म. ग्रं सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. 3५

रंग इंद्रधनूचे...

विद्याधर गोखले



REFBK-0026895

संदर्भ
निबंध
३५२९
२९८९५
१३१९३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

24 JUL 1993

20 NOV 1993


22 DEC 1993

5 [illegible] 1994

2 FEB 1994

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

REFBK-0026895



विद्याधर गोरवले

वसंत बुक स्टॉल मुंबई

प्रकाशक
अरविंद रघुनाथ तेंडुलकर
वसंत बुक स्टॉल
न. चिं. केळकर रोड,
हनुमान मंदिराजवळ
दादर,
मुंबई ४०० ०२८

(c) विद्याधर गोखले

•
प्रथमावृत्ती
जुलै १९९०
•
मुखपृष्ठ
सुहास चांडक

मुखपृष्ठ छपाई
बॉंबे सर्वोदय प्रेस, मुंबई
•
मुद्रक
सौ. शामला अनंत चिंचणीकर
माधुरी मुद्रण
४४३, शिवाजीनगर, पुणे ५.

मूल्य : ऐशी रुपये

माझे ज्येष्ठ मेहुणे व मित्र

श्री. मधुकर दत्तात्रय महाजन

आणि

सौ. नलिनी मधुकर महाजन

ह्यांना सप्रेम अर्पण

— लेखक

प्रकाशकाचे चार शब्द

●

श्री. विद्याधर गोखलेलिखित 'शायरीचा शालीमार', 'दीपमाळ', 'हिंदुत्वाचा महामेरू' ह्या पुस्तकांनंतर 'रंग इंद्रधनूचे' हे गोखलेआण्णांच्याच चटकदार लेखणीतून उतरलेले नवे पुस्तक प्रकाशित करण्यास आम्हास फार आनंद होत आहे. सध्या ते लोकसभेचे खासदार झाले असले, तरी आपल्या खास रसिल्या शैलीमुळे ते विद्वत्सभेचे कायमचेच खासदार आहेत ! मराठी वाचक ह्या त्यांच्या नव्या लेखसंग्रहाचेही उत्तम स्वागत करतील अशी आम्हांस खात्री आहे. आम्ही आण्णांचे आभारी आहोत.

प्रस्तुत पुस्तकाचे संपादन व प्रस्तावना-लेखन सौ. माधवी चाफेकर, (मराठी विभाग प्रमुख, खालसा कॉलेज, मुंबई) ह्यांनी अगदी चोख केले आहे. वेळात वेळ काढून हे सहकार्य दिल्याबद्दल आम्ही या विदुषीचे आभार मानतो.

मुद्रक सौ. शामला अनंत चिंचणीकर आणि मुखपृष्ठ चित्रकार श्री. सुहास चांडक आणि आम्हांस निरंतर आश्रय देणारा वाचकवर्ग यांचेही आभार.

— अरविंद तेंडुलकर

..... आणि मग लक्षांत येते ते शब्दांशब्दांतून
जाणवणारे श्री. गोखल्यांचे रसिक, विदग्ध,
व्युत्पन्न व्यक्तिमत्व. विद्वान व रसिक पंडितांच्या
मेळाव्यांत बसून अभिजात साहित्य गोष्टी करणारे
गोखले आपल्या वाचनाच्या, निरीक्षणाच्या,
व्यासंगाच्या पोतडीतून इंद्रधनूची एकेक नवी
रंगछटा दाखवीत आहेत व विविध रसधारांची
बरसात करीत आहेत असा प्रत्यय येत रहातो.
संस्कृत, उर्दू, मराठी काव्यपंक्तीच्या
अवतरणांच्या बरसातीत वाचकांची मने भिजून
चिंब होतात.



संपादन आणि प्रस्तावना
प्रा. सौ. माधवी चाफेकर
मराठी विभाग प्रमुख
खालसा विद्यालय, मुंबई - १९

लेखकाचे प्राक्कथन

●

सप्तरंगांचे सौंदर्य केवळ आकाशातील इंद्रधनुष्यातच असते असे नाही, रसिक वृत्तीने पाहिल्यास ते दुनियेत ठायी ठायी दिसून येते. कित्येक रोखठोक व्यवहारी घटना, बाह्यतः रुक्ष दिसणाऱ्या व्यक्ती आणि मामुली वस्तु कित्येक मनोहारी भावनांचे नि कल्पनांचे रंगतदार तरंग हृदय-सरोवरात निर्माण करतात. ते शब्दबद्ध करण्याचा छंद मला लहानपणापासूनच जडला आहे.

म्हणूनच सुमारे ४० वर्षांच्या वृत्तपत्र-व्यवसायात, दैनंदिन जीवनाचा जसा निखळ वास्तवतावादी परामर्श मी घेतला तसेच त्याचे रसिकावलोकन करणारे अनेकानेक लेख मी लिहिले. त्यातील काही लेखांचा हा संग्रह — " रंग इंद्रधनूचे "

त्याचे नामकरण व संपादन ' खालसा कॉलेज ' (मुंबई)च्या मराठी विभाग-प्रमुख सौ. माधवी चाफेकर ह्यांनी अत्यंत साक्षेपाने केले आहे. इतकेच नव्हे तर, माझ्या ह्या लिखाणातील बलस्थाने आणि मर्मस्थानेही वाचकांपुढे मांडणारी एक अभ्यासपूर्ण प्रस्तावनाही त्यांनी मो ा आस्थेने लिहिली आहे. मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

' वसंत बुक स्टॉल 'चे कष्टाळू मनमिळाऊ प्रकाशक श्री. अरविंद तेंडुलकर ह्यांनी ह्या ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन केले असून, थोडक्याच वेळात सुबक मुद्रण माधुरी मुद्रण ह्यांनी केले आहे. त्यांचा, तसेच मुखपृष्ठचित्रकार श्री. सुहास चांडक ह्याचा मी आभारी आहे.

ह्यापूर्वी ' दीपमाळ, ' ' सौरभ ' हे माझे दोन लेखसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत, त्यांच्याप्रमाणेच या नव्या ग्रंथाचेही रसिकवाचक यथायोग्य स्वागत करतील अशी आशा आहे.

— लेखक

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३५९
दि. २६.६.९५
निवड ७३।९३

"रंग इंद्रधनूचे ...."

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

आकाशातल्या इंद्रधनुष्यात प्रमुख रंग सातच असले, तरी ते एकमेकात मिसळून इतक्या असंख्य रंगच्छटा निर्माण झालेल्या असतात आणि त्यांचा इतका रम्य रंगविलास दिसतो की त्याकडे पाहताना त्या सर्व रंगांचे सौंदर्य डोळ्यात साठविताना दमछाक व्हावी. श्री. विद्याधर गोखल्यांचे वर्तमानपत्रे, मासिके इ.मध्ये विखुरलेले स्फुट ललितलेखन याच स्वरूपाचे आहे. श्री. गोखल्यांच्या प्रतिभेचे इतके विविध पैलू या लेखनात इतक्या विविध स्वरूपात प्रकट झाले आहेत की हे लेखन एकत्र केल्याशिवाय त्याचे समग्र सौंदर्य लक्षात येणार नाही आणि हे लेखन असेच फुटकळ स्वरूपात राहिल्यास ते कालांतराने दुर्लक्षित होईल व एक अमोल साहित्यठेवा आपण गमावून बसू. म्हणून या संग्रहाचा प्रपंच !

श्री. गोखले 'लोकसत्ते'चे संपादक असताना रविवारची लोकसत्ता म्हणजे साहित्य-शास्त्र-मनोरंजनाची मेजवानीच असे. यातला श्रेयाचा सिंहाचा वाटा गोखल्यांचा होता. या संग्रहात 'रविवारच्या लोकसत्ते'त प्रसिद्ध झालेले जवळजवळ वीसएक लेख घेतले आहेत. इतर लेख विविध मासिके, दिवाळी अंक यात प्रसिद्ध झालेले आहेत.

वर्तमानपत्री लेखन

म्हणजे हे मुख्यत: वर्तमानपत्री लेखन आहे. या लेखनाची काही स्वत:ची वैशिष्ट्ये असतात. मुख्यत: हे लेखन चटकदार हवे, तसेच ते सोपे हवे. उगाच किचकट शब्दांच्या रुक्ष जंजाळाने ते जटिल बनले तर कुणी ते हातातही धरणार नाही. मात्र याचा अर्थ ते 'बाळबोध' हवे किंवा अगदी खालच्या वैचारिक पातळीवरचे हवे असेही नाही. सुगम असून अत्यंत चटकदार, आकर्षक, चैतन्यपूर्ण, लेखकाची रसिकता, व्युत्पन्नता दाखविणारे असे ते हवे. ही तारेवरची कसरत गोखल्यांना चांगली जमली आहे. संस्कृत, उर्दू, इंग्रजी व मराठी या चारही भाषांतील साहित्याचा त्यांचा व्यासंग, उत्तम स्मरणशक्तीमुळे चटकन् सुचणारी चपखल अवतरणे, ठराविक लांबीच्या लेखनाच्या शक्तीमुळे आलेला आटोपशीरपणा, कोणत्याही विषयावर लेखन केले तरी ते तितकेच आकर्षक करण्याचे आव्हान पेलणारी प्रतिभा, शब्दप्रभुत्व व कल्पनाविलास, अत्यंत अर्थपूर्ण आणि चटकदार शीर्षके - हे आणि असे इतर अनेक विशेष या वर्तमानपत्री लिखाणातून दिसतात. या लेखनातील

एक धोका हा की याचे मूल्य तात्कालिक असते. त्या क्षणाची, त्या दिवसाची गरज भागली की त्याचे महत्त्व संपले, पण गोखल्यांची लेखणी या तात्कालिकतेपलीकडे गेली आहे. एकाच वेळी तिला तात्कालिक आणि चिरकालिक अशी दोन्ही मूल्ये आहेत. त्यामुळेच त्या त्या वेळी चटकदार वाटलेले हे लेखन आजही ताजे टवटवीत वाटते. आजही त्याचे वाङ्मयीन मूल्य जराही कमी झालेले नाही. त्याची प्रसन्नता आपल्या मनाला आजही तरतरी आणते.

या लेखांचे विषय तसे हलकेफुलके आहेत. 'मुंबईतले पानवाले, रशियाला प्रथमच होणारी केळ्यांची-'रंभाफळांची'-निर्यात, विश्वसुंदरी-स्पर्धा, आरसा, झोपाळा, हळदकुंकू इत्यादि. पण हे विषय हाताळताना गोखल्यांनी जे चातुर्य वा रसिकता दाखविली आहे, ती लाजवाब आहे. बऱ्याच वेळा हे विषय म्हणजे रुक्ष बातम्या आहेत. पण ते नुसते नाममात्र आधाराला घेऊन आपल्या लेखात आपल्या भाषा-वैभवाची, रसिकतेची साक्ष पटविणारी गोखल्यांची सिद्धहस्त भाषाशैली अप्रतिम आहे. एकीकडे काहीतरी चटपटीत वाचनाची इच्छा करणाऱ्या आपल्या सामान्य वाचकवर्गाची आठवण ठेवूनही त्यांना एका वेगळ्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न करणारे हे लेखन आहे.

या विषयांमध्ये वैचित्र्यही भरपूर आहे. निरर्थक व न शोभणाऱ्या पदव्या देण्याचा व घेण्याचा त्रास, विश्वसुंदरी स्पर्धा, केळ्यांची निर्यात, पानवाले, चंपीवाले मोरारजींचा वेगळा आहार, हळदकुंकू, चिलीम, चिरूट, निदर्शने, जुगार, चंद्रावर मानवावतरण, केसांचे टोप - असे कितीतरी भिन्नभिन्न ! पण गोखल्यांच्या लेखनात विषय महत्त्वाचा नाहीच. त्या विषयाच्या निमित्ताने ते काय म्हणतात, ते महत्त्वाचे आहे. त्यांनीच एका लेखात दिलेल्या अवतरणाप्रमाणे,

जाति न पूछो संतकी
देख लियोजी ग्यान ।
मोल करो तलवारका
पडा रहा दो म्यान ।।

हे त्यांच्या लेखांच्या आशय-अभिव्यक्तींच्या बाबतीतही या अर्थाने खरे आहे.

आकर्षक शीर्षके

या लेखांची शीर्षके नुसती आकर्षकच नाहीत, तर त्यांच्यात एक अनपेक्षिततेचा धक्का आहे. भारतीय केळ्यांच्या निर्यातीला ते 'रंभा-फळांचा विश्वसंचार' म्हणतात. तर आंब्यांवरील लेखात आम्रफळांचा उल्लेख 'मधाने भरलेली सोन्याची अंडी' असा करतात. 'निळे डोळे, काळे केश !', 'हे खंजीर आणि ते खंजीर', 'जुगाराचा जागतिक एल्गार' या शीर्षकांना एक ताल आहे, लय आहे आणि ती शीर्षके लेख वाचावा असे वाटायला लावण्याइतपत मनोवेधक व वाचनानंतर सार्थ वाटतील अशी आहेत. 'ठसकेबाज

चिलम-सुंदरी ' या शीर्षकातील अर्थवाही ' ठसका ' आणि राष्ट्रीय पक्षीपदाच्या स्पर्धेचे निमित्त करून लिहिलेल्या ' दिल्लीत घडलेली पक्षीय खडाजंगी ' या लेखाच्या शीर्षकातील ' पक्षीय 'मधील नर्म उपरोधसूचक आहे. या शीर्षकांप्रमाणेच लेखातील उपशीर्षकेही लक्षणीय आहेत. ' सौंदर्याला फूटपट्टी ? ', ' नील-कमलांचे गर्वहरण ', ' नर्गिस-निम्मी यांच्यामध्ये महात्मा गांधी ', ' महाराष्ट्राच्या मधुर फळांवर मॉस्कोची मोहब्बत ', ' चल सखे आंब्याच्या वनात ग ' इत्यादि उपशीर्षके त्या त्या लेखाचे वेगळेपण मोठ्या आकर्षकरीत्या प्रगट करून लेखाची रंगत वाढवितात. ' जुगाराचा जागतिक एल्गार ' या लेखातील घोड्यांच्या शर्यतीवरील परिच्छेदाचे शीर्षक आहे — ' जुगाराची घोडदौड. ' या सर्व शीर्षकांत नाट्य आहे, काव्य आहे, विनोद आहे — किंबहुना या लेखांच्या अंतरंगात आपल्याला कोणकोणती वैचारिक व कल्पनाविलासाची मौज अनुभवायला मिळणार आहे त्याची ही शीर्षके म्हणजे झलकच आहेत.

माहितीचा सागर

यातील अनेक लेखात आपल्याला प्रचंड माहिती मिळते. ही दोन प्रकारची आहे. एक अगदी रुक्ष, आकडेवारीवजा — कदाचित् हा वर्तमानपत्री पार्श्वभूमीचा परिपाक असावा. अशी माहिती लेखाच्या ललित्याला अर्थात्च मारक ठरते. याने एवढेच सिद्ध होते की अशा माहितीचा आपल्या लेखात समावेश करूनसुद्धा आपल्या लेखांचे ललित स्वरूप टिकवून ठेवण्यात गोखले यशस्वी झाले आहेत. व अशी बरीच माहिती इथे गाळली आहे. दुसऱ्या प्रकारची माहिती वेगळी आहे. वाचकांच्या ज्ञानात वेगळ्या अर्थाने भर घालणारी, त्याला व्युत्पन्न करणारी आहे. यांत आख्यायिका, दंतकथा, वाङ्मयीन, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संदर्भ, सुभाषिते, श्लोक, अन्योक्ति, उर्दू शेर — या साऱ्यांचा समावेश होतो. याच्या जोडीला गोखल्यांचे शीघ्र-कवित्व आहेच. तर कुठेकुठे त्यांनी ' क्वचित् रम्या रामा ' या श्लोकाचे खचित् रम्या रामा हे नर्गिसला उद्देशून तर ' खचितचि जराजर्जरतनुः ' हे मामा वरेरकरांना उद्देशून केलेले विडंबन आहे. पूर्वीच्या कुण्या एका उमेदवार कवीने शब्दांची, अर्थाची अशी मोडतोड केली आणि तरीही काय काव्य (!) निर्माण झाले ते माहीत असल्याशिवाय ' पक्षीय खडाजंगी 'मधील ' उत्तिष्ठ उत्तिष्ठ राजेन्द्र ' या अवतरणातील रंगत लक्षात येणार नाही. मूळ श्लोक असा आहे —

उत्तिष्ठ उत्तिष्ठ राजेन्द्र
मुखं प्रक्षालयस्व टः ।
प्रभाते रोदिति कुक्कु —
च वै तु हि च वै तु हि ॥

— तिसऱ्या चरणात एक अक्षर ज्यादा व दुसऱ्या चरणात एक कमी ही अडचण सोडविण्यासाठी कवीने तिसऱ्या चरणातील टः हे अक्षर दुसऱ्या चरणात सुटे बसविले.

इतका खटाटोप करूनही चवथा चरण सुचेना. तेव्हा च, वै, तु, हि ही चार पादपूरकेच पुनरुक्तीने वापरली. याच लेखांतील 'यशवंती' संगिनीचा हल्ला, पंचशील इ. उल्लेखांना जरी आज ऐतिहासिकता प्राप्त झाली असली, तरी ते दुर्बोध वाटत नाहीत. पान-तंबाखू या विषयावर ललित लेख लिहिण्याइतकी माहिती व ती ललितरीत्या पेश करण्याइतकी रसिकता गोखल्यांकडे आहे. या लेखातील भरपूर व बारीकसारीक तपशील पाहिला की लेखनामागील लेखकाची मेहनत लक्षात येते. विड्याच्या पानात इतका रस असू शकतो हे हा लेख वाचल्यावर पटते. जुगारावरील लेखाची सुरुवात 'जा सहदेवा, थोडा अग्नि आण, म्हणजे ह्या धर्माचे हे जुगारी हातच जाळून टाकतो,' हे भीमाचे भीषण बोल काय धर्माच्या कानी गेले नसतील ?' अशा प्रश्नालंकाराने होते. मग हळूहळू महाभारतातला जुगार, 'मृच्छकटिकां'तला जुगार, इंग्लंडमधील 'रॉयल ॲस्कॉट रेसेस्' मग शतरंज, नंतर 'कसिनो'मधील जुगार अशा क्रमाक्रमाने वळणे घेत हा लेख परमेश्वर एक जुगारी, आपण सर्व प्यादी अशा आध्यात्मिक विचारावर संपतो. या प्रचंड माहितीमध्ये आपल्य लेख-विषयांच्या अनुरोधाने गोखले तार्किक सुसंगती शोधतात नि एका सुबद्ध, प्रमाणशीर लेखनाचा जन्म होतो. कधी एखाद्या स्थानाची व्युत्पती ते सांगतात. कश्यप ऋषींनी काश्मीरदरी प्रथम वसाहतीस योग्य केली. म्हणूनच त्यांचे नाव तिला प्राप्त झाले. 'कश्यपमीर'चा अपभ्रंश काश्मीर असा झाला. लोकमान्य पानबाजाराचे उद्घाटन १९१६ साली लोकमान्यांच्या हस्ते झाले, इ.

निरीक्षण

या लेखनामागे मेहनतीबरोबर सूक्ष्म निरीक्षणही आहे. मानवी मनाचे, स्वभावाचे, विविध स्थळांचे आणि असंख्य बारीक सारीक गोष्टींचे. पानाची गादी व पानपट्टीचे दुकान यातला फरक त्यांनी खुलवून सांगितला आहे. काश्मीरचे प्रवासवर्णन असेच बारीकबारीक तपशिलांनी भरले आहे. मात्र हे तपशील रुक्ष न राहता त्यांना कल्पनाविलासाची जोड मिळाल्यामुळे ते लेखाच्या रमणीयतेत भरच घालतात. पठाणकोट ते श्रीनगर हा २६७ मैलांचा, बसने दीड दिवस लागणारा वळणावळणाने वर जाणारा मार्ग — त्याला गोखले वर्तुळाकार जिना म्हणतात. तर बनिहाल ते अपर-मुंडा हा वर्तुळाकार नागमोडी अत्युच्च घाट म्हणजे त्यांना नीलकंठाच्या गळ्याभोवताली विळखे घातलेला सर्पराजच वाटतो. पानशौकिनांचे अनेक प्रकार ते सांगतात — पानपट्टीवाल्याकडे आपल्या आवडीनुसार पान खाणारे, आपल्या सूचनेबरहुकूम बायकोने वा मुलीने तयार केलेले विडे एखाद्या डबीतून आपल्याबरोबर बाळगणारे; जुन्या पद्धतीची पानाची चंची सदैव जवळ ठेवणारे इ. तसेच एकट्या मुंबई शहरात एक लक्ष रुपयांची पाने लोक खातात किंवा खाऊन थुंकतात ! (आकडे १९५६ सालचे) 'गावोगाव भटकणारी गतिमान् शायरी' या लेखात तर अनेक मालवाहिकांच्या (गोखल्यांचा शब्द) पाठीमागील भागावर लिहिलेल्या शायरीचे संकलन

आहे. पण त्या सर्व तुटक काव्य-कणिकांतून त्यांनी एक सुबद्ध, तार्किक, सुसंगत निवेदन उभे केले आहे.

लेखनशैली व भाषाशैली

एका शब्दात वर्णन करायचे तर श्री. गोखल्यांची ललित लेखनाची ही शैली " प्रसन्न " आहे. ही प्रसन्नता तिला प्राप्त होण्यासाठी अनेक घटक कारणीभूत झाले आहेत. लेखाचे शीर्षक व प्रारंभ हेच मुळी ' आता काहीतरी नवीन आणि रसपूर्ण, कल्पनाविलास दाखविणारे वाचायला मिळणार, ' हा विश्वास वाचकांच्या मनात उत्पन्न करतात. कधी कधी लेखात माहिती नवी नसते, नवी असते ती तिची हाताळणी. लेखात नाट्य कसे निर्माण करायचे ते सिद्धहस्त नाटककार गोखल्यांना पूर्ण अवगत आहे. त्याप्रमाणेच त्यातील काव्यमयतेचे श्रेय शीघ्रकवि व रसिक अशा गोखल्यांकडे जाते. कधी राजकीय उपहास, उपरोध यांची कास धरीत तर कधी सामाजिक टीकाटिप्पणी करीत खुसखुशीत शैलीत केलेले हे लेखन मनाला प्रसन्न विदग्धतेचा प्रत्यय आणून देते. यात कुठेही बोचरेपणा नाही, आचरटपणा नाही, बाष्कळपणा नाही, आहे ती आस्वादक विदग्ध रसिकता.

तार्किक सुसंगतीमुळे लेखनाला प्रवाहीपणा आला आहे. त्या ओघात आपण लेखाच्या शेवटापर्यंत रसपूर्ण आस्वाद घेत जातो. गोखल्यांच्या हजरजबाबी बुद्धीची झलकही या लेखात दिसते. ' द्वैभाषिक की द्वैभार्यिक ' या लेखात त्यांनी दोन बायकांच्या दादल्यांची उत्कृष्ट वकिली केली आहे, तीही द्वैभाषिकाच्या पार्श्वभूमीवर. शाब्दिक कोट्यांचा हव्यास त्यांना बऱ्याच ठिकाणी आवरता आला नसला तरी तो अभिरुचिपूर्ण असल्याने आपली तक्रार नसते. ' रंभा फळांच्या ' लेखात ' केळकरी पंथ ' आणि ' हरिद्रा-कुंकुम ' लेखात ' टिळक-पंथ ' अशा कोट्या सदभिरुचीला धरून आहेत. साहित्यसंमेलनांच्या भ्रष्ट रूपावर व व्याख्यानांचा हंगामा साजरा करणाऱ्या वक्त्यांवर कोरडे ओढले आहेत. पण त्यात मी-पणाचा अभिनिवेश कुठेही नाही. त्यामुळे या टीकेत कटुता नाही. टीका करणाऱ्याने ही टीका भल्या बुद्धीने व परार्थ विचारानेच केली आहे, हे त्यातून जाणवते. संस्कृत अवतरणे, आख्यायिका, कविसंकेत, उर्दू शेर इ. मधून असे वाटत राहाते की श्री. गोखले मनाने कायम या रसिक विद्वज्जनांत स्वत: वावरतात आणि वाचकांनाही त्यांच्याच सहवासात नेण्याच्या इच्छेने लिहितात. मात्र सद्य स्थितीची, वर्तमानाची जाणीवच त्यांना नाही असा याचा अर्थ नाही. ' जा घेऊन संदेश जलधरा ! ' या लेखात ते मेघाला श्री शंकराला पोहोचविण्यासाठी संदेश देतात, तो ' गरिबांच्या मस्तकावर तुझा वरदहस्त ठेवून आणि उन्मत्तांच्या उरावर तुझा त्रिशूल रोवून हा तुझा देश सुखी, समृद्ध कर ! ' असा सर्वांच्या जिव्हाळ्याचा. गोखल्यांची नाटके - संगीत नाटके - एका विशिष्ट रसिक प्रेक्षकवर्गासाठी आहेत. त्यांची विचारपूर्ण भाषणे एका विशिष्ट श्रोतृवर्गासाठी आहेत. तर त्यांचे हे ललित लेखन वैचारिक, रसपूर्ण, विदग्ध लालित्याची भूक लागलेल्या वाचकवर्गाच्या

तृप्तीसाठी आहे. एकट्यानेच अंतर्मुख होऊन आस्वाद घ्यावा अशा स्वान्त:सुखाय हे वाचन easy-chair reading आहे. या लेखनशैलीला अर्थात्च गोखल्यांच्या भाषाशैलीची साथ लाभली आहे.

या भाषेत संस्कृतचा भारदस्तपणा आहे, उर्दूची रंगेल रसिकता आहे, मराठीचा रोखठोकपणा आहे. विषयाला अनुरूप अशा संस्कृत, उर्दू, मराठी काव्यपंक्तींच्या अवतरणांच्या बरसातीत वाचकांची मने चिंब भिजून तृप्त होतात. 'एकात्मतेचा साक्षात्कार' या लेखात प्रियेच्या कृश कटीबद्दल 'अस्ति नास्तीति संदेह:' ह्या संस्कृत प्रियकराच्या संदेहाच्या पाठोपाठ 'सनम सुनते है तेरे भी कमर है' अशी खट्याळ उर्दू उक्ति सांगून गोखल्यांनी भिन्न भाषांतील साहित्यातली एकात्मता प्रकट केली आहे. मग या अवतरणांच्या वर्षावात 'एकं सत् विप्रा: बहुधा वदन्ति' अशा आध्यात्मिक अवतरणापासून ते 'श्वा, युवा, मघवा' अशी कल्पनाचमत्कृति किंवा 'अन्यदार-निहिता नखव्रणा: । तावके वपुषि पीड्यन्ति माम् ॥' अशा शृंगारिक संदर्भाचाही समावेश होतो. लिहिण्याच्या ओघात लोकवाहिका (बस) व मालवाहिका (ट्रक) असे भाषांतरित शब्द ते योजतात. तर कधी quarntineचे भाषांतर 'सुरक्षित स्थानबद्धता' असे करतात. पान खाणाऱ्यांचे थूक-संप्रदाय व अथूक - संप्रदाय असे दोन संप्रदाय ते सांगतात. 'मानवाचा खाबूपणा असा पुरातन आहे' असे मिष्किल किंवा 'ह्या खाबू देशाने फार प्राचीन काळापासून आहार-शास्त्रात रस घेतला आहे' किंवा 'आमच्या पूर्वजांनी ह्या भोजनशास्त्राचा कीस काढला असून...' अशी चमत्कृतिपूर्ण वाक्ये ते सहज लिहून जातात. जुगारी अड्ड्यांची 'व्रात' व 'किमतशाला' अशी संस्कृत नावे किंवा 'इंदीवर' म्हणजे निळे कमळ, 'नेता' म्हणजे नेणारा, अशा संस्कृत शब्दांच्या नेमक्या अर्थाबद्दल गोखले काटेकोरपणे जागरूक असतात. 'मोहब्बतीच्या माषुक मुलखांत अन् काव्याच्या कमनीय कुंजांत' अशा वाक्यांतून त्यांनी उर्दू-संस्कृतवरील आपल्या प्रभुत्वाच्या दर्शनाबरोबरच अनुप्रासांची हौसही भागवून घेतली आहे. "मूक निदर्शन' म्हणजे दक्षिण ध्रुव ते दाक्षिण्यपूर्ण असते" अशी चमकदार वाक्ये मधूनमधून भेटतात. 'पक्षीय खडाजंगी 'मधील 'तोरा हरणारा सौंदर्य-तुरा' हा शेवटचा भाग म्हणजे निखळ गद्यकाव्य आहे. वर्ण्य विषय वाचकांच्या नजरेपुढे उभे करणारी चित्रमय शैली या लेखांच्या लालित्याला अधिकच शोभा आणते.

काही नगण्य दोष !

छिद्रान्वेषी दृष्टीला या लेखनात काही दोष दिसू शकतील. मात्र त्यांचे निराकरणही करता येईल. पहिला म्हणजे या लेखात उत्स्फूर्तता नाही. सर्व लेखन मोजूनमापून बेतलेले दिसते. वर्तमानपत्री लिखाणाची शिस्त लक्षात घेतल्यास या दोषाला आपण दोष म्हणणार नाही. उलट इतक्या वेगाने लेखन करावे लागूनही ते इतके लालित्यपूर्ण, विचारपूर्ण, भारदस्त होऊ शकले याचेच अप्रूप वाटेल. 'श्रीगौरीच्या सान्निध्यात हराला बरे वाटते त्याप्रमाणे

त्या हरभऱ्यांनादेखील — ' अशी एखादी पोरकट कोटी लेखकाला टाळता आली नाही. पण हा प्रकार अपवादात्मकच आहे. आणि वर्तमानपत्री लिखाणात तो कधी कधी अपरिहार्य असल्यामुळे क्षम्यही आहे. इष्क, माषुक, प्रियकर इ. चा जरा अतिरेकच गोखल्यांच्या लिखाणात दिसतो असा आक्षेप घेता येईल. पण या सर्व लेखांतून त्या अतिरेकावर गोखल्यांनी आपल्या सद्‌भिरुचिपूर्ण संयमाचा लगाम घातला असून रसभंग होईल अशा रीतीने वा अशा प्रमाणात हे उल्लेख केलेले नाहीत हे लक्षात येईल. ' स्वातंत्र्यवीरांचे वंदे मातरम् ! ' या उदात्तगंभीर लेखात या गोष्टीचा चुकूनही उल्लेख नाही. हा लेख या संग्रहातील इतर लेखांपेक्षा अनेक बाबतीत वेगळा आहे. या लेखाचे उपशीर्षक आहे — ' एक रसिकावलोकन ! ' बंकिमचंद्रांच्या ' वंदे मातरम् ' या राष्ट्रगीताला एक मंत्रद्रष्टा भाष्यकार स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने इ. स. १९०६ साली मिळाला. या गीतावरील सावरकरांचे भाष्य म्हणजे एक गद्य काव्य आहे. आणि सावरकरांच्या या लेखाचे रसग्रहण श्री. गोखल्यांनी या लेखात केले आहे. लेखाचा विषय उदात्त, गंभीर व भारदस्त आहे. आणि त्याचे रसग्रहण करताना गोखल्यांच्या लेखणीनेही नेमका तोच सूर पकडला आहे. या लेखात गोखल्यांनी स्वत:च्या भाषाशैलीचे वेगवेगळे उन्मेष दाखविले आहेत. मूळ गीताइतकेच तेजस्वी असलेले हे भाष्य म्हणजे त्यांना भगवद्‌गीतेच्या अनुरोधाने स्वतंत्र प्रतिभेने रचलेल्या ' ज्ञानेश्वरी ' या काव्यमय भाष्याप्रमाणे प्रतिभाशाली भाष्य वाटते. ते म्हणतात, — ' हे केवळ गद्यकाव्य नव्हे तर एका क्रांतिकारक ऋषीच्या लेखणीतून प्रकटलेले पुरुषसूक्त आहे, मातृ-उपनिषद आहे.... ' या लेखात गोखल्यांच्या भाषेला वेगळाच बहर आला आहे. सावरकरांच्या अर्थघन संक्षेपशैलीबद्दल ते म्हणतात, — ' एखादे विशाल भरजरी नि गभरेशमी महावस्त्र एखाद्या लहानग्या टीचभर पेटीत ठेवावे.... '

मात्र या सर्व लेखांमध्ये, ' वंदे मातरम् ' या लेखासारखा एखादा सन्मान्य अपवाद वगळल्यास, एकच त्रुटी मला प्रकर्षाने आढळते. ती म्हणजे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या दारुण दु:खभावनेला किंवा मृत्यु-विचाराला गोखले कुठेही स्पर्शदेखील करीत नाहीत. काश्मीरमधील दल-सरोवरातील शांत बेटावरदेखील त्यांना अध्यात्मविचार सुचत नाही, तर ' एक चंदा आसमाँपर, एक हमारे पास है । ' एवढेच सुचते, त्यापुढे निर्वाण-सुखही फिके वाटते. — यातच श्री. गोखल्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे रहस्य दडलेले दिसते. ते ऐहिकांतच त्या परब्रह्माचे रूप पाहतात आणि या ऐहिकाच्या रसपूर्ण, उच्च पातळीवरून घेतलेला आस्वाद हे या दृष्टिकोनाचे सूत्र आहे. त्यांचे केवलानंदनादित्व हे त्यांच्या लेखनाचे जसे सामर्थ्य आहे तशीच ती त्या लेखनाची मर्यादाही आहे, हे लक्षात घेऊन त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये पाहायला हवीत. म्हणजे त्यांच्या लेखनावर अन्यायही होणार नाही आणि आपल्यालाही त्याचा मनसोक्त आस्वाद घेता येईल.

व्यक्तिमत्व


आणि मग लक्षात येते ते या सर्व लेखनातून पानोपानी, शब्दाशब्दातून प्रकट होणारे श्री. गोखल्यांचे रसिक, विदग्ध, व्युत्पन्न व्यक्तिमत्व. विद्वान् व रसिक पंडितांच्या मेळाव्यात बसून अभिजात साहित्यगोष्टी करणारे गोखले या लेखांतून दिसतात. संस्कृत, मराठी व उर्दू भाषांच्या प्रांगणात नेऊन आपल्याला अनेक सौंदर्यस्थळे दाखवितात, त्यातील सौंदर्य रसपूर्णरीत्या उलगडून दाखवितात. आपल्या स्मरणशक्तीच्या, वाचनाच्या, निरीक्षणाच्या, व्यासंगाच्या पोतडीतून इंद्रधनुष्याची एकेक नवी रंगच्छटा ते दाखवीत आहेत, आणि या रंगांच्या उधळणीबरोबरच विविध रसधारांची बरसात करीत आहेत असा प्रत्यय या लेखांच्या वाचकांना येत राहतो, आणि आपले डोळे तृप्त होतात, तद्वतच कसदार साहित्यस्वादाला लालचावलेल्या आपल्या आत्म्याचीही धणी पुरते नि आपलेही व्यक्तित्व समृद्ध झाल्याचा प्रत्यय येतो. वर्तमानपत्राची साप्ताहिक मागणी पूर्ण करणारे किंवा एखाद्या मासिकासाठी फुटकळ स्वरूपाचे म्हणून केलेले हे लेखन इतके रसपूर्ण असेल तर गोखल्यांनी गांभीर्याने, हेतुपूर्ण असे जर या प्रकारचे लेखन केले तर ते किती विदग्ध उंचीला पोहोचेल ? आखून घेतलेल्या चौकटीत राहूनही, त्या चौकटीची मर्यादा व बंधने पाळूनही, गोखल्यांचे लेखन या बंदिस्त चौकटीच्या बाहेरील विशाल व उंच अवकाशात झेप घेण्याचा पल्ला व भाषेचे, रसिकतेचे व्युत्पन्नतेचे सामर्थ्य दाखविते हे या लेखांचे वाङ्मयीन संचित आणि तात्कालिकतेला ओलांडून आज २५-३० वर्षांनंतरही ते ताजे, टवटवीत वाटते — त्यातले तत्कालीन, सामाजिक, राजकीय संदर्भ संपले तरी — हे त्यांचे सांस्कृतिक संचित !

— प्रा. सौ. माधवी अ. चाफेकर

'यशोदा सदन,' २ रा मजला,
सखाराम कीर रोड,
शिवाजी पार्क, मुंबई १६.

अनुक्रमणिका

- मोरपिसारा
- शब्दशार्दूलांचा देश
- घेराओ आणि घेरा होऽ !
- द्वैभाषिक की द्वैभार्यिक
- बिचारी आणि विचारी खंडिता
- चंद, चंद्रानना आणि चंद्रशेखर
- निळे डोळे, काळे केश !
- हे खंजीर आणि ते खंजीर !
- देशासाठी केसांची कुर्बानी !
- गावोगाव भटकणारी गतिमान शायरी !
- इस चंपी में बडे बडे गुन !
- मुंबईकरांच्या जीवनात रंग भरणारे पानवाले !
- स्वर्ग जर कोठे असेल तर तो हाच !
- रंभा फळांचा विश्वसंचार ! दिल्लीत घडलेली पक्षीय खडाजंगी !
- मधाने भरलेली सोन्याची अंडी !
- गव्हाची लज्जतदार बेटी !
- मोरारजींचे आहार-शास्त्र !
- जुगाराचा जागतिक एल्गार !
- उदार कांचेची चमकदार दुनिया !
- रम्य हा भारतीय झूला !
- हरिद्रा-कुंकुम
- ठसकेबाज चिल्म-सुंदरी ! सिगारेटचा बडा भाई !
- निदर्शने - ग्राम्य, सौम्य आणि रम्य
- महनीयांची महान् स्मारके !
- तुका म्हणे अवघे सोंग, तेथे कैचा पांडुरंग !
- व्याख्यानांचा हंगाम आणि हंगामा !
- साहित्यांतून एकात्मतेचा साक्षात्कार
- जा घेऊन संदेश जलधरा !
- स्वातंत्र्यवीरांचे वंदे-मातरम् !



१. मोरपिसारा

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

विदर्भाच्या भोजराजाची रूपसुंदर कन्या इंदुमती स्वयंवरमंडपात आली, तेव्हा देशोदेशींच्या राजांचे डोळे तिच्याकडे वळले. हजारो चकित नेत्र तिच्या सौंदर्याचे आकंठ पान करू लागले.

स्वयंवराला उपस्थित असलेल्या प्रत्येक राजाचा कंठ तिच्या सौंदर्यस्तुतीने धन्य झाला होता. आणि तिच्या हातांतील पुष्पमालेसाठी उत्कंठित होता. त्यांचे देहच काय ते सुवर्णासनावर आणि मन मात्र त्या लावण्यकलिकेभोवती रुंजी घालीत होते.

अशा वेळी मंद मंद पावले टाकीत ती हंसगामिनी राजसमूहात आली. लखलखीत सुवर्णाच्या आसनांवर राजेरजवाडे ओळीने बसले होते, आणि त्यांच्या समोरून ती यौवनाने रसरसलेली व सुवर्णालाही आपल्या अंगकांतीने लज्जित करणारी इंदुमती, पुष्पहार हाती घेऊन जाऊ लागली, तेव्हा काय झाले ? काय झाले, ते कालिदासाने फार बहारीने वर्णन केले आहे. तो म्हणतो—

संचारिणी दीपशिखेव रात्रौ
यं यं व्यतीयाय पतिंवरा सा ।
नरेंद्र-मार्गाट्ट इव प्रपेदे
विवर्ण-भावं स स भूमिपाल: ॥

[दुतर्फा भव्य राजवाडे असलेल्या एखाद्या राजमार्गावरून रात्रौ एखादी तेजस्वी दीपिका नेली तर काय होईल ? ज्या क्षणी ज्या प्रासादासमोर ती प्रकाशमान दीपिका असेल, त्या त्या प्रासादाचा चेहरा (म्हणजे त्याचा दर्शनी भाग) उजळून निघेल, पण जसजशी ती दीपिका पुढे पुढे जाईल तसतशी त्याच्या चेहऱ्यावर अंधाराची काळी छाया पसरू लागेल; अन् थोड्यात वेळात तो अंधारात पूर्णपणे बुडून जाईल ! त्याच प्रकारे नंतरच्या प्रासादाचा चेहरा प्रथम प्रकाशाने उजळेल आणि नंतर हळूहळू अंधारात मग्न होईल. त्या राजमार्गावरील सर्वत्र राजवाड्यांवर, दीपशिखेच्या क्षणिक सान्निध्यांत प्रफुल्लित होण्याचा व ती दूर जाताच अंधारात (जणू काही निराशेच्या अंधारात !) तोंड लपविण्याचा प्रसंग येईल !]

अगदी अशाच प्रकारचा प्रसंग स्वयंवरासाठी ओळीने स्थानापन्न झालेल्या त्या राजे लोकांवर ओढवला... तल्म रेशमी वस्त्र नि उंची उंची अलंकार धारण करून ती विदर्भ राजाची वंश-दीपिका इंदुमती, तिच्या प्राप्तीसाठी उत्सुक असलेल्या राजपंक्तीपुढून चालली होती. प्रत्येक राजाचा परिचय तिची सखी सुनंदा दहा-बारा ओळींत करून देत असे आणि तेवढाच वेळ ती राजकन्या त्या त्या राजापुढे उभी राहत असे. तेव्हा त्या राजाचा चेहरा आशेने फुलून जात असे. 'आता आपल्यालाच ही विश्वसुंदरी पुष्पमाला अर्पण करणार,' अशा आशेने तो उजळून निघत असे. पण अरेरे ! ती पुढे चालू लागताच तो उजळलेला चेहरा निराशेच्या अंधाराने काळवंडून जाई ! रघुवंशदीपक अज राजापुढे येईपर्यंत हा असा आशानिराशेचा, प्रकाशाचा नि अंधाराचा पाठशिवणीचा खेळ चालला होता !

कालिदासाची ही उपमा, इंदुमतीला दिलेली दीपशिखेची उपमा, रसिकांना इतकी काही आवडली की, त्यांनी त्या महाकवीला 'दीपशिखा कालिदास' ही पदवी बहाल केली. जनतेने दिलेली उत्स्फूर्त नि मार्मिक पदवी ही अशी असते. अशा पदव्यांची उदाहरणे काही थोडी नाहीत.

'माघ' कवीच्या 'शिशुपालवध' नावाच्या काव्यात रैवतक पर्वताचे बहारदार वर्णन आहे. त्यांत म्हटले आहे - " या पर्वताच्या एका बाजूस सूर्य अस्तास जात आहे आणि दुसऱ्या बाजूने चंद्र उगवत आहे, अशा वेळी हा धिप्पाड रैवतक कसा दिसतो, तर एखाद्या गजराजासारखा ! असा गजराज, की ज्याच्या एका बाजूस चांदीची वर्तुळाकार घंटा चांदीच्या साखळीस बांधून सोडली आहे नि दुसऱ्या बाजूस सोन्याची वर्तुळाकार घंटा सुवर्ण-रज्जूने खाली सोडली आहे !" रैवतक पर्वताला हत्तीची, सूर्य-चंद्रांना सोन्याच्या नि चांदीच्या घंटांची नि त्यांच्या किरणांना साखळीची ही उपमा रसिक पंडितांना इतकी यथातथ्य वाटली की त्यांनी उत्स्फूर्तपणे माघ कवीला 'घंटा माघ' अशी पदवी देऊन टाकली.

आणखी काही पदव्या

परंतु कालिदास-माघापर्यंत मजल मारण्याचेदेखील कारण नाही. अशा समर्पक नि उत्स्फूर्त पदव्यांची उदाहरणे अर्वाचीन महाराष्ट्रातही थोडीथोडकी नाहीत. कोण्या एका बैठकीत नारायणराव राजहंस यांचे सुश्राव्य गायन झाले. ते ऐकून लोकमान्य टिळकांच्या तोंडून सहजोद्गार प्रकटला, " हा मुलगा काय बालगंधर्वासारखं गातो !" झाले; त्या दिवसापासून नारायणरावांची 'बालगंधर्व' म्हणूनच सर्वत्र ख्याती झाली. पण ही पदवी देणाऱ्या टिळकांना तरी 'लोकमान्य' ही पदवी कशी प्राप्त झाली ? अगदी अशीच उत्स्फूर्तपणे. तो काळ 'राजमान्य राजेश्री'चा होता; 'रावसाहेब रावबहादुरां'चा होता. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या गंडस्थळावर झेप घेणाऱ्या त्या 'केसरी'ला - बाळ गंगाधर टिळकांना - राजमान्य

म्हणणे हा एक पदतो व्याघातच होता. ही गोष्ट कै. शि. म. परांजप्यांच्या मार्मिक नजरेतून सुटली नाही. त्यांनी एके प्रसंगी जाहीर केले, " मवाळ पक्षाचे पुढारी ' राजमान्य ' असले तर आमचा पुढारी बाळ गंगाधर टिळक हे ' लोकमान्य ' आहेत !" आणि हा विचार सर्व समाजाला इतका पटला की, लोकमान्यतेच्या सिंहासनावर टिळक हे नाव शोभू लागले !

' दीपशिखा कालिदास ', ' घंटा माघ ', ' बालगंधर्व ', ' लोकमान्य टिळक ' या मार्मिक नि सहजस्फूर्त पदव्यांच्या यादीत आणखी काही सुपरिचित पदव्यांची भर सहज घालता येईल. उदाहरणार्थ, दिनकर ढेरे हा गुणी कलावंत ' भावबंधन ' नाटकातील ' कामण्णा 'ची भूमिका इतक्या काही अभिजात अभिनयनैपुण्याने करीत असे की त्याचे नाव ' दिनकर कामण्णा ' असे पडले. ढेरे हे त्याचे उपनाव बाजूस पडले आणि ' दिनकर कामण्णा ' याच नावाने तो महाराष्ट्रात सर्वत्र गाजला; तीच त्याची पदवी होऊन बसली. 'दिनकर कामण्णा 'च्या धर्तीची एक जुनी पदवी म्हणजे ' यमक्या वामन.' वामन पंडितासारख्या महापंडिताला नि प्रथम श्रेणीच्या कवीला जनताजनार्दनाने प्रेमाने दिलेली ही पदवी — कविताकामिनीच्या पायात नादमधुर यमकांची पैंजणे बांधावीत, तर ती वामन पंडितानेच, असा अभिप्राय व्यक्त करणारी !

जरा सबूर !

पदव्या काय, अथवा गौरवाची विशेषणे काय, सहजस्फूर्त नि मार्मिक असावयास पाहिजेत. मोराच्या नैसर्गिक पिसाऱ्याप्रमाणे त्या शोभिवंत पाहिजेत. मोराची पिसे चिकटविणाऱ्या कावळ्याप्रमाणे, अथवा सिंहाची आयाळ गळ्यास चिकटवून बसलेल्या ग्रामसिंहाप्रमाणे, ' पदवीधरा 'ची अवस्था होता कामा नये. गुणांचे यथातथ्य मोजमाप घेऊन दिलेल्या स्वाभाविक पदव्या आणि वापरलेली विशेषणेच टिकून राहतात. पण दुर्दैवाने या ' पब्लिक शिट्टीच्या ' घोषणापटु युगात, या गोष्टीकडे आमच्या सरकारचे नि समाजाचे पाहिजे तेवढे लक्ष नाही.

अंदमानच्या अंधेरीत खडतर हालअपेष्टा वर्षानुवर्षे सहन केलेल्या; मृत्यूच्या दारात उभे असतानादेखील ' अवध्य मी अनंत मी !' अशी वीरोचित वृत्ती ठेवणाऱ्या सावरकरांना ' स्वातंत्र्यवीर ' ही पदवी शोभूनच दिसते. समाजाला ती पटते, विरोधकांनाही ती पटते आणि म्हणूनच ती १००वर्षानंतरही टिकून राहील. पण आपणास तुरुंगात ' ए ' क्लास मिळावा म्हणून वशिले लावणाऱ्या आणि ' थाट समरिचा दावी नट हा ' या जातीतील एखाद्या वाचिवीराला ही पदवी दिली तर ? तर ती पदवी देणाऱ्यांची नि घेणाऱ्यांची सारखीच शोभा होईल. तथापि, हा विवेक आपल्यात राहिला आहे कोठे ? ' राष्ट्रसंत ' ही पदवी समर्थ रामदासांनाच शोभून दिसते. पण जेव्हा तुकडोजी महाराजांनाही राष्ट्रसंत हे बिरुद बिलगते, तेव्हा (तुकडोजींविषयी यथाप्रमाण आदर बाळगूनही) असेच म्हणावे

लागेल की, " जरा सबूर ! पदव्यांचे अलंकारदेखील जरा पद्धतशीर वापरले पाहिजेत.' 'नहि चूडामणिः पादे, नूपुरं मूर्ध्नि धार्यते !' — चूडामणि पायाला बांधणे नि नूपुर मस्तकावर धारण करणे अयोग्य आहे. "

परंतु, हा विवेकी इशारा आजकाल कोणीच जुमानीत नाहीत. हे पदवी-युग आहे. आपल्या नावाच्या आगेमागे पदव्यांची शेपटे असल्याविना आपणास शोभा नाही, अशी कित्येक महाभागांची कल्पना झालेली आहे. बी. ए., एम. ए., टी. डी., बी. टी. इत्यादि शेपट्या पुढे जोडण्यात येतात, तर 'डॉक्टर', 'देशभक्त', 'क्रांतिवीर', 'संगीत चूडामणि', 'वैद्य पंचानन' या शेपट्या प्रतिगामी आहेत, म्हणजे त्या नावाच्या पाठीमागे लागतात !

गांधर्व विवाह

तथापि, उपर्युक्त पदव्या निदान परीक्षेला बसून संपादिलेल्या असतात, पण कोणत्याही परीक्षेला न बसता पदव्या पटकावून कृतार्थ झालेले कित्येक महाभाग आहेत आणि ते म्हणजे बहुशः कलावंत नि राजकीय पुढारी. कुठे २-३ नाटकांतील भूमिका बऱ्या झाल्या की 'नटवर्य' ही पदवी नावामागे झळकू लागली आहे. 'बाल गंधर्व', 'छोटा गंधर्व', 'सवाई गंधर्व' इत्यादि काही गंधर्व ठीकच आहेत. पण अल्प गुणांच्या भांडवलावर गंधर्व पदवीशी गांधर्व विवाह करणारे ग्राम-गंधर्वही कमी नाहीत. श्री. रघुवीर मुळगावकर आम्हा पत्रकारांचे मित्र आहेत आणि त्यांच्या चित्रांविषयी आम्हाला यथाप्रमाण आदरही आहे. पण पिकासो अथवा रविवर्मा यांनाही जे सम्राटपद मिळाले नाही. ते '(रंग) - सम्राट 'पद त्यांना (बहुधा दर कमी व्हावा या मतलबी हेतूने !) बहाल करणाऱ्या बहाद्दरांना काय म्हणावे ? मुळगावकरही त्यांना मनातल्या मनात हसत असतील. अभिनय, चित्रकला इत्यादि क्षेत्रांहून संगीत क्षेत्रात तर पदव्यांचा धुमाकूळ विशेषच माजला आहे. 'गान कोकिळा 'पासून 'गान कुक्कुटा 'पर्यंत विविध पदव्यांचे पंछी संगीताच्या कबुतरखान्यात जमा झाले आहेत. न शोभणाऱ्या पदव्या धारण करणारे महात्मे धन्य की या पदव्या देणारी भगत मंडळी धन्य, हा प्रश्न सूज्ञांपुढे उभा राहतो.

पण पदव्यांच्या बाबतीत भंपकगिरीची परमावधि ढोलबडव्या राजकारणातच पहावयास मिळते. सैन्यात न जाता वीर बनलेले पुढारी, आणि 'हायकमांड 'पुढे लांगूलचालन करीत असूनही 'सिंह' बनलेले नेते या पदवी-युगात पैशापासरी झाले आहेत. मौजेची गोष्ट अशी की, आपली विद्यापीठेही राजकीय पुढाऱ्यांना सढळ हाताने 'डॉक्टरेट 'ची पदवी बहाल करतात. या विद्यापीठीय लांगूलचालनावर काही दिवसांपूर्वी हैद्राबाद विधानसभेत एका आमदाराने मार्मिक टीका केली. तो म्हणाला, " सन इन् लॉ म्हणजे जावई, फादर इन् लॉ म्हणजे सासरा व ब्रदर इन् लॉ म्हणजे मेहुणा, इतकेच काय ते 'लॉ 'चे (कायद्याचे) ज्ञान असलेल्या पुढाऱ्याला 'डॉक्टरेट ऑफ लॉ' ही पदवी विद्यापीठाने दान करावी याहून

नादानपणा तो कोणता ?"

समाजवादी कमल-शोभा !

पण असा नादानपणा सर्वत्रच चालू असताना, केवळ विद्यापीठांनाच दोष का द्या ? आमचे सरकार तरी पदवीदानाच्या बाबतीत चोखंदळ आहे काय ? दर वर्षी 'पद्मभूषण' नि 'पद्मश्री' यांची जी खैरात दिल्ली दरबारात होते, तिच्याबाबत काटेकोर विचार झाला आहे काय ? मला तर त्या 'पद्मश्री' शब्दाची कींव येते. किती सुंदर शब्द ! पद्म म्हणजे कमळ. त्याची श्री म्हणजे शोभा. पण ही शोभा वाढण्याऐवजी, बिचाऱ्या कमळांची चांगलीच शोभा झाली आहे. त्या कमळांना आपण मानवांप्रमाणे मोर्चा काढण्याचे सामर्थ्य असते, तर त्यांनी नव्या दिल्लीच्या लोकसभेसमोर निषेध मोर्चा नेला असता ! इतका त्या 'पद्मश्री'च्या समाजवादी पद्धतीने (म्हणजे 'सब घोडे बारा टक्के' या पद्धतीने !) वापर चालू आहे. 'नर्गिस'च्या नावामागे पद्मश्री ही अक्षरे लागली, हरकत नाही. मीनाकुमारी नि वैजयंतीमाला या सुंदरींनाही वाटल्यास ती कमल-शोभा द्यावी ! पण तीच पदवी जेव्हा मामा वरेरकरांना देण्यात येते, तेव्हा मात्र सरकारच्या विनोदी रसिकतेची तारीफ करावीशी वाटते. वरेरकरांच्या वाङ्मयीन कामगिरीबद्दल सरकारने वाटल्यास त्यांचा सुखेनैव गौरव करावा, पण जी पदवी नर्गिसला तीच वरेरकरांना, वाः, एकाच सूत्रात श्वा, युवा नि मधवा यांना जखडणाऱ्या पाणिनीवर दिल्लीपतींनी कडी केली म्हणायची ! 'खचित् रम्या रामा' अशा नर्गिसला आणि 'खचितचि जराजर्जरतनुः' अशा मामा वरेरकरांना, एकाच 'पद्मश्री'च्या पद्मासनावर बसविणाऱ्या दिल्लीश्वरांची करामत जगदीश्वराहून लाजवाब आहे खरी !

●

(दीपावली : १९६१)

२. शब्दशार्दूलांचा देश

आपला देश ' अर्था 'च्या उत्पादनात मागासलेला असेल, पण शब्दांच्या उत्पादनात कोणत्याही देशाला हार जाणार नाही. या देशात कृतिशूर माणसे रशिया-अमेरिकेहून कमी असतील, पण शब्दशूर माणसे येथे नि:संशय जादा आहेत ! या देशाचे अणुशक्तीचे उत्पादन प्रगत राष्ट्रांच्या मानाने कमी असेल, पण शब्दशक्तीचे उत्पादन येथे लाजवाब आहे ! विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात, या महान देशात बोलघेवड्यांची निपज इतकी भरमसाट झाली आहे की, ' शब्दशार्दूलांचा देश ' अशी किताबत त्याला आलम दुनियेने बहाल करावी !

ही शाब्दिक प्रगती होणे क्रमप्राप्तच होते. कारण, गरज हीच अनेक गोष्टींची जननी ! आपणास शब्दांची अतोनात गरज होती. म्हणूनच आपल्या चौदाही राज्यांत, चौदाही प्रमुख भाषात आणि अनेक बोलभाषात शब्दांची बेसुमार दौलत निर्माण झाली. असे पहा की, कोणाला जगास ' स्पुटनिक ' द्यायचा आहे; कोणाला प्रचंड लष्करी मदत देऊन स्वत:चे पारडे ' जड ' करावयाचे आहे; कोणाला अन्य देशाना विकासकार्यासाठी कोट्यावधी रुपयांचे ' दान ' करावयाचे आहे; कोणाला ' भाई भाई 'चा उद्घोष करीत शेजारची राष्ट्रे घशात घालावयाची आहेत; कोणाला नवीन ' लाल बसाहतवाद ' यशस्वी करावयाचा आहे; जगाला भौतिक सुखसोयींची विस्मयजनक साधने उपलब्ध करून देण्याचा खुला नाद पाश्चिमात्य राष्ट्रांना जडला आहे; पण आम्हाला मुख्यत: ' पंचशीलांचा वेदांत ' जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचता करावयाचा आहे. आक्रमक राष्ट्रांनाही उदात्त संदेश देणे; बलिष्ठांकडे भीक मागता मागताही त्यांना उपदेशांची खिरापत वाटणे, हेच आमचे ईश्वरदत्त कार्य !

साहजिकच संदेश नि उपदेश यांचे माध्यम व्याख्यान (आणि व्याख्यानांचे माध्यम शब्द) हेच असल्याने त्यांचीच पैदास या आध्यात्मिक भारतात झाल्यास त्यात नवल कसले ?

पदवी-बहादर !

शब्दांना नाद असतो, पण आम्हास तर शब्दांचाच नाद जडला आहे ! या शब्दप्रीतीचे एक गमक म्हणजे आमच्या समाजात झपाट्याने वाढीस लागलेला पदव्यांचा सोस. कित्येकजण आपल्या नावाच्या आगेमागे पदव्यांच्या शेपट्या जोडतात. बी.ए., एम.ए., टी.डी. इत्यादि पदव्यांची शेपटे पुढे जोडली गेली, आणि 'डॉक्टर', 'क्रांतिवीर', 'लोकनायक' इत्यादि पदव्यांची शेपटे परंपरागत पद्धतीने मागे लावण्यात आली तर, त्यात विशेष काही वावगे नाही. पण नाही 'बी.कॉम.' तर 'डी.कॉम.' (डिप्लोमा इन कॉमर्स) अशा स्वत:च बनविलेल्या पदव्या आपल्या नावापुढे लिहिणारे चतुर लोकही बरेच आढळतात. नशीब, या शब्दशूर देशात 'एम्.एफ्.', म्हणजे मॅट्रीक फेल, 'आय.ए.' म्हणजे इंटर आर्टस् अशा पदव्या अद्यापि सुरू झाल्या नाहीत ! एखाद्या युगपुरुषाला त्याच्या अंगभूत श्रेष्ठतेमुळे प्राप्त झालेली पदवी (उदा. कालिदासाची 'कविकुलगुरू' व टिळकांची 'लोकमान्य' ही पदवी) कोणालाच टीकास्पद वाटणार नाही. पण असा 'पदवीधर' या देशात विरळाच. शब्दगौरवाचा षौक जडलेल्या या देशात 'पदवीनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजि' असेच मानणारे महाभाग अधिक !

आपली शब्दशूर विद्यापीठे राजकीय पुढाऱ्यांना तर सढळ हस्ताने 'डॉक्टरेट' सारख्या पदव्या बेधडक बहाल करतात. या विद्यापीठीय शाब्दिक औदार्यावर काही दिवसांपूर्वी एका विधानसभेत एका सदस्याने कडक टीका केली. तो म्हणाला, 'सन इन लॉ म्हणजे जावई; फादर इन लॉ म्हणजे सासरा; आणि ब्रदर इन लॉ म्हणजे मेहुणा इतकेच काय ते 'लॉ'चे (कायद्याचे) ज्ञान असणाऱ्या राजकीय पुढाऱ्याला 'डॉक्टरेट ऑफ लॉ' ही पदवी आमच्या विद्यापीठाने बहाल केली ! पात्रापात्र विचार न करता पुढाऱ्यांना देण्यात येणाऱ्या या पदव्यांनी विद्यापीठे हास्यास्पद ठरतील ....." पण छे ! असे पदवीदान या शब्दशूर देशात हास्यास्पद ठरण्याचे काहीच कारण नाही. कारण, 'नाव मूठभर आणि पदव्यांची दाढी हातभर' असा मोंगलाई खाक्या या देशाला अपरिचित नाही. हातभर लांबीच्या कोरड्या पदव्या बहाल करण्यात कोणाचे काय खर्च होते ? 'वचने किं दरिद्रता' हा आपला बाणाच आहे; आपली परंपराच आहे.

शब्दांची निरांजने !

या देशातील विद्यापीठेच नव्हे, तर सामान्य जनताही शाब्दिक गौरव करण्यात इतर कोणत्याही देशातील लोकांना हार जाणार नाही. तिने गल्लोगल्ली 'अमुक आचार्य', 'तमुक सिंह', 'अमुक वीर', 'तमुक भूषण' निर्माण करून ठेवलेलेच आहेत. एक वेळ आमच्या पुढाऱ्यांना जनता 'मत' देणार नाही, पण पदवीची 'पत' ताबडतोब बहाल करील ! 'फुकाचे मुखी बोलता काय वेचे' हे सुभाषित या देशातील लोकांना पुरेपूर पटलेले आहे.

विभूती-पूजेत हे लोक शब्दांची निरांजने ओवाळण्यात तरबेज झाले आहेत, अनुप्रासयुक्त विभूती गौरवात हे लोक अत्यंत कुशल आहेत. याचा मासला नुकताच एका पुढाऱ्याच्या सत्कार प्रसंगी एका वक्त्याने सादर केला. तो म्हणाला—

'दे. भ. अमुक अमुक यांच्यात गेंडा, गजराज आणि गजारि (सिंह) यांचे गुण एकवटले आहेत ! गेंड्याप्रमाणे त्यांची कातडी टणक असल्याने त्यांना टीकेचे भाले बोचू शकत नाहीत; गजराजाप्रमाणे ते कठीण समस्येचा दरवाजा सहज फोडू शकतात. कुत्र्यांच्या भुंकण्याकडे ते लक्ष देत नाहीत, आणि लोकहो, हे आपले लाडके नेते सिंहाप्रमाणे संकटावर तुटून पडतात'. .....अशी शब्दबंबाळ वर्णने पुढारी खरोखरच थोर असला तर खपून जातात, एरव्ही ती हास्यास्पद होतात. गेंड्याप्रमाणे कातडी कठीण आहे, गजराजाप्रमाणे आहार मोठा आहे, अथवा ते 'लंबोदर' आहेत, आणि सिंहाप्रमाणे ओरडण्यातच ते अग्रेसर आहेत, असे उपरोक्त वर्णनाचे विडंबन होऊ शकते ! एकदा एका किरकोळ अंगयष्टीच्या व मुलायम आवाजाच्या मामुली पुढाऱ्याचा 'हे आपल्या प्रांताचे "केसरी" आहेत,' असा गौरव त्यांच्या एका भाटाने करताच , श्रोत्यांतून आवाज आला —'हां, केसरियाप्रमाणे सिंहकटी आहेत खरे !' पुढारी खरोखरच तितकासा थोर नसेल तर शब्दांच्या आतषबाजीने त्याला शोभा येण्याऐवजी त्याची 'शोभा'च होते, याचे भान या शब्दशूर देशाला नाही !

प्रतिष्ठित मुखवटे

प्रतिष्ठित शब्दांचे मुखवटे धारण करून आपले लघुत्व, दुर्बलत्व अथवा दोष झाकून टाकण्याचे कसब या शब्दपंडित देशाला चांगलेच साधले आहे. छत्रीची रिपेरी करणारा फूटपाथवरील सामान्य कारागीरदेखील 'छत्रीचा डॉक्टर' अशी पाटी लावून प्रतिष्ठा मिळवण्याचा दुर्बल प्रयत्न करतो. बुंदीचे लाडू विकणारा एखादा हलवाईदेखील आपल्या दुकानावर 'लाडूसम्राट' अशी गरगरीत पाटी झळकावतो !

जगातील साम्राज्यशाहीचा जमाना संपला असेल; पण या देशात सर्वच क्षेत्रात 'सम्राट' आपल्या भगतगणांसमवेत वास्तव्य करीत आहे ! येथे नटसम्राट आहेत; संगीतसम्राट आहेत, भजनसम्राट आहेत, रंगसम्राट आहेत, कथासम्राट आहेत, सिनेसम्राट आहेत आणि सम्राज्ञीदेखील थोड्या नाहीत. येथे 'गानसम्राज्ञी' आहेत तशाच 'मादक सौंदर्याचा ॲटमबॉंब' म्हणून बोंबाबोंब झालेल्या सौंदर्यसम्राज्ञीदेखील 'जनता शो'मध्ये रुपये एक, दोन, तीन या भावात रसिकांना दर्शनसुखासाठी उपलब्ध आहेत ! या देशात रहिमतखाँसारख्या गवयांना 'भूगंधर्व' आणि नारायणरावांसारख्या मधुर आवाजीच्या अभिजात कलाकाराला 'बालगंधर्व' अशी पदवी मिळाली तर विशेष नाही; पण विशेष हे की येथे गावगन्ना 'अतिगंधर्व', 'प्रतिगंधर्व', 'किंचित् गंधर्व' असे अनेकविध गंधर्व शब्दशूर स्तुतीपाठकांनी केले आहेत ! 'मी कारकून आहे', असे सांगण्याऐवजी

'मी स्टेनो आहे' असा परिचय करून देणे या देशात अनेक 'बाबू' लोकांना प्रशस्त वाटते, बेकार लेखकही येथे स्वत:ला 'फ्री लान्सर' या प्रतिष्ठित शब्दांनी गौरवून घेतो !

पण अशा प्रतिष्ठित शब्दांचा वापर या देशातील सामान्य लोकच करतात असे नाही. येथील पुढारीही प्रतिष्टित शब्दांचे बुरखे मोठ्या शिताफीने चढवतात. सरळ सरळ 'ब्राह्मणेतर' असे म्हटले तर जातीयतेचा वास येतो; त्याऐवजी 'बहुजन समाज' असा शब्दप्रयोग येथील पुढारी खुबीने वापरतात. 'दंगाधोपा' असे न म्हणता 'जनतेचा उत्स्फूर्त उठाव' असा उठावदार शब्दगौरव राजकारणी लोक आपणास अनुकूल असलेल्या हुल्लडबाजीला बहाल करीत असतात ! विचित्रांच्या तत्त्वशून्य शय्यासोबतीला 'संयुक्त आघाडी', 'एकजूट' अशी नावे देण्याची प्रथा आहे. नग्नप्राय नृत्यांना 'सांस्कृतिक कार्यक्रम' (कल्चरल प्रोग्रॅम) अशा भपकेबाज शब्दाचे लेबल लावून हवा तो धुडगूस घालणे येथे लब्धप्रतिष्टेचे लक्षण ठरले आहे !

शाब्दिक सुधारणा

शब्दांचे असे पोकळ बुडबुडे उधळणाऱ्या या देशात सुधारणादेखील बहुदा शाब्दिकच होणार ! एका राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी एकदा असे सुचविले होते की, "सरकारी काम करणाऱ्या 'प्यून्सना 'आपल्याकडे चपराशी म्हटले जाते. हा शब्द आपण टाकून दिला पाहिजे. त्याऐवजी 'साथी' हा शब्द योग्य आहे"....वाहव्वा ! मंत्रीमहाशयांची ही सूचना कधीकाळी खरोखरीच अंमलात आली तर चपराशी लोकांचे केवढे कल्याण होईल ! ऑफिसमधील शिपायांचे पगार वाढोत वा न वाढोत, यापुढे मोठमोठे हर्पीसरदेखील 'साथी' म्हणू लागले तर केवढी भाग्याची गोष्ट ! आता कोणी शंकेखोर म्हणतील की, सरकारी कचेऱ्यांतील शिपायांना 'साथी' म्हटल्याने खरोखरच त्यांच्याविषयी सुहृदभाव निर्माण होईलच असे नाही. शिवाय चपराशांना साथी म्हटल्याने आमच्या प्रजासमाजवादी मंडळींना काय वाटेल, याचाही विचार करावयास पाहिजे !....

पण असा विचार करतो कोण ? प्रतिष्टित शब्द वापरल्याने, भपकेबाज पदव्या दिल्याने, अलंकारिक वर्णनांचा जल्लोष उडविल्याने माणसांना महत्त्व येते, अशी दृढ समजूत या शब्दप्रेमी देशात रूढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्यात शाळामास्तरांना गुरूजी म्हणायचा फतवा निघाला होता. त्यामुळे मास्तरमंडळींचा दर्जा कितपत वाढला आहे ते दिसतच आहे ! तसेच शिक्षक, प्राध्यापक नि गांधीवादी कार्यकर्ते यांना आचार्य म्हणण्याच्या प्रथेचे . 'जो धर्म आचरून दाखवितो तो आचार्य' हा त्या शब्दाचा खरा अर्थ लुप्त झाला, आणि एखाद्या धर्मलंड मास्तराला अथवा एखाद्या ग्रामगांधीला 'आचार्य' हे भारदस्त अभिधान भूषवू लागले !

वक्त्यांच्या पलटणी !

भपकेबाज शब्दांच्या भंपक वावड्या उडविण्याचा षौक असलेल्या या देशात व्याख्यानबाजीचे अमाप पीक आले तर नवल कसले ? पूर्वी ' वक्ता दशसहस्त्रेषु ' अशी समजूत होती; पण आता दिल्लीपासून गल्लीपर्यंत आणि लोकसभेपासून तो ग्रामपंचायतीपर्यंत वक्त्यांचा सुकाळ झाला आहे. या वक्त्यांच्या पलटणी जी वाफ मुखावाटे वाया दवडतात, ती जर कोणी एकत्रित केली तर, एवढी बाष्पशक्ती निर्माण होईल की, जगातील साऱ्या आगगाड्यांच्या इंधनाचा प्रश्न सुटेल ! आपल्या आमदारांचा, खासदारांचा, नामदारांचा जीवनातील बराचसा वेळ आतषबाज शब्दांनी बहरलेल्या भाषणातच व्यतीत होतो. निवडणुकीच्या फाल्गुन मासात तर व्याख्यानबाजीला आणि शब्दांच्या उधळपट्टीला असा काही ऊत येतो की, शांततापे्रमी नागरिकांना श्रवणशक्ती हा शाप वाटू लागावा ! सर्वच क्षेत्रात शब्दशूर वाचाळतेचा दोष इतका काही वाढीस लागला आहे की, ' कुटुंबनियोजन ', ' आर्थिक नियोजन ' इत्यादींच्या चालीवर कोणी ' भाषणनियोजन ' अथवा ' शब्दनियोजन ' केले तर ते साऱ्या जगाला स्वागतार्हच वाटेल !

●

(सुजाता : दिवाळी १९६८)

३. घेराओ आणि घेरा हो !

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

कडक उन्हाच्या झळा लागून अनेकांना उन्हात घेरी येते. पण या वर्षीच्या उन्हाळ्यात आणखी एक विकार अनेक राज्यांत उद्‌भवला आहे. सूज्ञ, शांततापेमी, समंजस लोकांना घेरी आणणाऱ्या या विकाराचे नाव आहे- 'घेराओ!' पश्चिम बंगालमध्ये या विकाराने जबरदस्त मूळ धरले आहे आणि त्याची लागण अखिल देशाला लागून लोकशाही मुळापासून उखडली जाईल की काय, अशी भीती अनेकांना वाटत आहे.

'घेराओ' तसा नवीन नाही. 'घेरा डालो' या स्वरूपात आपल्या तो परिचयाचा होताच. आणि एखाद्याच्या दारी धरणे धरून बसणे, या स्वरूपात तर तो कैक शतकांपासून चालू आहे. पण साध्यासुध्या 'घेरा डालो'ला बंगभूमीत जेव्हा 'घेराओ'चे विक्राळ रूप प्राप्त झाले, तेव्हा मामुली पुटकुळीची काळपुळी झाल्याचा धसका सूज्ञ जनतेला बसला (आणि पुढाऱ्यांना व्याख्यानबाजीसाठी एक नवा विषय मिळाला !) 'घेराओ' हा दलित जनतेला गवसलेला गुणकारी आधार की उद्योगधंदे धुळीला मिळवणारा घातकारी अंगार ? 'घेराओ' हा गांधीप्रणीत सत्याग्रहाचा नवा आविष्कार की माओच्या लालरक्षक चळवळीचा बंगाली अवतार ? 'घेराओ' ही मुद्दाम नफेखोर मालकांना वठणीवर आणणारी अमृतवल्ली की कामगारांना बेकायदा वर्तनासाठी मोकाट सोडणारी विषवल्ली ? अशी चर्चा गेले काही दिवस विद्वज्जनात चालू आहे.

परंतु या विद्वत्ताप्रचुर चर्चेच्या घेऱ्यात सामान्य वाचकाला फेकण्याऐवजी 'घेराओ'वरील विविध स्वगते आम्ही येथे सादर करतो. यावरून काही बोध नि काहीसे मनोरंजन पदरी पडू शकेल अशी आशा वाटते.

प. बंगालचे कामगारमंत्री सुबोध बॅनर्जी (स्वगत) :-

धन्योऽहम् ! धन्योहम् ! जगात आजवर खूप मंत्री झाले असतील पण माझ्याप्रमाणे धमाल उडविण्याची कमाल कोणीही करून दाखविली नसेल ! जॉर्ज फर्नांडिसचा तो अळणी 'घेरा डालो' आमच्या कलकत्त्यात झणझणीत 'घेराओ' बनविला मीच. ''घेराओ अप्रस्तुत नि अन्याय्य असेल, हिंसक बनला असेल, तरच पोलीस हस्तक्षेप करतील. एरव्ही घेराओ हा कामगारांचा जन्मसिद्ध अधिकार असल्याने सरकार तटस्थ राहील,"

असे मी जाहीर करण्याचा अवकाश ' सुबोध बॅनर्जी झिंदाबाद 'च्या घोषणांनी सारी रंगभूमी दणाणून गेली; मोठमोठ्या कारखानदारांची पाचावर धारण बसली; आणि एखाद्या वणव्याप्रमाणे घेराओ भडकत गेला.

महापालिकेच्या मेयरभोवती घेराओ, ब्रिटिश केबल कंपनीच्या अधिकाऱ्यांभोवती घेराओ, कॉसीपूरच्या बंदूक फॅक्टरीवरदेखील घेराओ - जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, घेराओ ! दोन महिन्यात एकट्या कलकत्त्यात १५० घेरा डाले ! महात्मा माओत्से तुंगच्या रेडगार्ड चळवळीलाही एवढे यश प्राप्त झाले नाही ! पण काही मूर्ख मित्र शंका विचारतात -

' घेराओ ' तुमच्या संयुक्त आघाडीच्या सरकारवरच बूमरँगप्रमाणे उलटत आहे, त्याचे काय ?.... त्याचे ? त्याचे अभिनंदन ! अहो, शासनयंत्रणा खिळखिळी होऊन या सीमा प्रदेशात अराजक माजावं हाच तर आमचा उद्देश ! आम्ही कोणत्याही आघाडीत घुसतो ते बिघाड करण्यासाठीच !.... काय म्हणता ? उद्योगपतींत घबराट निर्माण झाली असून, ते आपले कारखाने बंगालबाहेर नेतील ? नेऊ द्या. मग बेकारीचे, उपासमारीचे खापर त्यांच्या टाळक्यावर फोडून आम्ही क्रांतीची होळी पेटवू !

' घेराओ 'ला मीच उत्तेजन दिले आणि त्यामुळे अगदी किरकोळ कारणांवरून मोकाट मजुरांनी फॅक्टऱ्यांच्या मॅनेजरांना तीन-तीन, चार-चार दिवस कोंडून ठेवले. त्यांना लघुशंकेलाही बाहेर पडू दिले नाही. अन्न बंद, पाणी बंद, दिवे बंद, पंखे बंद !.... मग करतात काय, आधी मजुरांच्या अन् नंतर माझ्या पाया पडत आले ! जितं मया, जितं मया !....

हां, आता या माझ्या क्रांतिकारी मार्गाविरुद्ध इंदिराजी, चव्हाण, राजाजी, मधोक, जयप्रकाश हे सारे ठणाणा करीत आहेत खरे, पण म्हणावं, तुम्ही करा वटवट, माझा गुरू (माओ) बळकट ! शिवाय, भाई डांगे, लोहिया, मधु लिमये माझा पाठपुरावा करीतच आहेत. माझ्याप्रमाणेच ' घेराओ 'चे संपूर्ण खापर नोकरकपात, टाळेबंदी, औद्योगिक निवाडे अंमलात न आणणे यांच्यावर फोडीत आहेत.... तुम्हाला खरं सांगू ? त्या मधु लिमयेनं घेराओची तुलना गांधीजींच्या सविनय कायदेभंगाशी केली, तेव्हा मलाही मनातल्या मनात खुदकन् हसू आलं ! असं समर्थन मलाही जमलं नसतं. उद्या ही मंडळी खाटकाचा सुरा नि सर्जनचा चाकू; काळा कोळसा नि काळी कस्तुरी; हिरवं गलिच्छ शेवाळं नि हिरवीगार पाचू एकाच मापानं मोजण्यास कमी करणार नाहीत ! काही का असेना, नकळत ते आपले सहप्रवासी बनले आहेत, बंगाली घेराओला तेच अखिल भारतीय स्वरूप देतील. घेराओ अमर रहें !

अजय मुखर्जी : (बंगालचे मुख्य मंत्री) :-

हर हर ! कुठून ही दुर्बुद्धि सुचली अन् या संयुक्त आघाडीच्या फंदात पडलो. अक्षरशः वाघावर स्वार झालेल्या माणसासारखी माझी अवस्था झाली आहे. खाली उतरलो

तर फाडून खाईल; वरच बसून राहिलो तर अराजकाच्या जंगलात घेऊन जाईल ! त्या सुबोध बॅनर्जीनं उद्योगपतींपेक्षा माझाच जीव अधिक कासावीस केला आहे. लालभाईंच्या देऱ्यात माझा गांधीवादी आत्मा तडफडत आहे.

काय करावे ? कोठे जावे ?
नकळे मजला की विष खावे !

या घेराओमुळे उत्पादनांत २० टक्के घट झाली, 'सचिवाल्या 'वरदेखील घेरे पडू लागले; दंगेधोपे उद्‌भवले, लष्कर बोलवावे लागले, गोळीबार करावा लागला, उद्योगपतींचे नि सामान्य जनतेचे शिव्याशाप खावे लागले. केंद्रसरकारची समजूत काढता काढता नाकीनऊ आले. ' हर हर देवा, काय विडंबन ?....

- आणि हा सारा मुका मार बोलून दाखविण्याचीही सोय नाही. मंत्रीमंडळात लालभाईंचे वर्चस्व. सत्य बोलले तर ते मलाच भांडवलदारांचा ' प्रतिगामी हस्तक ' म्हणून सिंहासनावरून खाली खेचतील ! माझ्याच बंगल्याभोवती ' घेरा डालो ' घडवून माझी नाचक्की करतील.... या आमच्या भारतीय उद्योगपतींनादेखील काळाची पावलं ओळखता येत नाहीत. औद्योगिक निवाडे तत्परतेने अमलात आणायचे नाहीत; बोनस द्यायचे नाहीत; नफेबाजीच्या आहारी जाऊन नोकरकपात करायची आणि मग ' घेराओ 'चे कोलीत कामगारांच्या हाती गेले म्हणून शंख करायचा !

' कारखानदार नि मालक अन्याय करत असतील तर सरकारनं त्यांना कायद्याच्या धारेवर धरून वठणीवर आणावं, कामगारांनीच कायदे हातात घेऊन दंगेधोपे करू नयेत,' ही सूज्ञ टीका मलाही पटते. पण माझे लाल सहकारी ती मनावर घेण्यास तयारच नाहीत. म्हणूनच त्रिपक्ष परिषदेचा बोजवारा उडतो. स्टँडिंग लेबर कमेटीच्या सभेत भाई डांगे गर्जतात, '' घेराओ हे कायदेशीर शस्त्र आहे.''

पण डांग्यांना काय अथवा सुबोध बॅनर्जींना काय, मी ठणकावू शकत नाही. अरे, निवासस्थानाभोवती वा ऑफिसभोवती गराडा घालून अन्नपाणीही बंद करायचं म्हणजे Wrongful Confinementच नव्हे का ? आणि या कृत्याला कायदेशीर कसं म्हणता येईल ? ...पण... पण... मला या बळजबरीचेही समर्थन केलं पाहिजे. या झुंडशाहीवर पांघरूण घातलं पाहिजे. कारण असंगाशी संग नि प्राणाशी गाठ ! कम्युनिस्टांच्या कच्छपि लागल्याबद्दल, आई दुर्गे ! मला क्षमा कर.

एक कारखान्याचा रंगेल मॅनेजर :-

' घेराओ 'देखील रोमॅन्टिक असू शकतो बरं ! पहा ना, उत्तरप्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांच्या नि महसूल मंत्र्यांच्या घराभोवती महिला नोकरांनी घेरा घातला. मिस्टर, घेरा पडावा तर हा असा ! मंत्री महाशयांना क्षणभर वाटले असेल, आपण गोकुळातले कृष्णच आहोत ! हां ! '' नोकरकपात रद्द करा '' ही कर्णकटु घोषणा अधुनमधून कानी पडली असेल

. पण तो कंकणांचा मधुर किणकिणाट ! मानिनींच्या उंचावलेल्या भुवयांची धनुष्याकृती हालचाल ! आणि आश्वासन मिळाल्यानंतर खुललेली मुखकमले, नेत्रकमळे - आणि ते शारदीय चंद्रकलेसारखे प्रसन्न स्मित !....

' घेराओ ' ही आणखी एका प्रकारे इष्टापत्ती ठरू शकते. कल्पना करा, सायंकाळी मी आणि माझी छबकडी स्टेनो मिस ★★★ उगाच फायलींची चाळवाचाळव करीत असताना; अकस्मात माझ्या कचेरीभोवती घेरा पडला आहे. साहजिकच मी कचेरीची, माझ्या केबिनची दारे-खिडक्या बंद करतो. आणि भयभीत ' स्टेनो 'ला धैर्यधराच्या रुबाबात सांगतो, '' सुंदरी घाबरू नकोस. ये ! अशी या पुरुषोत्तमाजवळ बस ! "....

त्या शांत एकांतात तिच्या पाठीवरून हळुवार हात फिरवीत तिला मी धीर देत आहे. टेलिफोनच्या तारा कापल्या गेल्यामुळे त्याचाही त्रास नाही. दिवे बंद पडल्याने फक्त प्रेमाची मेणबत्तीच उजळणे काय ते शक्य आहे ! ... पंखे बंद पडल्यामुळे, तिला माझ्या रुमालाने वारा घालण्याची गोड संधी चालून आली आहे !

मी प्रार्थना करीत आहे - देवा, हा ' घेराओ ' अराच राहू दे. ' स्टेनो ' सुंदरीच्या सहवासात तासन् तास काढता येतील. आणि शिवाय बायकोनं विचारलं '' इतका उशीर का झाला ? " तर सांगता येईल - '' काय करू लाडके, ' घेराओ 'च्या संकटात पडलो होतो. "

....पण हे सारं ' घेराओ ' शांततामय असला तरच शक्य ! नाहीतर खिडकीच्या काचेवर दगड कोसळायचे आणि आमच्या सुखाची काच तडकायची ! ....

एक कारकून :-

' घेराओ 'चा केवढा बाऊ केला आहे या उद्योगपतींनी ! पण अरे, ' घेराओ ' कुणाला चुकला आहे ? प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला आमच्याभोवती केवढा घेरा पडतो, याची कल्पना नाही या नवकोट नारायणांना. जरा हाशहुश करून खुर्चीवर देह लोटत नाही, तोच मागण्यांचा महापूर आमच्यावर लोटतो ! सौभाग्यवती मोठ्या प्रेमाने ' इश्श, अय्या गडे, ' इत्यादि स्त्रीसुलभ मोहिनीमंत्र उच्चारून आधी आमचं पगाराचं पाकीट हस्तगत करते - आणि मग ' गडे, मला नायलॉन साडी घ्यायची हं ' - शिवाय टेरेलिन, चिकन, व्हेल्वेट ... एक ना दोन अनेक मागण्या ! इतक्यात बंड्याची ' नवी बॅट 'ची ऑर्डर; खंड्याची नव्या बुटांची फर्माइश, आणि बेबीचा नव्या फ्रॉकचा हट्ट ! हा असा कौटुंबिक घेरा पडला असतानाच बाहेर दाराशी दूधवाला भय्या, वाणीमहाराज आणि असे अनेक घेणेकरी ' घेराओ ' करतात .....

छे, छे, छे ! मुंजीच्या वेळी नापिताने टाळक्यावर घेरा स्थापन केला होता, तेवढाच पुरेसा होता. लग्नाच्या फेऱ्यात उगाच पडलो आणि हा मासिक ' घेराओ ' मागे लावून घेतला !

बाकी 'घेराओ' या ना त्या प्रकारे सर्वत्र सर्व काळ दिसून येतो. चंदनवृक्षाभोवती सर्पांचा, सत्ताधीशांभोवती स्तुतीपाठकांचा, माणुकमैनांच्या भोवती गोंडाघोळू लंपटरावांचा घेरा पडतच असतो ! मग आपल्या भोवतीच्या 'घेराओ'बद्दल ओरड का करा ?

एक आधुनिक लैला :-

अय्या ! शर्थ झाली या गल्लीतील कॉलेजकुमारांची- मी ह्यांना टाळत असते पण हे मेले सारखे घराभोवती घोटाळतच असतात ! कोणी शीळ वाजवतात, कोणी खाकरतात, कुणी फिल्मी शेरही किंचाळतात - 'बिस्तर बिछा दिया है तेरे दर के सामने !' मला या 'घेराओ'चा थोडासा त्रास होतो, थोडा रागही येतो, पण बरंही वाटतं, कारण मी या गल्लीची हिरॉइन आहे, लैला आहे, ज्यूलियट आहे, 'ब्यूटी क्वीन' आहे, ही पावतीच मिळते या तरुणांच्या 'घेराओ'मुळे !....

घेरा हो !

'घेरा डाले' उर्फ 'घेराओ' हा वर सांगितल्याप्रमाणे काहीजणांना सुखकारक वाटत असल्यामुळे, तेच जणू आपल्या कृतींनी वा उक्तींनी सुचवित असतात, ''या ! आमच्याभोवती घेरा टाका. आम्हाला घेरा हो !" उदाहरणार्थ :- हा पहा एक सत्ताभ्रष्ट मंत्री. हा म्हणत आहे- ''कालाचा महिमा काय अगाध आहे पहा. मी सत्तेवर होतो तेव्हा माझ्या बंगल्यावर याचकांचा नि स्तुतिपाठकांचा अखंड घेरा पडलेला असायचा. कोणी म्हणायचा, ''तुम्ही प्रति महात्माजी आहात, प्रति लोकमान्य आहात, जनतेच्या आशा-आकांक्षांशी एकरूप झालेले महापुरुष आहात !" कोणी म्हणे, ''साहेब, तुम्हीच आमच्या पुस्तकाच्या प्रकाशनाला या, नाटकाच्या उद्घाटनाला या- कारण तुम्ही हाडाचे रसिक साहित्यिकच आहात ! काय तुमचं वक्तृत्व, काय तुमची विद्वत्ता, किती स्फूर्तिदायक तुमची रसवंती !".... पण या स्तुतिपाठकांचा तो 'घेराओ' कुठे गेला ? अरे, मला ही एकलेपणाची आग आतल्याआत जाळीत आहे. या रे या, स्तुतिपाठकांनो या, मी उपकृत केलेल्या याचकांनो, एकदा तरी माझ्या घरी या आणि तुमचा घेरा पडू द्या-

सेवा ती पूर्विची स्मरूनी-
करि रोष न सखया, दया करी !
मला घेरा हो, मला घेरा हो !

पडेल नाटकवाला :-

देशभर 'घेराओ'ची धामधूम उडाली असताना आमच्या नाटकाच्या ॲडव्हान्स बुकिंगच्या ग्रॅनकडे कोणीही का वळत नाही ? रसिकांचा घेरा का पडत नाही ? काय करू म्हणजे प्रेक्षकांचा घेरा या बुकिंग ऑफिसभोवती पडेल ? सांगा, सरकत्या-फिरत्या-उडत्या व बुडत्या रंगमंचाची सर्कस आमच्या नाटकात घालू ? की

'सिनेस्टार' ही पदवी धारण करणारे लठ्ठ नाटकवाले नट, नि मादक सौंदर्याचे गलेलठ्ठ ॲटमबॉम्ब कलाकार म्हणून या नाटकांत टाकू ? वृत्तपत्रांतून स्तुतीचे रकाने छापून आणू की माफक दराचा जनता शो लावू ? खदाखदा हसविणाऱ्या विनोदाचा पाऊस पाडू की ढळाढळा रडविणाऱ्या दिलफोडक प्रसंगाची पेरणी करू ?.... बोला, काय वाटेल ते करतो-पण गर्दी करा-तिकीटविक्रीच्या टेबलाला घेराहो ! घेरा हो !

कृष्णकुमारी लठ्ठे :-

माझं मेलं नशीबच फुटकं ! नको तिथे, नको त्या वेळी हे वेडपट लोक घेरा टाकतात. पण माझ्याकडे ढुंकूनही बघायला फुरसत नाही. सौंदर्यप्रसाधनाच्या साऱ्या जाहिरातींचा खोल अभ्यास करून हा देहाचा भूगोल सजवला, कांती नितळ करणारा 'सुंदरी सोप'; नेत्रांची प्रभा वाढविणारं 'नीलम पॅरी काजळ'; मेडन फार्म - कंचुकी, स्लीव्हलेस ब्लाउझ... झुळझुळीत नायलॉन साडी या साऱ्यांचा सहकार मिळाला पण कोण्या तरुणाचा होकार येईल तर शप्पथ ! उलटपक्षी 'विशाल महिला', 'इंदुबिंदु' या शब्दांनी माझी हेटाळणीच होते. माझ्या स्नोसुगंधित वाऱ्यालाही कोणी उभे राहत नाही. अरे, अरसिकांनो, एकदा तरी मला घेरा हो, घेरा हो !..... काय नाही ना 'घेराओ' करीत ? प्रतिगामी, पळपुटे, घाबरट मेले ! !

●

(रविवारची लोकसत्ता : ४-६-१९६७)

४. द्वैभाषिक की द्वैभार्यिक

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

श्रेष्ठींच्या आदेशामुळे अण्णासाहेबांना नाईलाजाने द्वैभाषिकाचे जाहीर समर्थन करण्याची पाळी आली. पण ऐन वेळी मु. रा. वि. त्यांच्या मदतीला धावून आला, आणि...

'मु. रा. वि.' उर्फ मुद्राराक्षसाचे विनोद ही चीज मराठी वाचकांना नवीन नाही. पत्नीची 'पंती'; स्वजनाचे 'श्वजन'; वामनरावाचा 'वुमनराव'; रा. स. भागवतचं 'रासभा गवत'; आणि करंडीची 'क' बाद झालेली 'रंडी' करून, संपादकांना रडकुंडीस आणणारं कंपॉझिटर-मंडळींचं हस्त-कौशल्य आपल्या चांगल्या परिचयाचं आहे !

अर्थात् याला केवळ 'कंपॉझिटर'च जबाबदार असतात असं नाही. 'आप लिखे खुदा बाचे' असे हस्ताक्षर असलेले लेखकही या अर्थाच्या अनर्थास तितकेच जबाबदार आहेत.

पण मुद्रा-राक्षसाच्या विनोदाने केवळ अर्थाचा अनर्थ होतो, असं नाही; आजकाल अर्थलाभही होतो. 'मु. रा. वि.' हे सदरच काही मासिकांनी सुरू केलं आहे. आणि असा एक विनोद पाठविणाऱ्या वाचकाला 'एक अंक नि एक रुपया' पाठविण्याचं औदार्यही ते दाखवतात. मुद्राराक्षसांच्या विनोदांनी अर्थलाभ तर होतोच, शिवाय नावही छापून येतं. गावोगावीच्या ग्राम-साहित्यिकांना यापरता 'अमृत'-लाभ तो कोणता ?

श्री. अण्णासाहेब दुभाषी (दुर्तोंडे नव्हे !) यांना मात्र मुद्राराक्षसामुळे वेगळ्याच प्रकारचा लाभ झाला. अण्णासाहेब हे आमच्या गावचे एक शिस्तप्रिय काँग्रेसजन होते (हा वदतोव्याघात नव्हे) - मनास पटो न पटो, वरून सुटलेला हुकूम पाळणारे ! साहजिकच "द्वैभाषिकच का हवे हे जनतेला शांततेने पटवून द्या. आज ना उद्या जनतेचा प्रक्षोभ शांत होईल आणि तिला द्वैभाषिकाचा निर्णय पटेल. कारण त्यात व्यापक राष्ट्रहिताची दृष्टी आहे..." इत्यादि उपदेशाने भरलेला खलिता, श्रेष्ठींना मनातल्या मनात शिव्या देत का होईना, त्यांनी शिरसावंद्य मानला. आणि यथाशक्ति द्वैभाषिकाच्या समर्थनाचं कार्य ते करू लागले.

आमचं गाव म्हणजे संयुक्त महाराष्ट्र समितीचा बालेकिल्ला. त्यात एकाकी अण्णासाहेबांचा कितीसा प्रभाव पडणार ? त्यांच्याविषयी गावात तसा आदर असतानाही,

त्यांना द्वैभाषिकाच्या प्रचाराची उघड उघड सभा घेणं शक्य नव्हतं. आणि त्या काळी ते इष्टही नव्हतं. त्यासाठी अनुकूल काळाची वाट पहाणं त्यांना भाग होतं. तथापि लहान लहान अभ्यास-मंडळांत ते द्वैभाषिक महात्म्य सांगत असत. कोणी त्यांना विचारी, " अण्णासाहेब, खुद्द यशवंतरावांना मांडता येणार नाही, इतकी तुम्ही द्वैभाषिकाची बाजू चांगली मांडता ! फर्डे वक्ते तुम्ही ! मग जाहीर सभेत जनतेपुढे का येत नाही ? " तेव्हा ते काका गाडगीळीय चतुराईने दृष्टांत देऊन सांगत, " आम जनता प्रक्षुब्ध भावनेच्या विषमज्वरानं पछाडली आहे. तिला तो ज्वर असेपर्यंत हे आमचं व्यापक राष्ट्रहिताचं दूध पचायचं नाही-

अगा गोक्षीर जरी जाहले । तरी पथ्यासी नाहीं घेपिलें ।
विष होऊनिया सूदले । नवज्वरीं ।।

म्हणूनच मी अभ्यास-मंडळात काय ते बोलतो !"....

आलिया भोगासी

परंतु त्यांना जाहीर सभेत द्वैभाषिकाच्या प्रश्नावर बोलण्याच्या संकटात मिस् शीला लट्ठे यांनी टाकलं. शीला लट्ठे या मूळच्या काँग्रेसमधल्याच, पण आता ' झालाच पाहिजे ' पंथात सामील झालेल्या लोकप्रिय अभिनेत्री नाही, तर निदान ' नेत्री ' - पुढारी बनण्याची हौस असलेल्या ! त्यांनी आपल्या वनिता मंडळातर्फे एक व्याख्यानमाला आखली आणि त्यात अण्णासाहेबांना द्वैभाषिकावर बोलण्याची गळ घातली. तेव्हा इच्छा नसूनही अण्णासाहेबांना ती आपत्ती स्वीकारावी लागली.

व्याख्यान-मालेच्या पत्रिका छापल्या गेल्या. आणि नियोजित वेळी नियोजित दिवशी अण्णासाहेब दुभाषी यांच्या व्याख्यानासाठी श्रोत्यांनी सभास्थान फुलून गेलं. अध्यक्षस्थानी अर्थातच मिस् शीला लट्ठे नटून थटून बसल्या होत्या. अण्णासाहेब सभागृहात येताच ' मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे,' अशा गर्जना उठल्या. त्या गर्जनांनी छत कोसळून पडतं की काय, असं अण्णासाहेबांना वाटलं. ते मनात म्हणाले, " श्रेष्ठींचा आदेश देण्याचा खेळ होतो, नि कार्यकर्त्यांचा जीव जातो. लहान अभ्यास-मंडळांत लोकांना अप्रिय विषय सांगणं वेगळं, आणि येथे तुफानाला तोंड देणं वेगळं- " सभेचा तो नूर पाहून येथे ' द्वैभाषिकच का ? ' या विषयावर बोलणं हेच कार्यनाश करणारं आहे, असा विचार त्यांच्यासारख्या कसलेल्या वक्त्याच्यादेखील मनात आला. पण या वक्तृत्वाच्या आपत्तीतून सुटका होण्याचा मार्ग त्यांना दिसेना. ' झालाच पाहिजे 'च्या घोषणा, वात्रट मुलांच्या शिट्ट्या, टाळ्यांचा कुत्सित गजर इत्यादींची सलामी घडल्यानंतर, अध्यक्षीणबाईंनी वक्त्यांचा परिचय करून दिला. आणि लोकांना न पटणारे विचारही शांतपणे लोकशाही वृत्तीनं ऐकून घेण्याची विनंती केली. शांतता प्रस्थापित झाली. पण ही वादळापूर्वीची शांतता आहे हे अण्णासाहेबांनी हेरले. आणि ते या संकटातून कसा मार्ग काढावयाचा

या विचारात पडले. आल्या भोगासी सादर होणे त्यांना भाग होते.

मिस् शीला लठ्ठे यांचे प्रास्ताविक भाषण चालू असतानाच सचिंत अण्णासाहेबांचं लक्ष टेबलावरील छापील पत्रकाकडे गेलं आणि मग त्यांचा चेहरा उजळला. कारण त्या निमंत्रणपत्रिकेत एक मोठा मुद्रण-राक्षस शिरला होता; आणि तोच अण्णासाहेबांना वाचविणार होता. 'द्वैभाषिकच का ?' या विषयाऐवजी 'द्वैभार्यिकच का ?' असं नजरचुकीनं छापलं गेलं होतं. 'अमृत'च्या वाचकांपेक्षा 'मु. रा. वि.'चे हार्दिक आभार मनातल्या मनात मानून अण्णासाहेब व्याख्यानास उभे राहिले. त्यासरशी 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे !' या घोषणांची एकच धमाल पुनः उठली !

मु. रा. वि.ची पळवाट

अण्णासाहेब आवाज उंचावून उद्‌गारले, "मित्रहो, मी इथं द्वैभाषिकाचं समर्थन करण्यास उभा नाही." जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे सभेत शांतता पसरली, "कारण मी शिस्तीचा भोक्ता आहे." अण्णासाहेब बोलू लागले, "आणि आमंत्रणपत्रिकेत 'द्वैभार्यिकच का ?' असा विषय छापलेला असल्याने मला त्याच विषयावर आज बोललं पाहिजे." सभेत एकच हल्लकल्लोळ माजला. मु. रा. वि.च्या वाटेनं किंबहुना मनमाड मार्गानं अण्णासाहेब असे निसटतील अशी श्रोत्यांची अपेक्षा नव्हती. म्हणूनच ५-२५ श्रोते ओरडले, "विषय नजरचुकीनं कसाही छापला जावो; तुम्ही द्वैभाषिकावरच बोललं पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र झिंदाबाद !".....अण्णासाहेबांनी हात उंचावून त्यांना शांत केलं आणि ते म्हणाले, "माझं द्वैभार्यिकावरचे व्याख्यान अप्रत्यक्षपणे द्वैभाषिकावरचंच ठरणार आहे. तेव्हा ते शांतपणे अखेरपर्यंत ऐकून घ्या. माझे शिस्त-पालन होईल नि तुमचीही इच्छा सफल होईल"....श्रोते आश्चर्यानि एकमेकांकडे पाहू लागले आणि मग उदार होऊन परवानगी देण्याच्या स्वरात, एक दोन मुखडे उद्‌गारले, "बोला, बोला-" 'द्वैभार्यिक' हाही विषय काही कमी मनोरंजक नव्हता. आणि त्यातून अप्रत्यक्षपणे द्वैभाषिकाचं समर्थन करणं, ही तर अजब करामत होती. म्हणून जनताजनार्दनानं बऱ्याच खळबळीनंतर का होईना, अण्णासाहेबांना व्याख्यान देण्यास परवानगी दिली.

अण्णासाहेबांचं भाषण निर्वेध सुरू झालं- "द्वैभाषिक म्हणजे दोन भिन्नभाषी समाज ज्यांत एकत्र नांदतात ते राज्य. तर द्वैभार्यिक म्हणजे दोन भार्या एकाच नवऱ्यापाशी नांदतात ते कुटुंब. आणि कुटुंब हे लहानसं राज्यच असतं. अशा द्वैभार्यिकास कायद्याची संमती सध्या नसली, तरी त्यावर बोलण्यास मात्र कायद्याची बंदी नाही. आणि म्हणूनच मी त्यावर बोलणार आहे.

दोन गृहमंत्री का नकोत ?

एक बायको जिवंत असताना, दुसरं लग्न करणं यास हल्लीच्या सरकारनं बंदी घातली

आहे, पण तत्पूर्वी अशी लग्नं होत असत. बहुपत्नीत्वाची चाल आपल्यात परवा परवापर्यंत होती. (आणि आजही या कायद्यात पळवाट काढून दोन बायकांचे दादले होणारे महाभाग आहेतच !) "पन्नाशीची झुळुक लागली, बाईल दुसरी करू नको," ही दसलाखाची गोष्ट एका संतकवीनं सांगितली आहे, हे खरं; पण याचाच अर्थ, पन्नाशीपूर्वी दोन लग्नं करण्यास त्याची हरकत नव्हती असाच नाही का ? साधुवर्य गोरा कुंभार हे दोन बायकांचे दादले होते आणि म्हणूनच दोन बायका असलेल्या पांडुरंगाचे ते आवडते झाले ! पांडुरंगाला दोन बायका आहेत. तो जसा रख्माई-वल्लभ आहे तसाच राईचा (राधेचा) वल्लभ आहे. अहो, ज्याचा संसार मोठा त्यांना एक गृहिणी पुरणार कशी ? आपल्या सरकारला गृहखाते सांभाळण्यासाठी गृहमंत्र्यांच्या जोडीला उपगृहमंत्री द्यावा लागतो. मग व्यक्तीचं गृहखातं मोठं असेल तर त्यालाही दोन गृहमंत्री - दोन भार्या नकोत का ? गृहिणी ही 'कार्येषु मंत्री' असते. सारांश, मोठ्या गृहाला किंवा गृहस्थाला दोन बायकांची जरुरी भासतेच. आता काटकसर-योजना म्हणून त्यानं एकीवरच भागवले तर वाहव्याच, पण दोन होम-मिनिस्टर्स, दोन होम मिस्ट्रेसेस त्याला आवश्यक वाटल्यास ते वावगं खास नाही.

महाप्रतापी पांडवांचा जनक पंडुराजा हा द्वैभार्यिकवादी होता. माद्री आणि कुंती या त्याच्या दोन बायका. अगदी सख्ख्या बहिणीसारख्या एकमेकींशी न भांडता त्या सुखाने नांदल्या. त्या दोघींना घेऊन तो वनविहार (हल्लीच्या भाषेत पिकनिक्) करीत असे. त्याचं वर्णन करताना मुक्तेश्वर म्हणतो- 'करिणी संगे करिनायक । सुरतानंदे क्रिडनु ।' या दोन भार्याच नव्हेत, तर त्यांची मुलेबाळे - पाच पांडवदेखील एकोप्यानं राहिले. अशा यशस्वी द्वैभार्यिकाची प्राचीन उदाहरणं किती सांगावीत ? पुराणांच्या नि इतिहासाच्या पानोपानी ती विखुरली आहेत. त्या काळाचे पुरुष कर्तबगार नि बायका कमी भांडकुदळ असतील, म्हणून ही अशी उदाहरणं दिसतात. अशी यशस्वी द्वैभार्यिकांची उदाहरणं प्रत्यक्ष जीवनात ज्या प्रमाणात घडली त्याच प्रमाणात वाङ्मयात त्यांची प्रतिबिंबंही पडली आहेत. ही द्वैभार्यिक उपमा पहा. कालिदासाच्या रघुवंशातील चतुर सुनंदा इंदुमतीला सांगते-

निसर्ग-भिन्नास्पदमेकसंस्थं
अस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च !
कान्त्या गिरासूनृतयाच योग्या
त्वमेव कल्याणि ! तयोस्तृतीया ॥

[अगं, लक्ष्मी आणि सरस्वती या निसर्गतःच भिन्न भिन्न ठिकाणी राहणाऱ्या परस्परविरोधी स्त्रिया आपलं स्वाभाविक वैर विसरून त्यांच्या ठायी एकत्र नांदत आहेत. सौंदर्य नि सत्यप्रिय मंजुळ वाणी इत्यादि गुणांनी या राजाला योग्य असलेली तू त्या दोघींत सामील हो !]

घाटातील डबल इंजिन

कालिदासाच्या तिन्ही नाटकांचे थोर नायक अनेकपत्नी होते. आणि कालिदासाने वंदिलेल्या भासाच्या 'स्वप्नवासवदत्ता' नाटकातील उदयन राजाही अखेर यशस्वी द्वैभार्यिकवाला बनला आहे ! गेल्या पिढीपर्यंत द्वैभार्यिक संसार यशस्वी झाल्याची बरीच उदाहरणं आढळतात. बिकट घाटाची चढण चढण्यासाठी अग्निरथाला दोन इंजिनं लावावी लागतात. मग या दुनियेच्या बिकट घाटातून संसार-शकट सुखरूप मुक्कामी पोहोचण्यासाठी दोन भार्या का असू नयेत ? - असाच काहीसा विचार गेल्या पिढीतील द्वैभार्यिकवाल्यांनी केला असेल. 'अधिकस्य अधिकं फलं', 'एक से दो भले' हे न्याय इतरत्र लागू पडतात. तर द्वैभार्यिक संसाराला ते का लागू पडू नयेत ?...'

अण्णासाहेबांचं भाषण अशा प्रकारे रंगात येत होतं, पुरुष श्रोते खूष होत होते, पण महिला वर्गात खळबळ माजली होती. 'हे मेलं कसलं भाषण ?' अशी कुजबूज अधुनमधून होत होती. आधीच उल्हास असलेल्या आपल्या पतिराजांवर या भाषणाचा फाल्गुनमास भलताच परिणाम करील, अशी भीती काही ललनांच्या मनात डोकावून गेली ! आणि काही आर्य महिला तर स्वैपाकघरातील चुलीसारख्या तापल्या. एकजणीनं संतप्त प्रश्नाचं लाटणं अण्णासाहेबांवर भिरकावलं- "तुम्ही आपल्या मतलबाची तेवढी उदाहरणं घेतली. दशरथानं त्या मैल्या कैकयीला घरात आणलं म्हणून सारी धूळधाण झाली, रामाला वनवास घडला आणि दशरथाला मृत्यु आला, हे का नाही सांगत ?...."

त्या रणचंडीचा तो कडकडाट ऐकून मर्द मंडळीही सर्द झाली, आणि औरत कंपनीच्या चेहऱ्यावर औरच उजाळा चढला. पण अण्णासाहेब कसलेले वक्ते होते. ते शांतपणे बोलू लागले, "बाईसाहेब म्हणतात ते खरं आहे. पण यावरून सिद्ध काय होतं, तर म्हाताऱ्या दशरथाला तिसरी बायको झेपली नाही. त्रैभार्यिक अयशस्वी झालं ! पण त्याचं द्वैभार्यिक किती यशस्वी होतं पाहा- कौसल्या नि सुमित्रा सख्ख्या बहिर्णींहून एकमेकींशी प्रेमानं वागायच्या. कैकयीची तशी अट नसतानाही सुमित्रेनं आपल्या पोटच्या गोळ्याला - लक्ष्मणाला - रामाबरोबर वनात पाठविलं. सवतीच्या मुलाची एवढी काळजी त्या थोर समंजस स्त्रीनं घेतली !...."

काही उद्‌बोधक उदाहरणे

सभेतील नारीजन या कोटीक्रमानं जागच्या जागी चडफडत बसला आणि पुरुष श्रोते अण्णासाहेबांच्या भाषणचातुर्यावर बेहद्द खूष झाले. अण्णासाहेब पुढे म्हणाले, "द्वैभार्यिक यशस्वी होणं, हे जसं बायकांच्या समंजसपणावर नि जुळवून घेण्याच्या वृत्तीवर अवलंबून आहे, तसंच पुरुषाच्या कौशल्यावरदेखील ! एक बायको सांभाळताना पुरुषाला दहा अवधानं पाळावी लागतात, तर दोन बायकांचा यशस्वी दादला होण्यासाठी त्याला शतावधानी महापुरुष व्हावं लागतं. त्यानं दोघींनाही सारखंच वागवलं पाहिजे; त्यांच्यातील असूया

दूर करून उलट पतीचं प्रेम जिंकण्याची निरोगी स्पर्धा त्यांच्यात निर्माण केली पाहिजे; अशी अनेक पथ्यं पाळणारा, द्वैभार्यिक-यशस्वी पुरुष दुप्पट जीवनानंद भोगू शकतो पण चातुर्याविना का कोणाला यशवंतराव होता येतं ?

द्वैभार्यिक चातुर्याची ही काही उदाहरणं ऐका : योगीराज श्रीशंकर हे द्वैभार्यिक महादेव होते, हे तुम्हास माहीतच आहे. पार्वती नि गंगा या त्यांच्या दोन भार्या. त्यांनी पाहा दोघींना कसं कौशल्यानं प्रसन्न ठेवलं आहे ! एका भार्येला आपल्या मांडीवर बसवलं आहे, तर दुसरीला डोक्यावर घेतलं आहे ! पार्वतीला ते सांगणार, " अग, तुझ्यावरच माझं प्रेम अधिक आहे. पहा माझा अनन्य-नारी-कमनीय असा अंक मी तुलाच दिला, अन तुला हृदयाशी कवटाळलं." आणि गंगेला ते समजावणार " पार्वतीला मी वामांकारूढ केलं म्हणून तू रागावू नकोस. अग, तिची पर्वा न करता तुला मी डोक्यावर नाचवीत आहे. माझ्यावर पगडा तुझाच ! वर्चस्व तुझंच ! माझ्या डोक्यावरच नव्हे तर डोक्यातही तूच आहेस !" या वाक्-गंगेने ती का खूष होणार नाही ? अर्थात जननिंदेचं हलाहल पचविण्याची ताकद असलेल्या योगीराज शंकरालाच द्वैभार्यिक योगाचं अमृत चाखता येईल; इतरांना नाही. द्वैभार्यिक हा योग आहे ! हो; योगच तो. ज्या कर्मात अतिशय कौशल्य लागतं त्यालाच ' योग ' म्हणतात. द्वैभार्यिकच नव्हे, तर सोळासहस्र-भार्यिक साम्राज्य चालविणाऱ्या भगवंतांनी म्हटलं आहे, " योग: कर्मसु कौशलम् ! ! "

अशाच द्वि-भार्यावंत पुरुषाच्या कुशलतेचं आणखी एक उदाहरण सांगतो. ' अमरू शतक ' नामक संस्कृत काव्यात ते सांगितलं आहे. त्याचं असं झालं की, दोन बायकांचा एक रसिक दादला बाहेरून घरात प्रवेशला, तो त्याच्या दोन्ही बायका मंचकावर बसलेल्या आढळल्या. दोघी अलग अलग भेटल्या असता तर फार चांगलं झालं असतं. पण आता त्याच्यासमोर पेच पडला. कारण कामधाम आटोपून सायंकाळी घरी परत येताच पहिल्या ' एंट्री 'सरशी आपल्या बायकोचं चुंबन घ्यायचं, असा त्याचा शिरस्ता होता. परंतु आता पेच असा पडला की, ही शृंगारचेष्टा प्रथम कोणत्या पत्नीशी करायची ? जिला चुंबन वा आलिंगन लाभेल ती खूष होईल. पण दुसरी नाराज होऊन म्हणेल, ' पहा, प्रथम तिच्याकडे लक्ष. माझ्याकडे नाही. तिजवरी तयांचे प्रेम खरे ? ' पण या पेचप्रसंगाने तो द्वैभार्यिक राज्याचा बादशहा डगमगला नाही. त्यानं ती समस्या अशी सोडविली-

एक मंचकी बसल्या होत्या त्याच्या दो ललना
तदा खेळकरपणा दावुनी एकीच्या नयनां-
हळूच मागुनि घट्ट झाकुनी; किंचित वाकोनी-
दुसरीते चुंबिले; सुखाविल्या दोन्ही त्या सजणीं !

एकपत्नी रामाला वनवास आणि.....

' विद्यावंतांचा पूर्वजु ' असं ज्याचं ज्ञानेश्वरांनी वर्णन केलं आहे तो विद्याधर, विद्यादाता,

सुखकर्ता, दु:खहर्ता गणेश, द्विभार्यावान असल्यानंच त्याला प्रत्येक मंगलकार्यात अग्रमान मिळत असेल काय ? ऋद्धि आणि सिद्धि ह्या त्याच्या दोन भार्या. सड्याफटिंग माणसापेक्षा गृहस्थाश्रमी माणसाला समाजात अधिक प्रतिष्ठा मिळते. नुसतं एक लग्न करण्याचा हा महिमा, तर मग दोन लग्नं करणाऱ्या महाभागाचा महिमा दुप्पट का असू नये ? गृहस्थाश्रमी दुप्पट जबाबदारी पत्करणाऱ्या 'डबल गृहस्था'ला समांजात मानपानही डबल का मिळू नये ? गृहिणी म्हणजेच खरं घर, खरा संसार हे जर खरं असेल, तर अनेक गृहिणी असलेला संसार हा विशाल संसार ठरेल. अर्थात त्याची जबाबदारीही मोठी. संसारतापाचं 'टेंपरेचर' जरा अधिक, आणि म्हणूनच अशा विशाल संसाराच्या धन्याला सुखवैभवही अधिक मिळालं पाहिजे. त्याला महागृहस्थ मानून समाजात अधिक मान दिला पाहिजे. पूर्वीच्या काळी असं खात्रीनं होत असावं. पहा की, द्विभार्यावंत गणेशाला मोदकांची मेजवानी, बहुभार्यावंत श्रीकृष्णाला दही-दूध-लोणी आणि बिचाऱ्या एकपत्नी एकवचनी रामरायाला १४ वर्षे वनवास !! स्त्री हे पुरुषाचं भूषण, पुरुषाचं धन, अशी भावना असलेल्या त्या मर्दुमकी-प्रधान सुवर्ण-युगात देवांची ही अशीच व्यवस्था लागणं क्रमप्राप्त होतं.

ठोकळेबाज कायदा

परंतु आता त्या सुवर्णयुगाच्या गोष्टी आठवून काय उपयोग ? परवापरवापर्यंत काही भावनात्मक वा व्यावहारिक कारणास्तव पहिली पत्नी जिवंत असताना दुसरी घरात आणल्याची उदाहरणं घडतच होती. (अर्थात् ती तुरळकच होती; आणि कोणत्याही काळी ती तुरळकच असणार.) गुण्यागोविंदानं ही द्वैभार्यिक राज्यं चालल्यास कोणाला काही खटकत नसे आणि पहिल्या पत्नीला अन्यायानं वागवणाऱ्या द्वैभार्यिक पुरुषाला जननिंदेची शिक्षा आपोआपच होत असे. पण सब घोडे बारा टक्के या न्यायानं वागण्याच्या आधुनिक काळात, आपल्या सरकारनं द्विभार्या प्रतिबंधक कायदा केला आहे. सर्व लोकांना एकाच नीतीच्या साच्यात कोंबण्याचा हा सरकारचा प्रयत्न आहे. समाजाच्या दडपणांवर समाजव्यवहार सोपविण्याऐवजी, रामराज्याचा एकपत्नीक आदर्श लोकांच्या डोक्यावर कायद्याने लादण्याचा हा प्रयत्न आहे. समाजांत भिन्न भिन्न प्रकारचे लोक असतात आणि ते भिन्न भिन्न परिस्थितीत सापडतात, हे लक्षात घेऊन विवाहाचे आठ प्रकार सांगणाऱ्या प्राचीन स्मृतीकारांची व्यापक दृष्टी सध्याच्या राजकर्त्यांमध्ये नाही. साचेबंद समाज निर्मिण्याचा हा खटाटोप आहे. याचा अर्थ एवढाच होतो की, दुसरी स्त्री ठेव पाहिजे तर, पण लग्न करू नकोस ! आधुनिकतेच्या नावानं केलेली विवाहपूर्व, विवाहोत्तर नि विवाहबाह्य लफडी या आधुनिक समाजात चालू शकतात, वैधही ठरतात, बेकायदा ठरते देवाब्राह्मणांना नि समाजाला साक्षी ठेवून उचललेली दुसऱ्या बायकोची जबाबदारी ! या रामराज्यात एकपत्नीक राहून उघड उघड वा गुपचूप केलेली अनेक 'लव्ह अफेअर्स'- प्रेमप्रकरणं - गुन्हा या सदरात जमा होत नाहीत; पण पहिल्या पत्नीला कृतज्ञतेने वंदन करून घरात येणाऱ्या

ममताळू स्त्रीला दुसरीच काय पण दुय्यम बायको बनण्याचाही कायदेशीर अधिकार नाही ! तिच्या भावना अतिउत्कट असतील तर तिनं जन्मभर कुंवार रहावं; वाटल्यास नुसताच संबंध ठेवावा; नाईलाजानं दुसऱ्या कोणाशी तरी विवाह करून, नाही सुख तर निदान संरक्षण मिळवावं. पण तिनं प्रेमाचा एकमेव विषय झालेल्या विवाहित पुरुषाची दुसरी बायको - पहिल्या पत्नीशी जुळवून घेणारी बायको - बनणं मात्र कायद्याच्या दृष्टीनं हराम आहे ! अर्थात अशा या कायद्यांतून पळवाटा काढणारे बहादर आहेतच.

जुनं तूप टाकावू वाटतं !

परंतु त्या कायद्याचा विचार जाऊ द्या. आपले कायदे नीट केलेले नाहीत; ब्रिटिश अमदानीत त्याचे मसुदे चांगले होत असत, असं एक मोठे न्यायमूर्ति परवाच म्हणाले नाहीत काय ? तेव्हा त्यावर अधिक टीका नको. आहे त्या कायद्यांतून पळवाटा काढा; पण ते मोडणं मात्र योग्य नाही !

केवळ कायद्याचाच द्वैभार्यिकाला विरोध असतो असे नाही, तर समाजातल्या बऱ्याच लोकांचाही असतो. आणि त्याला रास्त कारणंही असतात, हेही नाकारता येत नाही. समाजानं हेही पाहिलं आहे की, कित्येक द्वैभार्यिकांत दुसऱ्या पत्नीचाच काय तो बडेजाव असतो आणि पहिली पत्नी मात्र निर्माल्यवत् होते. दुसरी पत्नी करते खुषी आणि पहिली मात्र अश्रु ढाळीत भिजविते उशी. केवळ कामुकतेच्या आहारी जाऊन स्वीकारलेल्या द्वितीय बंधात पुरुष इतका मश्गुल होतो, की पहिला बंध गळून पडला तर बरं, असा बे-उपकारी अधम विचार त्याच्या मनांत डोकावतो, मुक्तेश्वर विनोदानं म्हणतो, " नवीन खमंग नि गोरंपान तूप घरात आलं, की जुन्या तुपाचा स्वाद नकोसा होतो. -

द्वितीय बंध कर्पिता हातें । शिथिलता येई पूर्वबंधातें ।
नूतन धृत जीर्ण धृतातें । फिक करूनी दावितें ॥

अशा द्वैभार्यिकांत ' जुनं तूप ' केवळ होमकुंडात पडलं तर नवल नाही आणि मग साहजिकच गृहकलहाचा अग्नि या राज्यात भडकून उठतो. साऱ्या घरादाराची राखरांगोळी होते.

दुहेरी संकटातला उंदीर

द्विभार्यावंताच्या दोन्ही बायकांपैकी एक जरी असमंजस, स्वार्थी नि मत्सरग्रस्त असली, तरी संसाराची धूळधाण होते, मग दोन्ही बायका भांडकुदळ नि सवतीमत्सरानं पेटलेल्या असल्या की त्या द्वैभार्यिक गजाननाचा ' चुव्वा ' का होणार नाही ! बिळाच्या आत सर्प फूत्कार करीत आहे आणि बिळाच्याबाहेर मांजर पंजा उभारून सिद्ध आहे, अशा दुहेरी संकटांत सापडून, बिळाच्या दाराशी भीतीने दडून बसलेला उंदीर आणि दोन असमंजस कजाग बायकांचा दादला, यांत एका सुभाषितकाराला विलक्षण साम्य आढळलं ! म्हणूनच त्यानं म्हटलं आहे-

बिलाद बहिर बिलस्यान्त:
स्थित-मार्जार-सर्पयो : ।
मध्ये चाखु: इवाभाति
पत्नीद्वय-युतो नर: ।

चिंतातुर जंतु नि फुकट फौजदार ।

हा सर्व अनुभव जमेस धरून द्वैभार्यिकास तत्त्वत: विरोध करणारे प्रामाणिक लोक समाजात असतात. तसेच ' एका पुरुषाला एकच स्त्री ' ह्या पलीकडचं नीतीसूत्र न मानणारे महाभागही द्वैभार्यिकावर कडक टीका करताना आढळतात. पण काही पुण्यात्मे एक प्रकारच्या सुप्त असूयेनं प्रेरित होऊनच, द्विभार्यावान पुरुषाची निंदा करीत असतात. द्विभार्याशाली पुरुषाच्या पहिल्या बायकोविषयी या पुण्यपुरुषांच्या हृदयात करुणेची गंगा उसळू लागते. !.... ...." बिचारीचे नुसते हाल हाल चालले आहेत हो. झुरणीला लागली आहे ती.... बघा, आज गोड वाटतंय त्याला पण उद्या मात्र पस्तावेल तो." इत्यादि उद्‌गार त्यांच्या पवित्र मुखांतून बाहेर पडत असतात. सर्वच लोक असे करू लागले तर, समाजाची व्यवस्था टिकेल कशी ? याची या चिंतातुर जंतूंना चिंता पडलेली असते. " कोणाच्या ' पर्सनल अफेअर 'मध्ये वैयक्तिक भानगडीमध्ये - आपणास डोकावण्याचं कारण नाही म्हणा." असं म्हणत म्हणत ते द्वैभार्यिक राज्याची बित्तंबातमी मिळवण्याचा खटाटोप ' जिज्ञासू ' वृत्तीनं करीत असतात. काही भावनात्मक पेचप्रसंगावर तोडगा म्हणून ' द्वैभार्यिक ' समंजसपणानंही निर्माण होऊ शकतं, हे या नीतीच्या फुकट फौजदारांना पटूच शकत नाही. " अहो ते लग्न करणं भागच पडलं त्याला ! अडला हरी नि दुसरं लग्न करी ।" डोळे मिचकावित हे थोर पुरुष कुजबुजतात जणू काही चित्रगुप्ताची पाप-पुण्याची ' रजिस्टरं ' भरण्यासाठी या कलम-कसायांना नेमलेलं आहे !

बर्नार्ड शॉ काय म्हणतो ?

असो. द्वैभार्यिकांच्या टीकाकारांचे हे प्रकार झाले. द्विभार्यावंताचं कौतुक करणारेही काही लोक आढळतात. कोणी म्हणतो, " धन्य या नरपुंगवाची ! एक बायको सांभाळता सांभाळता आमचे टाके ढिले होतात. आणि हा तर दोन बायकांचा भार वाहणार ! वा: ! दोन नलिकांच्या बंदुकीस, (double barrel gun ला) तोंड देण्यासारखे धाडस आहे हे " कोणी धट्टेने उद्‌गारतो, " जो एक भार्या यशस्वीपणे सांभाळू शकतो, तिला प्रेमाने नांदवू शकतो, त्याच्यावरच परमेश्वर दुसऱ्या बायकोची जबाबदारी टाकतो ! ' अधिकार तैसा करू उपदेश ! साहे तोचि भार देऊं शिरी ' हेच परमेश्वराचंही धोरण असतं. एखाद्या कुशल मंत्र्याकडे दोन खाती सोपवितात, कुशल नटाला डबल रोल देतात, तसेच कुशल नवऱ्यावर दोन भार्यांचा भार ईश्वर टाकीत असतो !!

माझे हे द्वैभार्यिकावरचे विचार हे येथल्या बऱ्याच स्त्रियांना पसंत नाहीत, असं त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून येत आहे. पण सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता जॉर्ज बर्नार्ड शॉ यानं मांडलेला एक विचार मी तुमच्यासमोर ठेवतो. शॉ म्हणतो, " सध्या इंग्लंडमध्ये स्त्रीपुरुषांचं लोकसंख्येचं प्रमाण अकरास दहा असं आहे. अशा स्थितीत एका पुरुषाला एक बायको ही नीती अमलांत आणली तर दहा स्त्रियांची सोय होते खरी, पण जी अकरावी स्त्री उरेल तिनं काय करावं ? तिनं जन्मभर कुंवार राहावं अशी सक्ती तुम्ही करू शकाल का ? की तिनं वाममार्गानं आपली नैसर्गिक पुरुष-संगाची भूक शमवावी ? छे, तिला कोणाची तरी दुसरी बायको बनण्याखेरीज गत्यंतर नाही !....." शॉ असंही म्हणतो की, " नादान पुरुषाच्या सर्वस्वाची एकमेव स्वामिनी बनण्याऐवजी, कर्तबगार महापुरुषाची एक दशांश बायको बनणं कित्येक स्त्रियांना मनापासून आवडेल !".....

कर्तबगारीस आवाहन

सारांश, द्वैभार्यिक काय; किंवा एकभार्यिक काय हा ज्याच्या त्याच्या सोयीचा प्रश्न आहे. मात्र दोन्ही प्रकार विशिष्ट नीतिमत्तेविना यशस्वी होऊच शकणार नाहीत. ही नीतिमत्ता, नि:पक्षपातीपणा, तडजोड करण्याची वृत्ती, जुळवून घेण्याचा स्वभाव (ॲकोमोडेटिव्ह नेचर), कर्तृत्व, सांपत्तिक अनुकूलता, समंजसपणा इत्यादि गुण ज्या चतुर पुरुषाच्या अंगी असतील त्याचं द्वैभार्यिकदेखील यशस्वी होऊ शकेल आणि यशस्वी द्वैभार्यिक दुप्पट सुख नि आनंद निर्माण करील. हा आत्मविश्वासाचा नि कर्तृत्वाचा प्रश्न आहे.

जर कर्तबगारीच्या बळावर विशिष्ट परिस्थितीत प्राप्त झालेले द्वैभार्यिक यशस्वी करून दाखविता येतं, तर व्यापक राष्ट्रहितासाठी द्वैभाषिक मुंबई राज्य का यशस्वी करता येणार नाही ? दोन बायका सवती-मत्सर दूर सारून एकाच घरात सुखा-समाधानानं राहू नांदू शकतात, तर मग दोन भाषा - दोन भाषिक गट - एकाच विशाल राज्यात प्रेमानं का नांदू शकणार नाहीत ? आपल्या कर्तबगारीस आवाहन करणारं हे द्वैभाषिक आपण चालवून दाखवू या !"....

अण्णासाहेबांचं व्याख्यान संपलं. व्याख्यानाच्या अखेरीस श्रोत्यांच्या हे लक्षात आलं की, त्यांचं व्याख्यान हे एक रूपक होतं. द्वि-भार्यत्वाची तरफदारी करणं हा त्यांचा खरा उद्देश नव्हता, तर मनोरंजक रीतीनं द्वैभाषिकाचं समर्थन करणं हा उद्देश होता. त्यामुळेच विरोधी श्रोत्यांनीही त्यांचं हशा नि टाळ्यांनी चिन्हांकित झालेलं भाषण आनंदानं ऐकून घेतलं; पण अखेरीस त्यांचा डाव लक्षात येताच ते गर्जले - " द्वैभाषिक मुर्दाबाद ! संयुक्त महाराष्ट्र जिंदाबाद !"

हे मेलं कसलं भाषण !

" आता खुशाल घोषणा करू द्या. " अण्णासाहेब अध्यक्षीणबाईंना हसत म्हणाले. त्यांनी त्या दिवशी वेळ तर झकास मारून नेली होती. ते विजयानंदात घरी आले. तत्पूर्वीच त्यांची पत्नी घरी येऊन पोहोचली होती. त्या विजयी वक्त्याचं स्वागत करण्याऐवजी ती कडाडली, " हे मेलं कसलं भाषण ! तुमचं ताळतंत्र सुटत चाललं आहे बरं. आणि ती मेली अध्यक्षीण, हसत काय होती; ' हिअर हिअर, ' काय पुटपटत होती; तुमच्याकडे एकसारखी पहात काय होती ! सांगून ठेवते हं; तुम्ही कोण्या सटवीला घरात आणणार असाल तर जीव देईन मी ! " या विजेच्या कडकडाटानंतर अश्रूंच्या पर्जन्यधाराही कोसळल्या ! बिचारे अण्णासाहेब काकुळतीनं पत्नीच्या पाया पडून म्हणाले, " अगं, माझं भाषण एक रूपक होतं. मी द्विभार्या-प्रतिबंधक कायदा मोडीन असं तुला वाटलं तरी कसं ? बोलून चालून विनोदी व्याख्यान ते. ' परिहास-विजल्पितं सखे ! '.... अगं तुझ्यासारखी अमृताची चरवी ज्यांना मिळत नाही ते चहाची केटली किंवा ताकाची वाटी तोंडास लावतात. मला काय त्याची गरज ?.... हस पाहू जरा. वेडी कुठली ! "..... आणि एक नाजुक टिचकी त्यांनी आपल्या ' आर्यगृहिणी 'च्या हनुवटीवर मारली. त्यासरशी पदरानं डोळे पुसून ती खुदकन् हसली.

●

(अनुराधा : नोव्हेंबर १९५८)

९. बिचारी आणि विचारी-खंडिता

" तुमचं माझ्यावर प्रेम नाही हेच खरं. तुमच्या त्या प्रिय शिष्येबरोबर तासन्‌तास काव्य-चर्चा करायला तुम्हाला वेळ आहे. पण बायकोशी दोन शब्द बोलायला फुरसत नाही अं ? "

" उगाच उडवाउडवी करू नका. मला सारं काही कळलं आहे. काल तुम्ही मालूला घेऊन सिनेमाला गेला होता. तिला अगदी खेटून बसला होता... लोक काय म्हणतील याचा तरी विचार करा."

" सुरेखा नि सुशीला ! दोघींचंही व्यक्तिमत्व आकर्षक आहे. पण एक आहे विजेसारखी, तर दुसरी देवघरातील शांत समईसारखी." सुधीर दोघींच्या फोटोकडे आळी-पाळीनं पाहत विचार करू लागला.

" त्याचं एक मन विभावरीच्या लावण्याकडे आकृष्ट होत होतं, तर दुसरं गोदावरीच्या प्रेम-स्मृतींत रेंगाळत होतं...."

अशा प्रकारची वाक्यं कथा-कादंबऱ्यांत हवी तेवढी आढळतात. आणि 'एक पुरुष नि दोन स्त्रिया' या जातीचा प्रेमत्रिकोण प्राचीन काळापासून चालत आला आहे. अर्थात् त्या काळीही एक पुरुष नि एकच स्त्री, असा एकनिष्ठ कोन सर्वोत्तमच मानला गेला. त्यात गुंतागुंत कमी, त्रास कमी, मानसिक ताण कमी आणि कुटुंबाच्या अभंगतेच्या दृष्टीने तो अधिक हितावह म्हणूनच एकपत्नीव्रत किंवा एकपतित्व अधिक मानमान्यता पावले आणि ते ठीकच आहे.

जुना त्रिकोण आणि नवा त्रिकोण

पण मानवी जीवन इतके बहुविध आहे की, ते कोणत्याही एकाच साच्यात बसणे कधीही शक्य नाही. म्हणूनच त्या धोपटमार्गी प्राचीन काळातही प्रेमाचे त्रिकोण निर्माण व्हायचेच. परंतु त्या काळच्या, 'एक बापया व दोन बायका' या जातीच्या त्रिकोणात नि हल्लीच्या त्याच जातीच्या त्रिकोणात, एक मूलभूत फरक आहे. तो असा की, हल्लीच्या प्रेमत्रिकोणात एकच कोन लग्न-बंधनाने जोडला जाऊ शकतो. दुसरा नाही. कारण द्विभार्या-प्रतिबंधक कायदा नि रूढी ! हल्ली एकाच पुरुषावर दोन स्त्रिया अनुरक्त असतील

आणि तो पुरुष जर 'सनदशीर' असेल तर त्याला दोघींनाही सामाजिक दर्जा देण्याची सोय नाही. तो एकाच स्त्रीला विवाहित स्त्रीचा दर्जा देऊ शकतो. दुसरीशी तो संबंध ठेवू शकेल पण विवाह करू शकत नाही ! (अर्थात् 'स्वामिनी' नाटकात म्हटल्याप्रमाणे 'बायांनी दिला रुकार तर काय करील सरकार ?' अशीही स्थिती क्वचित् आढळेल !) पण प्राचीन काळी नव्हे, परवा परवापर्यंत कुलीन स्त्रीशी विवाहबाह्य संबंध ठेवणे प्रतिष्ठितपणाचे लक्षण मानले जात नसल्याने, द्विभार्यावान होण्याची कायदेशीर मुभा होती. आणि यातूनच 'सवत', 'सवतीमत्सर', 'सख्ख्या बहिर्णीसारख्या वागणाऱ्या सवती' इत्यादि गोष्टी प्रेम-त्रिकोणात निर्माण होत असत. त्यांचे मनोहर प्रतिबिंब प्राचीन वाङ्मयात पडलेले आढळते. या लेखात त्या प्रतिबिंबाचे ओझरते दर्शन घडविण्याचे योजिले आहे.

मानिनीचे शर-संधान

आपल्या प्रेमात कोणीतरी भागीदार होत आहे ही कल्पना स्त्रीला काय अथवा पुरुषाला काय, तापदायकच होणार. प्रेम हे निसर्गत:च मत्सरी असते. म्हणून सवतीमत्सर ही स्वाभाविक भावना मानावी लागते. त्या भावनेवर विचारपूर्वक नि संस्कारपूर्वक विजय मिळविणाऱ्या थोर मनाच्या स्त्रियाही आढळतात. पण सामान्यत: सवत घरात येणे ही गोष्ट स्त्रीला, निदान आरंभी तरी, अत्यंत कष्टदायक होते. संतापजनक वाटते. अशा मन:स्थितीत तिच्या कोमल ओठांतून कठोर शब्दांचे अग्नि-पराग बाहेर पडल्यास नवल नाही. पतिराजाला तिखट नि लागट बोलांच्या बाणांनी ती घायाळ करते. उदाहरणार्थ; हे शरसंधान पहा —

प्रयाहि तत्रैय ययानु रंज्यसे
किमत्र निस्त्रिंश । तव प्रयोजनम् ? ।
न कंचुक-ग्रन्थिमपाकुरुष्व मे
कथं हृदि ग्रन्थिमपाकरिष्यसि ? ॥

[चल दूर हो ! जिच्याकडून तुझं मनोरंजन होतं त्या लाडकीकडे जा. अरे निर्दया ! तुझं इथं काय प्रयोजन आहे ? दूर सर, दूर सर. माझ्या कंचुकीची गाठ सोडू नकोस. हृदयात पडलेली प्रेमाची गाठ सोडताना कसं काही वाटलं नाही ? जा, ती गाठ बेइमान हातांनी सोडणाऱ्याला, ही चोळीची गाठ सोडण्याचा अधिकार नाही !]

अन्य स्त्रीशी शृंगार करून घरी आलेल्या प्रियकराच्या अंगावर त्या शृंगाराच्या खुणा पाहून कोणत्याही स्त्रीला अतिशय संताप येणे साहजिकच नाही काय ? पण काही धांदरट नरपुंगवांच्या अंगावर त्या मोहब्बतीच्या खुणा गफलतीने राहणेही साहजिकच आहे ! कधी गालावर दंतव्रण, कधी नखांचे व्रण. कधी अधर-रागाचे (आधुनिक भाषेत 'लिपस्टिक्'चे) शिक्के तर कधी कुंकुम-तिलकांचे ठसे ! कधी जागरणाने लाल झालेले धुंद नयन तर कधी अपराधीपणाच्या भावनेने शरमिंदे झालेले वदन ! अशा खाणाखुणातील

एक खूण जरी सापडली तरी, मुद्देमालासह सापडलेल्या चोराची जी गत होईल, तीच गत त्या पुरुषाची होते. कठोर शब्दांचे शंभर फटके त्याला खावे लागतात. आणि वर उपहासाचे मीठ चोळले जाते, ते असे —

सत्यमेव गहितं त्वया विभो ।
जीव एक इति यत् पुरावयोः ।
अन्यदार-निहिता नखव्रणाः
तावके वपुषि पीडयन्ति माम् ॥

[पतिदेवा, 'आपल्या दोघांचा आत्मा एकच आहे,' असं जे आपण पूर्वी मोठ्या लाडात येऊन म्हणाला होतात, ते खरंच आहे हो ! पहा ना, दुसऱ्या स्त्रीनं तुमच्या शरीरावर नखव्रण उमटविले, पण त्यांच्या वेदना मलाही पीडा देत आहेत !]

स्त्रीची स्वाभाविक इच्छा !

अशा नायिकेला संस्कृत वाङ्मयात 'खंडिता' ही संज्ञा मिळाली आहे. प्रियकर अन्य स्त्रीवर अथवा सवतीवर अनुरक्त झाल्यामुळे जिचे प्रेम नि मान खंडित झाला आहे ती 'खंडिता.' ही स्थिती कधीही प्राप्त होऊ नये; असेच प्रयत्न कोणतीही स्त्री करील. म्हणूनच, विवाह-मालेत 'सपत्नी-मर्दन' नावाची वनस्पती गुंफण्याचा प्रघात प्राचीन काळी होता. ही वनस्पती गुंफल्याने सवत घरात येत नाही, अथवा आलीच तर तिचा नायनाट होतो, अशी समजूत होती. पण वनस्पतीने अथवा मंत्र-तंत्राने का सवतीची आपत्ती दूर होणार आहे ? आपल्या मजबूत प्रेम-रज्जूने व आकर्षक व्यक्तिमत्वाने पतीला पूर्णपणे बांधून ठेवणे, हीच सपत्नी-विरहित जीवन जगण्याची खरी उपाययोजना. तिचाच अवलंब प्राचीन काळच्या चतुर गृहिणी करीत असत. तिच्याशी जुळवून घेऊन तिला आपलीशी करणे हेच श्रेयस्कर मानीत. 'सवतीविषयी प्रेम धरावे,' हा कण्वाने शकुंतलेला केलेला उपदेश त्या आचरणात आणीत असत. कौसल्या नि सुमित्रा यांचे परस्परांशी वागणे त्या दृष्टीने उद्बोधक आहे.

परंतु, सवत येऊ नये हीच मुलीची व तिच्या आप्तेष्टांची स्वाभाविक इच्छा. या दृष्टीने 'रघुवंशा 'तील सहाव्या सर्गातले सुनंदेचे काही श्लोक मार्मिक वाटतात. इंदुमतीच्या स्वयंवर प्रसंगी तिची सखी सुनंदा एकेका राजाचा परिचय करून देते असा प्रसंग आहे. त्या वेळी अंग-देशाच्या राजाची तारीफ करताना सुनंदा सांगते —

" अगं, संपदा नि विद्या या दोघीजणी सहसा एकत्र नांदत नाहीत म्हणतात. पण या राजापाशी त्या दोघीही सुखाने नांदत आहेत. हे कल्याणि ! तू जर या राजाला माळ घातलीस तर, मधुर नि सत्यभाषण आणि सौंदर्य या गुणांनी मंडित झालेली तू त्या दोघींची - लक्ष्मी नि सरस्वतीची - तिसरी जोडीदारीण होशील ! "

तसेच दक्षिण देशाच्या 'पांड्य' राजाचे वर्णन करताना ती उद्गारते —

" या उच्च कुलांतील राजेश्वराशी तू विवाहबद्ध झालीस तर, भूतलावरील उच्चस्थान तुला लाभेल आणि रत्नखचित कंबरपट्टा धारण करणारी तू रत्नाकराचा - सागराचा - कंबर-पट्टा धारण करणाऱ्या दक्षिण दिशेची सवत होशील ! "

सुनंदेच्या या मार्मिक उद्गारांत ' खरीखुरी सवत तुझ्या नशिबी येणार नाही ! " असे खुबीने सूचित केले आहे. मल्लिनाथाने या श्लोकावर भाष्य करताना म्हटलेच आहे की, ' अनेन सपत्नी-अन्तराभाव: ध्वन्यते.'

'असा तो शंकर सुखकर हो !'

परंतु, सपत्नी (सवत) येऊ नये, ही इच्छा अत्यंत स्वाभाविक असली तरी, त्या प्राचीन काळी बहुपत्नीत्व निषिद्ध नसल्याने, सवत येण्याची भीती स्त्रियांच्या मनात घिरट्या घालीतच असे. इतकी की, पतीच्या सहवासातल्या आवडत्या वस्तूला स्त्री अलंकारिक अर्थाने सवत म्हणत असे. उदाहरणार्थ - ' दूति नव्हे ही माला, सवतची भासे मला ! ' वीरपुरुषाची तरवार त्याच्या पत्नीला सवत वाटायची, तर कवि-पत्नीला कविता ही सवत भासत असे.

आपला पती अन्य नारीशी रममाण झाल्याचे दु:स्वप्न त्या सवतप्रधान-काळी स्त्रीला अनेकदा पडले आहे. ' मेघदूता 'तील निष्ठावान् यक्षाच्या पत्नीलादेखील ! ' मेघ ' हा आपला खरा दूत आहे, हे पटविण्यासाठी यक्ष जो खुणेचा प्रसंग आपल्या संदेशात सांगतो, तो अशाच एका स्वप्नाचा आहे. यक्ष म्हणतो —

मिठी एकदा गळा माझिया मारुनि तूं निजलीस
मधेच अवचित मोठ्याने तूं रडत सखे उठलीस ।
पुन: पुन: मी कारण पुसतां हंसुनि बोललिस गालीं
ठका, पाहिले स्वप्नी मजला गुप्त सवत त्वां केली ।

यक्षपत्नीला असे स्वप्न पडले यात आश्चर्य नाही. उघड वा गुप्त सवत केल्याची अनेक उदाहरणे तिने पाहिली वा ऐकली असतील. काही देवतादेखील जिथं सवतीच्या आपत्तीतून सुटल्या नाहीत तिथे आपली कथा काय, असे तिला मनातल्या मनात वाटणे शक्य आहे ! भोळा म्हणविणाऱ्या योगीराज शंकरानेदेखील सवत डोक्यावर बसवून पार्वतीला क्रोधायमान केले नाही का ? सवत घरात आणली, इतकेच नव्हे तर ती पार्वतीपासून लपवून ठेवण्याचा धूर्त प्रयत्न त्याने केला. भोलानाथाची स्तुति करणारा हा श्लोक - हा गमतीदार सवाल-जवाब पहा —

पार्वती : मौलो किं नु महेश ? *(महेश, तुमच्या मस्तकावर हे काय आहे ?)*
शंकर : मानिनि, जलम् ! *(मानिनि, हे तर पाणी आहे !)*
पार्वती : किं वक्त्रं ? *(पाणी ? हे तर सुंदर चेहऱ्यासारखं काहीतरी दिसत आहे ! हा चेहरा कुठून आला ?)*

शंकर : अंभोरुहम ! *(छे छे, हा कुणाचा चेहरा नाही. अग, हे त्या पाण्यातलं सुंदर कमळ आहे !).*

पार्वती : किं नीलालक-वेणिका ? *(अस्सं ! तर मग ही काळीभोर वेणी हो कसली ?)*

शंकर : मधुकरी *(कमळावरील भुंग्यांची मालिका आहे ती !).*

पार्वती : किं भ्रूलता ? *(आणि या भुंवया ?)*

शंकर : वीचिका: ॥ *(छे, या वर्तुळाकार भुवया नव्हेत, पाण्यावरील तरंग आहेत हे !)*

पार्वती : किं नेत्रे ? *(आणि हे सुंदर डोळे ?)*

शंकर : शफरौ ! *(नेत्र नव्हेत हे ! पाण्यातले दोन चमकदार मासे आहेत.)*

पार्वती : किमु स्तन-युगं ? *(पण काय हो, हे स्तनयुग्म इथे कसं ?)*

शंकर : प्रेंखद् - रथांगद्वयम् ! *(स्तनयुग्म नव्हे ग, जलात हेलावणाऱ्या चक्रवाक् पक्ष्यांची जोडी आहे ही !).*

अखेर कवि म्हणतो —

" साशंकां इति वंचयन् गिरि-सुतां गंगाधर: पातु व: " अशा प्रकारे शंकित झालेल्या गिरिजेला ठकविणारा, तो गंगाधर तुमचे रक्षण करो ! तुम्हा तो शंकर सुखकर हो !

काय नामी आशीर्वाद आहे हा ! बहुधा असा लपंडाव खेळण्याची पाळी ज्यांच्यावर येते त्या प्रेम-त्रिकोणातील नर-पुंगवांनाच हा आशीर्वाद कवीने दिला असावा ! ते असो. पण अशा लबाडीने फसण्याइतपत, संतुष्ट होण्याइतपत का स्त्रिया मूर्ख असतात ? श्री शंकरांनी दिलेली वरील उडवाउडवीची उत्तरे किती काळ टिकाव धरू शकली असतील ? शंकरापेक्षा शतपटीने धूर्त असलेल्या श्रीकृष्णाचे वाक्चातुर्यदेखील ' खंडिता ' नायिकेपुढे खंडित झाले असेल, म्हणूनच ' नच सुंदरी करू कोपा ' अशी करुणेची भीक त्याला वारंवार मागावी लागली !

सवती मैत्रिणी बनतात

पुराणातील देवांचा सवत घरात आणण्याचा प्रघात, आमच्या पुराणकालीन राजेरजवाड्यांनी पुढे चालू ठेवला असल्यास नवल नाही. कारण राजा हा ईश्वराचा अंश ना ! कालिदासाचे ' दुष्यन्त ', ' पुरुरवा ' नि ' अग्निमित्र ' हे तिन्ही नायक बहुपत्नीक आहेत. यापैकी ' पुरुरवा ' नि ' अग्निमित्र ' यांना नायिकांच्या सापत्न भावाचे चटके फटके सोसावे लागले आहेत. ' अग्निमित्रा 'ला कंबरपट्ट्याचे तडाखे बसले, तर पुरुरव्याला पट्टराणीच्या पाया पडावे लागले ! तथापि, ' मालविकाग्निमित्र ' नि ' विक्रमोर्वशीय ' या दोन्ही नाटकांत, सवती बहिणी-बहिणीप्रमाणे वागू लागल्याचे गोड दृश्यही कालिदासाने अखेरीस रेखाटले आहे. घरात सवत येणे ही गोष्ट खेदजनक तर खरीच, पण परिस्थितीवशात् ती आलीच तर मत्सराने कुढत नि जळत बसण्यात शहाणपणा नाही; संसाराचे स्मशान बनविण्याचे कारण नाही. उलटपक्षी, समंजस नि उदार दृष्टी ठेवून सवतींनी सख्य करण्यात

मोठेपणा आहे, हित आहे, असे मत दिसते. म्हणूनच —

अन्याय तू केलास तो
आहे अती मोठा जरी
त्याहून मोठे प्रेम हे
वाहे भरूनी अंतरी

अशी उदात्त भावना विक्रमोर्वशीय नाटकातली राणी औशिनरी राजाविषयी बाळगते, आणि चंद्र-रोहिर्णीना साक्षी ठेवून शपथ घेते — 'आजपासून मी आर्यपुत्रांच्या प्रियेशी प्रेमानंच वागेन.' औशिनरीची सवतदेखील अशीच थोर मनाची आहे. ती स्वत: अप्सरा असूनही नम्र आहे. उदार ज्येष्ठ सवतीविषयी तिच्या हृदयात् आदर नि प्रेम ओतप्रोत भरलेले दिसून येते. 'देवी या शब्दाने हिचा गौरव होणे उचित आहे' (स्थाने खलु इयं देवी-शब्देन उपचर्यते !) अशी तिची राणी औशिनरीविषयी-सवतीविषयी-मनोमन खात्री असते.

खरोखर प्रेम-भावनेचा प्रभाव किती विलक्षण आहे पहा ! त्या भावनेच्या पोटीच मत्सराचा उदय होतो आणि सवती-सवतींत कलह माजतो. पण मत्सराग्नीचे चटके आपल्या समान प्रियकराला बसू नयेत ही सहृदयतादेखील उत्कट प्रेमभावनेतूनच जन्म पावते. आणि मग मत्सराला दूर भिरकावून त्या गोडीगुलाबीने वागू लागतात - एकमेकींच्या मैत्रिणी बनतात. समान प्रेमविषयानेच त्यांच्यात सख्य निर्माण होते. सावरकरांनी गोपींविषयी एके ठिकाणी म्हटले आहे —

भुक्त-कामा रतिश्रांता
आत्मा एक तया हरी ।
सखी म्हणोनि त्या झाल्या
सम-तृप्त परस्परी ।।

समंजस सहृदय सवतींचे सखींत रूपांतर का नि कसे होते, याचे इंगित या चार ओळींत आढळते.

'बिहारी'ची खंडिता

असा आहे हा सापत्न-भाव. त्याचे बहुरंगी स्वरूप संस्कृतप्रमाणेच प्राचीन देशाभाषांतही प्रतिबिंबित झाले आहे. ब्रज भाषेतील शृंगाररसाचा राजा कवि 'बिहारी' याचे काही बहारदार श्लोक नमुन्यादाखल पुरेसे होतील

★ सवतीच्या घरी रात्रभर शृंगार करून घरी परत आलेल्या महाशयांच्या अंगावरील खाणाखुणा पाहून क्रुद्ध झालेली खंडिता म्हणते—

पलनि पीक, अंजन अधर
धरे महावर भाल !
आज मिले सु भली करी
भले बने है लाल ! ॥

[लाल ! आज आपण असे दृष्टीस पडलात हे फार बरं झालं. जागरणामुळे आपल्या डोळ्यांत लाली तरळते आहे; तिच्या नेत्रांचं चुंबन घेतल्यामुळे अधरांवर काजळाची रेषा उमटली आहे; आणि पायांवर लाचारीनं मस्तक ठेवल्याने भालप्रदेशी अळत्याचा रंग विराजमान झाला आहे ! वाहवा, आपलं रूप किती छान दिसतं आहे पण !]

★ **जिहि भामिनी भूषन रच्यो,**
चरण महाउर भाल !
वही मनो अंखियाँ रँगी
ओंठनि के रंग लाल

[ज्या भामिनीने आपल्या कपाळी अळत्याचा रंग भूषण म्हणून चढविला - जिच्या चरणी आपण वारंवार मस्तक ठेविले - तिनेच आपले ओठदेखील इष्काच्या लाल रंगाने रंगविले आहेत !]

★ **बिधुर्‍यो जावक सौती पग**
निरखि हँसि गहि गाँस ।
सलज हँसोहि लखि लियो
आधी हँसी उसाँस ॥


[आपल्या सवतीच्या पायाला अव्यवस्थितपणे लागलेली मेहंदी पाहून ती हसू लागली. अशा अभिप्रायाने की, 'या गबाळ बाईला धड मेहंदीदेखील लावता येत नाही. बावळट कुठली ! '... पण लगेच तिची नजर आपला पति नि सवत यांच्या चेहऱ्याकडे गेली तेव्हा पतिराजाचा चेहरा लाजेनं गोरामोरा झाला नि सवत गालातल्या गालात हसत आहे, असे तिला दिसून आले. मग सारा प्रकार तिच्यात लक्षात आला.

" आपल्या पतीनेच सवतीच्या पायाला घाईघाईत मेहंदी लावली. साहजिकच ती नीट लागली नाही. " हे तिला कळून चुकले... आणि मग तिचे ते खवचट हास्य अर्ध्यावरच अचानक थांबले. तिने दीर्घ नि:श्वास सोडला !]

★ आणि आता हा अखेरचा सुंदर दोहा. सापत्नभावाचे विविध रंग थोडक्यात रेखाटणारा —

बालम बारी सौतिके
सुनि परनारि-बिहार
भो रस, अनरस, रिस, रली,
रीझी, खीझ इकबार ॥

[दोन सवतींची वेगवेगळी बिऱ्हाडे होती, आणि त्या दोघींत पतीच्या दिवसांच्या (किंबहुना रात्रींच्या !) — समान वाटण्या झाल्या होत्या. अशा स्थितीत एकदा 'कनिष्ठ सवतीची रात्रपाळी चुकवून पतिराजांनी दुसऱ्याच एका स्त्रीसह आहार-विहार केला.' ही वार्ता कानी पडताच एकाच वेळी विविध भावनांचे कल्लोळ तिच्या ज्येष्ठ सवतीच्या मनात उठले ते असे : (१) चांगली जिरली सवतीची या कल्पनेने ती सुखावली, (२) पण 'पतिराज सवतीला विटले असले तरी आपल्याकडेच रात्री का आले नाहीत ? परनारीकडे ते का गेलेत ?' या विचाराने ती दु:खी झाली, (३) 'अशा प्रकारे एका रात्री ते आपल्याला सोडून सवतीकडे गेले होते,' ही स्मृति जागृत होऊन क्रुद्ध झाली, (४) पण आता सवतीची कुचेष्टा करावी, "पति बेईमान झाल्याचं दु:ख आता कळलं ना तुला ? स्वत:वर बेतल्याविना कळत नाही हो !' असा टोमणा हाणण्याची क्रीडा तिला सुचली, (५) 'निदान या वेळी सवतीच्या रात्रपाळीतच हा प्रकार घडला. माझ्या रात्रपाळीत दुसरीकडे जाण्याची हिंमत अथवा इच्छा त्याला झाली नाही.' या खोट्या अहंकाराने तिची तब्येत खूष झाली, (६) परंतु, 'आतापर्यंत एकच सवत होती, तर यापुढे कदाचित् सवतींची संख्या दोन होऊन, आपल्याकडे अधिकच दुर्लक्ष होणार; आपला नंबर तिसरा लागणार !' या भीतीने ती फारच अस्वस्थ झाली.]



(अनुराधा : दिवाळी १९५९)

६. चंद्र, चंद्रानना आणि चंद्रशेखर

चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण, राष्ट्रपतिपदाची निवडणूक, तेलंगणांचे आंदोलन, भातबंदीचे उच्चाटन, घरदुरुस्ती विधेयक इत्यादि शेकडो जिव्हाळ्याचे नि जवळचे विषय, चंद्रज्योतीपुढील काजव्यांसारखे निष्प्रभ झाले असून, सुमारे २॥ लक्ष मैलावरील चंद्र-विजय हाच जनतेच्या नयनांचा, कानांचा नि मनाचा एकमेव विषय बनला आहे.

अमेरिकन अंतराळवीर नील आर्मस्ट्रॉंग, एडविन् ऑलड्रिन् नि मायकेल कॉलिन्स, दोन दिवसांपूर्वीच सुखरूप परत येऊन सुरक्षित स्थानबद्धतेत प्रविष्ट झाले. पण तरीही त्यांचा जयजयकार थांबलेला नाही आणि त्यात आश्चर्य कसले? अखिल मानवजातीच्या हृदय-सागराला आलेले अभूतपूर्व आनंदाचे हे उधाण आहे. ते लवकर ओसरणार नाही आणि ओसरूही नये! चालू द्या, तो बेहोष जयघोष चालू द्या! देश-धर्म, जातपात या साऱ्या तटबंद्यांचे बांध उल्लंघून थेट चंद्रापर्यंत उचंबळलेला, इतकेच नव्हे तर, हजारो चंद्र एका हुंकारासरशी निर्माण करणाऱ्या श्रीचंद्रशेखरापर्यंत पोहोचणारा जयजयकार अखंड दुमदुमू द्या! अरे, ती दारिद्र्याच्या चिखलात रुतलेल्या संसारशकटाची कटकट; ती ९-१५ ची भरगच्च गर्दीची लोकल; ती बेवकूब बॉसची 'बढाईखोर वटवट; क्षुद्र राजकारणाच्या शेणात सत्तेचे राजवाडे बांधू पाहणाऱ्या किड्यांची ती वळवळ; ते आपले कुत्र्यामांजराचे लाचार पोटार्थी जिणे नेहमीचेच आहे..... पण अशी सात्विक, आनंदाच्या सुधा-लहरींनी ओलीचिंब झालेली, नरातले नारायणत्व प्रकट करणारी, भव्य दिव्य आकांक्षांनी भारलेली नि मंगलतेने मंतरलेली पुण्य घटना युगायुगांतून एखादे वेळीच घडते. म्हणूनच चालू द्या; तो अंतराळवीरांचा जयजयकार अविरत चालू द्या!

नमने वाहुनि स्तवने उधळा! कारण, चंद्रमा अक्षरशः पादाक्रान्त करून आपले बंधु विज्ञानाचा विजयडंका वाजवीत सुखरूप परत आले आहेत! हजारो वर्षांपूर्वीच प्रभू रामचंद्राच्या मुखाने प्रकटलेली मानवाची उदात्त आकांक्षा आज विज्ञानकौसल्येने पूर्ण केली आहे! 'चंद्र म्हणजे गगन सरोवरातील राजहंस,' असे आपण म्हणत आलो होतो. पण हा हंस कोणत्याही पराक्रमी नळाला अथवा रूपसुंदर दमयंतीला प्राप्त झाला नव्हता. तथापि, आता मानवाची विज्ञान-लक्ष्मी त्या हंसावर आरूढ झाली आहे! 'राजपथी जणु दीपचि

गमला ' असे आपला चारुदत्त वसंतसेनेला सांगत आला पण तो हजारो मैल दूर असलेला दिवा कोण्या वसंतसेनेच्याच काय पण रंभा-उर्वशी-मेनका-तिलोत्तमा इत्यादि देवांगनांच्याही हाती आला नव्हता! तो आता मानवतेच्या हाती आला असून त्याच्या प्रकाशात ती सारे तारामंडळ पालथे घालणार आहे! म्हणूनच, आनंदाची ऊर्मि जराही न ओसरू देता अखंड जयनाद करा!

शमा-परवाना

मला वाटते, मानव प्रथमत: चंद्रमुखीचा आशिक बनला. मग तिचे ते कांतिमान कपोल, तिचे ते मंद हास्य, तिची ती अधर-सुधा यांचे दिनरात चिंतन करता करता त्याला सहजच उपमान सापडले. ते म्हणजे चंद्र! प्रेयसीच्या मुख-मंडळाची याद करून देणारे चंद्र-मंडल! जगातील लक्षावधि लावण्यवतींना हजारो वर्षे पुरून उरलेले उपमान, साहजिकच मानवांना दिलप्यार झाले. सौंदर्यपिपासू मानवी मन चंद्रमुखीवर प्रेम करता करता चंद्राचेही प्रेमी बनले. ' चंदाराणी 'च्या नील महालाभोवती प्रथमत: कल्पनायानात बसून ते घिरट्या घालीत होते पण गेल्या काही वर्षांत प्रत्यक्ष विज्ञान-दत्त अंतरिक्ष यानात बसून मानवांनी ' चंदाराणी 'भोवती प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली! असेही म्हणू या की, आकाशाच्या विशाल शमादानात दिनरात जळत राहणाऱ्या त्या चंद्रज्योतीवर मानवी पतंग झेप घेण्यासाठी उतावीळ झाले होते आणि अखेर गेल्या सोमवारी (चंद्रशेखर श्रीशंकराच्या शुभदिनी) - सकाळी ८ वा. २६ मि. २० सेकंद या शुभ मुहूर्तावर या परवान्यांनी शमेवर झेप घेतली! शमा परवान्यांच्या प्रेम-प्रकरणात एक तर परवाने जळून शहीद होतात, अथवा शमा विझून खामोश होते, असा आजवरचा अनुभव! पण नवल हे की प्रस्तुत प्रेम-प्रकरणात ती चंद्रज्योती विझली नाही अन् पतंगही बरबाद झाले नाहीत! ते दिव्य प्रेम करून सहीसलामत परत आले! या अभूतपूर्व मोहब्बतीबद्दल त्यांचा जयजयकार करा.

आशिके-चाँद

मोठमोठ्या ऋषी-मुनींनी कडक चांद्रायण व्रते केली. वेदांतील चंद्र-स्तोत्रांचा मन:पूर्वक उद्घोष करून चंद्राची उपासना केली. पण नील आर्मस्ट्रॉंग, एडविन ऑल्ड्रिन नि मिचेल कॉलिन्स या तिघांनी ' चाँद परस्ती 'ची परिसीमा गाठली! गुरुत्वाकर्षणाच्या अनेक सरहद्दी ओलांडून आकाश पंथावर जागोजागी दबा धरून बसलेल्या यमदूतांना चुकवून, मृत्यूच्या जबड्याप्रमाणे आ वासून सिद्ध असलेल्या चंद्रविवरांना टाळून, त्यांनी आपला ' गरुड ' अचूक उतरविला आणि -

' उडुराज! नमस्तुभ्यं पादस्पर्शम् क्षमस्व मे ', असे अभिवादन करून चंद्रतळावर पाय ठेवला! इतकेच नव्हे तर काशीला जाणारा यात्रेकरू जसे गंगेचे पाणी अन् मृत्तिका घेऊन परत येतो तद्वत चंद्राची धूळ घेऊन हे यात्रिक परत आले! त्या यात्रिकांच्या

जयजयकाराने दाही दिशा निनादित करा! 'पहा, पहा, आरक्त चंद्रमा प्राचीचे मुख चुंबीत आहे.' (अयमैंद्रीमुखं पश्य, रक्तश्चुंबिति चंद्रमा:।) असे म्हणत पटकन आपल्या चंद्राननेचे मुख चुंबिणाऱ्या दिलदार प्रेमीजनांनो! या अंतराळवीरांचे मन:पूर्वक अभिनंदन करा. कारण, जिवाची बाजी लावून प्रत्यक्ष चंद्राचेच चुंबन घेऊन हे 'आशिके-चाँद' विज्ञानाचा नवा अमृत-कलश घेऊन आले आहेत! युगानु युगं मानवाच्या फिरत्या महालाभोवती - पृथ्वीभोवती - घिरट्या घालणाऱ्या प्रेमवेड्या चंदाराणीला मानवाने अंतराळ महालात आलिंगन दिले. याहून रोमहर्षक काव्यविषय कोणता असू शकतो? म्हणूनच, कविजनांनो, या अद्भुत प्रेमप्रसंगावर अमृतातेहि पैजा जिंके असे महाकाव्य करा! 'नमने वाहुनि, स्तवने उधळा। जयजयकार करा। विज्ञानाचा विजय पातला आज आपुल्या घरा।' केवळ पुराणातच शोभावी अशी अचाट घटना, केवळ स्वप्नांतच खुलावी अशी तरल कल्पना, आज मानवजातीच्या कैक दशकांच्या विज्ञान तपश्चर्येने, पर्वतप्राय प्रयत्नाने आणि गगनचुंबी प्रतिभेने प्रत्यक्षात साकार केली आहे. जणू काही या अभूतपूर्व विक्रमाला अदबीने अभिवादन करण्यासाठीच अस्मान खाली लवले आहे आणि धरतीचे चरणचुंबन घेत आहे!

माती नव्हे, विभूति!

पण या अचाट विक्रमाची फलश्रुती काय? असे कोणी व्यवहारकोविद विचारतील. चंद्रावरील मिनिटभराच्या वास्तव्यासाठी १५ कोटी डॉल्र्सचा चुराडा! जेथे हवा नाही, पाणी नाही, वनस्पती नाही, जीवसृष्टी नाही अशा या खड्डेदार वैराण चंद्राचे दुरूनच दर्शन घेणे शहाणपणाचे नव्हते काय? देवीचे व्रण असलेल्या नारीच्या रंगरंगोटीप्रमाणेच चंद्राचे मुखमंडल दुरूनच साजिरे दिसते - 'दूरस्थ चंद्रमा रम्य:' हे उधळ्या अमेरिकनांना ठाऊक का नव्हते? बरे, तिथे जाऊन यांनी केले काय तर २ तास ५५ मिनिटे कांगारूसारख्या उड्या मारून २७ किलो वजनाची दगड-माती ते घेऊन आले! अवघ्या २७ किलो मातीसाठी अब्जावधि डॉल्र्सची माती करणे सूज्ञपणाचे लक्षण आहे काय? एवढा पैसा मागासलेल्या देशांच्या झोळ्यांत अथवा अध्यात्मवादी दारिद्र्यपीडित भारताच्या कटोऱ्यांत टाकला असता तर, शांततामय सहजीवनाचे ध्येय किती जवळ आले असते!....

काय म्हणावे या व्यवहारपंडितांना? त्यांना काय ठाऊक की आता चंद्रावरील या यशस्वी आरोहणानंतर मानव चंद्राचे स्थंडिल करून, पृथ्वीवरील विज्ञान-यज्ञ थेट अनंत अंतराळात नेणार आहे! त्या विज्ञान-यज्ञाची पूर्वतयारी करण्यासाठीच तर विक्रमशाली अंतराळवीरांनी तेथे भूकंप-मापक यंत्रे, लेसर किरणे परावर्तित करणारे आरसे आणि अन्य उपकरणे बसविली. चंद्रावरील सौरवायुने भरलेली पिशवी परीक्षणार्थ पृथ्वीवर आणली. चंद्रावरील ती प्रचंड विवरे उल्कापाताने घडली की ज्वालामुखीने निर्माण झाली, याचा अभ्यास केला, शेकडो छायाचित्रे घेतली आणि ती २७ किलो दगड-माती? ज्यांच्या डोक्यात दगडच भरले आहेत आणि ज्यांच्या मतीची माती झाली आहे त्यांना त्या चांद्र

दगडांची नि मातीची महती काय कळणार? ती माती साक्षात् श्री चंद्रशेखरांच्या - शंकरांच्या - विभूतीप्रमाणे अत्यंत प्रभावी आहे. तिच्या कणांकणांत वैज्ञानिक सत्याचा नारायण स्फुरत आहे! त्यांच्या परीक्षणाने मानवाच्या ज्ञानात पृथ्वीमोलाची भर पडणार आहे आणि मग त्या विपुल ज्ञानप्रकाशाच्या झोताने उजळलेल्या अंतराळात तो एक पाय चंद्रावर तर दुसरा मंगळावर, या प्रकारे संचार करून त्या चंद्रशेखराला - त्या अनंतकोटी ब्रह्मांडनायकाला - अधिकाधिक प्रसन्न करून घेणार आहे!

चंद्र हा पृथ्वीचाच एक तुकडा की पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण तडाख्यात सापडून हजारो वर्षे तिच्याभोवती भ्रमण करणारा अन्य कुणाचा तुकडा? चंद्राच्या मृत्तिकेत काही सूक्ष्म जंतू आढळतात काय? ते मानवाला उपकारक होतील की उपद्रवकारक? चंद्रावरील खडकांचे पृथ्वीवरील खडकांशी साम्य आहे की नाही? चंद्रावरील भूकंपाचे नि सुप्त ज्वालामुखीचे स्वरूप कोणते? अशा शेकडो प्रश्नांची उत्तरे आता बिनचूक मिळू शकतील, व 'चक्षुर्वै सत्यम्' हाती गवसेल. ही फलश्रुति तर मोलाची आहेत. पण त्याखेरीज अन्य फलश्रुति आता वर्तविली जात आहे.

'मोहब्बतीच्या भावुक मुलखांत अन् काव्याच्या कमनीय कुंजात चंद्राचे सपाटून अवमूल्यन होणार,' असे अनेकजण बोलू लागले आहेत. एका काश्मिरी पंडिताने तर 'मानवी पदस्पर्शाने दूषित झालेल्या चंद्राचे देवत्व नष्ट झाले आहे म्हणूनच नवग्रहांतून त्याची हकालपट्टी करावी,' अशी सूचना केली आहे! सारांश, यापुढे चंद्र हा पूजनीय देव न राहिल्याने १२ राशींच्या बाराही घरांतून त्याला अर्धचंद्र मिळणार! तो खडबडीत नि खड्डेदार आहे हे सत्य कळल्याने तो काव्याच्या कोमल प्रदेशांतून हद्दपार होणार! आणि सुंदर नारींच्या गोऱ्यापान मुखडयाला त्याची उपमा देणे ही बडी बत्तमीजी वाटल्याने तो प्रेम-कूजनातून खडयासारखा बाजूला फेकला जाणार!

एस. एन. डी. टी. विद्यापीठातील एक कॉलेज-रति तर 'समाचार भारती'च्या वार्ताहराला मिस्किलपणे म्हणाली, "बरं झालं ग बाई! आता आम्हाला चंद्राची उपमा द्यायला मोठमोठे कवीही धजावणार नाहीत. आमच्या मागचा चंद्राचा ससेमिरा चुकविण्यात साहयभूत झाल्याबद्दल आम्ही आर्मस्ट्रॉंगचे आभार मानतो!"

ऐसे होणे नाहीं!

अनजान कॉलेज सुंदरी! ती काव्याचा विषय असेल पण तिला काव्य कळत नाही; ती कुणाच्या मोहब्बतीचा विषय असेल पण तिला मोहब्बत कशाशी खातात हे माहीत नाही असेच म्हटले पाहिजे! त्या अजाण पोरीला वाटते की, यापुढे आपण खिडकीचा पडदा ओढून घेतला तरी कुणी मजनू 'ओ चांद छुप ना जाना' असे किंचाळणार नाही! तिला वाटते, आपल्या गोऱ्या गोऱ्या नरम गालांवर लज्जाभावांचा लालिमा तरळला तरी कोणी रोमिओ 'चांदसा मुखडा क्यौं शरमाया?' अशी पृच्छा करणार नाही! वेडे पोरी!

आर्मस्ट्रॉंगने एकदा नव्हे हजारदा चंद्रमा पायाखाली तुडवून जरी कंठरवाने सांगितले की, " चंद्र हे एक हजारो विवरांचे वाळवंट आहे," तरी हे ऐसे होणे नाही! चंद्रमा दुरून का होईना अत्यंत सुंदर दिसतो. त्याच्या चंदनशीतल किरणांनी कुमुदिनींप्रमाणे प्रणयिनीचे हृदयकोश फुलतात; चांदण्या रात्री सागराप्रमाणेच प्रणय-सागराला भरती येते, हे जोपर्यंत सत्य आहे, तोपर्यंत (म्हणजे जगाच्या अंतापर्यंत) चंद्राचे काव्यातील नि प्रणयातील स्थान अढळ राहील!

चंद्रावर वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जावोत वा युद्धतळ निर्माण होवोत, कविजनांना नि प्रेमीजनांना त्या तशा चंद्राशी काही कर्तव्य नाही. आपल्या नायिकेचे सौंदर्य वर्णन करण्यासाठी उपयुक्त ठरणारा दूरस्थ चंद्रमा त्यांच्या सेवेशी हाजीरच राहणार आहे! यापुढेही -

'नील विरल घुंगटात शोभे
गौर चेहरा कसा?'

या प्रणयिनीच्या सवालाला जवाब देताना म्हणतील -

'नील जली यमुनेच्या झमगम
करी चंद्रमा तसा!'

तंग पोटिमा-ब्लाउजच्या तळाकडील भागातून पुष्ट स्तनांची गोरी गोरी कुचरेखा डोकावताच, कविजन अथवा प्रणयीजन यापुढेही म्हणणारच -

" वाहवा! जलभाराने दाटलेल्या घननील मेघातून चंद्रकोर डोकवावी तशी तुझी कुच-कोर प्रकट झाली आहे अन् आम्हा चकोरांना तिचे ते ओझरते दर्शनही खूष करणारे आहे!"

परस्पर संलग्न असलेले घाटदार उरोज दृष्टीस पडताच कविमन यापुढेही मोठ्या कौतुकाने उद्गारणार -

मुखेन्दु-चंद्रिका-पूर
प्लाव्य-मानौ पुनः पुनः ।
शीत-भीत मिवान्योन्यं
तस्याः पीडतयः स्तनौ ॥

(मुखचंद्राच्या शीतल किरणांनी पुनः पुनः न्हाऊन निघाल्यामुळे की काय, थंडीला घाबरलेले तिचे उरोज एकमेकांना ऊब देण्यासाठीच पहा कसे खेटून बसले आहेत!)

सौधतलावर उभ्या असलेल्या सुंदरीने आपल्या भुरभुरत्या बटा नाजुक बोटांनी बाजूला सारताच कोणी शायर यापुढेही शेर रचणारच -

लबेबाम उस परीने
बाल क्या चेहरेसे सरकाये ।

उठाकर अब्रके परदेको
गोया चांदने झाका ।।

(गच्चीच्या कठडचापाशी उभ्या असलेल्या त्या खुबसूरत गौरांगीने काळेभोर केस चेहऱ्यावरून मागे सारताच वाटले की, जणू काही कृष्णमेघांचा पडदा बाजूला सारून चंद्रानेच डोकावून पाहिले!)

ते रम्य संकेत अमर आहेत.

व्यास-वाल्मिकी-कालिदास यांच्या काळी मानव चंद्रावर गेला नव्हता हे कबूल, पण चंद्र हा एक पृथ्वीसारखाच ग्रहगोल आहे हे त्यांनाही माहीतच होते आणि तरीही त्यांनी सुंदरीला 'चंद्रमुखी', 'चंद्रानना', 'शशिवदना' म्हटलेच. चंद्रावरील कलंक म्हणजे हरिण नव्हे हे ठाऊक असूनही त्यांनी चंद्राला 'शशांक' ही संज्ञा दिलीच. चंद्रावरील त्या कलंकालाही त्या कविवर्यांनी प्रतिभाविलासाने उजळले. कोणी म्हटले, तो कलंक नाही तर समुद्रातून वर येताना त्याला चिकटलेला समुद्रतळाचा चिखल आहे. कोणी म्हटले, चंद्राला दृष्ट लागू नये म्हणून त्याला विधात्याने काळी तीट लावली आहे. कोणी कल्पना रचली की, रतिश्रांत झालेली काळी रजनी चंद्राच्या वक्षःस्थळावर आपले वक्षःस्थळ ठेवून पहुडली आहे! आणि आमच्या नरेंद्र भट्टाने तर केवढा रम्य प्रतिभा-विलास प्रकट केला! तो उद्‌गारला - " भूगोलाच्या प्रासादाच्या छताला धवल अमृतरसापासून बनविलेला आरसा लटकविला आहे आणि त्यात श्रीकृष्णाचे सावळे रूप बिंबले आहे. त्याला कलंक म्हणू नका! "

भू-गोलकांच्या प्रासादी जैसा ।
गाळिवा अमृताचा आरिसा ।
तेथ श्रीकृष्णाचा बिंबला ठसा ।
कळंकु नव्हे तो ।।)

या नरेन्द्र भट्टापासून तो -

'नभो मुकुरि कीं सखी बघतसे
बिंब मुखाचे तिथे पडतसे
जन-नयनां ते चंद्र गमतसे ...'

असे म्हणणाऱ्या गुणवंतराव देशपांडचांपर्यंत जे शेकडो कवि होऊन गेले त्यांना आर्मस्ट्रॉंगएवढी चंद्राची वास्तव कल्पना नसली तरी, चंद्र हा एक दगडामातीचा अचेतन गोल आहे हे काय ठाऊक नव्हते? आणि तरीही त्यांनी चंद्राचा कल्पनारम्य उपयोग काव्यात करून घेतला; चंद्रविषयक कवि-संकेत चतुराईने वापरले. त्यांच्या त्या कल्पनांना नि संकेतांना नवीन चंद्रशोधनाने मुळीच बाधा पोहोचणार नाही. इतकेच नव्हे तर निंबोणीच्या झाडापलीकडील चांदोबाचा वाडा जमीनदोस्त होणार नाही. अन् भाऊबीजेच्या दिवशी त्याला ओवाळली जाणारी भावरम्य नीरांजने काही केल्या विझणार नाहीत!

चंद्र अधिक चमकेल !

कारण, वैज्ञानिक सत्य एवढेच काही एकमेव सत्य नाही. भावनांची नि कल्पनांची भाषा जशी वेगळी तसेच त्यांचे सत्यही वेगळे ! लैलाचे सौंदर्य पाहणाराला जसे मजनूचेच डोळे पाहिजेत, तसेच काव्यगत वा भावनागत सत्य पाहण्याला काव्यात्म अंत:करण पाहिजे. मानवाचे ते अंत:करण जोपर्यंत शाबूत आहे तोपर्यंत आमच्या गेल्या हजारो वर्षांच्या काव्यमय भावजीवनांतून चंद्र तडीपार होणे कालत्रयी शक्य नाही ! उलटपक्षी चंद्राविषयीची जी जी नवी वैज्ञानिक माहिती उपलब्ध होईल, तिचा उपयोग करून जुने काव्यसंकेत नवे रूप धारण करतील, नवे नवे संकेत निर्माण होतील, नव्या नव्या उत्प्रेक्षा-उपमा जन्म घेतील. विज्ञानाने काव्याच्या गगनातील चंद्र अधिकच चमकदार होईल !

उदाहरणार्थ, कोणी प्रेमिक आता म्हणेल, " सुंदरी, तुझा चेहरा दूरस्थ चंद्रासारखा सुंदर नि कांतिमान आहे. पण चंद्रावरील गुरुत्वाकर्षण अगदीच कमी. पृथ्वीचे आकर्षण मात्र तुझ्या आकर्षक व्यक्तिमत्वामुळेच चंद्राहून सहापट झाले आहे ! "

कोणी शायर म्हणेल, " संगदिल चंद्रानने ! प्रत्यक्ष चंद्रावर अब्जावधि डॉलर्स खर्च करून सफर करता येणे शक्य आहे पण तुझ्या गल्लीतून आमच्या प्रेमाचा अपोलो फिरविणे, प्राणाचे मोल देऊनही शक्य होणारे नाही ! "

असो, पण चंद्रविषयक नवीन उपमा-उत्प्रेक्षा निर्माण होणे ही काही मुख्य फलश्रुति नव्हे. मुख्य फलश्रुति ही आहे की, आता या चंद्रविजयानंतर मानवाची वैज्ञानिक शक्ती खूपच वृद्धिंगत होऊन ती सूर्यमालेतील अनेक ग्रहतारांवर झेप घेईल. ज्ञान-विज्ञानाची नवी नवी दिव्य भांडारे तिच्यापुढे उघडी होतील आणि मग ही 'शक्ती' देखील कुठे ना कुठे कुंठित होताच, चंद्राचा तुरा मस्तकी खोवलेला आणि सारे चराचर विश्व व्यापूनही दशांगुळे उरलेला तो विश्वचालक चंद्रशेखर तिला हसून म्हणेल - " देवी ! आता पुरे झाला तुझा दुर्दम्य प्रयास, बुद्धि-विलास अन् प्रतिभा-विलास. 'यो बुद्धे: परतस्तु स:' असा मी सर्वेश्वर तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. आता या सदाशिव सर्वेश्वराच्या अंकावर बसून साऱ्या जगताचे कल्याण कर. शक्तीचे शिवाशी मीलन होऊ दे, जगताचे मंगल होऊ दे ! "

- हे असेच होईल ना ? आता चंद्राच्या उत्तुंग मनोऱ्यावरून अनंत अंतराळात विजीगिषु झेप घेणारी मानवाची महत्त्वाकांक्षा नि ज्ञान-विज्ञान-शक्ती, जगन्नायक श्री चंद्रशेखरापुढे नम्र होणार ? की चंद्रमंगळाचे युद्धतळ बनवून साऱ्या जगाचे अखेर अमंगल करणार ? या शंकेने भयकंपित होणारी जनता या चंद्र-विजयोत्सवाच्या मंगल मुहूर्तावर श्री चंद्रशेखरालाच प्रार्थना करीत आहे -

" या मानवी विज्ञान शक्तीला सद्भावना दे, सात्विकता दे, मांगल्य दे, आणि-
भद्रं भद्रं वितर भगवन् भूयसेमंगलाय "

(रविवारची लोकसत्ता : २७-७-१९६९)

७. निळे डोळे; काळे केश!

/ /

हे जग जितके रुक्ष तितकेच रमणीय आहे, जितके कठोर तितकेच कोमल आहे. येथे रणदुंदुभीप्रमाणेच नुपूरझंकार ऐकावयास मिळतात. रखरखीत वाळवंटाच्या बाजूसच मखमली हिरवळ दृष्टीस पडते ! कर्कश वार्तांच्या पाठोपाठ मंजुळ वार्ता वृत्तपत्रांत झळकतात ! म्हणूनच -

उत्तर व्हिएतनामवरील प्रचंड बॉंबवर्षाव, 'हो चि मिन्ह' याची सर्वंकष युद्धाची रणगर्जना, कृद्ध सिंहांची हवाई दंगल, अमेरिकेतील उष्माघाताची लाट इत्यादि अनेक बातम्यांनी मन गलबलून गेले असता, 'सयामी बीच 'वरून एक लहानशी पण रसिली वार्ता रसिकांना सुखविण्यास आली, प्रभातकालीन मंद सुगंधित पवन लहरीप्रमाणे !

सौंदर्याला फूटपट्टी ?

सौंदर्यस्पर्धेची मधुर वार्ता ! प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही, जिच्यात नाना देशींच्या लावण्यवतींनी जवानीच्या जिद्दीने भाग घेतला होता, त्या जागतिक सौंदर्य-स्पर्धेची खुषखबर ! 'खुषखबर' म्हणण्याचे कारण हेच की, निदान या जनानी चढाओढीत तरी, भारताने प्रगतीची बरीच मोठी मजल मारली. या माधुक स्पर्धेत मार्गारेता आर्विदसन या स्विडिश सुंदरीला सर्वोच्च मानाचा मुकुट मिळाला हे खरे. पण तिच्याशी अटीतटीने अंतिम स्पर्धा करणाऱ्या पंच-कन्यांत, भारताची यास्मिन दाजी बरीच चमकली. तिने चौथा क्रमांक पटकाविला. स्विडिश सुंदरीप्रमाणेच भारताची ही हसरी जाई (यास्मिन्) रसिकांच्या अभिनयाला पात्र आहे.

पण या विक्रमशाली रूपवंतीचे अभिनंदन करतानाच, हेही नमूद केले पाहिजे की, कित्येक रसिकांना ही सौंदर्यस्पर्धा म्हणजे एक रुक्ष खटाटोपच वाटतो. कारण, विधात्याने नाना रंगाढंगांनी आणि रूपरेखांनी निर्माण केलेले उन्मेषशाली रमणी सौंदर्य ठोकळेबाज नियमांत चपखल बसवणेच शक्य नाही. तारुण्याच्या वसंतऋतुत बहरलेल्या लावण्यलतिकांना फूटपट्टी लावून त्यांच्या चारुगात्रांची मापे घेणे हे शिंप्यांचे कर्म झाले. रसिकतेचे मर्म त्यात आढळणार नाही ! वजन, उंची, छाती, कंबर यांच्या कोष्टकात रमणीचे रमणीयत्व मोजूनमापून, सौंदर्याची नंबरवारी लावणे जातिवंत रसिकतेला व्याकरणाप्रमाणेच रुक्ष वाटणार !

व्याख्या करणे मुष्किल

कारण उघडच आहे. सौंदर्याची काटेकोर व्याख्या करणेच मुष्किल आहे. सर्व गोष्टींची व्याख्या करण्यात तरबेज असलेल्या प्राचीन संस्कृत पंडितांनाही ' सौंदर्य म्हणजे काय ? ' ते नीट सांगता आले नाही. त्यातल्या त्यात डोके चालवून एका पंडिताने एवढेच सांगितले की -

किमप्यस्ति स्वभावेत
सुंदरं वाप्य सुंदरम् ?
यदेव रोचते तस्मै
भवेत तत् तस्य सुंदरम् ।।

(अहो, या जगात स्वभावत:च सुंदर अथवा असुंदर असे काय आहे ? काहीच नाही. जे ज्याला आवडते तेच त्याला सुंदर वाटते !)

सौंदर्य हे असे व्यक्तिनिष्ठ (Subjective) आहे, वस्तुनिष्ठ (Objective) नव्हे. सौंदर्याचे सर्वमान्य स्टँडर्ड नियम सांगता येणे कठीणच आहे. लैला इतरेजनांना अगदी सामान्यच वाटत होती. पण मजनूंच्या डोळ्यांना तीच ' विश्वसुंदरी ' भासत होती ! कोणाला ' सुंदर खाशी सुबक ठेंगणी ' अशी युवती मनोहर वाटते; तर कोणाला सरू-तरूप्रमाणे उंच शेलाटी पण लवचिक नार रतीहून सुंदर दिसते ! कोणी गोऱ्या रंगात गुंग होतात, तर कोणी सावळ्या रंगात दंग होतात. अशा परिस्थितीत प्रस्तुत सौंदर्यस्पर्धा ही फार तर ' शरीर सौष्ठव स्पर्धा 'च ठरते. आणि तिचेही सर्व निकष सर्वमान्य होतीलच असे नाही. माझा एक शायर मित्र तर विनोदाने म्हणतो - " जिने आपल्या सौंदर्याने जास्तीत जास्त हृदये रक्तबंबाळ केली असतील, प्रेमी जवानांचे मुडदे पाडले असतील तीच विश्वसुंदरी ! जी रस्त्यावरून डौलदार हंसगतीने चालली असताना हजारो नजरा जिच्याकडे वळतात, हजारो युवक चळतात, जिच्या पदाघातांनी घायाळ होण्यासाठी हजारो दिलवाले तडफडतात तीच खरी त्रिभुवनसुंदरी ! मग ती जागतिक सौंदर्य-स्पर्धेत प्रविष्ट झालेली असो वा नसो. "

खानेसुमारी अशक्य

या विचारसरणीत काही तथ्य असले तरी या निकषावर सौंदर्यस्पर्धा आयोजित करणे शक्यच होणार नाही, हे उघड आहे. कोण्या रूपवतीने किती कलिजे खलास केले, याची खानेसुमारी करणे हे काम गगनाला गवसणी घालण्यासारखे अशक्य आहे. बरे, आशिकांच्या दिलाची दैना उडविण्यात सौंदर्याचा वाटा किती आणि नाजुक नखऱ्याचा भाग किती हे शोधून काढणे अशक्यच आहे. पुष्कळदा मामुली सौंदर्य असलेली नारी, - लटपट लटपट चालण्याने, लाडिक लाडिक बोलण्याने, गोड गोड हसण्याने, मुरडून मुरडून पाहण्याने अतिशय सुंदर वाटते; पण खरोखर ती तेवढी सुंदर असतेच असे नाही. सारांश, सौंदर्य-स्पर्धेचे सर्वमान्य निकष शोधून काढणे कुणालाही शक्य होणार नाही.

तथापि सयामी बीच येथे जी स्पर्धा झाली, तिच्या परीक्षकांनी कोणत्या कसोटचा सौंदर्य-सुवर्णाला लावल्या, कोणते 'स्टँडर्ड' मानले, हे कळले असते तर बरे झाले असते. म्हणजे मग आपली भारतीय 'जाई' कोणत्या बाबतीत किती अंशांनी कमी पडली हे आपणास कळले असते. मार्गारेतहून तिची 'पतलि कमरिया' दोन सुताने जास्त भरली? की तिच्या वक्षाचे गोलघुमट दोन सुताने कमी ठरले? याचा खुलासा झाला असता. सौंदर्य-स्पर्धा चालकांनी आपल्या निर्णयासोबत, त्यावरील भाष्यही प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसे झाले तर, गावोगावीच्या सौंदर्यशालिनींना त्या जागतिक निकषांच्या प्रकाशात आपल्या देहयष्टीला 'स्टँडर्ड' आकार देण्याचा शास्त्रशुद्ध उद्योग आरंभिता येईल!

रमणींचा 'सिरताज'

निकष कोणतेही असोत, या वर्षी स्वीडनच्या सुंदरीने पहिला नंबर मिळवून आपले सौंदर्य शंभर नंबरी असल्याचे सिद्ध केले आहे. तिच्या सविस्तर मुलाखती ल्वकरच पाश्चात्य वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतील. पण तूर्त तरी तिची दोनच वैशिष्ट्ये प्रसिद्ध झाली आहेत आणि ती म्हणजे निळे डोळे नि काळे केस! स्वीडनची मार्गारेत नीलाक्षी आहे, कृष्णकुंतला आहे!

कृष्ण कुंतल! काळा केशकलाप! वा! आम्हा भारतीय रसिकांना पुरातन काळापासून जसा भगवान तसाच हा कृष्ण केशकलाप 'शिरोधार्य' वाटत आहे. भारतीय सुंदरींना दिलदार निसर्गाने दिलेला 'सिरताज' म्हणजेच काळाभोर केशकलाप! संगमरवरी शुभ्र ताजमहालाहून तो भारतीय कवींना दिलप्यार झाला आहे. जेव्हा भारतीय ललना या केश-कलापाची वेणी बांधतात तेव्हा तिच्या प्रत्येक पेडागणिक रसिक चित्तच करकचून बांधले जाते! वसंत ऋतुतील सुगंधी फुलांना एकच अभिलाषा असते - एकतर देवमूर्तीच्या चरणी पडावे नाहीतर सुंदरीच्या कृष्णवेणींत रमावे!

नयनभृंगांची झेप!

मार्गारेतचा केशकलाप अगदी काळाभोर आहे की त्यात पिंगट वा सोनेरी छटा आहे हे अद्यापि कळले नाही. पण काही झाले तरी तो एकंदरीत काळा आहे, एवढेच वृत्तही तिच्याविषयी जवळीक उत्पन्न करण्यास पुरेसे आहे! कारण, भारतीय मनाची ही ठाम समजूत आहे की, गोऱ्या गोऱ्या मुखचंद्राला काळ्या केशांचा किरीटच सुवर्ण-मुकुटाहून शोभादायक होतो. या केशकलापातील एखादी बट जेव्हा भालपटाच्या गोऱ्यापान केतकीवर भुरभुरते, गुलाबी गालांवर रेंगाळते, तेव्हा रसिकांचे नयनभृंगच सुंदरीच्या मुखकमलावर झेपावत आहेत, असा भास भारतीय मनाला होतो आणि जेव्हा या भुरभुरत्या बटांना नाजुक हातांनी बाजूला सारून, सुंदरी दृष्टीक्षेप टाकते तेव्हा तर वाटते —

लबे बाम उस परीने
बाल क्या चेहरेसे सरकाये ।
उठाकर अब्रके परदेको
गोया बर्कने झांका !!

(अहो, गच्चीच्या कठड्यापाशी उभे राहून त्या अप्सरेने आपल्या चेहऱ्यावर आलेले केस बाजूला सारले, तेव्हा वाटले की जणू मेघांचा पडदा बाजूला सारून बिजलीनेच डोकावून पाहिले !)

कटि-लालक नागीण !

हाय ! पण सौंदर्य-स्पर्धेत भाग घेणाऱ्या सुंदरींना आणि परीक्षकांना हे ठाऊक नसावे की अशा या काळ्या कुंतलाची, मदनाच्या मुलायम रेशमी पाशाची खरी शोभा आनितंब रुळण्यातच आहे. रमणीच्या घनवर्तुळ नितंबाला मदनमहाराजांनी गौरव बहाल केल्यावर, त्यावर दिलदारीने रेशमी चौऱ्या ढाळणारे काळे कुरळे केश आखूड असून कसे चालेल ? कालिदासासारखे विलासी कविराजच नव्हे तर बारामतीचा भारदस्त कविवर्य मोरोपंतही अशा लांबसडक केसांचाच आशिक आहे. कामिनीच्या उन्नत उरोजांवरून, कमरेपर्यंत रुळणारा तो 'कटि-लालक' केशपाश पाहून हा महाब्राह्मणदेखील रसिकतेने उद्‌गारला - "अहो, मेरू पर्वतावरून लंबायमान झालेला नागराज वासुकीच हा !" काळ्याभोर केसांच्या आनितंब रुळणाऱ्या तुकतुकीत वेणीला काळ्याभोर नागिणीची उपमा तर शेकडो कवींनी शेकडो वेळा दिली आहे !

सौंदर्यदृष्ट्याच नव्हे, तर शरीरसौष्ठवाच्या दृष्टीनेही केशकल्पाचा मुलायमपणा नि लांबी लक्षात घ्यावयास नको काय ? आणि केसांची लांबी हेदेखील शारीरिक आरोग्याचे लक्षण नाही काय ? परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, प्रस्तुत सौंदर्य-स्पर्धेतील सर्वच सुंदरींनी आपल्या मस्तकावरील केशसंभार पाश्चात्य पद्धतीने बराच हलका केलेला होता. मागीरेता असो वा यास्मिन असो, सर्वांचे बॉबकट् !

नीलकमलांचे गर्वहरण

परंतु भारतीय रसिकतेला खटकणारी ही केशकपात विसरण्यासाठी, विश्वसुंदरी मागीरेताच्या निळ्या डोळ्यांकडेच वळणे बरे ! तिचा हा सौंदर्यविशेषही आपल्याला रुचणाराच ठरेल, यात शंका नाही. कारण, भारताच्या सौंदर्यपूजकांना निळ्या डोळ्यांचे आकर्षण प्राचीन काळापासून वाटत आलेले आहे. हरिणीच्या नेत्राप्रमाणे काळेभोर नि विशाल नेत्र असलेली मनहरिणी भारतीय कवींना प्रशंसनीयच आहे. पण तरीही त्यांचे मन नयनांच्या इंद्रनील रत्नांकडे विशेष ओढ घेते. संस्कृत महाकाव्यापासून तो प्राकृत 'गाथा सप्तशती' पर्यंत सुंदरीच्या चमकदार नि गहिऱ्या नेत्रांचा नीलिमा आपला गुणमहिमा व्यक्त करीत आहे !

या निळ्या डोळ्यांना डोळा भिडवून भारतीय कवींनी केलेली बहारदार वर्णने ज्याच्या नजरेत भरणार नाहीत नि मनात मुरणार नाहीत, तो डोळे अगून अंधळाच म्हटला पाहिजे. हिऱ्याप्रमाणे तेजस्वी असलेल्या या गहिऱ्या नील नेत्रांना बहुश: इंदीवरांची म्हणजेच नीलकमळांची उपमा देण्यात येते. एक संस्कृत कवि या डोळ्यांची महती वर्णन करताना म्हणतो -

इन्दीवरे लोचनयोस्तुलायै:
निर्माय यत्नेन विधि: कदाचित् ।
अतुल्यतां वीक्ष्य ततो रजांसि
निक्षिप्य चिक्षेप स पंकमध्ये ।।

(अहो, रमणीच्या सुंदर नीलनेत्रांशी तुलना करण्यासाठी विधात्याने मोठ्या प्रयासाने नीलकमलांची निर्मिती केली. पण हाय हाय ! ती कमळे त्या डोळ्यांची मुळीच बरोबरी करू शकत नाहीत हे पाहून त्याने वैतागून जाऊन त्या कमळांच्या मुखात परागांची धूळ भरली. अन् त्यांना चिखलात फेकून दिले !)

अशी ही नीलकमलांचा गर्वहरण करणारी सुलोचना किती सुंदर दिसते, हे वर्णन करताना आपला महाराष्ट्रीय गाथाकार म्हणतो - " कानांत कर्णभूषणं म्हणून नीलकमळे अडकविणाऱ्या त्या सुंदरीने प्रियकराच्या संगतीत, सुख पावून आपले डोळे अर्धवट मिटले तेव्हा कुठे त्या नील कमळाकडे नजर गेली ! तिने डोळे मिटेपर्यंत त्यांना कोण विचारतो ? "

पापण्यांचे खंजीर !

अशा या नीलाक्षीचे नेत्रविलास वर्णन करताना भारतीय कवींची प्रतिभा कधीच थकत नाही. या गहिऱ्या निळ्या डोळ्यांत काळे काजळ घातल्याने त्यांची मादकता अधिकच खुलते आणि पापण्यांचे लांबलचक केस त्यावर मदनाच्या नाजुक बाणांच्या पिसाऱ्याप्रमाणे शोभून दिसतात. कधी कधी असेही वाटते की, समुद्रातून निघालेले सर्व हलाहल नीलकंठ शंकराला आपल्या कंठात साठविता आले नाही. तेव्हा जगातील सौंदर्यवती त्याच्या मदतीला आल्या आणि त्यांनी ते काळे-निळे जहर आपल्या नयनांच्या बदामी प्यालांत धारण केले ! त्यात वारंवार स्नान केल्याने नीलाक्षींच्या पापण्यांचे सुकुमार खंजीर इतके प्रभावी झाले आहेत की, रसिकांच्या हृदयात त्यांचा स्पर्श होण्याचा अवकाश, पापणीला पापणी लागेनाशी होते, झोप उडते आणि आसुसलेले डोळे रात्रभर त्या नीलनेत्रांचेच चिंतन करीत बसतात !

या वर्षीच्या विश्वसुंदरीचे नेत्र निळे आहेत हे आपणास कळले, पण ते इतके प्रभावी आहेत का याची खबर अद्यापि लागली नाही !

●

(रवि. लोकसत्ता २४-७-१९६६)

८. हे खंजीर आणि ते खंजीर!

या बहुरंगी बहुढंगी दुनियेत एकाच वेळी परस्परभिन्न गोष्टींचा केवढा गजबजाट चालू असतो! मानवी संसाराची ही विषम बहुविधता पाहून, कोणी सुभाषितकार गडबडून गेला. त्याला कळेना हे जग आहे तरी कसे?

येथे एकाच वेळी (अन् कधी कधी एकाच वस्तीत) जसा विद्वानांचा काव्य-शास्त्र-विनोद चालू असतो तसाच दारूबाजांचा बाष्कळ बकवास! एकाच आळीत नि एकाच चाळीत, तिसऱ्या मजल्यावर सारंगीचे रंगीन आलाप, तर तळमजल्यावर तळमळत्या जीवांचे निराश नि:श्वास! एकाच लग्नसोहळ्यात एकीकडे जराजर्जर बुजरुकांचा समुदाय तर दुसरीकडे तारुण्याने नि लावण्याने नटलेल्या रमणींच्या सौंदर्याची आरास! म्हणूनच तो सुभाषितकार भांबावून गेला आणि उद्गारला, "काही कळत नाही, हे जग जहराने माखले आहे की अमृतात नाहले आहे?"

पण तो सुभाषितकारच कशाला? तुम्ही-आम्हीही वृत्तपत्रातील एकाच पानावरील परस्परभिन्न बातम्या वाचून नाही का भांबावून जात? वर्तमानपत्राच्या एकाच पानात केवढे भिन्न भिन्न घटनांचे भांडार भरलेले असते! एका बाजूला भयानक राजकीय खंजीर उगारलेला दिसतो, तर दुसऱ्या बाजूला मदनाचे नाजुक नाजुक खंजीर!!

दगाबाज खंजीर!

खंजीर? हो खंजीराचेच उदाहरण आम्ही सादर करीत आहोत.

गेली काही वर्षे चीनने भारताच्या हिमधवल मुकुटावर टांगला आहे, आक्रमणाचा खंजीर! किंबहुना तोंडाने 'भाई भाई' चा जप करीत, पाठीत खुपसला आहे दगाबाजीचा खंजीर! पण या देशाचा पाठीराखा जनताजनार्दन असल्याने, चीनचा उद्देश सफल होऊ शकला नाही. उलटपक्षी, हा जहरी खंजीर बाहेर काढून त्याचा चक्काचूर करण्याचा निर्धार निर्माण झाला आहे आणि भारताचे लोक नि लोकनेते या एकाच विचारात मग्न आहेत. भारतीय जनताच नव्हे तर थेट न्यूयॉर्कपासून टोकियोच्या टोकापर्यंत, सारे लोकशाहीचे सच्चे पाईक साम्राज्यवादाचा लाल खंजीर कसा छिन्नभिन्न करता येईल, याच विचारात दंग आहेत.

पण या राजकीय खंजीराचे माषुक मदालसांना काय होय? ज्यांच्या लांब अणकुचीदार

पापण्यांचे खंजीर रसिकांच्या मनाला लागताच रात्रभर पापणीला पापणी लागेनाशी होते, त्यांची नजर वसाहतवादांच्या अथवा लाल साम्राज्यवादाच्या खंजीराकडे जाईलच कशाला ? इकडे केनेडी क्रुश्चेव्हपासून तो सर्वोदयी पदयात्रिकांपर्यंत युद्धाचा टांगता खंजीर कसा म्यानबंद करावा, याची चर्चा चालू आहे, पण तिकडे अमेरिकन गुल्बबदनींच्या गुलशन्मध्ये पापण्यांचे खंजीर अधिक खतरनाक करण्याची धूम उठली आहे ! संयुक्त अरब राष्ट्राकडून काहीही घेण्याची श्रीमंत अमेरिकेला जरुरीच नाही. पण अमेरिकन सुंदरींनी अरब जगांतून 'शेख नजर' (Sheikh look) नामक फॅशन उचलली आहे खरी ! नजरेचे सौंदर्य वाढवणारी ही नवीन मेकअप् स्टाईल आहे आणि तिच्या योगे त्या गुलजार नारींच्या पापण्यांचे खंजीर अधिकच प्रभावी होतील अशी बोलवा आहे.

ती क्लिओपात्रा नजर

हे नवीन नेत्रप्रसाधन म्हणजे सौंदर्यशास्त्राने (अथवा शस्त्राने) गाठलेला 'क्लिओपात्रा नजरे'पुढील पल्ला आहे ! काही महिन्यांपूर्वी 'क्लिओपात्रा' बोलपटातील एलिझाबेथ टेलर या रूपसुंदर नटीची उठावदार चित्रे वृत्तपत्रांत प्रसिद्ध होताच क्लिओपात्राटाईप मेकअप्ला भलताच उठाव आला होता आणि अद्यापि ही फॅशन बरीच प्रचलित आहे. नेत्राच्या सर्व कडा दाट कज्जल-रेखेने उठावदार करणे आणि दोन्ही नेत्रकोणांपासून कानाच्या दिशेने एकेक कज्जल-रेखा काढणे हे क्लिओपात्रा फॅशनचे मुख्य वैशिष्ट्य होय. हिऱ्याप्रमाणे चमकदार नेत्रांना ठळक कज्जल-रेखांचे कोंदण देण्याची पद्धती क्लिओपात्रा राणीच्या काळी इजिप्तमध्ये चालू होती. या पद्धतीनुसार, नेत्रकोणांपासून कानाकडे काढलेल्या रेखेने तर इजिप्शियन ललनांचे नेत्र अधिकच विशाल दिसत असत, यात शंकाच नाही. हीच ती नेत्रप्रसाधन पद्धती की जिच्या आधारे क्लिओपात्रा राणीने एका कटाक्षात ज्यूलियस सीझरसारख्या दिग्विजयी वीराचा कलिजा खलास केला ! क्लिओपात्राचे नेत्र सुंदरच होते, मद्यासारखे मदिर होते, पण त्यांची 'किक्' वाढविली ती याच प्रसाधनप्रद्धतीने ! हीच ती 'क्लिओपात्रा स्टाईल' की, जिच्या कज्जलरेखांनी त्या काळचा रोमन् साम्राज्याचा नकाशा पालटून टाकला !!

हाय कंबख्त ! ज्यूलियस सीझरमध्ये अनेक गुण होते, पण त्याला संस्कृत काव्य येत नव्हते ! नाहीतर तो क्लिओपात्राच्या त्या नेत्रप्रसाधनाला उद्देशून मजेने म्हणाला असता -

लोचने हरिष-गर्व-मोचने
मा विदूषय नतांगि ! कज्जलै: !
सायको सपदि जीव-हारक:
किं पुनर् हि गरलेन लेपित: ? ॥

(हे हरिणींचा गर्वहरण करणाऱ्या मनोहारिणी ! तुझे सुंदर नेत्र काजळाने दूषित करू नकोस. तुझा नैनबाण ताबडतोब प्राणहरण करणारा आहे. मग त्याला हे काळे जहर

माखण्याची जरुरीच काय ?)

जरुरी असो नसो, शेकडो वर्षांपूर्वी जी क्लिओपात्राप्रसाधनपद्धती मिसर देशांत रूढ होती, तीच अमेरिकेत काही महिन्यांपूर्वी पुनरुज्जीवित झाली आणि आता तर तिच्यातही सुधारणा चालू आहे. मघाशीच उल्लेखिलेली 'शेख नजर' (Sheikh Look) हा या सुधारणेचाच एक प्रकार.

या 'शेख नजरे'चे (अथवा रूपदर्शनाचे) छायाचित्र आम्हास अद्यापि उपलब्ध झालेले नाही. पण वृत्तपत्रीय वर्णनावरून असे दिसते की, "लॉरेन्स ऑफ अरेबिया" नामक एका बोलपटातून या 'शेख फॅशन'ने सध्या कॅलिफोर्निया नि फ्लोरिडिया या भागात पदन्यास केला आहे. पण लौकरच तमाम अमेरिकन रमणींच्या प्रसाधनगृहांत तो प्रवेश करील अशी अपेक्षा आहे. फार काय सांगावे, श्रीमती जॅक्यूलिन केनेडी दोन वर्षांपूर्वी 'प्रथम दर्जाची महिला' ठरल्यानंतर, ज्या "Jackie Look" चा विशेष बोलबाला होता, ती जॅक्यूलीनबाईंची प्रसाधनपद्धतीदेखील ह्या नव्या फॅशनपुढे फिकी पडेल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

असे या पद्धतीत आहे तरी काय ? असे सांगतात की - क्लिओपात्रा-स्टाईलमध्ये कज्जलरेखा जास्त ठसठशीत असल्याने त्या जादा कृत्रिम दिसतात, तो दोष या नव्या शेख पद्धतीने काढून टाकला आहे. आता नेत्रांच्या कडा बारीक नि सौम्य कज्जलरेखेने विभूषित होतील. याशिवाय अरबस्तानात शेकडो वर्षांपूर्वी हिरवट छटा असलेले नेत्रचूर्ण वापरीत तेही या शेख फॅशनमध्ये वापरले जाईल. त्यामुळे नेत्रांना स्वाभाविक गहिरेपणा प्राप्त होईल! असे हे गहिरे डोळे ओठांच्या रंगाशी मिळते-जुळते पाहिजेत. म्हणूनच शेख पद्धतीत वाळवंटातील 'सॅन्ड स्टोन'चा रंग, अधरांना बहाल करण्यात येईल. त्यासाठीच तशा नवीन रंगाच्या लिप्स्टिक्स तयार करण्यात आल्या आहेत.

पण ह्या रुक्ष तपशीलात शिरण्याचे आपणास कारणच नाही. कारण पाश्चात्यांचे विचार आपल्याकडे रुजण्यास भरपूर काळ लागत असला, तरी त्यांच्या फॅशन्स आपल्या देशात फार जलद गतीने येतात नि रुजतात! सध्या आपल्याकडील कित्येक शहरी ललना "क्लिओपात्रालुक"च्या अनुयायी आहेत, पण काही दिवसांनंतर त्या "शेख स्टाईल"च्या अनुयायी होतील!

-आणि मग आपल्याकडील आशिकांना नवे "अमेरिकन रॉकेट" आपल्या दिलावर आदळत असल्याचा भास होईल. दिलाची दाणादाण उडविणारी ती शेखनजर आपल्या रसिकांना "शेख-नजर" वाटू लागेल. पण तरीही ते भारतीय औदार्याने म्हणतील -

तेरी आँखोंका कुछ कुसूर नहीं ।
हाँ, मुझीको खराब होना था ।।

●

(रविवारची लोकसत्ता : २४-२-१९६३)

९. देशासाठी केसांची कुर्बानी !

स्त्री म्हणजे आदिमायेचा अवतार ! तिची सूरत सदैव खुबसूरत दिसावी म्हणूनच परमेश्वराने केशकलापाचा किरीट तिला बहाल केला आहे.

राजकन्या असो वा किसानकन्या असो; रेशमासारखा मुलायम केशसंभार हाच रमणीचा रम्य सिरताज ! इतर कोणालाही तिने डोक्यावर बसवून घेतले नसले तरी, हा सिरताज तिने आनंदाने धारण केला आहे !....

- आणि तिने असा बहुमान दिल्यानंतर तो मुलायम केशसंभार का हुरळून जाणार नाही ? तिचा बंदा गुलाम का होणार नाही ?

त्या कुरळ्या केशांनी रमणीची हरप्रकारे सेवा करण्याचे व्रत अंगिकारले. पहा तो काळा-कुरळा केशसंभार तिच्या मुखाची शोभा वाढविण्यासाठी 'फ्लॉवर पॉट' बनला. तिच्यावर लट्टू झालेल्या आशिकांची बेबंद बेफाम हृदये करकचून बांधणारा रेशमी पाश बनला ! तिच्या सौंदर्यवर्धनासाठी हस्तिदंताशी त्याने टक्कर घेतली. हस्तिदंती फणीचा नांगर आपल्या देहावरून फिरवून घेतला ! तो तिच्या शिरीचे छत्र बनला. तिच्या नितंब-बिंबाचे गुणगौरव करणारे चामर बनला आणि अशा नाना प्रकारची कामगिरी करूनही तो सच्च्या कार्यकर्त्याप्रमाणे बहुश: पाठीमागेच राहिला !...

बालांच्या 'बालां'ची जादू !

अशा या केसांचे महत्त्व नि आकर्षण प्रेमीजीवांना (आणि कविजनांना) वाटल्यास नवल कसले ? म्हणूनच त्यांच्या अनेक सुंदर सुंदर काव्यपंक्ति त्या केशांवर कुर्बान झाल्या; हजारो स्तुतिसुमने त्यांत गुरफटून गेली. त्या सुगंधित नि मुलायम केसांची एक बट जरी उभ्या आयुष्यात प्राप्त झाली, तरी त्यांना धन्यता वाटू लागली. सुंदर नवबालांच्या 'बालां'नी अशी काही नवल परीची जादू केली-की, प्रौढांची मनेही प्रणयविकारांनी बालिश झाली ! त्यांना केशांची आनितंब रुळणारी वेणी नागीण वाटू लागली. अन् ती नागीण त्यांच्या हृदयाला प्रणयाचे (गोड गोड) चावे घेताच, कल्पनाशक्ती बेहोष होऊन त्या नागिणीला काव्याचे अमृत पाजू लागली ! उदाहरणार्थ, विख्यात हिंदी कवी पंडित नथूराम शंकर शर्मा यांचे काव्य पहा. ते म्हणतात —

" त्या सुंदर स्त्रीच्या यौवन-सरोवरात उरोजरूपी दोन हंस क्रीडा करण्यासाठी आले. तिच्या गळ्यांतील मोत्यांचा हार पाहून ते फार खूष झाले. ' आपल्याला हे मोती खायला मिळतील, ' या आनंदाने ते फुलले ! पण त्या मोत्यांवर ते झडप घालणार तोच, त्यांची नजर तिच्या मानेवर रुळणाऱ्या काळ्याभोर वेणीकडे गेली. त्यामुळे ते घाबरले. त्यांना वाटले, ही जहरी काळी नागीण आपल्याला डंख मारील. म्हणूनच ते हंस लगबगीने हिरव्या कंचुकीच्या कुंजात लपून बसले ! "

असा आहे कुरळ्या केशांचा - रमणीच्या शिरोभूषणाचा - आनितंब रुळणाऱ्या काळ्या नागिणीचा - मदनाच्या सुगंधित रेशमपाशाचा प्रभाव !

'पतितां'ना कोण विचारतो ?

पण कुठपर्यंत ? ते केश त्या सुंदर उच्चपदी विराजमान आहेत तोपर्यंत ! " एकदा का ते स्थानभ्रष्ट झाले, एकदा का त्या सुंदर शिरोभागावरची त्यांची सत्ता संपली, की त्यांना कोण विचारतो ? इतरांचे जाऊच द्या. ज्यांनी त्यांना शिकेकाईच्या उष्णोदकाने स्नान घातले; ज्यांनी सुगंधित तेलाने त्यांना माखले; ज्यांनी त्यांना बकुळीचे नि मोगऱ्याचे गजरे घालून सजविले; ज्यांनी त्यांना गुलाबी गालांशी हितगुज करण्यास कधी कधी मोकळे सोडले, त्या रमणी तरी त्यांना विचारतात का ? नाव नको ! ' अगबाई, मेली गुंतवळ तरी किती ! ' असे उद्गार काढून त्या कचऱ्याच्या टोपलीतच त्यांची बोळवण करणार. " यांनीच अनेक जवानांची हृदये आपल्याला अर्पण केली. यांच्या मुळेच —

नींद उसकी है, दिमाग उसका है,
रातें उसकी है ।
तेरी जुल्फे जिसके शानोपर
परेशाँ हो गयी ।।

असे गौरवोद्गार आपणाविषयी कविजनांच्या मुखांतून बाहेर पडले, " ह्याचे कृतज्ञ स्मरण त्यांना होणार आहे का ? मुळीच नाही. म्हणूनच शतकानुशतके केराच्या टोपल्यांतून करुण ध्वनि उठत राहिला — " स्त्रीजात तितकी निमकहराम ! "

पण केवळ स्त्रियांनाच का दोष द्यावा ? पुरुषांनी तरी केशांची कितीशी पर्वा केली आहे ? दरमहा नापितांकडून केशांची कत्तल होताना त्यांना कितीदा रडू कोसळले आहे ? छे छे, या जगात ' पतितां 'चा वाली केवळ परमेश्वरच !

त्या ' पतित-पावना 'लाच अखेर गळून पडलेल्या वा कटाप झालेल्या केशांची करुणा आलेली दिसते. त्याने पुढारलेल्या देशांतील लोकांच्या - विशेषत: स्त्रियांच्या - डोक्यांत केसांचा टोप (Wig) डोईवर बसविण्याची फॅशन शिरविली. आणि मग काय, पडेल केसांना, अगदी कचरापेटीतील गुंतवळालासुद्धा भाव चढला; मानवी केसांची आणि त्या केसांपासून बनविलेल्या बहुविध टोपांची निर्यात हा डॉलरप्राप्तीचा एक नवीन मार्ग

उपलब्ध झाला. आजवर उपेक्षेच्या उकिरड्यावर पडलेले मानवी केस, परकीय चलनाची चणचण दूर करण्याचे साधन बनले.

अलीकडील काही वृत्तांवरून भारतात हा 'मानव-केश-निर्याती'चा धंदा चांगलेच मूळ धरणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. कारण, अमेरिका, पश्चिम जर्मनी, हाँगकाँग, ऑस्ट्रिया, फ्रान्स, जपान, इटली, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया इत्यादि ठिकाणांहून भारतीय केशांना येणारी मागणी प्रतिवर्षी वाढतच चालली आहे. साहजिकच निर्यातही प्रगतिपथावर आहे.

अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स इत्यादि प्रगत देशांतील सुखवस्तु मंडळींत - विशेषत: महिला वर्गात - केशकिरीट घालण्याची रीत जोरात सुरू झाल्याने, भारतीय मानवी केसांच्या निर्यातीला जोर चढला, हे मघाशी सांगितलेच आहे. पण केसांचा टोप घालण्याची रीत वा फॅशन तरी का रूढ झाली ?

एक कारण तर उघडच आहे. केशवर्धक तेलांच्या जाहिराती काहीही म्हणोत, डोक्याला महिनोगणती तेलमालिश केले तरी, म्हणण्याजोगता गुण क्वचितच येतो. कित्येकदा तर केस जातात, अन् मालिशही वाया जाते ! 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे !' पण तेल रगडिता, टाळूचे केश गळणे थांबत नसल्याचाही अनेकदा अनुभव येतो. केसांचे पतन वेगाने सुरू झाले की, 'स्नेह-दान' विशेष परिणामकारक होत नाही. गुण आलाच तर तो तुरळक तुरळक !

मग 'तुरळक तुरळक केश रुपेरी' अथवा 'डोईस टक्कल छान' ही आपत्ती डोक्यावर कोसळते. ती लपविण्याचे सुंदर साधन म्हणचे केसांचा टोप ! राजमुकुट मस्तकी ठेवला तरी तेवढ्याने एखादा भिकारदास राजा भोजाप्रमाणे दिसू शकणार नाही. पण एखादा खल्वाट केश-किरीट धारण करताच दिलीप वा देव आनंद दिसू शकतो ! एखादी विरळकेशा वा विकेशा या काळ्या किरीटाच्या किमयेने क्षणांत —

'काळेभोर विशाल केश रुळती
जीच्या नितंबावरी'

अशी विपुलकेशा दिसू लागते !

पण ज्यांना देवाने विपुल केशाचे वरदान दिले आहे, त्या मॉडर्न मदनिकादेखील केश-किरीटाकडे झपाट्याने का वळल्या आहेत ? याचे कारण विविध केशरचना. या रचनांचे नाना नखरे मस्तकी मिरविण्यासाठी त्यांना वारंवार आपले मस्तक केशभूषाकारांपुढे (हेअर ड्रेसर्सपुढे) नम्र करणे भाग पडते. आणि त्यापायी बराच पैसा नि वेळ खर्ची पडतो. परंतु केसांचे बहुरूपी, बहुरंगी टोप उपलब्ध होताच, हा खटाटोप बराच संपुष्टात येत चालला ! टोपांच्या मदतीने वाटेल ती हेअरस्टाईल पाच मिनिटांत मस्तकावर विराजमान होऊ शकते.

केश-स्पर्धा

केसांचे टोप तयार करण्याचे अनेक कारखाने या पुढारलेल्या देशांत निघाले आहेत आणि त्यांची मागणी एकसारखी वाढतच आहे. भारतीय मानवी केसांना चांगली मागणी असण्याचे कारण हेच की, ते निग्रोंच्या केसासारखे राठ नसतात, तर मृदु मुलायम असतात. पाश्चात्यांच्या केसांशी मिळतेजुळते असतात. केस जितका अधिक लांब, तितकी त्याची किंमत अधिक. म्हणूनच भारतीय नारींच्या गुंतवळींतील लांब केसांना बरेच बरकतीचे दिवस आले आहेत.

बलिदान सार्थ झाले !

पहा काय गंमत आहे. दैवमूर्तीच्या मस्तकावरील फुलांचे निर्माल्य झाले की त्यांचे महत्त्व खलास ! त्या निर्माल्याची मातीच होते. पण देवापुढे बलिदान पावलेले मानवी केस या व्यापारी युगात मोल पावले आहेत !...

उद्या सलूनमधल्या उपेक्षित केसांना नि कचऱ्याच्या टोपलीतील गुंतवळांनादेखील या अर्थप्रधान युगात मोल येईल. नव्हे, येतच आहे.

देशाला परकीय चलन मिळवून देणाऱ्या पतित केसांनादेखील पावनता प्राप्त झाली ! त्यांची कुर्बानी धन्य झाली !... 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' हेच खरे. त्यामुळेच लोक एक वेळ पतितपावन केशवाला विसरतील, पण आपल्या पतनाने देशाला डॉलर्स मिळवून देणाऱ्या केसांची काळजी वाहतील नि म्हणतील 'केशाय नमः !'

●

(रविवारची लोकसत्ता : २/७/१९६७)

१०. गावोगाव भटकणारी गतिमान शायरी !

" माजले आहेत साले ! फटके मारले पाहिजेत. दारू पिऊन रॅश् ड्रायव्हिंग करतात हरामखोर.... " आमचा एक फेलोट्रॅव्हलर खोपोलीच्या उपहारगृहात गरम गरम भज्यांवर ताव मारीत, तावातावाने दुहेरी तोंडसुख घेत होता !

" नशीब बलवत्तर म्हणून आपण बचावलो बरं. " चहाचा घुटका घेत एकाने सुटकेचा नि:श्वास सोडला.

" पण आपली बस दुरुस्त व्हायला तब्बल दोन तास लागतील, " एक त्रासिक आवाज... पुनश्च ट्रकड्रायव्हरला सामूहिक शिव्यांची लाखोली !

साहजिकच होते. कारण, आमच्या लोकवाहिकेच्या-बसच्या-पिछाडीला माल-वाहकाने बराच मार दिला होता. हा पराक्रम करणाऱ्या ट्रकड्रायव्हरने बरीच झोकली होती, हेही खरेच होते. मग त्याच्यावर शिव्याशापांची बरसात झाल्यास त्यात नवल कसले ? ट्रक-ड्रायव्हर्सबद्दलचा वर्षानुवर्षे मनात साचलेला तिरस्कार पांढरपेशा प्रवाशांच्या मुखांतून धो धो वाहत होता ! हे असे अनेकदा होते.

विधायक सेवा

पण ट्रकड्रायव्हर्सच्या जीवनात एक विधायक बाजूही असते. यच्चयावत् ट्रकसारथी बेजबाबदार नि बेहोष असतात असं नाही.... रस्त्यावरून संथपणे जाणाऱ्या काही ट्रक्सकडे पाहून माझ्या विचारचक्राने उलटी दिशा घेतली.

चकचकीत खाजगी मोटारींना धडक देणारे, रस्त्यावर खेळणाऱ्या बालकांचा बळी घेणारे हत्तीहून प्रचंड ट्रक्स आमच्या तिरस्काराचा विषय व्हावेत, हे साहजिक आहे. पण दररोज शेकडो मैलांचे अंतर रात्री अपरात्री कापून धान्याची पोती (बरीचशी अमेरिकन ?) खेड्यापाड्यापर्यंत पोचविणारे, अवजड यंत्रसामुग्री दूरवर पोहचवून देशाच्या औद्योगिक विकासाला हातभार लावणारे, नाटकांच्या सेटिंग्जचे सामान या गावाहून त्या गावी नेऊन जनतेचे मनोरंजन साधणारे; सिमेंट, दगड, माती वाळू यांचे ढिगारे इकडचे तिकडे नेऊन टोलेजंग बांधकामास हातभार लावणारे.... छे, छे ! या लोकसेवेची यादी खूपच मोठी होईल. सांगण्याचा मुद्दा एवढाच की ट्रक्स नि ट्रकड्रायव्हर्स यांच्या या सेवेची अति परिचयात्

अवज्ञा होते ! अति परिचयात् ? नव्हे नव्हे, अहर्निश कष्ट उपसणाऱ्या या लोकसेवकांची पुरेशी ओळख पांढरपेशांना नसते, म्हणूनच ते या श्रमिकांचा तिरस्कार करतात.

साधे सोपे कवित्व

पण ट्रक्सच्या पाठीमागच्या भागावर ड्रायव्हर लोकांनी मोठ्या हौसेने रेखाटून घेतलेले 'शेर' डोळ्यापुढे आणा. म्हणजे त्यांचे मनोगत तुम्हास आपोआप कळेल. सदान्‌कदा फिरतीवर असलेल्या या कष्टाळू जीवांची कथा नि व्यथा, आवड नि निवड, सुख नि दु:ख यांचे ओझरते दर्शन तरी खास होईल. ट्रकच्या पाठीमागच्या फळीवर रेखाटलेली ही वचने म्हणजे अक्षरश: गतिमान काव्य होय ! अक्षरश: खेड्यापाड्यापर्यंत यांचा संचार झाला आहे. आजकालच्या जमान्यात सर्वात अधिक चलती असलेले काव्य ते हे !

हे शेर, हे श्लोक, फारसी-प्रचुर नाहीत अथवा संस्कृतप्रचुर नाहीत, साध्या लोकांचे साधे सोपे नि चुरचुरीत बोल आहेत हे ! त्यांच्यात लोकसाहित्याचा सुबोध नि सीधा ढंग भासमान होतो. क्वचितच एखाद्या नामवंत कवीचा शेर ट्रकचा पृष्ठभाग मंडित करतो. पण बहुसंख्य शेर उपेक्षित, अज्ञात कवींचेच असातात. शेर-शायरींचा शौक असलेल्या ट्रकड्रायव्हर्सच्या अथवा त्यांच्या शायरदोस्तांच्या लेखणीतून उतरलेले असते हे ट्रकसाहित्य !

संभलकर चल प्यारे !

या सारथीसाहित्याकडे जरा नजर तर वळवा. घटकाभर मनोरंजन होईल आणि बोधामृतही मिळेल पहा —

बेदरकारपणे ट्रक चालविल्याने अनेकदा आपल्या शिव्याशापांचा विषय झालेले हे ट्रकसारथी रॅश ड्रायव्हिंगचे दुष्परिणाम जाणत नाहीत, असे नाही. गाडी सावधानतेने चालवावी हे तत्त्वत: त्यांनाही कबूल आहे. म्हणूनच ते आपल्या व्यवसायबंधूला मोठ्या प्रेमाने सूचना करतात —

"संभल कर चल प्यारे !
जिंदगी अनमोल हैं !"

आणि प्रिय बंधो ! ही सूचना तू मनावर न घेता वाहन वेगाने हाकलून आम्हाला 'ओव्हरटेक' करण्याचा प्रयत्न केलास तर... ? तर तू प्राण संकटात पडशील. लक्षात ठेव —

चलनेसे घम्‌घम् ।
तुझे धोखा, मुझे गम ।।

परंतु कधी कधी आपल्या व्यवसायबंधूंना, विशेषत: खाजगी मोटर-गाड्यांच्या सारथ्यांना टोमणाही हाणलेला आढळतो. ओव्हरटेक करून पुढे सटकू पहाणाऱ्या आलिशान गाड्यांच्या वारंवार वाजणाऱ्या हॉर्नला दिलेला जबाब पहा —

'हम चलते, तो तुम क्यो जलते ?'

अरे, सरळ रांगेत चाला. आपल्या चकचकीत गाडीचा रुबाब दाखविण्यासाठी, पुढे घुसण्याचा खटाटोप का करता ? आम्ही आमच्या मागनि सरळ चाल्लो आहोत, मग तुम्ही का जळता ? ड्रायव्हरने जाळायचे असते पेट्रोल, — मत्सराने स्वत:चा दिल जाळून घेणे त्याला शोभत नाही !

या ट्रकड्रायव्हर्सनी अनेक प्रकारच्या रस्त्यांवरून मुसाफिरी केलेली असते. प्रशस्त राजमार्गाप्रमाणेच बिकट घाटांची वहिवाट केलेली असते. आणि त्यामुळेच त्यांनी अनेक अपघात पाहिलेले असतात. कधी अंधाऱ्या तर कधी भरदिवसा राजमार्गावरही अगदी किरकोळ कारणाने त्याला घोर अपघात घडतो ! कधी एक केसाच्या अंतराने वाहन बचावते, तर कधी एक केस अंदाज चुकताच वाहन उलटे-तिलटे होऊन दरीत कोसळते ! कधी बेहोष ड्रायव्हर अनेक चुका करूनही बचावतो, तर कधी होषवाला हुशार ट्रकवाला, त्याची स्वत:ची चूक नसतानाही दगावतो ! नियतीचे असे अनेक खेळ प्रत्यक्ष पाहिल्याने, इतकेच नव्हे तर अनुभवल्याने, ट्रकड्रायव्हर्स भोळे, देवभोळे नि दैववादी बनल्यास आश्चर्य नाही. हातांतील 'स्टिअरिंग व्हील'पेक्षा नियतीचे चक्र लाखो पटीने प्रभावी आहे, ही त्यांची दृढ श्रद्धा असते. म्हणूनच अनेक ट्रक्सवर लिहिलेले असते —

मुद्दई लाख बुरा चाहे
तो क्या होता है ?
वही होता है,
जो मंजुरे खुदा होता है ।।

याच अर्थाचा पण याहून काव्यात्म शेर कधी कधी ट्रक्सवर आढळतो. तो असा

फानूस बनके जिसकी
हिफाजत खुदा करे ।
वो शमा क्या बुझें
जिसे रोशन् खुदा करे ?।।

(स्वत:च संरक्षक कवच बनून खुद्द परमेश्वरच ज्या दीपज्योतीची देखभाल करीत आहे, तिला प्रकाशित करीत आहे, तर ती विझेलच कशी ?)

अशा या दैववादी ड्रायव्हर्सनी दैवावर नि देवावर इतका भरंवसा ठेवला, तरी देवाने नि दैवाने त्यांच्या नशिबी काबाडकष्टच ठेवले. 'भगवान तेरे सहारे,' असे त्यांनी आपल्या ट्रक्सच्या ललाटी लिहिले; तरी भगवंताने ह्या श्रमिकांच्या ललाटी रुक्ष जीवनाचे सहारा वाळवंटच लिहिले ! रोज मैलोगणती एकाकी भ्रमंती; इंजिनची नि चाकांची घरघर, पेट्रोलचा उग्र गंध ! स्वत:ची बायको नि मुलेबाळे घरी ठेवून दगड-धोंड्यांची पलटण दूरवर घेऊन जाणे, हे त्यांचं कर्तव्य ! प्रियजनांचा विरह त्यांना वारंवार घडत असतो. त्यांचे जीवन

अक्षरशः मोटारीच्या चाकांना बांधलेले असते. म्हणूनच कोण्या ट्रकवर लिहिले होते —

'बुलबुलकी जिंदगी है
चंपा की डालपर
मगर ड्रायव्हर की जिंदगी है
मोटर की चाल पर ।।

मित्र हो, तुमच्यासारख्या सुखी बुलबुलाचे जीवन वैभवाच्या चंपक उद्यानांत, चाफ्याच्या डहाळीवर, खुषबूदार चाफेकळीच्या सहवासात जात असेल ! पण आम्हा ड्रायव्हरांची जिंदगी मोटारीच्या भ्रमंतीत अडकलेली आहे ! काय सांगावी या भ्रमणशील जीवनाची करुण कहाणी ! प्रियजनांच्या विरहाची उदास छाया त्यावर पसरली आहे. बाकी अशा दीर्घ विरहाची वेदना तुम्हा सुखी जीवांना कशी कळणार ? ती वर्णने करणेही कठीण आहे... ट्रकच्या पिछाडीवरील एक शेर म्हणतो —

अगर सारी जमीं हो कागज
और समंदर हो सिहाईका ।
मगर लिखा नही जाता
सद्मा जुदाइका ।।

(साऱ्या धरणीचा कागद केला आणि साऱ्या समुद्राची शाई बनविली तरी, ताटातुटीच्या व्रणांचे यथार्थ वर्णन रेखाटता येणे शक्य नाही !)

पण बायका-मुलांना, आई-वडिलांना सोडून पोटासाठी दूर देशी भटकत फिरणे हेच ड्रायव्हरच्या नशिबात लिहिलेले असते. आणि हा ललाटलेख पुसून टाकण्याचे सामर्थ्य आपल्या दुर्बळ हातात नाही, याची जाणीव कित्येकांना झालेली असते. म्हणूनच काहीजण आपल्या ट्रकवर ही अगतिकता अशी श्लोकबद्ध करतात —

'जहाँ बेदर्द हकीम हो
वहाँ फरयाद क्या करना ?
किस्मत में लिखा परदेश
तो वतन को याद क्या करना ?

(अहो, रोग्याच्या वेदनेकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेदर्द वैद्याप्रमाणे, दैव बेपर्वा झालेले आहे. मग उगाच तक्रार करण्यात काय अर्थ आहे ? आणि आमच्या नशिबी परदेशांत एकाकी भ्रमण करणेच लिहिले असेल, तर आपल्या देशाची, मुलखाची आठवण काढण्यात काम हशील ?)

दुर्भागी दफन !

हंशील असो वा नसो, प्रियजनांची आठवण येणारच. कोणीतरी ओळखीची, प्रेमाची व्यक्ती भेटेल अशी वेडी आशा वाटणारच. म्हणून लॉरीवरील एक शेर म्हणतो —

जाता हुँ मै अकेला
अपने सफर को यारो ।
मुड मुड के देखता हूँ
शायद कोई पुकारे ।।

(दोस्त हो, मी तर एकटाच मुसाफिरीला निघालो आहे पण पुनः पुनः वेडी आशा मनात धरून मागे वळून पाहतो, कोणी मला प्रेमाने हाक मारणारा दिसतो का ?)

हाय ! हाय ! नाही, कोणीही ओळखीचा हमदर्द आम्हांला दिसत नाही. एकलेपणाची आग नि विरहाचा व्रण हृदयात धारण करीत आम्ही ही निर्मनुष्य वाट तुडवीत आहोत. बस्स, अशा या भ्रमंतीतच एका दिवशी आमचा कुठेतरी परमुलुखात मृत्यु व्हायचा ! आमची उत्तरक्रिया बेवारशी माणसासारखी व्हायची ! कोणी अश्रु ढाळणारा नाही, कोणी अंत्यसमयी मुखात गंगाजल टाकायला नाही ! ... ही दुःस्थिती एका ट्रकवरील ' शेरा 'त किती विदारकपणे सांगितली आहे —

हम मुसाफिर है,
गाडी है वतन अपना ।
टायरो में होगा दफन,
ट्यूबे होंगी कफन अपना ।।

पण का ? का ही शोचनीय दुर्दशा आमच्याच वाट्याला यावी ? धिप्पाड यमदूतासारखे ट्रक कोणी बनवलेच नसते तर ? तर मग हा ट्रकड्रायव्हरचा पेशाच नशिबी आला नसता. घर असूनही असे बेघर होण्याची पाळी आमच्यावर आली नसती. म्हणूनच ट्रकवरील एका ' शेरा 'त प्रार्थना केलेली आहे —

खुदा गारद करे
मोटर बनानेवाले को ।
घरसे बेघर बनाया
मोटर चलानेवाले को ।।....

हितोपदेश

परंतु, वैतागाच्या भरात उच्चारलेली ही क्षणिक वासना होय. एरव्ही कोणी गारद व्हावा, अशी इच्छा कोणताही मोटर चलानेवाला बाळगणार नाही. आपल्या दुःस्थितीचे खापर तो आपल्या दुर्दैवावरच फोडत असतो. आणि —

परवाह नहीं मुझे
सारा जमाना खिलाफ हो ।
मै वही रास्ता चलूं,
जो सीधा और साफ हो ।।

— अशीच अभिलाषा बाळगतो. जीवनाचे नाना रंग त्याने पाहिलेले असतात, म्हणूनच प्राय: अशिक्षित असूनही त्याचा दृष्टीकोन रुंदावलेला असतो. म्हणूनच तो आपल्या ट्रकच्या पृष्ठभागावर अनुभवसिद्ध हितोपदेश स्वत:साठी नि इतरांसाठी रेखाटून ठेवतो. त्यांतील मी टिपून घेतलेले हे काही शेर वाचा —

जिंदगी में नेकी कर बंदे
मुफ्तका खाना छोड दे ।
न होता किसीका भला
तो बुरा भी करना छोड दे ।।

मुसीबतका इक-इकसे
अहवाल कहेना ।
मुसीबतसे है यह
मुसीबत जियादा ।

फरिश्तेसे बहतर है
इन्सान बनना ।
मगर इसमें पडती है
मेहनत जियादा ।।

' अहर्निश ट्रक चालविणारे हे अडाणी दारुडे ड्रायव्हर ! ह्यांना देश, धर्म, संस्कृती कुठली ठाऊक असणार ? ' असा गैरसमज पांढरपेशांनी बाळगू नये. ऐन हिंदू-मुसलमान दंग्याच्या वेळी एका ट्रकवर मला लिहिलेले आढळले —

कौन हिंदू कौन मुसलमान
कौन सिख सरदार है ?
फिर कर देखिये रगोमें
एक खून की धारा है ।।

बोला, यातील धर्मातीत राष्ट्रीयताच आपले नेते उच्चरवाने तेव्हा सांगत नव्हते काय ?

तसेच भाषिक प्रश्नावरून जेव्हा राजकारणांत अक्षरश: हाणामाऱ्या चालल्या होत्या, त्या वेळी —

यारो ! अपनी बोली,
मुहब्बत की बोली !
न उर्दू, न हिंदी, न कन्नड, मराठी !

असे आपल्या ट्रकवर लिहिणाऱ्या ड्रायव्हरचा दृष्टीकोन अभिनंदनीय नव्हे काय ?

आपल्या देशाचा, फार काय सांगावे आपल्या गावाचादेखील ट्रक ड्रायव्हरला मोठा

अभिमान वाटतो. म्हणून तर —

जो शहीद हुये है वतन पे,
उनकी याद करो कुरबानी

असा संदेश ते लॉरीवर रेखाटतात आणि आपल्या साताऱ्याकडील ट्रक्सवर

चमकला सूर्याचा तारा
धन्य तो दक्षिण सातारा !

अशी अक्षरे अनेकदा आढळतात.

जीवनातील दारिद्र्य दु:ख व कष्ट भरपूर अनुभवूनदेखील या ट्रकसारथ्यांची वृत्ती पुष्कळशी आनंदी राहिलेली आढळते. पांढरपेशांप्रमाणे फार काळ कुढत बसणे नि 'आऊट ऑफ मूड' होणे त्यांना मानवत नाही. जीवनात जो भोग वाट्याला आला असेल, तो हसतमुखाने भोगलाच पाहिजे, असेच त्यांना वाटते. कारण, परिस्थितीवर चिडून निष्कारण डोक्यात राख घालण्याने फायदा काहीच होत नाही हे त्यांना कठोर वास्तवाने पटविलेले असते. म्हणूनच ट्रकवर दर्दभऱ्या 'शेरां'प्रमाणेच आनंदी काव्यवचनेही झळकतात. कुणी आपल्या 'अनारकली' नामक गाडीचे 'अनारकली झम्झम् चली !' असे आनंदाने गुणगान करतो, तर कोणी आशावादी सांगतो,

रहेंगा गुलशन,
तो फूल खिलते रहेंगे :
रहेंगी जिंदगी
तो मिलते रहेंगे ॥

●

(रविवारची लोकसत्ता २२/१/१९६७)

११. 'इस् चंपीमें बडे बडे गुन !'

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

संवाहक : (अंग चेपणारा, चंपीवाला)

शृणोतु आर्या । संवाहकस्य वृत्तिं उपजीवामि ।
वसंतसेना : सुकुमारा खलु कला शिक्षिता आर्येण ।

(मृच्छकटिक : अंक २रा)

वाळवंट म्हणजे एक रुक्ष, चैतन्यहीन स्थळ अशी सर्वसामान्य कल्पना असते. पण मुंबईचे चौपाटीचे वाळवंट तसे नाही. निदान सायंकाळी ५ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ते रसिकतेने व जीवनातील उल्हासाने बहरलेले असते.

रंगीबेरंगी छत्र्यांची भेळ-पुरीवाल्यांची दुकाने, गंडेरीवाल्याचे फिरते ताफे, बाळगोपाळांचे वाळूतील किल्ले, झक्कपक् पोषाखातील गुलछबू तरूण-तरूणींचे हसणे-खिदळणे, समुद्रकिनारी एकमेकांना खेटून बसलेली व गोड गुजगोष्टी करणारी प्रेमिक युग्मे, ज्यांचा अंतरीचा हिरवेपणा अजून सुकला नाही अशी जून पिकली पाने, आर्यसमाजी महंताची प्रवचने इत्यादि अनेक गोष्टींनी मुंबईची चौपाटी मोठी आकर्षक झाली आहे. येथे मुंबईच्या अठरा पगड जातीचे लोक हवा खाण्यासाठी येतात आणि लोकमान्य टिळक, विठ्ठलभाई पटेल यांचे भव्य पुतळे नि तीर्थराज सागर यांच्या सान्निध्याने पुनीत झालेल्या या वाळवंटात आपापले संसार-ताप, घटकाभर का होईना विसरून जातात. समुद्राच्या निळ्या विस्तारावरून वाहत येणाऱ्या वायुलहरी अंगावर घेत या गजबजलेल्या चौपाटीच्या वालुकामय गादीवर बसून नुसती सभोवार नजर टाकली तरी जिवाची केवढी करमणूक होते ! ' जल बावडीका ' ' गंडेरी ऽ ' ' चना गरम ' च्या ललकाऱ्या, व्रात्य मुलांच्या वाळूतील फ्रीस्टाइल कुस्त्या, त्यांना आवरता आवरता नाकी नऊ आलेल्या लेकुरवाळ्या काकू, पारदर्शक रेयॉन नायलॉनच्या साडयांतील सिंधी पंजाबी युवती, ' साली आवनी, जावनी ' करणाऱ्या गोऱ्यापान पारशी पुरंध्री, विजोड जोडपी, जाड चष्म्यांच्या भिंगातून रोखून पाहणारे पेन्शनरांचे जुलमी डोळे, ' हवामें उडता जाये ' असे मलमली दुपट्टे, फडफडणारे रंगीबेरंगी अंचल, रुद्राक्षाच्या जपमाळा ओढीत बसलेले जटाधारी साधु, सघन केश-कलापांवरील गजऱ्यांचा सुगंध .... चौपाटीच्या विशाल रंगमंचावरील ती बहुरंगी

दृश्ये !

'सेठ, चंपी ?'

या बहुरंगी दृश्यांच्या यादीतून कितीतरी दृश्ये वगळली गेली आहेत. पण 'चंपी तेल मालिश 'चे दृश्य खात्रीने वगळता येत नाही. चौपाटीच्या यक्षनगरीत जेवढे भेळवाल्यांचे तेवढेच चंपीवाल्यांचेही महत्त्व आहे ! सूर्य मावळल्यावर चौपाटीवर अंधाराचे साम्राज्य सुरू होते आणि त्याचबरोबर चंपीवाल्यांचेदेखील ! डोक्यावर गांधी टोपी व खांद्यावर पंचाची घडी ठेवून सुमारे ५०-७५ चंपीवाले 'चंपीऽ' 'सर-मालिश' अशी ललकारी ठोकीत चौपाटीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फिरू लागतात. 'सेठ चंपी ? सेठ, सर मालिश ?' असे अपेक्षित गिऱ्हाईकाला आर्जवाने विचारू लागतात. हवा खाण्यासाठी अथवा भेळ गंडेरी खाण्यासाठी चौपाटीवर नियमाने येणारे जसे काही लोक असतात, तसेच चंपीवाल्याकडून 'कडक चंपी' करून घेण्यासाठी येणारेही काही सेठ असतात !

'मर्दनं गुणवर्धनम्'

चंपी ! कडक चंपी ! तशी बहुतेक सर्वांच्याच परिचयाची आहे. झोपण्यापूर्वी आपल्या मुलामुर्लीकडून पायावर नि पाठीवर पाय घेणारी प्रौढ मंडळी एका प्रकारे चंपीच करून घेतात. मुलेही मोठ्या आवडीने हे पाय देण्याचे काम करतात. (बाप वृद्ध झाल्यानंतर त्याला 'लाथ' मारण्याची ही रंगीत तालीमच असते काय ?) भारतीय पतिव्रता तर मोठ्या भक्तिभावाने पतिराजांची चरणसेवा करतात. शेषशायी श्रीविष्णूंचे पाय आपल्या वक्षःस्थळी घेऊन चुरणाऱ्या लक्ष्मीदेवींपासून ही परंपरा चालत आली आहे ! पण केवळ स्त्रियाच पुरुषांचे पाय चेपतात असे नाही तर रसिक नि प्रेमळ भारतीय पुरुषदेखील पत्नीचे संवाहन (अंगमर्दन) आवडीने करतात, असे दिसून येते. कालीदासाचा विरही यक्ष मेघाला सांगतो, " माझ्या प्रिय पत्नीची रसरसलेल्या केळीच्या खांबासारखी गोरीपान मांडी, मी माझ्या हाताने योग्य तऱ्हेने मर्दन करीत असे. ती आता माझ्या आठवणीने केवळ स्फुरणच पावेल !" **(संभोगान्ते मम समुचितो हस्तसंवाहनानां । यास्यत्यूरू: सरसकदली-स्तंभगौर: चलत्वम् ।)** आणि कालीदासाचा रसिक दुष्यंत काय म्हणतो पाहा :-

" हे सुंदरी, तुला मांडीवर बसवून, कमळाप्रमाणे तुझे लाल व कोमल पाय मी सुखाने चेपीन !"

(अंके निधाय करभोरू यथा सुखं ते । संवाहयामि चरणं उत पद्मताम्रौ ।।)

तात्पर्य 'मर्दनं गुण-वर्धनम्' हे तत्त्व भारतीय स्त्रीपुरूषांना नीट अवगत आहे.

अ-लिखित संकेत

अरे, पण आपल्या चौपाटीवरील चंपीवाल्याला बाजूस ठेवून ही घरगुती चंपी कशाला

मध्येच आली ? आपण पुन्हा त्या चंपीवाल्याकडे वळू. हे चंपीवाले उत्तरभारतीय मथुरा बनारसकडील आहेत. ऐषआरामी उत्तर भारतात मालिशचा धंदा चांगला चालत असल्याने चंपीवाले त्या भागातील असणेच साहजिक आहे. चौपाटीवरील या चंपीवाल्यांची पद्धतशीर युनियन नसली तरी त्यांचे काही अलिखित संकेत असतात आणि त्यांचे प्राय: काटेकोरपणे पाळन केले जाते. संपूर्ण अंग चेपणे, रगडणे यास 'चंपी' म्हणतात. तिचा दर सहा आणे असतो. 'कडक चंपी किंवा तेल मालिश' म्हणजे संपूर्ण अंग तेल लावून रगडणे. सुमारे तासभर रगडणे याचा दर १ रुपया असतो आणि 'सरमालिश' म्हणजे डोक्याला तेल लावून ते रगडणे-चोळणे याचा दर चार आणे असतो. हे दर काटेकोरपणे पाळण्याचा संकेत हे चंपीवाले कधीही मोडीत नाही. कोण्या गिऱ्हाईकाने खूष होऊन आणखी दोन-तीन आणे 'चा-पाण्यास' दिले तर ते सलाम करून त्याचा स्वीकार करतात. जो सरमालिश करणारा चंपीवाला असेल, त्याने चंपी वा कडकचंपी करता कामा नये आणि चंपी करणाऱ्याने सरमालिश करावयाचे नाही, हा अलिखित संकेतही हे सर्व चंपीवाले बिनचूकपणे पाळतात.

सहा आण्यांत नवाबी ऐट

गिऱ्हाईक चंपीला तयार झाले की वाळूच्या ढिगाऱ्याची उशी करून बाकीची वाळू हाताने सपाट करून ते वालुकामय बिछाना तयार करतात आणि त्यावर आपल्या काहीशा तेलकट पंचाची चादर पसरतात. या बिछान्यावर सेठजी आडवे झाले की संगीत चंपी सुरू होते. संगीत म्हणण्याचे कारण असे की, अंग रगडण्याइतकेच पाठीचा तबला करून त्यावर थापा मारणे, हाही चंपीचाच एक महत्त्वाचा भाग असतो ! मानेच्या मणक्यापासून तो पायाच्या बोटापर्यंत ही धबाधब चंपी आरामात चालू असते. ज्यांना संपूर्ण अंगाला तेलमालिश करून घ्यायचे असते, ते अर्थातच उघडेबंब होतात आणि नसन् नस रगडून घेतात. सर-मालिश करून घेताना शर्ट काढण्याची काहीच आवश्यकता नसते. गिऱ्हाईकाच्या मानेभोवती व खांद्यावर पंचा टाकून सरमालिशवाले डोक्यावर तेल चोळतात. काही चंपीवाले खरोखरच या मर्दन कार्यात कुशल असतात, तर बहुसंख्यांची भिस्त धबाधब् आवाज काढण्यावर व हातांतील ताकदीवर असते. कधीकधी चंपीवाले इतक्या जोराजोराने अंग रगडतात की, चंपी केल्यानंतरच अंग अधिक दुखू लागते ! संतापलेल्या त्राटिकाबाईंनी भाकरीची कणिक मळावी अशा थाटात काही चंपीवाले गिऱ्हाईकाची हड्डी नरम करतात. पण इतका त्रास अपवादात्मकच होय. चंपीवाला कुशल असो की मामुली कामचलावू असो, अंग रगडले गेल्याने रुधिराभिसरण होते व गिऱ्हाईकाला जरा हुशारी वाटतेच. डोक्याच्या तबल्यावर तबलजीच्या कौशल्याने होणारे सुखद आघात, शिरा मोकळ्या होणे, हातापायांची बोटे काड्काड् मोडणे इत्यादि मर्दन क्रियांनी चंपीचा आनंद निर्माण होतो, हे तर खरेच पण चौपाटीवरील चंपीचा खरा आनंद मुख्यत: भावनात्मकच असतो. समोर मंद गर्जित करणारा सागर नि वरती तारकांनी चमचमणारे छत अशा चौपाटीच्या हवा-महालात आपण

लखनौच्या नवाबासारखे मऊ गाद्या-गिरद्यांवर पहुडले आहोत आणि कोणीतरी ' गंगाशरण ' ' रामचरण ' आपले चरण चुरीत आहे, या कल्पनेनेच आपणास आनंद होऊ लागतो ! आणि हा औटघटकेचा नवाबी आनंद अवघ्या सहा आण्यात. !

भारतीय मर्दनशास्त्राचा लोप

आपल्याकडील हाडवैद्य हे या चंपीवाल्यांचे भाऊच आणि बाळंतिणीच्या अंगाला तेल चोळणाऱ्या सुईणी या त्यांच्या बहिणीच होत ! चंपीवाले, हाडवैद्य, सुईणी हे सारे मर्दनकलेचे उपासक आहेत. निसटलेले हाड अनुभवी हाडवैद्य व्यवस्थित बसवतात व परंपरागत लेप त्यावर बांधून व्यथा नाहीशी करतात. मुरगळलेल्या, लचकलेल्या वा सुजलेल्या भागास तेलमालिश करून तो भाग बरा करणारे मसाजवाले खेडचापाडचांतही अनेक असतात. पण या सर्व मर्दन-पटूंना गुरूपरंपरेने जे काही ठोकताळे कळले असतील तेवढेच. एरव्ही मर्दनशास्त्राचे शुद्ध ज्ञान त्यांना नसते. प्राचीन भारतात मर्दनशास्त्र जाणणारे व त्याचा व्यवसाय करणारे लोक होते. त्यांना संवाहक म्हणत, पण कालाच्या ओघात ती संवाहन-कला नि शास्त्र लोप पावले. संवाहन-कला ही मोठी नाजुक कला आहे, याची जाणीव प्राचीन भारतीयांना होती, हे या लेखाच्या आरंभी दिलेल्या अवतरणावरूनही दिसून येईल. त्यात वसंतसेना संवाहकाला म्हणते, " ही मोठी नाजुक कला आपण हस्तगत केली आहे. "

पाश्चात्यांचे मर्दनशास्त्र

ही नाजुक कला नि शास्त्र माहीत नसलेल्या अडाणी चंपीवाल्याकडून कधी कधी व्यथा दूर होण्याऐवजी अधिक वाढण्याचा प्रसंग ओढवतो. असा प्रसंग माझ्या एका मित्रावर नुकताच ओढवला होता. त्याच्या मांडीत लचक भरली होती. चंपीवाल्याच्या जोरदार रगडण्याने ती अधिकच वाढली. तेव्हा मी त्याला बरोबर घेऊन गिरगावमधील मसाज स्पेशालिस्ट श्री. एम. व्ही. दामले, डी. एन. आय. एस. (लंडन) यांच्याकडे गेलो. त्यांनी आठ-दहा दिवस त्याच्यावर शास्त्रीय मर्दनाचे उपचार करून त्याला खडखडीत बरा केला. या निमित्ताने माझा श्री. दामल्यांशी परिचय झाला व आधुनिक (पाश्चात्य) मर्दनशास्त्राची थोडीशी माहिती मला झाली. या शास्त्रावरील काही वाङ्मय मला वाचावयास मिळाले.

पाश्चात्यांनी ' फिजिओथेरपी ' (म्हणजे नैसर्गिक उपचार चिकित्सा) नावाचे एक शास्त्रच आता सिद्ध केले आहे आणि मालिश अथवा मसाज हा त्याचा एक भाग आहे. या शास्त्राचे शिक्षण देणारी विद्यापीठे इंग्लंड, अमेरिकेत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून मुंबईच्या के. इ. एम. हॉस्पिटलमध्ये या शास्त्राचा दोन वर्षांचा शिक्षणक्रम सुरू करण्यात आला आहे. इंटर-सायन्स झालेल्यांना तेथे प्रवेश मिळतो.

' फिजियोथेरपी 'मध्ये तेलाने अथवा टाल्कम् पावडरच्या साहाय्याने मर्दन करणे,

विजेच्या यंत्राच्या साहाय्याने शेक देणे वा मालिश करणे, वाफेने किंवा गरम पाण्याने शेकणे, टबबाथ देणे, थंडपाणी व बर्फ यांचाही वेळप्रसंगी उपचार करणे, दुखऱ्या भागास यथायोग्य हलका व्यायाम देणे इत्यादींचा अंतर्भाव होतो. 'मसाज' या शब्दाचा ग्रीक भाषेत चोळणे असा अर्थ होतो, तर अरबी भाषेत 'दाबणे' असा अर्थ आहे. एकंदरीत मनुष्याच्या शरीरांत रक्तवाहिन्या, मज्जातंतू इत्यादींची जी नाजुक वेष्टने व जाळी आहेत, त्यांच्यावर शरीराच्या बाहेरून उपचार करणे म्हणजेच मालिश अथवा मसाज.

'इस चंपीमें बडे बडे गुन !'

अशा मसाजमुळे शरीरात नवचैतन्य संचारल्याविना राहत नाही. या शास्त्रशुद्ध चंपीत अनेक गुण सामावलेले आहेत. 'इस चंपीमें बडे बडे गुन' असे एका हिंदी बोलपटात चंपीचे महात्म्य वर्णन केले आहे, ते खरे आहे. पण त्यासाठी ती चंपी त्याच सिनेमात दाखविल्याप्रमाणे जॉनी वॉकरटाइप नको शास्त्रशुद्ध हवी.

'या शास्त्रपूत चंपीपासून - 'मसाजपासून कोणते फायदे होतात ?' असा प्रश्न मी मसाज स्पेशालिस्ट दामले यांना एकदा विचारला असता ते प्रोफेसरच्या उत्साहाने सांगू लागले, "अहो, फायदे अनेक होतात. चामडीच्या कार्यात सुधारणा होते; रक्त व लासिका यांचा प्रवाह वाढतो; आंतरिंद्रियाकडे रक्ताचा ओघ व्यवस्थित वाहू लागतो.' स्नायूंना चलन मिळून ते कार्यक्षम होतात. शरीराच्या भागावर आलेली सूज नि बधिरपणा नाहीसा होऊन ते पूर्ववत होतात आणि या सर्वांचा संकलित परिणाम शरीराचा थकवा इत्यादि नाहीसा होण्यात होतो" आणि मग त्यांच्या शास्त्रीय विवेचनाचा ओघ मालिश केव्हा करावे, केव्हा करू नये, मालिशच्या 'एप्लाराज,' 'फ्रिक्शन' व 'प्रेटिसेज' या पद्धति. 'पॅसिव्ह व ॲक्टिव्ह' व्यायाम इत्यादि गहन विषयांकडे वळला. तेव्हा मी म्हटले, "दामलेसाहेब, तुमच्या मालिशने शरीराला आराम वाटत असला, तरी त्याचे शास्त्रशुद्ध विवेचन ऐकून मात्र मी थकून गेलो आहे. आता पुरे !" "असं का ?" दामले हसून म्हणाले आणि त्यांनी इलेक्ट्रिक मसाजचा लोहगोल अर्धा मिनिट माझ्या डोक्यावरून व पाठीवरून भुर्रकन् फिरवला. झाले. माझा शीण नाहीसा झाला आणि उत्तम चहा घेतल्यावर जशी तरतरी येते तशी तरतरी मी अनुभविली !

मर्दन आणि मदन

पाश्चात्यांचे मालिशचे शास्त्र आत्मसात केलेले स्त्री-पुरुष आपल्याकडे तुरळकच आढळतात. स्त्रियांचे हात निसर्गत:च नाजुक असल्याने त्या उत्तम संवाहिका होऊ शकतात. पण या व्यवसायाकडे आपल्या स्त्रियांचे लक्ष अजून वळलेले नाही. हां ! 'मसाज हाऊस' अथवा 'मसाज होम' अशा धर्तीच्या पाट्या लावून बसलेल्या काही संवाहिका (?) मुंबई शहरात आढळतात. तेथे कोमल हातांना मालिशही केले जाते. पण त्याचा हेतू

वेगळाच असतो. तेथे मर्दनाचा हेतू मदनास जाग आणण्याचा असतो । शरीराचा थकवा घालविण्याऐवजी शरीरास वेगळाच थकवा आणण्याचे काम या संवाहिका करीत असतात ! शास्त्रशुद्ध मालिश तेथेही केले जात नाही.

अलंकारिक चंपी !

शास्त्रशुद्ध मालिश अथवा चौपाटीवरील ' संगीत चंपी ' यांचा अनुभव कोणी घेतला असो वा नसो. अलंकारिक चंपीचा अनुभव मात्र सर्वांना या ना त्या प्रकारे येतच असतो. फंड-गुंडपणा करून वा खोटी आश्वासने देऊन पुढारी लोक गरीब जनतेची चंपी करतात, तर संतापलेली जनता दगड-अंडी-जोडे फेकून पुढाऱ्यास चंपीचा अनुभव देतात ! ब्रात्य विद्यार्थी शिक्षकांची तर रागीट नि खाष्ट शिक्षक विद्यार्थ्यांची चंपी करतात. ' सांसारिक जीवन म्हणजे नवरा-बायकोनी परस्परांची केलेली चंपी !' असेही सुभाषित खांडेकर पद्धतीने तयार करता येईल. कारकुनांची चंपी सरकारकुनाकडून आणि सरकारकुनाची सुपरिन्टेंडंटकडून, अशीही चंपीची परंपरा थेट ' सुप्रीम बॉस 'पर्यंत भिडविता येईल. पण आता हे चंपीपुराण पुरे. नाहीतर ते कंटाळवाणे होऊन वाचकांची चंपी केल्याचा अपराध घडायचा !

●

(रविवारची लोकसत्ता : ६-४-१९५८)

१२. मुंबईच्या जीवनात रंग भरणारे पानवाले !

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

धारानगरीचा भोजराजा आज फार खुषीत होता. कारण त्याच्या दरबारी पानवाल्याने आज अतिशय उंची, उत्तेजक व सुगंधी तंबाखू तयार करून त्याच्या पानात घातली होती. त्यामुळे इतकी गोड धुंदी त्याच्या मस्तकात रेंगाळू लागली की, राजकारणाच्या चिंता घटकाभर हद्दपार झाल्या. तो त्या गोड धुंदीतच " तमाखुः तमाखुः तमाखुः तमाखुः ' असा जप मनातल्या मनात करीत दरबारात आला आणि दरबारी कवींसमोर त्याने समस्या टाकली. " ज्याची शेवटची ओळ ' तमाखुः तमाखुः तमाखुः तमाखुः ' अशी आहे असा श्लोक येथल्या तेथे ताबडतोब करून दाखवा. "

सारे कवि बुचकळ्यात पडले. कोणालाच समस्यापूर्ति जुळेना. पण कवि-कुलगुरू कालिदास मात्र पुढे सरसावला आणि उद्‌गारला — " राजन्, एकदा ब्रह्मदेवालाही अमृताचा वीट आला. तेव्हा तो नारदाला म्हणाला, ' बा नारदा, अमृताहूनही जास्त उत्तेजक नि चवदार अशी एखादी वस्तु आहे काय ?

' आहे तर ! आपणच पृथ्वीतलावर मानवांना आनंदित करण्यासाठी अशी एक वस्तु निर्माण केली आहे, की जिचा देवांनाही लोभ सुटावा आणि तिजपुढे अमृतही केविलवाणे वाटावे ! '

' तर मग आत्ताच्या आत्ता घेऊन ये ती वस्तु. ' ब्रह्मदेवाने हुकूम दिला.

मग नारद पृथ्वीतलावर आला व येथून उत्तम तंबाखू घातलेले एक पान घेऊन, तो ब्रह्मदेवाकडे परतला. ब्रह्मदेवाने ते पान चघळताच त्याचे मन फार प्रसन्न झाले. त्याने विचारले. ' नारदा, ही उत्तेजक वस्तु कोणती ? '

नारद म्हणाला, ' पान-तंबाखू महाराज ! '

ते ऐकताच ब्रह्मदेव कौतुकाने आपल्या चारीही तोंडाने क्रमशः उद्‌गारला, ' अहाहा ! तमाखुः तमाखुः तमाखुः तमाखुः ! ' ही गोष्ट सांगून कालिदास म्हणाला, " महाराज, म्हणूनच तुम्ही टाकलेली समस्या मी अशी पुरी केली आहे : -

तमाखू-विडा भक्षितां ब्रह्मदेवे
वदे तो 'सुधेचा न बिंदुहि चाखूं'

जपे मंत्र धुंदीत चारी-मुखांनीं
तमाखुः तमाखुः तमाखुः तमाखुः !'

पान तंबाखूविषयीच्या अशा कितीतरी आख्यायिका या देशांत प्राचीन काळापासून चालत आल्या आहेत. पान-तंबाखूचा शौक रामायण-महाभारताइतका जुना असला पाहिजे. आपल्या धार्मिक विधींत देव-देवतांनाही तांबूल देतात. कालिदासाने रघुवंशांत 'तांबूलवल्ली. परिणद्ध-पूगाः' (म्हणजे पानवेली व वाढलेल्या पोफळी') यांचा उल्लेख केला आहे. या देशात राजा भोजापासून गंगू तेल्यापर्यंत आणि बाजीरावाच्या मस्तानीपासून तो खेडेगावातील एखाद्या मैनेपर्यंत, सर्व थरांतील लोकांत पान-तंबाखू खाण्याचा शौक दृष्टीस पडतो. विशेषतः उत्तर भारतात तो पूर्णावस्थेत गेलेला आढळतो. रंग-महालांतील मैफलीपासून तो विवाह-समारंभापर्यंत पान-तंबाखूने आमच्या जीवनात सर्वत्र एक प्रकारची रंगत नि लज्जत निर्माण केली आहे. पान-तंबाखूमुळे भारतीय घरांच्या केवळ भिंतीच रंगतात असे नाही, तर चार भिंतीआडचे एकांतही रंगतात !! सारांश, तंबाखू हा आमचा राष्ट्रीय शौक आहे, छंद आहे; व्यसन आहे. नवल नव्हे, की एकट्या मुंबई शहरात दिवसाला एक लक्ष रुपयांची पाने लोक खातात अथवा खाऊन थुंकतात ! प्रस्तुत लेखात केवळ मुंबईतील पानांच्या व्यापाराविषयी व शौकाविषयी काही माहिती देण्याचे योजिले आहे.

पानांच्या गंगोत्री नि जमुनोत्री !

लोकमान्य-पानबाजार व सुतार गल्लीतील पानबाजार ह्या मुंबईतील पानव्यापाराच्या गंगोत्री व जमुनोत्री होत. लोकमान्य-पानबाजाराचे उद्घाटन चाळीस वर्षांपूर्वी लोकमान्य टिळकांच्या हस्ते झाले. हा पानबाजार मुंबईतील गोलपिठ्याच्या जवळ असून, त्यांत सुमारे ७० ते ८० बडे व्यापारी आहेत. या व्यापाऱ्यांत ९९% महाराष्ट्रीयच आहेत. येथे दररोज बेळगाव, निपाणी, कोल्हापूर, सांगली, मिरज, मालेगाव, नाशिक, ठाणे इत्यादि ठिकाणांहून कच्ची पूना-पाने ट्रकने येत असतात. पानांची पार्सले मोठी काळजीपूर्वक बांधावी लागतात. पाने सडू नयेत अशी खबरदारी घ्यावी लागते. त्याचसाठी उन्हाळ्यांत पानांची पार्सले भरताना मध्ये मध्ये नाचणीचा थर टाकावा लागतो. अशा प्रकारची पार्सले लोकमान्य पान-बाजारांतील व्यापाऱ्यांच्या दुकानात येऊन पडतात. तेथून ती घाऊक व्यापारी व गादीवाले विकत घेतात. हीच पाने मुंबईच्या नळबाजारांतील मंडईत शेकड्याच्या दराने विकत मिळतात. लोकमान्य-पानबाजारातून विकत घेतलेल्या एक डागात सुमारे तेरा ते साडेतेरा हजार पाने असतात. आणि अशा प्रकारच्या ७०० ते ८०० डागांची विक्री रोज होते. पानांची किंमत पावसाळ्यात बरीच खाली उतरते, तर उन्हाळ्यात बरीच वर चढते. पावसाळ्यात एका डागाची किंमत वीस ते पंचवीस रुपये असते. तर उन्हाळ्यात ती शंभर रुपयांपर्यंतही चढू शकते. तथापि तीस ते चाळीस रुपये डाग ही पानांची सरासरी किंमत मानता येईल. लोकमान्य पानबाजारातील बराचसा व्यापार उधारीवर चालतो.

पंधरा-वीस वर्षांपूर्वी ही पूना-पाने आफ्रिकेतही जात असत, असे कळते.

पूना पानाखेरीज बंगला, देशी, मघई, डन्टन्, मद्रासी इत्यादि जातींची पानेही मुंबईत येतात. पण त्यांचा खप पूना-पानांच्या मानाने बराच कमी असतो. बोरीबंदर येथे या पानांची पार्सले सोडून घेऊन, ती सुतारगल्लीत विकावयास ठेवतात. ह्या पानांच्या व्यापारी वर्गात महाराष्ट्रीय अगदी अल्पसंख्य असून, उत्तर भारतीय, गुजराथी, मद्रासी व मुसलमान यांचा भरणा जास्त आहे. मद्रासी पानांत ' चादूर ' व ' शाकरी ' या जातींची पाने मऊ व नाजूक असतात. वर उल्लेखिलेली ' डन्टन् ' जातीची पाने पिकविण्यात येऊन, ती पानपट्टीवाले बनारसी पाने या नावाने विकतात.

पानांतील नर-मादी

देशी पूना, बंगाल इत्यादि पानांचे प्रकार ' प्रादेशिक ' मानावे लागतील. पण त्याखेरीज चोखंदळ पानशौकीनांनी पानांच्या आकारांवरून व शिरांच्या रचनेवरूनही काही प्रकार कल्पिले आहेत ! चिंचोळ्या लांबट आकाराच्या पानास ' पापडा ' म्हणतात. अतिशय लांब असलेल्या कळीच्या पानाला, ' नायकिणीची कळी ' असे रंगेल नावही कोहींनी दिले आहे ! ज्या पानाच्या मधल्या शिरेस नजिकच्या दोन्ही शिरा एकाच जागी मिळालेल्या असतात त्याला ' नर ' म्हणतात; आणि मध्यवर्ती शिरेच्या नजिकच्या दोन्ही शिरा वेगवेगळ्या जागी मिळाल्या असतील. तर त्या पानास ' मादी ' म्हणतात ! एक नर-पान व एक मादी-पान यांचाच विडा खाणारे काही ' फॅडिस्ट ' आढळतात ' कळीचे पान ' ' पापडा पाना 'हून जरा अधिक चवदार असल्याची समजूत आहे. म्हणून ती किंचित् महाग मिळतात.

पानांच्या 'गाद्या'

पानबाजारांशी पान-रसिकांचा प्रत्यक्ष संबंध येत नसल्याने, त्यांच्याविषयी अधिक न लिहिता पानांच्या गाद्यांकडे आपण वळू. गादीवाले उपरोक्त बड्या व्यापाऱ्यांपासून पाने विकत घेतात व सामान्यत: डझनांच्या भावाने गिऱ्हाईकांना विकतात. पाने व तत्संबंधी इतर साहित्य या गाद्यांवर मिळते. कोणतीही गादी पहा, तिचे स्वरूप साधारणत: सारखेच आढळेल. समोरच्या कट्ट्यावर पानांच्या वर्तुळाकार थापी; एक मोठा दांडा असलेले चुन्याचे डबडे व कोपऱ्यात बिडी पेटविण्यासाठी ठेवलेली जळती चिमणी दिसून येते. त्यानंतर मागील बाजूस तंबाखू व सुपारी यांचे कप्पे दिसून येतात. घुमटाकार डिझाईनच्या लाकडी कोनाड्यांतून निलगिरी तेलाच्या बाटल्या, सनलाईट साबूच्या वड्या, उदबत्त्यांचे पुडे इत्यादि सामान डोकावत असते. तंबाखू व सुपारी यांच्या कप्प्यांवर बिड्यांची बंडले व सिगारेटची पाकिटे शिस्तीने लावलेली आढळतात. आणि पोस्टाची कार्डे नि पाकिटे चिमट्यांनी लोंबकळत असतात ! गादीच्या पिछाडीस विड्या वळण्याचे कामही चाललेले दिसते. कित्येक गादीवाले या पिछाडीच्या खोलीतच राहतात. अशा गाद्या मुंबईत निदान सात आठ हजार तरी

असतील. बहुतेक सर्व गादीवाले कोकणी आहेत.

जिकिरीचे काम

गादीवर बहुश: पूना-पानेच ठेवतात. ही पाने गादीवाल्यांनी पिकवून ठेवलेली असतात. गाडीच्या पिछाडीस जसे विडी वळण्याचे काम चालू असते तसेच पान पिकविण्याचेही काम चालू असते. हे काम मोठे जिकिरीचे ! पानांच्या डागातून कुजकी पाने काढून टाकून, बाकीची व्यवस्थित साफसूफ करून एका लोखंडी गोल पिंपात ती वर्तुळाकार रचण्यात येतात. एक दिवसाआड पिंपातून ती पाने बाहेर काढून, पुन्हा त्यातील कुजकी पाने फेकून देऊन, पुन्हा उरलेली चांगली पाने त्यात भरतात. असा खटाटोप निदान दहाबारा दिवस तरी करावा लागतो, तेव्हा कोठे कच्ची पाने पक्की होतात ! पानांचा कुजका भाग कापून उरलेले कपटे गोरगरिबांना स्वस्त दराने विकले जातात. गादीवर एक प्रकारचे घरगुती वातावरण आढळते. गादीवाल्याला एक पैसा देऊन, तिथल्या तिथे स्वत: पान तयार करून खाणारी काही गिऱ्हाईके असतात. 'पैशाच्या बिड्या, पैशाची पाने, पैशाचा कात, पैशाची सुपारी आणि चुना मोफत !' अशी 'ऑर्डर 'गर्जून सांगणारी शेकडो गिऱ्हाइके गादीला भेट देत असतात ! पानपट्टीच्या दुकानावर तुम्हास स्त्री गिऱ्हाईके सहसा आढळणार नाहीत ! पण " चल दे की रं दादा पैशाची कळीदार पानं ! " असा आपुलकीने तगादा लावणाऱ्या मराठमोळ्या बाया; आणि आपली बिडी गादीवाल्याच्या चिमणीवर पेटवून मजेत झुरके मारणाऱ्या कोळीणी, ह्या मात्र गादीवरच आढळतील ! नारीजनांची अशी मेहेरनजर भपकेबाज पानपट्टीवाल्यांच्याही नशिबी नाही !!

सर्व प्रकारच्या गिऱ्हाइकांशी आणि विशेषत: अडाणी गिऱ्हाइकांशी शांततेने, आपुलकीने व तरीही व्यवहारीपणाने वागण्यावरच गादीवाल्यांचे यश अवलंबून असते. अशा प्रकारचे यश संपादन करणारे व कुर्ला येथील 'मामा पानवाले' यांची प्रसिद्ध गादी चालविणारे श्री. लक्ष्मणराव टेके यांना परवा पान खाताखाताच मी विचारले, " काय लक्ष्मणराव, कसा काय चाल्लाय धंदा ?

" अहो शेठ, कसला आमचा धंदा ? अडाणी लोकांशी आमची गाठ ! "

" म्हणजे काय माझ्यासारख्या ? "

" तस कसं म्हणन सेठ ? एका पैशाचा माल घेऊन डोकं उठवतात हे लोक ! " काही कामगार-गिऱ्हाईकांकडे बोट दाखवून लक्ष्मणराव वैतागाने उद्गारले. पण त्यांचा तो वैताग लटका नि क्षणिक होता. कारण थोड्याच वेळाने त्या गिऱ्हाइकांची किंचित् थट्टा-मस्करी करून त्यांनी त्यांची बोळवण केली आणि ते म्हणाले, " अहो, ही अडाणी गिऱ्हाईकं परवडली. पण गादीवाल्यांना खरा जाच होतो हिशेब ठेवण्याचा ! रोजी ५० रु.वर गल्ला असणाऱ्यांना विक्रीकर द्यावा लागतो. एका रुपयाच्या विक्रीवर ठेवला आहे तीन पैसे कर; आणि आमची माल घेणारी गिऱ्हाईकं तर असतात, पैशाची सुपारी नि

पैशाचा कात घेणारी. गर्दी करणारी आणि गिल्ला करणारी ! अशा स्थितीत गादीवाल्यांना नीट हिशेब कसा ठेवता येईल ? "

नर्गिस-निम्मी यांच्यामध्ये महात्मा गांधी !

' मुंबईतील रस्त्यांवर हॉटेलांचा अनुप्रास आहे, ' अशा आशयाचे कै. गडकऱ्यांचे वाक्य पुष्कळांना ठाऊक असेल. त्याच धर्तीवर बोलावयाचे झाले तर, मुंबईच्या रस्त्यावर पानांच्या गाद्या व पानपट्ट्यांची दुकाने यांचाही अनुप्रास आढळतो; असे म्हणावे लागेल. म्हणजे मुंबईच्या बहुतेक सर्व रस्त्यांवर अधुनमधून पानांच्या गाद्या व पानपट्टीची दुकाने दिसून येतात. पानांच्या गाद्यांवर एक पैसा देऊन स्वत: तयार केलेले पान खाता येते. तर पानपट्टीच्या दुकानावर सामान्यत: दोन पैशाला एक पानपट्टी विकत मिळते. पानपट्टीच्या दुकानाचा थाटमाट गादीच्या दुकानाहून कितीतरी अधिक असतो. गादीच्या दुकानाला साध्यासुध्या मराठमोळ्या खेडवळ स्त्रीची उपमा दिली, तर पानपट्टीच्या दुकानांस उत्तर हिंदुस्तानी नखरेल पुरंध्रीची उपमा द्यावी लागेल ! बहुतेक पानपट्ट्यांची दुकाने बिलोरी आरशांनी सजविलेली असतात. त्यात ' आज नगद उद्या उधार ' अशा इशारेवजा पाट्याही कधीकधी झळकताना आढळतात. जिगाने चमचमणाऱ्या देवादिकांच्या फोटोंबरोबरच सिनेमानटीचे फोटोही तेथे मान्यता पावलेले असतात ! गांधीजींच्या एका बाजूस नर्गिस तर दुसऱ्या बाजूस निम्मी असा थाट पानपट्टीच्या दुकानात नजरेस पडतो ! एकपत्नीव्रताचे निस्सीम उपासक " सियावर रामचंद्रजी " यांच्या बाजूस, सिनेसृष्टीतील आधुनिक रासक्रीडेचे दृश्य बिनधोक झळकत असते.

अशा या दुकानांच्या चिमुकल्या ऐनेमहालात निरनिराळ्या तंबाखूच्या नि पानमसाल्याच्या बरण्या अथवा बाटल्या टापटिपीने लावलेल्या असतात. निरनिराळ्या प्रकारांची पाने पितळी पत्र्यावर अथवा चकचकीत काचेवर शिस्तीने ठेवलेली असतात. चुन्याचे व काताचे दोन पितळी चकचकीत लोटे विशेष लक्ष वेधून घेतात आणि त्यात दांडी फिरवतांना होणाऱ्या खणखणाटाच्या तालावर भैय्याजी पानपट्ट्या तयार करीत असतात !

आर्जव, आदब नि बढाई

बहुतेक पानपट्टीवाले उत्तर भारतीय आहेत. साहजिकच त्यांच्या बोलण्यावागण्यात आर्जव, आदब, बढाई यांचे मनोहर मिश्रण आढळते. कित्येकदा तर पानवाल्या भैय्याचे हे मिश्रणच, त्याच्या पानाहूनही रुचकर असते ! नेहमीचे गिऱ्हाईक बरेच दिवसांनंतर आल्यास ' का सेठ, कही मुलुख गये थे ? ' अशी चौकशी तो करील. एखादा शौकीन कॉलेजकुमार त्यांच्या दुकानावर आल्यास ' लीजिये जनाब, बडा xxबाज पान है ! ' असे तो डोळा मिचकावित म्हणेल ! एखादे वेळी ' ये दिल्खुष पान है; कडवा नही ! ' अशी प्रौढी झोकण्यास तो मागेपुढे पाहणार नाही !

गादीवाल्याच्या गिऱ्हाईकाहून पानपट्टीवाल्यांची गिऱ्हाइके आर्थिकदृष्ट्या प्राय: वरच्या दर्जाची असतात. आपल्या 'बड्या' गिऱ्हाइकांबद्दल पानपट्टीवाला अभिमानाने बोलत असतो. उदाहरणार्थ, प्लाझा-सिनेमाच्या बाजूचा पानवाला 'अमुक अमुक सिनेमा नट माझ्याशिवाज दुसरीकडचे पान खात नाही. बडा शौकीन आदमी है !' इत्यादि स्वत:ची व बड्या गिऱ्हाईकांची तारीफ मोठ्या अभिमानाने सांगील. 'माधव बागे'च्या दारावरील पानवाला व 'भारतीय विद्याभवना'च्या बाजूचा पानवाला हेदेखील कित्येक बड्या गिऱ्हाइकांच्या मोहब्बतीतील आहेत. काळबादेवी भागातही पानपट्ट्यांची उत्तम व रसिकमान्य दुकाने आढळतात. पानांच्या या दुकानात बहुश: एक आण्याखाली पानपट्टी मिळत नाही. एक आण्यापासून १०० रुपयांपर्यंत विविध दर्जाची पाने देण्यास हे बडे पानपट्टीवाले तयार असतात ! यांच्या दुकानांतील बनारसी, मघई, मोहप्पा, इत्यादि जातींची पाने अतिशय मुलायम असतात व त्यात घालण्यात येणारा सुगंधी माल्मसाला अथवा तंबाखू चांगल्या दर्जाचा असतो. पानपट्टी तयार झाल्यावर ती चंदेरी किंवा सोनेरी वर्खात गुंडाळून गिऱ्हाईकांना आदबीने दिली जाते. काही पानवाले पातळ पांढरा कागदही गिऱ्हाइकास हात वगैरे पुसण्यासाठी देतात. त्यास ते 'रुमाल' म्हणतात.

'पलंग-तोड' पान

चौपाटीवरही एक आण्यापासून शंभर रुपयांपर्यंतच्या विविध दर्जाच्या पानपट्ट्या विकत मिळतात. येथील काही पानपट्ट्यांची 'कामोत्तेजक' म्हणूनही जाहिरात करण्यात येते. त्यांना 'पलंग-तोड' हे मोठे ढंगदार नाव आहे ! "यह पान खानेसे बूढा जवान होता है । और जवान और भी जोरदार होता है ।" अशी त्याची जाहिरात (खरी किंवा खोटी ते खाणारा जाणे !) पुकारण्यात येते ! असे म्हणतात, की या "मर्दाई आणणाऱ्या" पानपट्ट्यात काही उत्तेजक पदार्थ घालण्यात येतात, आणि त्यामुळे खाणारा घटकाभर उत्तेजित होतो एवढेच. ह्या पानपट्ट्यांत कदाचित् 'किमाम'ही घालत असतील. 'किमाम' म्हणजे तंबाखूचा अर्क. त्यात काही प्रमाणात अंमली अथवा उत्तेजक पदार्थ असतात, असे म्हणतात. 'किमाम' लखनौ बनारस येथून येतो. उंची किमाम ६०-७० रुपये तोळा असतो व आगकाडीच्या गुलाएवढा पानात टाकला, तरी त्याने 'तबियत' तर्र होते ! आणि उत्तर हिंदुस्तानी पद्धतीने सांगायचे झाल्यास 'उसकी खुषबूसे मुँहमें बगीचा फुलता हैं ।'

पानाचे बडे व्यापारी, गादीवाले व पानपट्टीवाले यांच्याविषयी येथवर थोडक्यात प्रपंच केला. आता थोडेसे मुंबईच्या पानशौकिनांबद्दल. पानशौकिनांचे अनेक प्रकार आहेत. पानपट्टीवाल्याकडे आपल्या आवडीनुसार पान खाणारे; आपल्या सूचनेवरहुकूम बायकोने वा मुलीने तयार केलेले विडे एखाद्या डबीतून आपल्याबरोबर बाळगणारे; जुन्या पद्धतीची पानाची चंची सदैव जवळ ठेवणारे इत्यादि. प्राय: खरेखुरे पान-तंबाखूचे शौकीन घरी

पानाचा सुसज्ज डबा ठेवतात. पाने, तंबाखू, वेलदोडे, लवंगा, कात, सुपारी, चुना, बडीशेप, जायपत्री इत्यादि साहित्य घरंदाज पानशौकिनांच्या डब्यात ठेवलेले असते. आणि डब्याचेही ढंग किती ! चांदीच्या जाळीदार शानदार डब्यापासून तो अनेक खणांच्या दणकट पितळी डब्यापर्यंत !

'हिरॉइन 'शिवाय नाटक !

पानशौकिनांत केवळ साधे पान खाणारे, मसाला पान खाणारे व तंबाखू पान खाणारे असेही वर्गीकरण करता येईल. तथापि, खऱ्याखुऱ्या पाने शौकिनांत तंबाखूपान खाणारे बहुसंख्य आढळतील. त्यांच्या मते " तंबाखूविना पान म्हणजे ' हिरॉइन 'शिवाय नाटक ! पंचमालापाविना वसंतऋतु, तसेच पंचमाशिवाय (तंबाखूशिवाय) पान !! " पानाबरोबरच तंबाखू खाणारे आपल्या आवडीनुसार व ऐपतीनुसार निरनिराळ्या प्रकारची तंबाखू जवळ बाळगतात. ८० रुपये शेराच्या सुगंधी ' बनारसी पीला 'पासून तो १।। रुपये शेराच्या साध्या तंबाखूपर्यंत ! कोणी पसंत करतात, सातारचा सुगंधी इब्राहिमी जर्दा, तर कोणी पसंत करतात गोडवोल्यांचा जर्दा !

तंबाखूपान खाणाऱ्यांचे आणखी एक प्रकारे वर्गीकरण करता येईल. (१) थूक सांप्रदायी, (२) अथूक सांप्रदायी ! अथूक-सांप्रदायातील मंडळी पानांत तंबाखू थोडा घालतात. पण त्याचा सर्व पींक किंचितही न थुंकता, गिळून टाकतात, परंतु बहुसंख्य मंडळी थूक-सांप्रदायातील आहेत. तंबाखूपानाचे यथास्थित चर्वण केल्यावर, एक दोन तंबाखूचे पींक थुंकून मगच ते बाकीचा भाग पोटात जाऊ देतात. थूक-सांप्रदायातील मंडळींचा कित्येकांना मोठा राग येतो. कारण या सांप्रदायातील मंडळी केवळ स्वत:ची मुखश्रीच रंगवून थांबत नाहीत ! (जवळपास थुकदाणी नसल्यास किंवा असली तरी !) ते घाईघाईने बेफिकीर पिचकारी मारून कधी दुसऱ्यांचे सफेत कपडे तर कधी घरांच्या सफेत भिंती रंगवून सोडतात ! सरकारी कायद्यानुसार रस्त्यावर पिचकारी मारणे बेकायदा आहे. पण खरोखरच पींक टाकण्यास माणूस इतका अधीर होतो, की रस्त्याच्या कडेस ठेवलेल्या थुकदाणीपर्यंत जाणंही त्यास अवघड वाटते. ' ना मारो पिचकारी ' ही विनंती, हे पानतंबाखू-बहादर कृष्ण-कन्हैय्याच्या आवेशाने जणू काही धुडकावून लावतात !

तसे पाहिले तर, पिकदाणीत अथवा अन्यत्र मुखरसाची अचूक पिचकारी मारणे ही एक कला आहे ! पिचकारी अशी मारता आली पाहिजे की ती स्वत:ला अथवा दुसऱ्याला उपद्रवकारक होऊ नये. काही रंगेल बहादर सिनेमा पोस्टर्समधील अर्धनग्न नटीवर अचूक पिचकारी मारून रंगपंचमी खेळतात !

पिचकारी वेंधळेपणाने मारल्यामुळे किंवा तोंडात जमा झालेला पींक वेळीच न थुंकता बोलण्याची घाई केल्यामुळे मोठे फजितीचे प्रसंग ओढवतात. स्वत:च्याच कपड्यांवर नव्हे तर दुसऱ्याच्या कपड्यावरही मुखरसाचे तुषार उडतात ! अशा वेळी माझे एक पत्रकार

मित्र मोठी नामी युक्ती योजीत असतात. अशा आणीबाणीच्या प्रसंगासाठी खिशात ठेवलेल्या खडूचा तुकडा घाईघाईने खिशाबाहेर काढून 'सॉरी सॉरी म्हणत, ते तो लाल डागांवर फिरवितात !

सामाजिक उपकार

असे हे पान-तंबाखू-आख्यान सांगावे तेवढे थोडेच. मी मागेच म्हटल्याप्रमाणे पान-तंबाखू हे आमचे राष्ट्रीय व्यसन आहे.

व्यसन म्हटले की ते थोडेफार अपायकारक असायचेच. पण हे व्यसन निदान दारू किंवा सिगारेट एवढे अपायकारक नव्हे. योग्य प्रमाणांत व योग्य तऱ्हेने पान-तंबाखू खाणे आरोग्यदृष्ट्या हितावहच आहे. पान-तंबाखूने केलेले सामाजिक उपकार विसरणे कृतघ्नपणाचे ठरेल.

"चिकणी सुपारी, कात सोनेरी, पान जंजिरी, चुना केशरी !
सर्व तयारी झाली हो माझ्या राजसा ॥"

अशी लावणी आळविणाऱ्या बारांगनेच्या दिवाणखान्यातील मैफलीपासून तो पेन्शनरांच्या "विश्राम-धाम-मंडळा" पर्यंत पान-तंबाखूने आमच्या जीवनांत रंगत, उल्हास, आणि मित्र-भाव निर्माण केले आहे. कधी कधी केवळ पानतंबाखूमुळे मित्रभावाचे संबंध जुळलेले आढळतील. या शौकाचे सामाजिक महत्त्व जाणूनच एका उत्तर भारतीय कवीने त्याचा यथायोग्य गौरव केला आहे. तो म्हणतो :

कृष्ण चले बैकुंठको
राधा कहे पकडत बाह ।
यहाँ तमाखू खाइ लो
वहाँ तमाखू नाय ॥
पान तमाखू छान के
जो कोइ सबको दै ।
सुरपूर, नरपूर, नागपूर
सब कोई वश कर लै ॥

●

(रविवारची लोकसत्ता : २/९/'९६)

१३. स्वर्ग जर कोठे असेल तर तो हाच !

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

दिल्लीच्या दिवाण-इ-खास या संगमरवरी इमारतीच्या कमानीवर सुप्रसिद्ध फारसी काव्यपंक्ति कोरल्या आहेत. त्यांचा अर्थ असा की, " जर जगात कोठे स्वर्ग असेल तर तो हाच ! तो हाच !! तो हाच !! "

(" अगर फिरदौस बरूए जमिं अस्त । हमीं अस्तो ! हमीं अस्तो ! हमीं अस्त ! ")

दिवाण-ई-खाससारख्या सदर इमारतीच्या बाबतीतही ही अतिशयोक्ति ठरेल, पण काश्मीरच्या सृष्टीसौंदर्याच्या बाबतीत ही खासच अतिशयोक्ति ठरणार नाही ! आकाश भेदू पाहणारे उंच, निळे नि बर्फाच्छादित पर्वत; त्यांच्या शिखरावर पांढऱ्या हत्तीप्रमाणे टकरा घेणारे पुष्ट मेघ; हरित तृणांच्या मखमालीचे तल्मकाठचे गालिचे; शांत सरोवराच्या कडेकडेने वसलेल्या बागा; टपोऱ्या गुलाबांचे टवटवीत ताटवे; चिनार, सुरू, फर, इत्यादि डौलदार वृक्षांच्या घनदाट रांगा. झेलमच्या संथ पात्रांतील नौकागृहांच्या शानदार ओळी; विणकामाचे रंगीबेरंगी नमुने; थंडगार आरोग्यसंपन्न हवा; आणि इतर अनेक मनोरम गोष्टी जेथे एकवटल्या आहेत, तेथील सौंदर्याला ' स्वर्गीय ' म्हटल्यास अतिशयोक्ति कशी होईल ? मला वाटते एप्रिल-मे महिन्यात येथील शिखरांवरून ओघळणाऱ्या बर्फाच्या पांढऱ्या शुभ्र रेषांनी, निळ्या हिरव्या पर्वततटावर विधात्यानेच जणू काही लिहिले आहे - " स्वर्ग तो हाच ! "

या स्वर्गीय प्रदेशाची वर्णने पुष्कळच वाचली होती. तो प्रत्यक्ष पाहण्यासाठी आम्ही गेल्या महिन्यात तेथे गेलो होतो. वस्तुत: काश्मीरला जाण्यास सर्वदृष्ट्या उत्तम काळ सप्टेंबर-ऑक्टोबर हाच होय. त्या वेळी तिकडे फळांचा मौसम असतो. केशराचे मळेही त्याच वेळी पहाण्यास मिळतात. आणि दिवस अधिक सतेज नि हवा अधिक चांगली असते. तथापि एप्रिल-मे महिन्यांतील सौंदर्यही काही दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण असते. ह्या काळात तिकडे फुलांचा मौसम असतो. हवेत थंडावा असतो; पण तो त्रासदायक नसतो.

मुंबईच्या सचिवालयामधून काश्मीरला जाण्याचा परवाना काढून आम्ही प्रथम दिल्लीस गेलो. येथील टूरिस्ट ऑफिसमधून घेतलेले काश्मीरविषयक सर्व वाङ्मय दिल्लीपर्यंत प्रवासातच

वाचून काढले. दिल्लीचा या दिवसांतील कडक उन्हाळा अनुभवून, नंतर थंडगार काश्मीर-खोऱ्यात प्रवेश केल्याने ते अधिकच सुखकर वाटते. रणरणत्या उन्हात भटकल्यानंतर 'एअर कन्डिशन्ड' इमारतीत प्रवेश केल्यावर वाटते तसे !

वर्तुळाकार जिना !

दिल्लीहून पठाणकोटला जावे लागते. पठाणकोट हे या मार्गावरील अखेरचे रेल्वे स्टेशन. भारतीय सैन्याचे हे एक महत्त्वाचे ठाणे आहे. स्टेशनाबाहेरच जम्मू काश्मीर सरकारच्या बसेस सुटण्याचा तळ आहे. पठाणकोटहून श्रीनगरला विमानमार्गेही जाता येते. पण बहुविध सृष्टीदर्शन घेण्याच्या दृष्टीनेही बसनेच जाणे चांगले. पठाणकोट ते श्रीनगर हे अंतर २६७ मैल व प्रवास जवळ जवळ दीड दिवसाचा आहे. पण ज्याला निसर्गसौंदर्य पाहण्याची आवड असेल त्याला तो कंटाळवाणा होणार नाही. वळणावळणाने वरवर जाणारा हा रस्ता म्हणजे सौंदर्याचे परमधाम गाठण्यासाठी उभारलेला वर्तुळाकार जिनाच आहे ! या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पर्वतापर्वतावर नि दरीदरीत एखाद्या प्रदर्शनात मांडावे त्याप्रमाणे सृष्टीसौंदर्याचे नमुने विश्वाच्या आद्य-कलाकाराने मांडून ठेवले आहेत !

पठाणकोट सोडताच उजव्या बाजूने कित्येक मैल रावी नदीचा कालवा तुमची साथ करितो. रावी नदीला जागोजागी घातलेल्या बांधामुळे भारत-पाकिस्तानांतील पाण्याचा प्रश्न डोळ्यापुढे उभा राहतो. पठाणकोटनंतरचे पहिले बसस्टेशन लखनपूर. येथे परमिट तपासले जातात. नंतरचे महत्त्वाचे ठिकाण जम्मू. हे पठाणकोटपासून ६७ मैलांवर असून काश्मीरची हिवाळी राजधानी आहे. या स्थळाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील सोन्याच्या कळसांची हिंदु-मंदिरे.

जम्मूनंतर उधमपूर व उधमपूरनंतर कुद हे महत्त्वाचे बस-स्टेशन लागते. कुद हे काश्मीर खोऱ्यातील ५७०० फूट उंचीवरील थंड हवेचे ठिकाण आहे. येथेच सध्या शेख अब्दुल्लाना ठेवण्यात आले आहे. कुदहून पुढे बटोटला जाताना, रस्त्याच्या कडेलाच थंड पाण्याचा झरा असून त्याची धार एका 'सिंहमुखा'तून सोडली आहे. येथे बस थोडा वेळ थांबविण्यात आली व उतारूंनी आकंठ जलपान केले.

पठाणकोट ते श्रीनगर हा सर्वच प्रदेश सुंदर असला तरी, त्यातही कुद ते 'अपरमुंडा' हा प्रदेश सृष्टीसौंदर्याच्या दृष्टीने विशेषच चांगला आहे. या भागात सृष्टीच्या रंगरूपाचे जितके मनोहर विभ्रम पहावयास मिळतात तितके ते अन्यत्र क्वचितच मिळतील. एका बाजूला हजारो फूट उंच हिरवे निळे हिमाच्छादित पर्वत तर दुसऱ्या बाजूस हजार पंधराशे फूट खाली खडकावरून गरगर लोळण घेत पुढे जाणारा चिनाब नदीचा प्रवाह ! कोठे सूर्यकिरणात तळपत असलेले पर्वतांचे बर्फमय कळस तर कोठे सूर्यकिरणाचा ताप वनचरांनाही होऊ नये म्हणून उभे असलेले उंच वृक्षांचे सैन्य ! अशी अनेक रम्य दृश्ये या मार्गावर जागोजागी दिसतात.

नीलकंठाचा सर्प !

कुद नंतर महत्त्वाचे ठिकाण ' बटोट ' व बटोटनंतर ' रामबन '. रामबनपाशी चिनाब नदीवर सुमारे १ फर्लांग लांबीचा अरुंद लोखंडी पूल लागतो. तेव्हा हृषीकेशच्या ' लक्ष्मण झूल्या 'ची आठवण होते. ' रामबन 'नंतर आपण बनिहाल येथे येतो. येथूनच ' बनिहाल-घाट ' सुरू होतो. बनिहाल ते अपर-मुंडापर्यंतचा हा वर्तुळाकार नागमोडी रस्ता अप्रतिम आहे. सुमारे ९००० फूट उंचीवरील हा बनिहाल-घाट, जगातील सर्वोच्च घाट समजला जातो. निळ्या पर्वत शिखरांना वळसे घालत गेलेला हा मार्ग पाहून असे वाटते की, नीलकंठाच्या गळ्याभोवती विळखे घातलेला सर्पराज तो हाच असला पाहिजे ! या सर्पाकृति घाटावरून बस सावधानतेने पुढे सरकत असताना, बसमधील रुक्ष माणसेही ' व्यावहारिक ' गप्पागोष्टी सोडून बाहेर पाहू लागली. मग कविमन किती उचंबळून आले असेल ! काश्मीररूपी अलकानगरीला जाण्याचा हा जिना एवढा सुंदर, मग ते काश्मीर किती सुंदर असेल ? असा विचार मनात डोकावून गेला ! इमानदार पहारेकऱ्याप्रमाणे एकामागे एक उभ्या असलेल्या हिरव्या, निळ्या अंजिरी पर्वतांच्या धिप्पाड रांगा मन वेधून घेत होत्या. सर्वांत मागील नि सर्वांत उंच दिसणारा पर्वत त्या धिप्पाड सैनिकांचा सेनापती शोभत होता. जणू काही तो इतरांहून वेगळा उमटून दिसावा, म्हणूनच त्याच्या मस्तकावर सुवर्णजडित स्फटिकाचा मुकुट कोणीतरी ठेवला आहे, असे वाटले ! हिरव्या पर्वतशिखरावरील ते हिम पाहून, मसालेभाताच्या ढिगावर पेरलेल्या खोबऱ्याची ' नरसोपंती ' चविष्ट उपमा, आम्हांस आठवलीच ! पण त्या धवल शिखरांवरील शुभ्र मेघ पाहून असेही वाटले की, चांदीच्या प्रचंड कुंभातून पांढऱ्या शुभ्र अमृताचा अभिषेकच या गगनभेदी शिव-पिंडिकांना वरुणाने केला आहे ! आणि दूर खोल दरीतून ऐकू येणारा चिनाब नदीचा घोष ? — वाटले की, त्या अभिषेकाच्या वेळचा ' शिवोऽहम शिवोऽहम ' हा जप, अद्यापि प्रतिध्वनित होत आहे !

ठंडा कुद्रति मेवा !

बनिहाल घाटाच्या अगदी वरच्या वळणावर येताच आपणास एकाखाली एक अशी ४-४, ५-५, वळणे दिसू लागतात. ' इकडे पर्वत, इकडे दरी ' हे वर्णन यथार्थपणे पहावयाचे असेल तर ते येथेच ! घाटाच्या सर्वोच्च टोकावर म्हणजे ९००० फूट उंचीवर येताच आपणास ६'५० फूट लांबीचा एक बोगदा लागतो. या ठिकाणी आमची बस थांबविण्यात आली. भर दिवसाही थंडीने गारठलेले उतारू आपले गळपट्टे नि शाली सावरीत खाली उतरले. रस्त्याच्या कडेला पडलेला बर्फ कित्येकांनी उचलला. " खाईये जनाब ! ये बम्बई के फेक्टरी में बना हुवा नहीं है । ये है हमारे मुलुखका कुद्रती मेवा ! " काश्मिरी बस कंडक्टर मोठ्या अभिमानाने म्हणाला.

खरोखर, त्याला अभिमान वाटावा असाच तो मुलुख दिसत होता. खाली खोल

दरी; तिजपलीकडे जणू पाचू नि इंद्रनीळ यांनी मढविलेल्या पर्वतश्रेणी; आणि त्यांच्याही पलीकडे खऱ्याखुऱ्या हिमाल्याची शिखरे ! सूर्यप्रकाशात उजळून निघालेल्या चकचकीत हिमशिखरांवर, घटके घटकेने आकार बदलणाऱ्या पांढऱ्या ढगांची यक्षनगरी लम्बमान झाली होती ! ना धड स्वर्गात, ना धड भूतलावर अशी त्रिशंकूसाठी रचलेली विश्वामित्राची प्रतिसृष्टी या घनदाट सफेद ढगांच्या संगमरवरी पायावरच उभारली गेली असावी ! साक्षात भव्यताच पुढे प्रकटली होती; सुंदरता नटली होती अन् शुचिता दरवळली होती.

झेलमचा उगम

बनीहालच्या बोगद्यातून बस बाहेर पडताच, आपणास खास काश्मीरचे मगजी खोरे दिसू लागते. बनीहाल घाटाचा २९ मैलांचा चक्राकार उतार सुरू होतो. हा उतार 'खानबल'पाशी संपतो. वाटेत 'लोअर मुंडा' नावाचे गाव लागते. त्याचे जवळच १॥-२ मैलावर असलेल्या 'वेरीनाग' या स्थळी एक फाटा गेला आहे. सर्व उतारूंच्या सूचनेस मान देऊन व माणशी १२ आणे घेऊन ड्रायव्हरने आमची बस तेथे नेली. तेथे 'परि पंजाल' नामक पर्वताच्या पायथ्याशी झेलमचा उगम झाला आहे. जहांगीरने हा उगमाचा झरा सुमारे ५० फूट लांबी-रुंदीच्या व २० फूट खोलीच्या पुष्करणीत प्रथम बंदिस्त करून नंतर बांधीव पाटातून बाहेर सोडून दिला आहे ! पाटाच्या दोन्ही बाजूस रम्य बगीचा आहे. त्यातील रंगीबेरंगी फुलांच्या किनारीने सजलेल्या मऊ कुरणावर आम्ही थोडा वेळ विश्रांती घेतली. झेलमकाठच्या त्या मऊ हिरवळीवर बसताना मला त्या शांत वातावरणात करुण खैय्याम आठवला ! मी पर्त्नीस म्हटले, "And this tender green.... ही खैय्यामची रुबाई तुला आठवते ? "

क्षणभर विचार करून ती म्हणाली, " ही नीट आठवत नाही पण हिचे मराठी भाषांतर आठवते ! "

" चालेल, म्हण पाहू "

ती म्हणाली —

"पाटाच्या ओठीं हिरवळ अभिनव गार
टाकितो जिच्यावर आपण रेलून भार !
हाँ ! हळूच रेला ! गूढपणे उगवे ही
कोणाच्या न कळे ओठांतुनी सुकुमार ? ॥

नंतर पुन: मागे फिरून आम्ही मुख्य रस्त्याला लागलो. प्रथम गाझीगुंड हे बसस्टेशन लागले व नंतर खानबल. येथून श्रीनगर अवघे ३२ मैलांवर आहे. रस्ता सरळ असून त्यावर दुतर्फा उंच सरळ पॉपलर वृक्ष चौऱ्या ढाळीत आहेत किंवा श्रीनगरला जाणाऱ्या प्रवाशांना मानवंदना देण्यासाठी हे वृक्ष दुतर्फा 'दक्ष'च्या (attensionच्या) स्थितीत उभे आहेत ! या वृक्षसैनिकांची मानवंदना घेत व आजूबाजूच्या हिरव्यागार बागा नि

वनदेवीच्या बिलोरी आरशाप्रमाणे चकाकणारी भातशेते पाहत आम्ही श्रीनगरला येऊन पोहोचलो.

सरकारी बसेस ' टूरिस्ट इन्फर्मेशन ऑफिस 'च्या प्रशस्त शामिन्याजवळच थांबतात. येथे उतरल्यावर हॉटेल्स, गाइडस् (वाटाडे), हाऊस-बोट्स वगैरे विषयी सर्व माहिती, आदबशीर नि नम्र अधिकारी उतारूंना पुरवितात. या अनोळख्या ठिकाणी त्यांचा सल्ला फार उपयुक्त ठरतो. न्यूडो, पार्क, लेक व्हयू व बॉलेवॉर्ड ही युरोपियन पद्धतीची नि श्रीमंती थाटाची हॉटेले होत. तेथे एक दिवसाचा रहाण्याजेवणाचा दर माणशी खर्च साधारणत: १४ ते १८ रुपये पडतो. रहावयास प्रशस्त नि सर्व सुखसोयींनी युक्त अशी स्वतंत्र खोली असते. भारतीय पद्धतीच्या हॉटेल्सचे दर माणशी ४ रुपयांपासून १० रुपयापर्यंत आहेत. ' हाऊस बोट्स 'मध्ये राहणे अधिक काव्यात्म असल्याने कित्येक श्रीमंत लोक (विशेषत: विदेशीय) त्यातच राहतात. ४-५ खोल्यांच्या हाऊस बोटचे भाडे दरमहा ५०० ते ८०० रुपये असते. झेलमच्या काठाकाठावर रमणीय स्थळी शेकडो सुंदर हाऊस-बोटी रसिकांच्या स्वागतार्थ पाण्यात उभ्या आहेत. ही अद्ययावत सुखसोयींची तरती नौकागृहे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविता येतात. पण तसे सहसा करीत नाहीत. प्रत्येक हाऊस बोटीला ये-जा करण्यासाठी एक शिकारा नामक लहानशी होडी जोडलेली असते व एक स्वयंपाकघर असलेली लहानगी नावही जोडण्यात येते.

आम्ही ' हाऊस बोटी 'च्या धर्तीच्या एक मध्यम दर्जाच्या हॉटेलमध्ये उतरलो होतो. जवळ जवळ हाऊसबोटीसारखेच असलेले हे ' काश्मीर हिंदु हॉटेल ' झेलमच्या पात्रात ' अमीरा कदल ' (First bridge) जवळ उभे आहे.

आम्ही पहिल्याच दिवशी श्रीनगरच्या शंकराचार्य टेकडीवर गेलो. या टेकडीच्या माथ्यावर सुमारे १००० फूट उंचीवर शंकराचे देवालय आहे. हे देऊळ सम्राट अशोकाचा पुत्र जल्क याने ख्रिस्तपूर्व २०० वर्षांपूर्वी बांधले. ६ व्या शतकात ललितादित्याने या देवळाची दुरुस्ती केली. व ९ व्या शतकात राजा शंकर वर्मा याने यात शिवलिंगाची स्थापना केली. या टेकडीच्या विरुद्ध टोकास हरिपर्वत आहे. येथूनही श्रीनगरचा संपूर्ण देखावा दिसतो. शंकराचार्य टेकडी व हरिपर्वत यांच्यामध्ये श्रीनगर झेलमच्या तीरावर व तिजपासून निघणाऱ्या वेगवेगळ्या कालव्यावर वसलेले आहे.

आम्ही ज्याच्याजवळ राहत होतो, त्या ' अमीरा कदल 'पासून (कदल म्हणजे पूल) जवळच झेलमच्या काठी येथील राजाचा भव्य वाडा आहे. त्यात हल्ली काश्मीर सरकारचे सचिवालय असते. पुढे गेल्यानंतर तिसऱ्या ' कदल 'जवळ ब्रह्म पागोडाच्या आकाराची ' शाह हमदन ' मशीद आहे. या लाकडी इमारतीचे जाळीदार नक्षीकाम सुंदर आहे.

श्रीनगरचे खास आकर्षण !

तथापि, 'शाह हमदन', 'जुना, राजवाडा', 'पत्थर मशीद' परीमहाल, हरिपर्वतावरील किल्ला ही प्रेक्षणीय ठिकाणे श्रीनगरचे हुकमी आकर्षण नव्हे. दल सरोवर व त्याच्या कडेवर लाडक्या लेकीप्रमाणे बसलेल्या 'मोंगली बागा' हेच त्याचे खास आकर्षण होय ! हे सरोवर नि या बागा पहाण्यास बसने अथवा टांग्याने जाता येते. पण तसे जाण्यात मजा नाही. शिकाऱ्याने जाणेच उत्तम.

'शिकारा' म्हणजे लहानसा शामियाना उभारलेली लहानशी नाव. हिच्या चारी खांबास रंगीत पडदे लावलेले असतात व आत गादीवर रंगीबेरंगी 'गब्बा' (लोकरी नक्षीदार सतरंजी) अंथरलेला असतो. त्यात जास्तीत जास्त ५ माणसे बसू शकतात. झेलमच्या बहुतांशी स्थिर व बऱ्याच अंतरापर्यंत अस्वच्छ असलेल्या पाण्यातून आमचा शिकारा दल सरोवराकडे निघाला. झेलमच्या काठावर दुतर्फा लहान लहान लाकडी घरे आहेत. त्याचप्रमाणे पाण्यात काठाकाठाने ओबड धोबड नावांवरील झोपड्याही आहेत. त्यात मळक्या कपड्याचे पण सतेज-गौर तांबूस वर्णाचे काश्मिरी लोक राहतात. पाण्यात क्रीडा करणारी गुटगुटीत मुले व काठावर कपडे धुण्यास अथवा पाणी भरण्यास आलेल्या काश्मिरी स्त्रिया जागजागी दिसतात. त्यांचे दारिद्र्य व गलिच्छपणा पाहून मन हळहळते. व्हेनिस शहराप्रमाणेच या कालव्यातूनच बरीचशी वाहतूक येथे होते. पण असे म्हणतात की, व्हेनिसमधील जल-मार्गाप्रमाणे येथील जलमार्ग स्वच्छ नाहीत.

सौंदर्याची बरसात

परंतु अस्वच्छतेच्या अभद्र दर्शनाचा विसर पडावा अशी मनमोहक दृश्ये हा नौकाविहार करताना नजरेस पडतात. 'डंगा' नामक ओबड धोबड होड्यांतून टोमॅटो, मटार, कोबी इत्यादि भाज्यांचे ढीगच्या ढीग वाहून नेणाऱ्या खेडवळ काश्मिरी स्त्रिया, काठावरील घरांच्या अथवा होडीच्या खिडक्यांतून आपला 'लव हांसरा ! लव बावरा !' असा गौर तांबूस चेहरा बाहेर काढून, कुतूहलमिश्रित नजरेने रसिक मुशाफिरांना विद्ध करणाऱ्या तरुणी, काश्मिरमधील गुलाब कलिकांप्रमाणेच मोहक असलेल्या व आपले गुलाबी पाय पाण्यात सोडून काही तरी काश्मीरी गाणे गुणगुणत असलेल्या बालिका, कॅमेरे सज्ज करून तेथील सौंदर्य टिपू पाहणाऱ्या साहेबांकडे कधी मोठ्या विस्मयाने पाहणारे तर कधी त्यांची टिंगल उडविणारे दणकट काश्मिरी छोकरे; शिकाऱ्यातून जवळून दिसतात. आणि निसर्ग सौंदर्याची तर बरसातच रसिकांवर होत असते. कोठे हिरव्यागार पर्णसंभाराच्या चाळणीतून गाळून निघालेल्या सूर्यकिरणांचे रेशमी तंतू हिरव्यानिळ्या पाण्यावरील काळ्याशार सावलीवर पडत आहेत; तर कोठे चिनार, सुरू, पाइन, फर वगैरे वृक्षांच्या झरोक्यांतून हिमधवल शिखरांचे भव्य दर्शन होत आहे ! अशी अनेक दृश्ये डोळ्यांचे पारणे फेडतात.

ती दृश्ये बघत बघत आपण दल सरोवरात प्रवेश करतो. **'रमणीयं प्रसन्नंच सज्जनांना**

मनोव्यथा ।' अशा प्रकारच्या या विशाल शांत सरोवरात पांढऱ्या ढगांचे, हिमशिखरांचे, व उंच तरुराजीचे पडणारे प्रतिबिंबच फार मोहक दिसते.

निर्वाण-सुखही फिके वाटेल !

अरे, पण या दल सरोवराच्या मध्यभागी ह्या लहानशा बेटावर हे चार हिरवे मनोरे कसले ? हे हिरवे मनोरे नाहीत, हे चार चिनार वृक्ष आहेत. आणि त्याच्या दाट सावलीखाली एकेकाळी जहांगीर बादशाने उभारलेल्या शामियान्याचा अवशेष दिसत आहे ! हे ते जहांगीरचे एकांतस्थान ! जहांगीरच्या रसिकतेला साजेसेच आहे; हे ! **'चलिये अब ऐसी जगह, चलकर जहाँ कोई न हो'** अशी इच्छा करणाऱ्या मिर्झा गालिबला आवडली असती अशीच ही जागा आहे ! 'Far from the maddening crowds ignoble strife' दूर कोठे तरी जाऊन आपल्या हृदयाची जळजळ शमवावी असे ज्याला वाटेल, त्याला हेच शांत बेट योग्य आहे ! बाजूस सुंदर मदिराक्षी, मदिरेचा पेला व हातांत कवितेचे पुस्तक घेऊन, घायाळ तरुतळी बसण्याची इच्छा करणाऱ्या कविमनाला एकदम रुचेल असेच हे ठिकाण आहे !

मध्यरात्रीच्या निळ्यांत शांत कौमुदी खुलली आहे; समोरच्या धूसर हिमशिखरांवर चंद्रमा अमृताची धार ओतीत आहे; बाजूच्या शाही बागांतील फुलांचा मंद सुगंध वायुलहरी वाहून आणत आहेत; आणि शंकराचार्यांच्या टेकडीवरील चंद्रशेखर ' तुमची प्रीती अशीच वाढो, ' असा शुभाशीर्वाद देत आहे; अशा वेळी या स्थानी बसून —

एक चंदा आसमाँपर
एक हमारे पास है ॥

असे म्हणण्याचे सौख्य ज्याला लाभले, त्याला निर्वाणसुखही फिके वाटेल ?

नंतर आम्ही चश्मेशाही (शहाचा झरा) निशात (आनंदोद्यान) व शालीमार (प्रीतिस्थान) ह्या मोंगली बागा पाहिल्या. ' चश्मेशाही 'त आरोग्यदायी पाण्याचा एक झरा आहे. म्हणूनच या स्थानी शहाजहान बादशहाने हा बाग बांधला. निशात बाग मुमताज महालचे वडील असफखान ह्यानी बांधला. व शालीमार बाग, जहांगीरने नूरजहानसाठी उभारला. या सर्व बागांची रचना साधारणत: सारखीच आहे.

विलासी मोंगल राजांनी बांधलेल्या या बागांत झेलमचे पाणी मोठ्या कुशलतेने खेळविलेले आहे. बगिच्याच्या प्रवेशद्वारापाशी नगारखान्यासारखी उंच इमारत; अखेरच्या उंचवट्यापासून प्रवेशद्वारापर्यंत दरडी दरडीवरून वाहत येणारा स्वच्छ पाण्याचा पाट; त्या पाटातच टप्प्या-टप्प्यावर निर्माण झालेले फेसाळ धबधबे; आणि पाटाच्या मध्य रेषेत सम अंतरावर थुईथुई नाचणारी कारंजी; असा थाट सर्वच बागांत दिसून येतो. या पाटांच्या बाजूस रंगीत फुलांचे ताटवे लावलेले असून त्या पलीकडे छायाळ वृक्ष हिरव्यागार कुरणांवर शीतल सावली पाडत आहेत !

'योजनगंधा' नि पराशर !

या बागांच्या मागील बाजूस पर्वतांची पार्श्वभूमी मोठी रम्य दिसते. कौमुदीच्या नौकेत बसून या 'योजनगंधा' बागा बाजूच्या पर्वतरूपी पराशरमुनींशी वर्षानुवर्षे रत झालेल्या आहेत ! प्रियकर पर्वताच्या दर्शनाने त्यांच्या हृदयातील प्रेम-रसायन उचंबळून येते; आणि त्यालाच आपण खुळेपणाने 'कारंजी' असे नाव देतो !!

या बागा आता आम जनतेला खुल्या आहेत. पण एकेकाळी त्या मोंगल राजांच्या विलास-वाटिका होत्या ! त्यात उभारलेल्या शामियान्यांत एकेकाळी अत्तराचे दिवे जळले असतील आणि पैंजणांच्या छुमछुमाटात इष्काचा काश्मिरी गुलाब उधळला गेला असेल ! बागेतील पुष्पांहून कोमल पण त्यांच्याहून कैकपटींनी प्रभावी असलेले पुष्पबाण या बागांतील इमारतींच्या सज्जातून कित्येक पुष्पांगींनी भुवयांच्या धनुष्यांवरून सोडले असतील !

रंगदेवतेची दिलदारी

या व इतर सुंदर बागा पाहून झाल्यावर आम्ही श्रीनगरजवळील 'गुल्मर्ग' हे हवा खाण्याचे ठिकाण पाहण्यास गेलो. गुल्मर्ग श्रीनगरपासून अवघे २९ मैलांवर आहे. गुलमर्गच्या अलीकडे चार मैलावर तानमर्ग आहे. तेथपर्यंत बसने जावे लागते. पुढची चढण घोड्यावरून करावी लागते. तानमर्गला आम्ही बसने उतरलो, तोच घोडेवाल्यांचा तांडाच्या तांडा आमच्याकडे धावतच आला आम्ही प्रत्येकी ५ रु. भाडे देऊन घोड्यावर स्वार झाले ! घोडी अगदी शांत होती. वाटल्यास आपण घोड्याचा लगाम मोतद्दारांच्या हाती देऊ शकतो. पण तशी आवश्यकता आम्हांस वाटली नाही. काहीसा चढावाचा नि काहीसा वळणावळणाचा मार्ग ५ मैल आक्रमिल्यावर गुलमर्ग येथे आले. गुलमर्ग म्हणजे पुष्पकुरण. या विस्तृत कुरणाचा देखावा मोठा मनोहारी आहे. रंगदेवतेने या कुरणात मोठ्या दिलदारीने उंची उंची रंग उधळले आहेत ! वाटते की इंद्रधनुष्यांना वितळवूनच विविध रंग रंगदेवतेने तयार केले नि रंगपंचमीच्या दिवशी येथील सृष्टीसुंदरीच्या अंगावर टाकले, तेव्हाच हे पुष्पमैदान तयार झाले !

८५०० फूट उंचीवरील या ठिकाणी उत्तम उपाहारगृहे व टुमदार बंगले असून, त्या सभोवती वर्तुळाकार रस्ता आहे. त्यावरून आम्ही हिंडत असताना समोरच्या नंगापर्वताचे देखावे फारच सुंदर दिसले. नंतर आम्ही पाईन वृक्षांच्या रम्य वनातून खिलनमर्गला निघालो. खिलनमर्गचा अर्थ मेंढकुरण. येथेही घोड्यावरूनच जावे लागते. खिलनमर्गचा कित्येक भाग उन्हाळ्यातही बर्फाच्छादित असतो. त्यावरून आम्हांस लाकडाचा फलकुटीवरून स्केटिंगही करावयास मिळाले. खिलनमर्गचे हिमस्नात पठार, विविध रंगाच्या रानफुलांनी सजलेले दिसते.

सफेत सौंदर्य !

थेट गुलमर्गाच्या विरुद्ध दिशेला श्रीनगरपासून ६० मैलावर असलेले प्रसिद्ध हवेचे

ठिकाण पेलधाम हे होय. सृष्टिसौंदर्य व उत्तेजक हवा यांच्या बाबतीत ते गुल्मर्गपेक्षा थोडे कमीच वाटले. अमरनाथ या पवित्र स्थळी जाणाऱ्या मार्गावरच हे स्थान नयनरम्य लिडार-दरीत वसले आहे. गुल्मर्ग खिलनमर्गपेक्षाही येथे बर्फाच्छादित भूभागाचे चकाकते सफेत सौंदर्य अधिक मनोहारी वाटले. मुंबईच्या चौपाटीवर जशी सर्वत्र पांढरी मऊ वाळू पसरलेली असते, तसेच येथे भूमीच्या काही भागावर मऊ, शुभ्र नि थंडगार हिम पसरलेले असते ! जणू हिमाचे वाळवंटच ! येथूनही हिमालयाचे उत्तम दर्शन घडते.

याखेरीज सोनमर्ग, वुलारतळे, मानसबल सरोवर, मार्तंड तीर्थ वगैरे कितीतरी प्रेक्षणीय स्थळे श्रीनगरच्या आसपास आहेत. त्यांचे वर्णन किती करावे ? त्या कारंजांच्या रंगीबेरंगी बागा; ती शांत प्रशांत सरोवरे; ती पांढरी शुभ्र हिमशिखरे; ते फेसाळ धबधबे, ते चक्राकार घाट, ती पर्वतांच्या पायऱ्या पायऱ्यांवर चकाकणारी जलमय भातशेते, ती हिरवीगार सपाट कुरणे... ते सारे सृष्टीसौंदर्य आम्ही डोळ्यांनी मनसोक्त प्यायलो आणि जागजागी आमच्या तोंडून उद्‌गार निघाले.

स्मरण शक्तिके । जागृत होई
दर्शन-दुर्लभ शोभा पाहीं ।
विसरुं नको गे ! यांतिल कांहीं
वारंवार-कोठून असे दिसणार ?।।

●

(लोकसत्ता : २८/६/५५)

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३५२९
दि. २६.८.९५
निवेदन ९३१९३

१४. दिल्लीत घडलेली पक्षीय खडाजंगी !

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

हे परिकथांचे (fairy talesचे) युग नसले, तरी परिषदांचे नि परिसंवादाचे आहे खास ! अशा या युगाला अनुसरून तीन वर्षांपूर्वी टोकियो येथे एक परिषद भरली होती. या परिषदेत " प्रत्येक राष्ट्राने एखाद्या पक्ष्याची निवड राष्ट्रीय चिन्ह म्हणून करावी, " असे आवाहन करण्यात आले होते. त्या आवाहनाला भारत सरकारने उत्तम प्रतिसाद दिला. " कोणत्या विहंगमाला राष्ट्रीय पक्षी म्हणून मान्यता द्यावी ? " ह्याबाबत राज्य-सरकारे, वृत्तपत्रे यांची मते विचारात घेतली. आणि अखेर पूर्ण विचारांती गेल्या महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात भारत सरकारने आपला निर्णय जाहीर केला. हा विहंगम-निर्णय ज्या अंतिम तज्ज्ञ बैठकीत घेण्यात आला, तीत पक्ष्यांबाबत पक्ष निर्माण झाले ! आणि मोठी विद्वत्ताप्रचुर खडाजंगी माजली.

त्या 'पक्षीय' खडाजंगीचे, आमच्या प्रतिनिधीने पाठविलेले खास वृत्त आम्ही येथे देत आहोत. ते वाचकांनी केवळ काल्पनिक व खोटे मानले, तरी आमची हरकत नाही !

नवी दिल्ली ता....

आज रोजी येथील 'विहंगम भवनात' भारताचा राष्ट्रीय पक्षी कोण, याबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी एका सर्वपक्षीय-तज्ज्ञ-समितीची बैठक भरली होती.

पक्ष्यांबाबतच्या या बैठकीत पुस्तकी पोपट-पंची करणारे विद्वान अनेक असले तरी प्रत्यक्ष पोपट किंवा कोणतेही 'पंछी' उपस्थित नव्हते ! " त्यांना उपस्थित ठेवावयाचे झाल्यास 'पिंजरे' आणावे लागतील. आणि पिंजरा हे तर गुलामगिरीचे प्रतीक ! " अशी तात्त्विक अडचण एका प्रवक्त्याने मजपाशी व्यक्त केली. तथापि, भारतातील निरनिराळ्या ५०० पक्ष्यांची रंगीत चित्रे विहंगम भवनात लावली होती. ही चित्रे खास अमेरिकन व रशियन चित्रकारांकडून काढून घेण्यात आली आहेत, असे म्हणतात ! पण वापरलेले रंग खास भारतीय आहेत, असेही कळते !

दमयंती व नूरजहान !

'विहंगम-भवना'च्या आवारात एक प्रेक्षणीय पक्षीय-प्रदर्शन भरविण्यात आले

होते. (या प्रदर्शनाचे एका दिवसाचे सर्व उत्पन्न रु. ४९, राष्ट्रीय संरक्षण निधीला देण्याचा समारंभ अत्यंत थाटामाटात कालच पार पडला !) दमयंतीला नळ राजाचा संदेश सांगणारा राजहंस; छत्रपती शाहूंच्या मनगटावर बसलेला पोपट, नूरजहाँच्या हातून उडालेले कबूतर इत्यादि चित्रे विशेष उल्लेखनीय होती. पण सर्वांत मनोवेधक चित्र पंडित नेहरूंनी उडविलेल्या शांति-कबुतराचे होते. त्या कबुतराला दगाबाज चिनी सैनिक बंदुकीने टिपू पाहत आहेत, तोच एका मराठा जवानाने 'यशवंती' संगिनीचा हल्ला त्या आक्रमकावर केला आहे, असे दृश्य त्या चित्रात दाखविले होते.

असो. त्या प्रदर्शनाशेजारच्या 'विहंगम-भवनात' विविध पक्ष्यांची तरफदारी करणारे प्रबंध प्रथमत: वाचण्यात आले. प्रबंधवाचनानंतर खडाजंगीची चर्चा होऊन लगेच मतदानही होत असे. ह्या प्रकारे सुमारे ५०० पक्ष्यांबाबत मतदान झाल्यानंतर अंतिम फेरीत हंस, कोकीळा, कोंबडा नि मोर हे चारच उमेदवार शिल्लक राहिले. बैठकीचा अंतिम दिवस या चार पक्ष्यांनी खाल्ला ! वेदांपासून नवकाव्यापर्यंत, जेथे जेथे या पक्ष्यांनी चोची खुपसल्या असतील, तेथे तेथे या बैठकीतील विद्वानांनी डोके खुपसले. आपल्या उमेदवाराची तरफदारी करताना, त्यांनी केलेले प्रतिभेचे उड्डाण त्या पक्ष्यांच्या उड्डाणांहून बहारदार असल्याने त्याचे त्रोटक संकलन येथे देत आहे.

शाकाहारी गगनविहारी !

हंसाची शिफारस करणारे खासदार राजहंस म्हणाले, " हंसाची तारीफ करावी तेवढी थोडीच. परमपूज्य बापूजींनी ज्या खादीचा पुरस्कार केला त्या खादीचा रंग पांढरा, आपल्या पंतप्रधानांपासून ग्राम-नेहेरूपर्यंत सर्वांच्या मस्तकी शोभणाऱ्या गांधी-टोपीचा रंग पांढरा. तोच रंग या राष्ट्रीय पक्ष्याने धारण केला आहे. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष, त्याचा जो रंग तोच या राष्ट्रीय पक्ष्याचा रंग ! दूध आणि पाणी यांचे 'मिक्श्चर' समाजविरोधी शक्ती कितीही करोत, त्यांची बिनचूक फाळणी करण्याची राष्ट्रीय बुद्धिमत्ता या हंसापाशीच आढळते. आपली उत्तर सीमा लढविण्यासाठी आपण आज प्रवृत्त झालो आहोत. पण हा बहादूर राष्ट्रीय पक्षी कैक शतकापासून हिमाल्यातील मानस सरोवराकडे दरवर्षी झेप घेत असतो ! हा पक्षी शुद्ध अहिंसावादी आहे म्हणतात. म्हणूनच कीटकांचा संहार न करता कमलतंतूंचा सात्त्विक शाकाहार हा गगन-विहारी करीत असतो. बरे हा केवळ निष्कलंक शुभ्र रंगाचा आणि विश्लेषणपटू (Analitic) बुद्धिमत्तेचा आहे इतकेच नाही, तर हा दयाळू हृदयाचाही आहे. पहा, सुंदर नारींना डौलदार चाल ह्याने अर्पण केली आणि नळ-दयमंतीसारख्या प्रेमिकांची 'दिल्जमाई' ह्याच दिलदार विहंगमाने घडवून आणली ! प्रेमळ शांततामय सहजीवनाचा हा आद्य पुरस्कर्ता ! भारतीय संगीतातील 'हंसध्वनी' रागाचा हा आद्य निर्माता ! ब्रह्मदेवाचे वाहन हंसच आहे. त्याअर्थी हा विधात्यांचादेखील 'नेता' ! त्याचीच निवड 'राष्ट्रीय पक्षी' म्हणून व्हावी.

'सबसे बडा कोंबडा'

हंसाच्या या शिफारसीवर म. म. कुक्कुटस्वामी यांनी लढाऊ कोंबड्याच्या आवेशात जोराचा हल्ला केला. ते म्हणाले, " राजहंस हा राजेशाहीतील श्रीमंताचा पक्षी आहे. तो गगनविहारी असो की मानस-विहारी असो, सामान्य जनांच्या दृष्टीला तो क्वचितच पडतो ! मग लोकशाही, समाजवादी भारताने त्याला ' राष्ट्रीय पक्षी ' म्हणून का निवडावे. आमच्या गरीब जनतेच्या झोपड्यांत वावरणारा कोंबडा हाच सबसे बडा ! ग्रामीण विभागात ' पोल्ट्री 'चा कुटिरोद्योग या कुक्कुटामुळेच होऊ शकतो. असा हा गोरगरीबांचा अर्थदायी राष्ट्रीय पक्षी आज उपेक्षिला जात आहे. ठीकच आहे म्हणा ! ' घरका मुर्गा दालबराबर ! ' विद्वज्जनहो, या दिल्लीत आंतरराष्ट्रीय पाहुण्यांच्या सन्मानार्थ मोठमोठे खाने होतात. त्यात भारतीय ' चिकन बिर्याणी ' ' मसालेदार मुर्गी ' इत्यादि कुक्कुटपदार्थांनी किती शांततामय सहजीवन (आणि भोजन) निर्माण होते ! पण आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय मेजवान्यात शहीदे-वतन होणाऱ्या कोंबड्याची आपणांस कदर नाही. हर हर, हे व्यर्थ न हो बलिदान ! कोंबडा तुष्टिदायक आहे, पुष्टिदायक आहे, अर्थदायक आहे. इतकेच नव्हे तर झुंजार वृत्तीचे प्रतीक आहे ! एरव्ही दाणे टाकून कोंबडे झुंजविण्याची क्रीडा भारतात सुरूच झाली नसती. हाच तो लोकोपयोगी झुंजार पक्षी, की जो भल्या पहाटेला भारतीय ' पब्लिक 'ला जागृत करतो ! त्याचे हे जागृतीचे व्रत आजचे नाही. " उत्तिष्ठ उत्तिष्ठ राजेंद्र " या श्लोकावरून हा राजेशाहीतही जागृतीचे कार्य करीत होता हे सिद्ध होते. अशा या द्विजोत्तमालाचा ' राष्ट्रीय पक्षी ' म्हणून गौरविले पाहिजे. "

कोकिळाबाईंना चान्स द्या !

यानंतर श्रीमती श्यामलम्मा ह्या दाक्षिणात्य विदुषीने कोकीळास्तवन सुरू केले. त्या आपल्या नादमधुर भाषणात म्हणाल्या, " सध्या भारत सरकारचे धोरण स्त्रियांना पुढे आणण्याचे आहे. स्त्री स्वतंत्र भारतात मंत्रीपदापासून तो संत्रीपदापर्यंत सर्वत्र आघाडीवर चमकू लागली आहे ! अशा या स्त्री-दक्षिण देशाने कोकीळाबाईंना ' राष्ट्रीय पक्षिणी ' म्हणून चान्स का देऊ नये ? कोकिळेचा रंग काळा. येथील जमिनीचा नि जनतेचाही रंग प्रायः तोच आहे ! कोकिळेला परभृत म्हणतात पण आपला देश तरी सध्या कोठे स्वावलंबी आहे ? अमेरिकेची, रशियाची नि अन्य देशांची आर्थिक नि तांत्रिक मदत घेणारा आपला भारत, आज तरी शेकडो बाबतीत परभृत आहे. अशा विकसनशील चतुर देशाचे राष्ट्रीय प्रतीक म्हणजेच दुसऱ्याच्या घरट्यात आपली अंडी घालणारी कोकिळा ! ह्या पक्षिणीचा पंचमालाप, ' पंचशीला 'च्या आलापांसारखाच मधुर आहे ! युद्धपिसाट जगाच्या उजाड माळावर उगाच गळा मोकळा करणारा हा देश, कित्येकांना कोकिळेसारखाच वाटत आहे. म्हणूनच ते आपुलकीने सांगतात —

"येथे समस्त बहिरे बसतात लोक,
का भाषणे मधुर तू करिसी अनेक ? "

सारांश, ह्या देशाचे कोकिळेशीच रंगात, रूपात नि स्वभावात साम्य असल्याने, तिलाच राष्ट्रीय पक्षिणी हा किताब द्यावा. अन् स्त्री-दाक्षिण्य दाखवावे ! असे केले तर आमच्या मद्रदेशीय श्यामला तर फारच खूष होतील ! "

अखेरीस पंडित मयूर शर्मा (प्रा. वाराणसी विद्यापीठ) इत्यादि अनेक विद्वानांनी मोराच्या मस्तकावर मानाचा तुरा चढविला. आणि त्यासरशी बैठकीचे पारडे फिरले. " मोर हाच भारताचा प्रमुख राष्ट्रीय पक्षी " हे मत बहुसंख्यांना मान्य झाले ! इतकेच नव्हे तर, भारताच्या या राष्ट्रीय पक्ष्याला एक काव्यमय मानपत्र पाठविण्यासाठी कविजनांची एक उपसमिती तेथेच नेमली गेली. त्या मानपत्रात मयुराची तरफदारी करणाऱ्या सर्व भाषणांतील मुद्दे समाविष्ट झाले असल्याने तेच पुढे देत आहे —

मयूराला मानपत्र

अभिनंदन शारदेच्या वाहना, अभिनंदन !

भारताचा राष्ट्रीय पक्षी म्हणून तुला अधिकृत मानमान्यता मिळाल्याबद्दल तुझे शतवार अभिनंदन ! द्विजोत्तमा, खरे पाहिले तर, भारत सरकारने तुझा गौरव करून, स्वत:चाच गौरव करून घेतला आहे. कारण तुला बाजूस सारून अन्य कोणत्याही पक्ष्याची तळी सरकारने उचलली असती, तर ते अरसिक ठरले असते. इतकेच नव्हे तर त्यावर वशिलेबाजीचा आरोप विरोधी पक्षाने केला असता ! म्हणूनच तुझ्यासह सरकारी निर्णयाचेदेखील अभिनंदन !

मित्रा मयूरा ! याहून प्रचंड गौरव तू पुरातन काळापासून अनुभविले आहेस. देवी शारदेने आपले आसन नि वाहन म्हणून तुझीच निवड केली, याहून मोठा गौरव असू शकतो काय ? भगवान श्रीकृष्णाने १६ सहस्र अंगना केल्या पण एकीलाही डोक्यावर बसू दिले नाही ! तथापि, त्याने तुझे रेशमाहून मुलायम पीस आजन्म मस्तकी मिरविले. अशी भगवत्कृपा अन्य कोण्या विहंगमावर झाली आहे काय ? फार काय सांगावे, तुझ्या दर्शनसुखाची ओढ लागल्यानेच तो श्यामसुंदर, श्यामल घनांच्या रूपाने सतत चार महिने गगनगोकुळात अवतीर्ण होत असतो; स्निग्ध, गंभीर घोषात तुझ्याशी वार्तालाप करतो. अरे अशी देवांची मैत्री दुसऱ्या कोणाला लाभली आहे काय ? एवढेच नव्हे तर, देवासुरांच्या संग्रामात, आपल्या पराक्रमी पुत्राचे-कार्तिकेयाचे तू वाहन झालास, या तुझ्या महान कार्यावर प्रसन्न होऊन श्रीशंकराने तुला ' नीलकंठ ' हे स्वत:चे नांव बहाल केले. याहून मोठे पदवीदान कधीतरी संभवते काय ? म्हणूनच ' राष्ट्रीय पक्षी ' या पदवीचे तुला कदाचित् विशेष कौतुक वाटणार नाही. पण तरीही अखिल राष्ट्राचे प्रेम त्यात व्यक्त झाले असल्याने तू या पदवीचा अत्यानंदाने स्वीकार करावा आणि आमचे अभिनंदनही स्वीकारावे; अशी नम्र विनंती आहे.

आर्त-त्राणाय व: शस्त्र:

मित्रा, काय मौज आहे पहा - तू आणि कुक्कूट एकाच वंशातले. तुमची शरीर-रचना साधारणत: एकाच ठेवणीची. म्हणूनच इंग्रजीत तुमच्या नावातही समान-वंशीयता सूचित होते. कोंबडा म्हणजे Cock तर तू Pea-cock एवढेच ! पण केवळ अंगभूत गुणवत्तेच्या बळावर तू शारदेचे वाहन होऊन कीर्तीच्या पर्वतशिखरावर चढलास, आणि कोंबडा मात्र उकिरड्यावरच उड्डाण करीत राहिला ! तुम्ही दोघेही वृत्तीने झुंजार पण कोंबड्याची झुंजार-वृत्ती चार किडक्या दाण्यांसाठी स्वजनांवर तुटून पडण्याची, आपसांत लढण्याची, तर तुझी रणशूरता जहरी सर्पांना नेस्तनाबूत करण्यासाठी ! तुझी चोंच, तुझी तीक्ष्ण नखाग्रे आर्तजनांना पीडा देण्यासाठी नाहीत; तर ' आर्तत्राणाय व: शस्त्र: ' हेच तुझे ब्रीद आहे ! म्हणूनच तुझा हा राष्ट्रीय गौरव, म्हणूनच हे नम्र अभिनंदन !

दिलदार प्रेमदूत

तू नुसता रणझुंजार लढनेवाला नाहीस, तर दिलदार दिलवालाही आहेस. म्हणूनच दुनियेचे दु:ख तू ओळखतोस. श्यामला धरणी आणि श्यामसुंदर मेघ यांचे अंतरंग तू जाणतोस आणि त्यांच्यातील शतयोजनांचे अंतर चतुर मध्यस्थीने दूर करतोस. मेघाच्या अमृतवर्षावासाठी ग्रीष्माच्या तापदायक उन्हात, तप आचरणाऱ्या विरहिणी धरणीचे आर्त तूच पर्वतशिखरावरून टाहो फोडून सांगतोस, आणि मग त्या गगनीच्या साँवरियाची रुमझुम रुमझुम प्रेमधारा बरसताच त्या शालिनीचे अभिनंदन तूच उच्चरवाने त्याला निवेदन करतोस ! या तुझ्या प्रेमळ मध्यस्थीमुळे, नळदमयंतीचा दुवा साधणाऱ्या हंसाची कामगिरी फिकी पडली. आणि म्हणूनच तो लज्जेने पांढराफटक झाला ! मेघाशी तुझा ऋणानुबंध हा असा असूनही, तू चातकाप्रमाणे कधी लाचारीने चोंच वासली नाहीस. एका थेंबाचीही याचना केली नाहीस. उलटपक्षी, मेघाला आपली निरपेक्षता स्पष्टपणे सांगितलीस,

अहमस्मि नीलकंठ:
तव खलु तुष्यामि शब्द-मात्रेण ।
नहि जलधर ! भवत:
चातक इव जीवन याचे ।।

म्हणूनच निरपेक्ष भक्तीचा आनंद भोगणाऱ्या भगवत्-भक्तांचे तू प्रतीक बनलास. ' भक्त-मयूर ' म्हणून तुझा गौरव झाला. त्या गौरवात आता अधिकच भर पडल्याबद्दल तुझे अभिनंदन !

तोरा हरणारा सौंदर्य-तुरा !

या मानसिक सौंदर्याबरोबरच शारीरिक सौंदर्यदेखील विधात्याने तुला बहाल केले आहे. तुझा तो ऐटदार तुरा ! जणू सौंदर्य-लक्ष्मीने आपल्या कोमल हातांनी कमलतंतू

वेचून वेचून तो तुझ्यासाठी बनविला. तो नाजुक तुरा पाहूनच की काय, मत्सरग्रस्त कोंबड्याचा तुरा रागाने लालीलाल झाला ! जसा तुझा तुरा तसाच तुझा निळा रंग उठावदार ! आश्चर्य हेच वाटते की, चित्रकूट पर्वतावर तुझ्या निळ्या निळ्या पिसाऱ्याचा फुलोरा दररोज नजरेस पडत असूनही, जानकीने कांचन-मृगाचा हट्ट का धरला ? तुझ्या मखमली पिसांचा रंग इतका मोहक की त्यांचे अनुकरण करणारी ' मयुरपंखी ' साडी नेसून आधुनिक रमणी प्रियकरांचा नेत्रोत्सव साजरा करतात... आणि तुझा तो रेशमाहून मऊ मुलायम पिच्छ-फलाप ! इंद्रधनुष्याच्या सर्व छटा मिरविणारा ! मित्रा मोरा ! सुंदरीच्या आनितंब रुळणाऱ्या केश-कलापाचा कुटिल तोरा तुला पाहताच गुंडाळला गेला. तुझा तो डौलात उभारलेला पिसारा पाहताच सुंदर ललना शरमिंद्या होऊन, त्यांनी आपला भुरभुरता केशसंभार बांधून टाकला. अन् तेव्हापासूनच वेणीबंधनाची पद्धती रूढ झाली ! फार काय सांगू ? मित्रा, मोठमोठे तपस्वी ज्यांच्या सुगंधी केशपाशात बांधले गेले, त्या सुंदरीचा दिल तुझ्या पिसाऱ्यांत केव्हाच गुंतून गेला !.... जसा तुझा पिसारा सुंदर, तसेच तुझे नत्यही सुंदर. इतके की इंद्राच्या रंभेपासून तो बाजीरावाच्या मस्तानीपर्यंत, सर्व नृत्यांगनांनी तुला त्याबाबत मानाचा मुजरा केला आहे ! त्या असंख्य मुजऱ्यांत आता आणखी भर पडली आहे. म्हणून तुझे अभिनंदन !

— सौंदर्यवंता, तुझे अभिनंदन ! कलावंता, तुझे अभिनंदन ! राजवाड्यापासून फासे-पारध्याच्या झोपडीपर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारतात सर्वत्र सर्वांना प्रिय असणाऱ्या गुणवंता, तुझे अभिनंदन ! ' पांखियामाजी मोयारू ' ह्या कविवचनाला आज दिल्लीदरबारने मान्यता देऊन तुला गौरविले; म्हणून तुझे त्रिवार अभिनंदन !

●

(रविवारची लोकसत्ता १०/२/६३)

१९. रंभा-फळांचा विश्व-संचार !

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

महाराष्ट्राच्या मधुर फळांवर मास्कोची मोहब्बत !

चिर तारुण्य आणि रुचिर लावण्य ह्यांनी पुरेपूर बहरलेली नंदनवनातील मदन-मंजिरी - इंद्राची आवडती अप्सरा रंभा - पराजित झाली, फजित झाली ! शुक्राचार्यांच्या प्रखर वैराग्यापुढे तिचे मंदमधुर हसणे, लटपट लटपट चालणे, तिरप्या नजरेने पाहणे, छम्छम् नाचणे : सारे काही निष्फळ ठरले. शुक्रमुनींचे मन जिंकण्याऐवजी ती नंदनवनाची माधुक मैना स्वत:चेच मन गमावून बसली ! ती मन्मथ-पुतळी जित-मन्मथ शुक्राचार्यांचा संयम पाहून लज्जित झाली आणि हिरमुसल्या चेहऱ्याने अमरावतीला निघून गेली, अशी एक कथा आहे पण....

पण रसिकहो, 'चतुर किती बायका' हेच खरे ! कारण अशीही एक कथा आहे की, शुक्राचार्यांवर लुब्ध झालेली ती देवांची वारांगना - गनिमी कावा लढवून म्हणजे कोमल केळीचे रूप धारण करून - त्या तपोवनातच राहिली !

तिने भक्तिभावाने शुक्राचार्यांना हात जोडून वंदन केले. त्या वेळी तिच्या हातांचा जो केळीसारखा आकार निर्माण झाला, त्यालाच लोक केळफूल म्हणू लागले ! आणि अशी ती सरस सुंदर केळी कालांतराने 'भूलोकीची रंभा' म्हणून विकसित झाली; तिच्या मधुर सोनेरी फळांना 'रंभा-फल' हे नाव प्राप्त झाले.

ऋषीमुनींचा तपोभंग करू पाहणाऱ्या 'त्या' रंभेला तपोवनातील आश्रमात थारा नसेल; पण भूलोकीची ही हिरव्या पदराची विशाल पल्लवांची रंभा मात्र जसे आश्रमाचे तसेच राजमंदिराचे भूषण बनली. आपल्या हिरव्यागार पल्लवांच्या विंझण-वाऱ्याने फुलबागेतील प्रणयी जनांपासून तो तपोवनातील मुनिजनांपर्यंत, सर्वांचे श्रम तिने हलके केले आणि नैवेद्याच्या ताटापासून तो मेजवानीच्या थाटापर्यंत तिची सुवर्ण-गौर फळे सर्वत्र मानमान्यता पावली.

सौंदर्यवतीचे साम्राज्य

अशी ही रंभा आणि रंभाफळे ! त्यांची उत्पत्ती प्रथम भारतात झाली, असे आधुनिक वनस्पती-शास्त्रज्ञ सांगतात आणि ते खरेच असले पाहिजे. कारण हजारो वर्षांपासून त्याचे

कोडकौतुक जसे भारताने केले आहे, तसे अन्य कोणी केले नसेल. आम्रफळांच्या खालोखाल किंबहुना आम्रफळाइतकाच बहुमान भारतीयांनी रंभावृक्षाला, रंभापर्णांना नि रंभा फळाला दिला आहे. भारतीय फलसृष्टीचा आंबा हा राष्ट्रपति असेल, तर रंभाफळ पंतप्रधान आहे ! मुंज असो की लग्नसमारंभ असो, आमंत्रितांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वाराशी रंभा पाहिजेच ! स्टेनलेस् स्टीलची वा चांदीची ताटे कितीही चमचमाट करोत, चमचमीत भोजनसमारंभाच्या षड्रस रंगतीसाठी लांबरुंद रंभापर्णे - केळीची पाने - पाहिजेतच ! फार काय सांगावे, प्राचीन भारतीय कवींना, सुंदर युवतींच्या तुकतुकीत नि सुखद-शीतल मांडयांचे वर्णन करताना प्रथमत: आठवण झाली ती केळीच्या खांबाची, कदलीस्तंभाची ! म्हणूनच ' रंभोरू ' ही मारु किताबत त्यांनी भारतीय सुंदरींना बहाल केली !...

अशा ह्या सौंदर्यवतीचे, गुणवतीचे साम्राज्य हळूहळू भारताबाहेर पसरू लागल्यास नवल कसले ? शेकडो वर्षांपूर्वीच केळीच्या वसाहती उष्णकटिबंधात पाय रोवून बसल्या आणि नवल हे की, ह्या वसाहतीच मूळ राज्यापेक्षा अधिक फोफावल्या ! प. आफ्रिका, दक्षिण व मध्य अमेरिका, वेस्ट इंडीज बेटे, कॅनरी बेटे, ह्या प्रदेशांतील केळीच्या बागा आज भारतीय बागांहून अधिक विशाल नि समृद्ध आहेत.

सध्या १२ फूट उंचीपासून तो २५ फूट उंचीपर्यंतच्या २०० प्रमुख जातीच्या केळी उष्णकटिबंधीय प्रदेशांत आनंदाने बहरल्या आहेत. त्यांच्या फळांची विविधता तरी केवढी ! कोठे करंगळीएवढ्या आकाराची, तर कोठे एक हात लांबीची ! कोठे आंबट-गोड चवीची, तर कोठे साखरेला लाजविणाऱ्या माधुरीची ! अशा विविध जातींच्या केळ्यांचे एकूण जागतिक उत्पादन ३ कोटी टनाहून अधिक आहे. जगात केळीच्या लागवडीखाली सुमारे १६ लाख एकर जमीन आहे. तज्ज्ञांचे मत असे की, भारतीय केळी अधिक रुचकर नि स्वादिष्ट लागतात.

उष्णकटिबंधातील उपर्युक्त देश केळ्यांची केवळ निर्यातच करतात असे नाही, तर तेथील काही रहिवासी केळी वाळवून त्यांचे पीठ बनवितात. तेच त्यांचे मुख्य अन्न. हे रहिवासी केळीच्या विशाल पानांचेही बहुविध उपयोग करतात. चटयांसाठी, घरांच्या छपरांसाठी, पिशव्यांसाठी ! इतकेच नव्हे तर, केळीच्या पानाच्या दांडयांतील मजबूत तंतूंपासून ते दोऱ्याही बनवितात. केळी नि केळे ह्यांचे असे अनेक पदार्थ बनतात म्हणूनच इंग्रजीत त्यांना ' बनाना ' म्हणत असावेत, अशी बरेरकरी-छापाची कोटीही कोणी करू शकतील !

भारतीय निर्यात-व्यापार

जगातील विविध देशांत रंभाराणीचे साम्राज्य, कोठे आयातीच्या तर कोठे निर्यातीच्या रूपाने वाढतच चालले आहे, हे पाहून, रंभेच्या आद्य उत्पत्तिस्थानात, भारतात - व्यापार-प्रेरणा निर्माण झाली असल्यास नवल नाही. भारतीय केळ्यांना विविध राष्ट्रांत

भरपूर मागणी आहे.

महाराष्ट्राची रंभा-प्रीती !

आपला हा महाराष्ट्र देश प्राचीन काळापासून आंब्याप्रमाणेच रंभाफळावर प्रेम करीत आला आहे. मुक्तेश्वर-मोरोपंत-रघुनाथ पंडित इत्यादींची काव्ये अधुनमधून आपली रंभा-प्रीती व्यक्त करतात. कैक वर्षांपासून वसईची नि भुसावळची केळी महाराष्ट्राच्या रावापासून रंकापर्यंत सर्वांना तुष्टी-पुष्टी देत आहेत. ह्या महाराष्ट्रीय केळ्यांचे प्रकार तरी किती ! कागदासारखी पातळ नि सुवर्ण-गौर त्वचा असलेली ती सफेत वेलची ! जणू काही वनश्रीच्या गोंडस हाताची नाजुक नाजुक बोटेच ! अतिशय गोड नि टिकावू. तिचीच बहीण लाल वेलची. पण हिची चव एखाद्या खटचाळ सुंदरीप्रमाणे जरा आंबट-गोड ! लोण्यासारखी मऊ नि एखाद्या पुष्ट पुरंध्रीच्या करांगुलीसारखी गुबगुबीत मुठेळी केळी-रसिकांना मुठीत घ्यावीशी वाटणारी नि मिठीसारखीच मिठास ! गणरायाला प्रिय असलेली राजेळी केळी असतात एखाद्या परिणत यौवनेप्रमाणे भरदार ! त्यांचा 'वेफर्स'साठी उपयोग होतो आणि सुकेळीदेखील त्यांचीच बनतात. राजेळी केळ्यांची सुकेळी बनतात केवळ आगाशीगावाच्या परिसरात. तेथील हवामान त्यांना मानवते. ह्याशिवाय हिरव्या सालींची वासराई केळी, आंबट गोड रुचीची लाल केळी, भाजीसाठी जी वापरतात ती बनकेळी असे कितीतरी प्रकार आपल्या महाराष्ट्रात आहेत.

मॉस्कोत रसिकांचा 'क्यू'

महाराष्ट्राच्या ह्या केळे-व्यापारात मंगळवार दि. २९ ऑक्टोबर १९६३ हा दिवस सोनेरी शाईने लिहावा लागेल. कारण ह्या दिवशी मुंबापुरीच्या व्हिक्टोरिया-डॉक्मधून 'महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी'ने १२०० टन केळ्यांचा पहिला हप्ता रशियाला मोठ्या इतमामाने रवाना केला ! ह्या पैकी ४५० टन केळी गुजरातमधली असली तरी ७५० टन केळी महाराष्ट्राच्या विविध भागांतून उपस्थित झाली होती; दोन स्पेशल गाडयांतून खानदेशातील रंभाफळे भुसावळहून मुंबईस हाजीर झाली होती.

रशियाने जी चार हजार टन भारतीय केळ्यांची मागणी केली होती तिचा पहिला हप्ता महाराष्ट्राने अशा प्रकारे उत्साहाने पाठविला होता. भारताची सदिच्छा बरोबर घेऊन ही महाराष्ट्राची रंभाफळे रसिकांच्या भेटीसाठी 'काळचा समुद्रा'तील ओडेस्सा बंदरांत उतरली आणि काय आश्चर्य ! तेथे शेकडो लोक त्यांच्या स्वागतार्थ सिद्ध झाले होते !

मास्कोमध्ये तर ह्या भारतीय केळ्यांसाठी रसिक ग्राहकांचे 'क्यू' लागले आणि 'बंबईका केला' अस्सी नये पैसे को एक, ह्या दराने खलास झाला ! रशियन जनता ह्या महाराष्ट्राच्या केळ्यांवर निहायत खूष झाली. कोठे मुंबई नि कुठे मॉस्को ! पण रंभाफळाच्या मधुर रुचीने हे अंतर ताबडतोब तोडले. आमचे तत्त्वज्ञान, आमची लोकशाही, रशियन

लोकांना पटणे मुष्किल असेल; पण महाराष्ट्राच्या रंभाफळांची माधुरी त्यांना झटपट पटली !

केळकरी पंथ !

मधुर रंभा-विजयाने महाराष्ट्राच्या केळे-व्यापाराच्या नव्या शुभारंभास सुरुवात झालेली आहे आणि भविष्य काळात युरोपीय देशांत अग्रस्थान मिळविण्याची जबाबदारी येऊन पडली आहे.

ही जबाबदारी केवळ व्यापारी हेतूनेच नव्हे, तर रंभा-प्रीतीच्या प्रेरणेने महाराष्ट्राचे बागायतदार पार पाडतील. ज्या महाराष्ट्रात वाग्दत्त वधूवरांना विवाहाच्या गोडव्या 'केळवणा'ची गोडी आप्तेष्टांकडून चाखावयास मिळते, त्या महाराष्ट्राची केळ्यांच्या बाबतीत प्रगती ही होणारच ! महाराष्ट्राच्या साहित्यातच नव्हे तर व्यापारातही 'केळकरी पंथ' मानमान्यता पावेल ह्यात मुळीच शंका नाही. महाराष्ट्रीय रंभा आज ना उद्या विश्वविजय संपादन करील !

●

लोकसत्ता.

१६. मधाने भरलेली सोन्याची अंडी !

/ / / / / / / / / / / / / / / / / /

सालाबादप्रमाणे या वर्षीही, ऐन वसंत ऋतुत भारतीय फळांचा राजा इंग्लंडच्या राणीला भेटला. समसमासंयोग झाला. अक्षरश: ' रसीली ' भेट घडली. मुंबईच्या राज्यपाल श्रीमती विजयालक्ष्मी पंडित ह्यांनी, लॉर्ड मौंटबॅटन ह्यांच्याबरोबर एक पेटारा पाठवून, ही राजाराणीची भेट घडवून आणली. एलिझाबेथ राणीला हापूस आंब्यांची ही सुंदर सुगंधी नि साखरगोड भेट खचित आवडली असेल, ह्यात शंका नाही. कारण, भारतीय आंब्यांची लोकप्रियता शंकातीत आहे.

वनस्पती-शास्त्रज्ञ सांगतात की भारत (नि मलाया) हेच आंब्याचे मूळ वसतीस्थान, जन्मस्थान. येथूनच त्याचे साम्राज्य जगभर पसरत गेले. या वर्षी तर त्याने आपल्या अहिंसक साम्राज्य-विस्ताराचा एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. म्हणजे असे की, सौदी अरेबिया, इराण, इजिप्त नि पाकिस्तान या देशांनी भारतीय आंब्याची रोपे लागवडीसाठी मागितली असून, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इत्यादींनी विचारले आहे - " आमच्या देशात भारतीय आंबा मूळ धरू शकेल काय ? "

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, स्वित्झरलंड इत्यादि अनेक देशांत आंब्यांच्या हजारो पेट्या दरवर्षी भेटीदाखल रवाना होतात. पण व्यापारी माल म्हणून आंबा प्राय: पर्शियन गल्फच्या प्रदेशांतच पाठविला जातो. त्यामुळे परकीय चलनाची चणचण तेवढीच कमी होते. तथापि, हा व्यापार वृद्धिंगत होण्यास भरपूर वाव आहे. मात्र त्यासाठी सरकारने उत्तेजनही तसेच भरघोस दिले पाहिजे.

कारण, आंब्याचा व्यापार फार दैवाधीन आहे. उदा. कोकणातील आंबे-बागा मोहर लागताच व्यापारी त्या मोहरावरून फळांचा अंदाज बांधतात, अन सीझनपुरत्या त्या बागा खरीदतात. पण समजा, अकस्मात वादळ उठले वा हवामान बिघडले तर ? तर सारा मोहर त्यांच्या आशा-आकांक्षेसह गळून पडतो. तसेच परदेशी पाठवावयाच्या फळांचे. पॅकिंगमध्ये थोडीशी चूक झाली अथवा प्रवासास थोडासा विलंब झाला तरी, फळांबरोबरच व्यापाऱ्यांचे चेहरे खर्रकन उतरतात !

ह्या अडीअडचणी लक्षात घेऊन आम्रवृक्षांच्या नि फळांच्या संपन्नतेकडे भारताने

लक्ष दिलेच पाहिजे. ते त्याचे केवळ आर्थिक नव्हे तर राष्ट्रीय कर्तव्य आहे. कारण आंबा हे भारताचे राष्ट्रीय फळ असून त्याचा जन्मदाता आम्रवृक्ष हा भारताचा राष्ट्रीय वृक्ष, ह्या नात्याने जगभर विख्यात आहे.

रंगीला तरुराज !

हाच तो भारतभूमीचा राष्ट्रीय वृक्ष, की ज्याच्या मंगल पानांशिवाय धार्मिक समारंभाचे पानही हलू शकत नाही आणि ज्याच्या मधुर रसपानाविना वसंतोत्सव साजरा झालासे वाटत नाही ! हाच तो भारताचा दिलफ्यार वृक्ष, की ज्याच्या सुगंधी मोहराशिवाय कालिदासाच्या अभिजात कलाकृतीच नव्हे, तर खेड्यापाड्यातील लोकगीतेही सजू शकत नाहीत ! हाच तो डेरेदार, खुषबूदार, दिलदार आम्रवृक्ष, की ज्याच्या लुसलुशीत लाल्सर पाल्वींनी हिरव्यागार पर्ण-संभारानी, कांचनगौर फळांनी आणि सुगंधित मंजिऱ्यांनी भारताची वनेच नाही तर कवनेही जागोजागी फुलून निघाली आहेत ! हाच तो भारताचा राष्ट्रीय तरुराज, की ज्याच्या राजस रसिकतेची ग्वाही शेकडो कवींनी दिली आहे. काहींचे म्हणणे असे की, सुंदर सुंदर ललनांच्या नुसत्या श्वासांनिश्वासांनी हा ताबडतोब मोहरतो, धुंद-फुंद होतो ! चूत: वक्त्रवातात् अशा त्या रंगील्या तरुराजाला मदनाने आपला सखा मानल्यास नवल कसले ?

भारतीय लैला-मजनूंना मोहब्बतीची मधुर जखम करण्यासाठी मदन महाराजांनी जे पाच बाण तयार केले त्यातला प्रमुख बाण आहे आम्रमंजिरीचा. ' वसंती बघुनि मेनकेला ' विश्वामित्राने आपल्या तपावर पाणी सोडले, त्या वेळी मदनाने त्या माषुक अप्सरेच्या आडून जो फुलबाण मारला तो बहुश: ह्या आम्र-मोहराचाच असावा ! आणि ह्याचे इष्काच्या लढाईत असे वारंवार सहकार्य मिळते, म्हणून कामदेवानेच ' सहकार ' असे यथार्थ नाव ह्याला दिले असावे.

मोगलांची मोहब्बत

प्राचीन भारतीयांनाच नव्हे, तर अरबस्तानचे वाळवंट सोडून भारताच्या नंदनवनात आलेल्या महंमदीयांनादेखील आम्रतरुच्या सुगंधी मोहपाशाने जखडून टाकले. मोगल सम्राट अकबराच्या आम्र-मोहब्बतीची साक्ष, दरभंगा (बिहार) येथील ' लाखीबाग ' आजही देत आहे. अकबराला येथील आंबा इतका काही रुचला की त्याने सुभेदाराला फर्मावले - " ह्या आंब्याची लाख झाडे दरभंग्याला लावल्याखेरीज मी येथून मुक्काम हलविणार नाही ! " झाले, दोन-चार दिवसात एक लाख आंब्याची रोपे लावण्यात आली आणि मग त्या प्रचंड आंबराईला ' लाखीबाग ' हे नाव प्राप्त झाले.

उत्तरेतल्या दरभंग्याप्रमाणेच दक्षिणेतल्या ' कोहीर ' (आंध्र प्रदेश) गावचा आंबा ह्या यवनांना अतिशय रुचला. इतका की, *" हर कस्तके साहेबे तकदीर बाशद / बफजले आंबा दर कोहीर बाशद / "* (जो नशीबवान असेल त्यालाच आंब्याच्या कृपेने ' कोहीर 'मध्ये

वास्तव्य लाभते.) अशी म्हण फारसीत रूढ झाली.

कोयींचे राजेशाही रिसेप्शन !

आयर्विन नामक इंग्रज संशोधकाने आंब्याच्या लागवडीचा एक मजेदार किस्सा लिहून ठेवला आहे. तो असा -

" एकदा मोगल बादशाह महंमदशाह रंगीला (सन १७१९ ते १७४८) ह्याने अच्छेर वजनाचा एक आंबा खाल्ला आणि त्याच्या गोडीची तारीफ सुभेदार महंमद बंगज ह्याला सुनावली. तेव्हा बंगज म्हणाला, " खुदावंद, नुसत्या वर्णनानं त्या आंब्याची गोडी आम्हाला कशी कळणार ? " बादशाहाने उत्तर दिले, " आपला सवाल बिल्कुल बराबर आहे. अफसोस ! आंबा तर माझ्या पोटात गेला. लेकीन ही कोय शिल्लक आहे ती आपण घ्या. " बंगजने मोठ्या अदबीने ती कोय आपल्या हातरुमालात बांधून घेतली आणि ताबडतोब फरुखाबाद येथे आपल्या मुलाकडे पाठवून दिली. " कोय येणार " ही वर्दी पोहचताच बंगजचा पुत्र काईमखान राजधानीपासून ६० मैलावर सोरोन या गावापर्यंत तिच्या स्वागतार्थ आला. मोठ्या थाटामाटाने त्या कोयीचे रिसेप्शन पार पाडले आणि फरुखाबादेच्या ' हयात बागेत ' शाही इतमामाने बीजारोपण समारंभ पार पडला. आंब्याच्या मोसमांत रोजी तीस शेर दूध त्या झाडाला घालण्यात येई ! अशा त्या आंब्याची फळे अमृताहून गोड असत... पण ही कीर्तीच त्याला मारक ठरली. कारण, इतर अनेक नवाबांनी त्या फरुखाबादी आंब्याची कलमे मागितली. परंतु हाय हाय ! कलमे काढून नेताच ते झाड एखाद्या विरही प्रियकरासारखे वाळू लागले अन् एका वर्षात सुकून नष्ट झाले ! "

द्राक्षा म्लानमुखी जाता !

अकबर जहाँगीरपासून तो बहादुरशाह जफरपर्यंत सर्वच मोगल राजे आंब्याचे आशिक होते. मग त्यांच्या दरबारचे शायर आंब्यावर लट्टू झाल्यास त्यात नवल कसले ? मिर्जा गालिब तर आंब्याचा फार शौकीन. एकदा बादशाह जफरबरोबर गालिब लाल किल्ल्यातील बागेत संचार करीत होता. बादशाहसाठी राखून ठेवलेल्या खास आम्रवृक्षाकडे त्याची नजर गेली. त्या वृक्षावरील रसरशीत आम्रफलांकडे आशाळभूत नजरेने पाहणाऱ्या त्या शायराला जफरने विचारले, " क्या देख रहे हो मिर्जासाहब ? "

गालिबने उत्तर दिले, " जहाँपन्हा, म्हणतात की, दाने दाने पे लिखा है खानेवाले का नाम ! म्हणून पाहत होतो की ह्या आंब्यावर माझे नाव कोणी लिहिले आहे काय ? "

बादशाह हसला. गालिबच्या बोलण्याचा भावार्थ जाणून त्याने त्याला भरपूर आंबे दिले हे सांगणे नकोच. बहुधा हे आंबे भरपूर चाखून नि चोखूनच मिर्जासाहेबांनी ती चोख आम्र-प्रशंसा लिहिली असावी. तीत म्हटले आहे -

" वाहवा ! ह्या आम्रवृक्षाला आपल्या स्तनाकार घटांतून स्वर्गसुंदरींनी अमृताचा

अभिषेक केला असावा. म्हणूनच इतकी सुंदर नि मधुर फळे त्याला आली. इतकी मधुर की, त्यांना पाहूनच द्राक्षे सुकली अन् त्यांच्या मनुका झाल्या आणि उसाचा रस कडक वेष्टनाआड लपून बसला!" **'द्राक्षा म्लानमुखीजाता शर्कराचाश्मतां गता!"**

आंब्याचा हा असा शौक दिल्लीदरबाराला प्राचीन काळापासून आहे. पण त्यातील वैशिष्ट्य हे की, दख्खनचे आंबे, महाराष्ट्राचे आंबे दिल्लीश्वरांना अधिक पसंत! शहाजहान दिल्लीच्या तख्तावर बसण्यापूर्वी त्याचे वास्तव्य दक्षिणेत बरेच झाले होते. तो विश्वसुंदरी मुमताजबरोबर जुन्नरला राहिला होता आणि बहुधा येथेच त्याला दिलकश दक्षिणी आंब्याची चटक लागली असावी. इतकी की, " आपल्या मोहब्बतीहून आंब्याच्या माधुरीचा मोह शाहजहानला अधिक पडतो " ह्या कल्पनेने ती यवन सुंदरी रुष्ट व्हावी! आणि मग शहाजहानने हसत हसत म्हणावे, " दिलजान, दिलप्यारी, रुठिये नहीं! घे, हा दक्षिणी आंबा घे. अन् तुझा सारा राग याच्या मधुर रसाबरोबर गिळून टाक पाहू " पुढे शहाजहान दिल्लीच्या तख्तावर आला तरी त्याचे दक्षिणी आंब्याचे वेड ओसरले नाही. उलट दुप्पट वाढले. मोठ्या इतमामानाने दौलताबाद, बऱ्हाणपूर इत्यादि ठिकाणचे आंबे त्या रसिक सम्राटाच्या भेटीसाठी आग्र्याला जात. एकदा दौलताबादचे आंबे पुरेसे न आल्याने शहाजहान फार रुष्ट झाला अन त्याने औरंगजेबाला कडक पत्र लिहिले. तेव्हा औरंगाबादेहून औरंगजेबने लांबलचक उत्तर पाठवून, आपण चांगले आंबे पाठवण्यासाठी किती कसोशीचे प्रयत्न करीत असतो हे सविस्तर निवेदन केले. त्या पत्रात म्हटले आहे, " काय करूं? ह्या मौसमात 'बादशाह पसंद' जातीचे तीनच आंबे मजकडे बागवानाने आणून दिले. कारण ह्यापूर्वी एकाच फांदीला फळे लागली. इतर फांद्या वादळी वाऱ्याने मोडून पडल्या...." इत्यादि.

आपल्या दक्षिणी मुलुखातील आंब्यासाठी दिल्लीश्वरांचा दिल इतका व्याकुळ व्हावा यात नवल ते कसले? अमीर खुसरोने १४ व्या शतकाच्या आरंभीच 'सर्टिफिकेट' देऊन ठेवले आहे की, " दौलताबादचे आंबे हे आंबे नव्हेत, तर मधाने पुरेपूर भरलेली सोन्याची अंडी आहेत ती!"

महाराष्ट्राच्या राजधानीत

अशा गोड आंब्याची निपज असलेला आपला महाराष्ट्र प्राचीन कालापासून आम्र-प्रेमात आघाडीवर आहे. महाराष्ट्राची विशेषत: रत्नागिरी जिल्ह्याची आम्रवृक्ष नि आम्रफळ यावर विशेष प्रीती आहे. म्हणूनच ह्या आम्रप्रिय नि आम्र-प्रचुर मुलखानजीक मुंबईत - महाराष्ट्राच्या राजधानीत - आंब्यांचा व्यापार फार तेजीत असतो. किंबहुना मुंबापुरी ही आंबापुरीच होय, असे म्हटल्यास विशेष अतिशयोक्ति होणार नाही. पण कोणाला ती अतिशयोक्ति वाटतच असेल तर त्याने मुंबईच्या 'क्रॉफर्ड मार्केटा'त जरा फेरी मारून यावे. त्याची खात्री पटेल की, मुंबई हीच आंब्याची जगातील सर्वांत मोठी बाजारपेठ आहे.

'क्रॉफर्ड मार्केटा'तील नाना जातीच्या आम्रफलांची आरास म्हणजे आंब्यांचे एक

' कॉस्मॉपॉलिटन ' संमेलनच म्हणाना. राजेशाही अल्फान्सो (हापूस) पासून तो लोकशाही रायवळ-पर्यंत ! हापूसचेदेखील तीन प्रकार : काही म्हैसूर राज्यातील चन्नापट्टनचे, काही बलसाडचे आणि बहुतेक रत्नागिरीचे. रत्नागिरीहून येणाऱ्या हापूसपैकी देवगडचा आंबा रसिकांना विशेष पसंत पडतो. कारण तो चवीला उत्तम असूनही नरम पडत नाही. देवगडचा आंबा असा असण्याचे कारण हेच की, तो जांभा-डोंगरात निपजतो. नुसत्या रत्नागिरी जिल्ह्यातून दररोज सुमारे दहा हजारांत कच्च्या फळांच्या पेट्या ' क्रॉफर्ड मार्केटां 'त येतात. चवीत हापूसहून खालच्या पायरीचा, पण रसाच्या बाबतीत सरस असलेला आंबा म्हणजे पायरी. म्हणूनच बहुतेक लोक आंबरस-पार्टीला पायरीची पार्टी पसंत करतात. ह्याखेरीज, कोकण व सूरत-पार्डीकडून रायवळ व मद्रासकडून तोतापुरी अन् नीलम ह्या संमेलनात दाखल होतात.

गोव्याचा आंबा राजकीय परिस्थितीमुळे काही वर्षे येईनासा झाला होता पण गोवा-मुक्तीनंतर तिकडचे आंबे क्रॉफर्ड मार्केटात येऊ लागले. या आंब्याची मूळची नावे साहेबी असली तरी, जनताजनार्दनाने त्यांना मराठी बाप्टीस्मा दिला आहे तो असा :-

Mr. Colaso - मानकुलास
Sacrru - साखरी
Silvera - सावर
Correha - करेल
Farnandis - फर्नांदीन

ह्या गोवेकुळात ' मानकुलास 'चा मान पहिला. हा आंबा कित्येक गुजराती गिऱ्हाईकांना हापूसपेक्षा पसंत पडतो. फर्नांदीन उर्फ फर्नांडिस हा आंबा मजूर नेते ' जॉर्ज फर्नांडिस ' प्रमाणेच टणक. तो सहजासहजी नरम पडत नाही हे तर त्याचे वैशिष्ट्य. शिवाय तो सहसा सडत नाही, हेही एक वैशिष्ट्य सांगता येईल.

'लंगड्याचे लाड !'

उत्तर प्रदेशात लंगडा नावाचा आंबा पैदा होतो. त्याच्याही सुमारे १५ ते २० हजार पेट्या जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मुंबईत पदार्पण करतात. धन्य, धन्य मुंबईकरांची रसिकता, की जिच्या योगे उत्तर प्रदेशचे हजारो ' लंगडे ' रसिकांच्या सेवेस हजर राहून, **"पंगु लंघयते गिरीम्"** ही उक्ति सार्थ होते !

' लंगडा ' आंबा हा आपल्या राजकारणावर ज्यांचा मोठा प्रभाव नि दबाव त्या उत्तर प्रदेशचा म्हणूनच की काय त्याचे बरेच लाड होतात. हा आंबा गोड असला तरी हापूसइतका खुषबूदार नाही, लज्जतदार नाही; पण तरीही पंडित नेहरूंच्या प्रांतात जन्मल्याने तो अधिक इज्जतदार बनला ! उत्तर प्रदेशने त्याला प्रवासाच्या आणि इतर प्रकारच्या खास सुखसोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. चालायचेच. फळांचे भाग्यदेखील स्थानपरत्वे

फळफळते !

अन् हापुसचे हाल !

पण अद्यापि हाल सरले नाहीत आपल्या गरीब रत्नागिरी जिल्ह्यांतील आंब्याचे. ह्या जिल्ह्यातील माणसांप्रमाणेच आंब्याची कीर्ती फार मोठी, पण परिस्थिती प्रतिकूल ! ह्या आंब्यांची नासधूस होऊ नये म्हणून आजकाल बहुश: ट्रकमधूनच त्यांच्या पेट्या मुंबईस आणल्या जातात. पण बोटीने जो माल येतो त्याचे काय ? बोटीच्या तळमजल्यात ह्या पेट्या फेकण्यात आल्याने कैक आंबे वाफून निघतात. पण एवढेच दु:ख नाही. रत्नागिरी ते भाऊचा धक्का अन् भाऊचा धक्का ते क्रॉफर्ड मार्केट एवढ्या प्रवासात ह्या पेट्यांना ५/६ वेळा जोरदार धक्के खावे लागतात. त्यामुळे आंबे नरम पडतात.

" आर्थिक दृष्ट्याही आंब्यांची वाहतूक दिवसेंदिवस तापदायक होत आहे, महागडी होत आहे. १९३७-३८ साली ज्या पेटीला रत्नागिरी ते मुंबई प्रवासभाडे ९ आणे पडत असे, ते वाढता वाढता २ रुपये झाले आहे. पूर्वी जे लगेज १ रुपयात येत असे, त्याला आता ३ रुपये मोजावे लागत आहेत," अशी तक्रार मार्केटमधील एका प्रमुख व्यापाऱ्याने केली. ह्या आंबेवाहतुकीच्या तापाची कहाणी तपशीलाने सांगून ते म्हणाले, " ह्या व्यवसायाबाबत सरकारला दुसरे काही करता आले नाही तरी, ' देशी वसाहत-वादाचे ' सहज उच्चाटन करता येईल, मात्र सरकारची तशी इच्छा पाहिजे. "

" देशी वसाहत-वाद ? "

" नाहीतर काय ? " ते म्हणाले, " पाहा ना, रत्नागिरीहून भाऊच्या धक्क्यावर जो आंबा येतो, तो क्रॉफर्ड मार्केटात पोहोचविण्याचा दर आहे ' पर पॅकेज ' ८ आणे. पण बॉम्बे सेंट्रलवर उतरणाऱ्या उत्तर भारतीय आंब्याला मार्केटात पोहोचण्यात पडतात फक्त ३ आणे ! ही तफावत का ? ह्याचे उत्तर शोधून काढा. म्हणजे आंब्याच्या टोपलीतही देशी वसाहत-वाद कसा लपलाय ते कळेल ! मक्तेदारीचे दुष्परिणाम ध्यानात येतील. दर टोपलीमागे गरीब रत्नागिरी जिल्ह्याला हा किमान ५ आण्याचा भुर्दंड का म्हणून ! " जगाला अमृतमधुर फळ देणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्याच्या नशिबी मात्र खडतर दारिद्र्याचेच फळ कसे आहे ते ते सांगत होते.

ह्या दु:स्थितीबाबत मूक-निषेध व्यक्त करण्यासाठीच रत्नागिरी जिल्ह्यातील बागा मोसमांत रुसल्या काय ? की, ' चिनी आक्रमणाचे संकट हिमालयावर उभे असताना कशाला हवा आंबरस-पाटर्यांचा शौक ' ह्या आणीबाणीच्या जाणीवेने ह्या वर्षीचा आम्रमोहर मंदावला ? काय कारण असेल ते असो. नेहमीच्या मानाने यंदाचा सीझन ३ हिस्से घटला एवढे मात्र खरे. साहजिकच आंबा महागला. ज्या सहा डझन हापूस आंब्याच्या पेटीला एरव्ही १२ रुपये पडत, तिला ह्या वर्षी ३० रुपये मोजावे लागत आहेत ! दर सीझनला

क्रॉफर्ड मार्केटात सुमारे दहा कोटींचा व्यवहार होत असतो. ह्या वर्षी ३ कोटींचा झाला तर शिकस्त.

'चल सखे आंब्याच्या वनात गं'

आंब्याचा दर अशा प्रकारे चढो वा उतरो, महाराष्ट्रीय जनतेचे आंब्यावरील प्रेम कधीही घट्टायचे नाही. कारण, ह्या प्रदेशाची आंब्यावर निर्विकल्प प्रीती आहे.

महाराष्ट्रात काश्मीरप्रमाणे गुलाबांची उद्याने नाहीत. बंगाल्सारखी कमळांची सरोवरे नाहीत पण त्याची महाराष्ट्राला कधीही खंत वाटली नाही. कारण येथे घमघमत्या आंबेबागा गावोगाव फुलल्या आहेत.

आंबेगाव ह्या नावाची खेडी महाराष्ट्रात सहज पाच पन्नास तरी आढळतील. आंबेकर, गोडांबे, आंबेघाट, आंबेबर्फी, आंबेहळद, आंबेवन इत्यादींची महाराष्ट्रात कमतरता नाही.

अशा ह्या महाराष्ट्राच्या गर्द छायाळ आंबरायांनी जसे कोकीळांचे 'पंचमालाप' ऐकले आहेत, तसेच शतकानुशतके प्रणयी राघू-मैनांच्या हृदयींचे गूज श्रवण केले आहे. ऐन मराठेशाहीत कोण्या मराठमोळा सुंदरीचा प्रियकर तिला विरहात लोटून लढाईला गेला, की तिचे उत्फुल्ल यौवन "आंबा आला पाडा, अन् ते गेले गडा" अशा म्हणीत हळहळले आहे. आंब्याचा उल्लेख असलेल्या पाच पन्नास म्हणी महाराष्ट्राच्या दैनंदिन व्यवहारांत सहज आढळतील. असा हा आम्रवेडा महाराष्ट्र देश! इतका आम्रवेडा की, ह्याच्या कोकण-विभागाचा राजादेखील आपल्या सुंदर राणीसह 'आंबा पिकतो' अन् 'रस गळतो' तेव्हाच झिम्मा खेळतो - एरव्ही नाही!!

●

(लोकसत्ता : १९-५-६३)

९७. गव्हाची लज्जतदार बेटी !

' उमर खय्यामचा स्वर्ग ' ह्या मथळ्याचे ते सुप्रसिद्ध चित्र आपण पाहिलेच असेल. एका शांत सुंदर फुलबागेत, एका छायाळ वृक्षाखाली उमरखय्याम बसला आहे. त्याच्या एका हाती आहे कवितेचा ग्रंथ, दुसऱ्या हाती आहे मदिरेचा पेला, आणि वामांकी आहे गुलजार मदिराक्षी !-

पण एवढ्याने उमर खय्यामच्या स्वर्गास परिपूर्णता आली नाही. उमर खय्याम हा जातिवंत कवि असला तरी, तो व्यवहार विसरला नव्हता. ' आधी पोटोबा अन् मग विठोबा ' हा रोखठोक व्यवहारवादही त्याला ठाऊक होता. म्हणूनच त्याने आपल्या स्वर्गातही ' रोटी 'ला-भाकरीला-आद्य स्थान दिले. आधी भाकरी मग छोकरी ! 'Ah, here with a loaf of bread beneath the bow — आहा, येथे तरुतळवटी भाकरी अर्धकोर ' हे त्याच्या मागणीचे पहिले कलम होते !

खय्यामसारखा रोमॅन्टिक कविराजही जेथे भाकरीची-रोटीची-उपेक्षा करू शकला नाही तिथे सामान्य जनांची काय कथा ? अगदी सृष्टीच्या आरंभापासून मानव पोटासाठी दाही दिशा हिंडला आहे; हजारो वर्षांपासून रोटीसाठी श्रमला आहे, श्रमत आहे. आज विसाव्या शतकातही, एका रोटीसाठी वा डबल रोटीसाठी कोटयवधि मानवांना दातांच्या कण्या नि पायांच्या चाळण्या कराव्याच लागत आहेत !....

हे ओळखूनच सध्याच्या बिकट धान्यस्थितीला तोंड देणाऱ्या आपल्या सरकारने सहा प्रमुख शहरी अद्ययावत् बेकऱ्या उभारण्याचा संकल्प सोडला आहे. हेतू हा की गोरगरिबांना माफक किंमतीत चांगली डबलरोटी (म्हणजे पाव, bread) मिळावी.

१० हजार वर्षांपूर्वी

ह्या अद्ययावत् बेकऱ्यांमागे हजारों वर्षांचा इतिहास आहे, ह्याची कल्पना मात्र फारच थोड्यांना असेल.

आदिमानव केवळ कंद-मूल-फल ह्यांवर जगत असे. पण पुढे तो धान्य निपजवू लागला. आणि नंतर अश्मयुगात, म्हणजे सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी, गव्हाची-ज्वारीची-मक्याची अथवा हरबऱ्याची रोटी बनविण्याची शक्कल त्याला सुचली.

त्या काळातला तो मोठाच शोध होता ! अर्थात् ती रोटी आजच्या नाजुक साजुक चपातीसारखी, अथवा मऊ टपोऱ्या पावासारखी मुळीच नव्हती. त्या काळचा मानव गहू, ज्वारी इत्यादि धान्ये पाण्यात भिजवून ती दगडावर वाटत असे. आणि मग त्याच्या लगद्याचे लहान पसरट गोळे निखाऱ्यावर भाजून रोटी तयार करीत असे. इराक, इटली, इजिप्त इत्यादि प्राचीन देशांच्या उत्खननांत अशा ओबड-धोबड भाकऱ्यांचे पुरावे उपलब्ध झाले आहेत. १९३६ साली 'अर्सॅफिक खोऱ्यां'त रामॅस्सिक मंदिराच्या परिसरात जी कडक, पसरट पण काळीशार भाजलेली भाकरी उपलब्ध झाली, ती सुमारे ३॥ हजार वर्षांपूर्वीची असावी, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्याचप्रमाणे प्राचीन पाम्पिया नगरीच्या अवशेषांत काळी कुळकुळीत - म्हणजे करपलेली - रोमन रोटी उपलब्ध झाली आहे.

रोमन लोक धान्यपिठाचा लगदा आधी लाटण्याने लाटीत असत, आणि मग तो एखाद्या दांड्यावर गुंडाळून निखाऱ्यावर खरपूस भाजत - हल्ली कबाब भाजतात त्याप्रमाणे ! ... पण रोटी बनवण्याची ही प्रक्रिया मोठ्या तकलिफीची होती. म्हणूनच, लवकर पण रुचकर रोटी कशी तयार करावी, ह्याचा विचार मानव करू लागला. ह्यातूनच 'बेकरी'च्या कल्पनेचा उगम झाला.

प्राचीन मिसरदेशीय बेकरी

तज्ज्ञांचा असा अंदाज आहे की, 'बेकरी' प्रथमत: इजिप्तमध्ये (अथवा रोममध्ये) उदयास आली असावी. अर्थात् ती मिसरदेशीय प्राचीन बेकरी नि हल्लीची यंत्रयुगातील बेकरी ह्यांच्यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. पण तत्त्व मात्र एकच - भट्टीत भाजणे ! ती प्राचीन बेकरी, हल्लीच्या विटा भाजण्याच्या गावठी भट्टीसारखीच होती म्हणा ना. त्या काळचे इजिप्शियन व रोमन लोक गव्हाचा वा मक्याचा आटा भिजवून, नऊ दिवसांत आंबवून व त्यात द्राक्षरस मिसळून तो प्रथम मातीच्या भांड्यात ठेवीत असत. आणि नंतर ही आटायुक्त भांडी भट्टीत भाजून ब्रेड्स्टोरी तयार होत असे. ही रोटी मधात अथवा दुधात बुडवून खाण्यात येई, असेही उल्लेख आहेत. इजिप्त देशात त्या प्राचीन काळी दूर खेड्यात अशी एखादी तरी सार्वजनिक 'बेकरी' असावयाचीच. सरदार दरकदारांच्या स्वतंत्र खासगी बेकऱ्याही असत.

मोठी आश्चर्याची गोष्ट आहे की, मधुकायुक्त 'बनपाव', 'मिल्क ब्रेड', 'हनी केक' इत्यादि हल्लीचे पाव-प्रकार ह्या ना त्या प्रमाणात, त्या काळीही अस्तित्वात होते. मानवाचा खाबूपणा असा पुरातन आहे !

रोटीची नानाविध रूपे

मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबरच त्याचा खवय्येपणाही वाढत गेला; सुधारत गेला. नुसत्या गव्हाचे पदार्थ शे-सव्वाशे तरी असतील. फार कशाला, नुसत्या 'रोटी'ची

रूपे तरी किती नानापरीची ! ती पापुद्रेदार मऊ मऊ चपाती ! तो मृदुलतेच्या गवनि फुगणारा नरम गरम फुल्का ! तो लट्ठ पण चविष्ट पराठा ! ती दुधात भिजलेली सात्त्विक दशमी ! ती लोणकढ्या तुपाने अधिकच रुचकर लागणारी पुरणपोळी ! ती खमंग खव्याची पोळी ! ती तांदळाची खापरपोळी ! हे सारे प्रकार करूनही मानवी मनाची नि जिभेची हौस जिरली नाही. म्हणूनच की काय, ' सुळावरची पोळी 'ही मानवाने शोधून काढली !!

' बेसनकी रोटी ' असाही एक रोटीचा प्रकार आहे. बेसनकी रोटी म्हणजे आपले मराठी थालिपीठ - चण्याच्या डाळीचे ! ह्या बेसन-रोटीबाबतचा एक किस्सा सांगण्यासारखा आहे. मिर्झा असदुल्लाखां गालिब हा विख्यात उर्दू शायर बडा खवैय्याही होता. रुचकर पदार्थ चवीने खाण्याचा त्याला मोठा शौक. एकदा त्याचा आश्रय-दाता, अखेरचा मोंगल बादशहा, बहादुर शाह जफर ह्याने ' बेसनकी रोटी ' त्याजकडे पाठवली. त्याने अर्थात्च तिचा योग्य तो समाचार घेतला आणि तृप्तीचा ढेकर दिला तो मजेदार शायरीच्या द्वारा !

मिर्झा गालिबने बादशहाला जे आभार-पत्र पाठवले त्यात लिहिले होते-

न पूछ इसकी हकीकत् हुजूरवालाने
मुझे जो भेजी है बेसन की रोगनी रोटी ।
न खाते गेहूं निकलते न खुल्दसे बाहर
जो खाते हजरते आदम ये बेसनी रोटी ।।

(बादशहाने मला जी बेसनाची खमंग रोटी पाठविली आहे, तिची तारीफ विचारू नकोस ! अरे, आदमने गहू खाण्याऐवजी जर ही ' बेसनकी रोटी ' खाल्ली असती, तर नंदनवनातून हद्दपार होण्याचा बाका प्रसंग त्याच्यावर ओढवलाच नसता !.... [गहू खाल्ल्यामुळे आदमला स्वर्गातून बाहेर पडावे लागले, असे मुस्लीम धर्मग्रंथात म्हटले आहे.])

आधुनिक बेकरी

मिर्झा गालिब ह्यांनी रोटीची जी तारीफ सुनावली, ती योग्यच आहे. पण जर ते आज हयात असते आणि हल्लीच्या अद्ययावत् बेकरींतील ताजे ताजे पावांचे प्रकार त्यांनी चाखले असते तर ? तर पाव-महिमा गाणारे ' शेर ' ही त्यांनी शेरभर सुनावले असते ! कारण हल्लीच्या यांत्रिक पद्धतीने बेकरींत तयार होणारी डबल रोटी, रावापासून रंकापर्यंत सर्वांनाच हवीहवीशी वाटते.

ही रोटी तयार करण्याची बेकरीची आदर्श प्रक्रिया साधारणत: ही अशी असते :-

आधी चांगल्या दर्जाचा गहू उंच उंच स्वच्छ कोठारांत साठविलेला असतो. तो नीट निवडला जावा, त्यांतील खडे नि काडीकचरा बाजूस पडावा, ह्या हेतूने त्याचा प्रवास अनेक लहान-मोठ्या चाळण्यांतून होतो. अशा यांत्रिक पद्धतीने खडे निवडून काढल्यानंतर तो पाण्याच्या मोठ्या टाकीत घातला जातो. नंतर यांत्रिक वरवंट्याखाली त्याचे पिष्ठ बनते.

ते पीठही बारीक चाळण्यांतून गाळले गेल्यानंतर, त्याला बारीक आटा अथवा

मैदा हे नाव प्राप्त होते. हा मैदा अथवा बारीक आटा विशिष्ट प्रमाणातील पाण्यात घालतात. त्यांत काही आम्लपदार्थ नि साखर यथाप्रमाण मिसळतात. हे मिश्रण ढवळून झाल्यावर जो ओल्या पिठाचा थर तयार होतो, तो ओल्या कापडाखाली झाकून ठेवण्यात येतो. त्यामुळे कालांतराने त्याला आंबुसपणा प्राप्त होतो; आणि मद्यार्कासारखा स्वादही येतो. साखरेच्या अंशाचे अल्कोहोलमध्ये रूपांतर होऊन, मग 'कार्बन डाय ऑक्साइड' (कर्बद्विप्राणिल) नामक गॅस त्या पिठात तयार होतो.

नंतर या पिठाचे यंत्रानेच तोलून मापून तयार केलेले गोळे विशिष्ट आकाराच्या धातुपात्रांत घालून, ती पात्रे रसरसत्या भट्टीत ठेवण्यात येतात. त्यांना पुरेसा शेक लागल्यावर आतील पिठाची डबलरोटी तयार होते. ही डबलरोटी जेव्हा शेकली जाते तेव्हा पिठातील 'कार्बन डाय ऑक्साइड' हा गॅस प्रसरण पावू लागतो. त्याच्यामुळेच रोटी तरारून फुगते, सच्छिद्र बनते, आणि स्पंजासारखी नरम-नरम होते !!....

ही डबलरोटी ६० ते ६५ फॅरनाइट् इतकी गरम असतानाच पॅकबंद करावी लागते. हे उष्णतामानाचे तंत्र थोडेसे बिघडले तरी रोटी बिघडते; खराब होते.

'रोटी नाही ? केक खा !'

असो. अशा अद्ययावत् शास्त्रीय पद्धतीने डबलरोटी तयार करणाऱ्या प्रचंड बेकऱ्या आपले सरकार काढू पहात आहे, हे अभिनंदनीयच आहे. कारण जे गोरगरिबांच्या रोटीच्या प्रश्नाकडे लक्ष देते, तेच कल्याणकारी सरकार होय. जे सरकार प्रजाजनांच्या भाकरीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करते, ते फार काळ टिकूच शकत नाही, हे इतिहासाने सिद्ध केले आहे.

फ्रेंच राज्यक्रांती का झाली ? भाकरीचा प्रश्न उपेक्षिल्याने ! असे सांगतात की त्या काळी भुकेलेल्या प्रजेने १४ व्या लुई राजाच्या महालावर मोर्चा नेला. तेव्हा लुईच्या राणीने - मेरी ॲन्टोनिएट हिने - नोकरांना विचारले, "हे लोक का ओरडत आहेत ?" "त्यांना रोटी मिळत नाही म्हणून 'रोटी दो, रोटी दो' असा आक्रोश ते करीत आहेत, राणी सरकार !"

"काय मूर्ख लोक आहेत ?" राणीसाहेब हसून उद्गारल्या, "त्यांना म्हणावं रोटी (Bread) मिळत नाही तर केक खा !!"

असा त्या मूर्ख नि उद्दाम राज्यकर्त्यांचा जनतेच्या असंतोषाने बळी घेतला, हा इतिहास प्रसिद्धच आहे. असो.

खिशाला परवडावी

आपल्या कल्याणकारी सरकारने गोरगरिबांचे भोजन सुखकर व्हावे म्हणून जो बेकऱ्यांचा संकल्प सोडला आहे तो यशस्वी होण्यासाठी काही गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. पहिली गोष्ट ही की, घरगुती चपात्यांची नि भाकऱ्यांची सवय असलेल्या आमच्या कामगारांना

वा मध्यमवर्गियांना डबल रोटीचा पाहिजे तेवढा सराव नाही. शिवाय, ही डबलरोटी घरच्या चपातीहून सत्त्वहीन असते आणि महागही पडते, ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा डबलरोटी कॅल्शियम् वगैरे पौष्टिक पदार्थांनी पुरेशी सकस निघाली पाहिजे आणि ती खिशाला परवडणारी पाहिजे.

अन्यथा, 'कांदा भाकर' खाणारा आमचा कष्टकरी (कारभारणीचा त्रास वाचविण्याची इच्छा असूनही) डबल रोटीकडे वळणार नाही. आणि मग नग्न भिक्षूंच्या गावी जी अद्ययावत लॉंड्रीची गत होईल, तीच गत ब्रेड बनविणाऱ्या बेकऱ्यांची होण्याचा संभव आहे !

(लोकसत्ता : १८-७-६५)

१८. मोरारजींचे आहारशास्त्र

आमचे लोक संपत्तीपूजक आहेतच, पण त्याहून अधिक सत्तापूजक आहेत.

एखादा माणूस मंत्री, मुख्यमंत्री वा प्रधानमंत्री झाला की वाट्टेल त्या समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून त्याला आमंत्रणे येतात. आमचे पत्रकार वाटेल त्या विषयावर त्याच्या मुलाखती घेतात ! आणि तो सत्ताधीशही ' हा माझा विषय नव्हे, ' असे म्हणून नकार देत नाही, तर विषयात आपले पांडित्य प्रकट करतो. कालिदासाच्या शब्दात जरा बदल करून म्हणावेसे वाटते की ' न खलु कश्चित सत्तामताम अविषयों नाम !' जणू काही जेथे सत्ता तेथेच बुद्धिमत्ता, तेथेच सर्वज्ञता ! तो कुक्कुटपालनापासून, अणुसंशोधनापर्यंत, पाकशास्त्रापासून शेतीशास्त्रापर्यंत, महंमदापासून महावीरापर्यंत; पुराणापासून कुराणापर्यंत सर्वच विषयांवर बोलू शकतो !...

आपले पंतप्रधान मोरारजीभाई तरी ह्या नियमाला अपवाद कसे असतील ? आमचे लोक कैक विषयांवर त्यांचा उपदेश मागतात आणि ते तो आनंदानं देतात. किंबहुना ' शहाणे करूनि सोडावे सकळ जन ' हा रामदासस्वामींचा आदेश कृतीत आणण्यासाठीच मोरारजींचा अवतार झाला आहे ! काही लोक उपदेश ऐकतात, काही उपदेश ऐकून सोडून देतात, आणि काही सदैव उपदेश करीत राहतात. मोरारजी देसाई हे तिसऱ्या वर्गात आहेत. चरणसिंग राजनारायण ह्यांच्या आरोपांनी उठलेल्या वादळात, त्यांनी भल्याभल्यांचे ऐकले नाही. जयप्रकाश नारायण कृपलानीसारख्यांचा सल्ला स्वीकारला नाही. मधु लिमयांच्या उपदेशाला त्यांनी भीक घातली नाही. ' माझा कान फार तर महात्मा गांधीच धरू शकतील ' (आणि ते तर स्वर्गवासी !) अशी त्यांची मनोधारणा दिसते ! सारांश, पक्का उपदेशनवाझ जसा ' ठाम ' नि हटवादी असावयास पाहिजे तसेच आपले प्रति महात्मा गांधी मोरारजीभाई आहेत ! म्हणूनच बड्याबड्या विद्वान धन्वंतरींनादेखील त्यांनी शिवाम्बुचिकित्सेचे डोस पाजले आहेत.

' आहारशास्त्र ' हाही मोरारजींच्या उपदेशाचा एक आवडता विषय होय ! आहाराबाबतच्या त्यांच्या सर्व उक्ती एकत्र केल्या तर ' मुरारी आहारदर्शन ' नावाचा

भारदस्त ग्रंथ तयार होईल. ह्याही विषयात 'आधी केले मग सांगितले,' असा त्यांचा बाणा आहे; ते सात्त्विक आहाराचे तामसी पुरस्कर्ते आहेत ! म्हणूनच त्यांनी सांगितले की "मी दिवसातून दोन वेळा फक्त दूध आणि फ़ळे घेतो. सकाळचा आहार १० वाजता व संध्याकाळचा आहार ७ ते ७.३० वाजता. त्यानंतर अधेमधे मी काहीही खात नाही !" असे हे सात्त्विक आहारपटु, मिताहारी मोरारजी मद्यपानाचे कट्टर विरोधक आहेत हे सुप्रसिद्धच होय. तथापि, 'भारतात दारूबंदी आवश्यक का ?' हे सांगताना त्यांनी तिची जी आहाराशी सांगड घातली आहे, ती पुष्कळांना ठाऊक नसेल. आहारशास्त्रकोविद मोरारजींनी गेल्या जून महिन्यात सॅनफ्रान्सिस्को येथे सांगितले की "जे मांसाहार करीत नाहीत, त्यांना दारू सोसत नाही. आणि भारतातील ८० टक्के जनतेला मांसाहार परवडत नसल्याने (ते शाकाहारी असल्याने) भारतात दारूबंदी अत्यंत जरुरी आहे !"... मोरारजी द्राक्ष कन्येच्या विरुद्ध असले तरी द्राक्षविरोधी नाहीत. म्हणून त्यांनी अलीकडेच द्राक्षाहाराचा पुरस्कार करताना म्हटले आहे की, "कर्क-रोग्याने सहा आठवडे द्राक्षे खाल्ली तर तो रोगमुक्त होईल !"...

मोरारजींची ही आहार-प्रवचने मोठमोठ्या डॉक्टरांनाही विचार करावयास लावतील, पण त्यामुळे मांसाहाराहूनही अधिक लज्जतदार असलेल्या एक खतरनाक आहाराची आदत आधुनिक भारतास सोडता येईल्से दिसत नाही. हा आहार म्हणजे द्रव्याहार — साधासुधा नव्हे, तर कृष्ण-द्रव्याहार ! स्वातंत्र्याच्या तीस वर्षांत हा द्रव्याहार (साध्या भाषेत पैसे खाणे-लाच खाणे इत्यादि !) 'शतकोटीप्रविस्तरम' झालेला आहे. इंदिरा-राजवटीतील भ्रष्टाचारावर आसूड ओढणारे जनता-नेतेही तो काबूत आणू शकले नाहीत ! हजार रुपयांच्या नोटा रद्द करणे, रिझर्व बँकेने सोन्याची विक्री करणे इत्यादि उपायदेखील ह्या 'कृष्ण-द्रव्याहाराला' — Black Money ला थोपवू शकले नाहीत ! ह्या देशघातक आहारावर कडक बंदी घालणे, हे सात्त्विक आहार नि दारूबंदी ह्यांच्या पुरस्काराहून अधिक जरुरीचे होय, अशी जनतेची आहार-शास्त्र-पारंगत मोरारजींना विनंती आहे.

आहार ! आहार ! आहार ! ह्या खाबूदेशाने फार प्राचीन काळापासून 'आहार-शास्त्रा'त रस घेतलेला आहे. केवळ पाश्चिमात्य साहेब लोकच ह्या बाबतीत रसं आहेत, असे नाही ! आमच्या आयुर्वेदिक ग्रंथांनी आहारबिहाराची पथ्ये-कुपथ्ये सांगण्यात हजारो पृष्ठे खर्ची घातली आहेत. (गंमत म्हणून सांगतो — रघुनाथ गणेश नवहस्त नामक महाराष्ट्रीय पंडिताने 'भोजनकुतूहल' नामक एक ग्रंथ ३०० वर्षांपूर्वीच लिहिला असून त्यात विविध खाद्यपदार्थांचे विवरण आहे. जुन्या काळचा दुसरा महाराष्ट्रीय आहारपंडित राघव अप्पा खांडकर. तो नमूद करतो...

मिरची विना सुपाको
मरहट्टानां क्वचिन्न रुजिदोऽस्ति ।

(म्हणजे मऱ्हाटी माणसांना मिरचीच्या ठेच्याविना वा तिखटाविना स्वयंपाक रुचकर वाटतच नाही !)... आमच्या पूर्वजांनी ह्या ' भोजनशास्त्रा 'चा अक्षरश: कीस काढला असून त्याचे रायते केले आहे ! कोणत्या सणाला कोणता आहार घ्यावा ? कडुलिंबाची चटणी केव्हा खावी नि पुरणाची पोळी केव्हा झोडावी ? उपासाच्या दिवशीही कोणत्या पदार्थावर ताव मारावा नि उपासाच्या दिवशीही कोणता पदार्थ पोटात कोंबून सोडावा ? भोजनारंभेच किं सेव्यम ? भोजनान्तेच किं पेयम ? चातुर्मासात काय खाऊ नये नि चातुर्मासानंतर गुलाबी थंडीच्या रंगेल दिवसांत कोणते मदनमस्त पाक सेवावेत ? कोणते पदार्थ पोटात सारल्याने जठराग्नि पेटतो नि कोणत्या पदार्थांनी पोटोबा शांत होतो ? कामविकार कोणत्या आहाराने वाढतात नि कोणत्या आहाराने शांत होतात ? इत्यादि साऱ्या प्रश्नांची जेवढी चिकित्सा आपल्या भारताने केली आहे, तेवढी अन्य कोणत्याही देशाने केली नसेल ! भगवद्गीतेसारख्या आध्यात्मिक ग्रंथातदेखील सात्त्विक, राजस नि तामस अशा विविध आहारांनी शिरकाव केला आहे. कारण ? ' अन्न हे पूर्णब्रह्म ' ही श्रद्धा ! (ह्या पूर्ण ब्रह्माचीया मायावादी देशात बरीच टंचाई पण ' ब्रह्म ' वगैरे सबझूट मानणाऱ्या पाखंडी पश्चिमी देशात मात्र रेलचेल !) मग भारताच्या सर्वश्रेष्ठ प्रतिनिधीने - मोरारजींनी - ह्या शास्त्रात रस घ्यायचा नाही तर कुणी घ्यायचा ?

मानवी मन:पिंडावर दूरान्वयाने अन् अप्रत्यक्षपणेच आहाराचा काहीसा परिणाम होतो, ह्यात शंका नाही. पण आहाराचा संबंध मुख्यत: शरीराशीच आहे, स्वभावाशी नाही. सात्त्विक आहार घेणाऱ्याचा स्वभाव सात्त्विक, राजस आहार घेणाऱ्याचा स्वभाव राजस नि तामसी अन्न खाणाऱ्याचा स्वभाव तामसी होतो, ही समजूत प्रत्यक्ष अनुभवाच्या कसोटीवर उतरत नाही. कदन्न खाऊन मनुष्य आजारी पडतो नि आजारात स्वभाव चिडचिडा बनतो हे खरे. परंतु येथे माणूस चिडचिडा होण्याचे कारण आजार हेच होय, कदन्न खाणारा माणूस आजारी न पडला तर तो चिडचिड करीलच असे नाही ! शिळी-पाकी भाकर नि लसणीची तिखटजाळ चटणी खाऊन घटाघटा पाणी पिणारा शेतमजूर कित्येकदा ' फ्रूटज्यूस 'वर ताव मारणाऱ्या श्रीमंत जमीनदाराहून कितीतरी पटीने सात्त्विक असलेला दिसतो ! भरपूर तिखट खाणारा नागपुरी माणूस स्वभावाने शांत, धीमा असू शकतो, तर सात्त्विक ताकभात भक्षिणारा एखादा कोकणी शामभट बोलण्यात तिखट नि वागण्यात भांडकुदळ असू शकतो ! रसगुल्ले खाणारा बंगालीबाबू गोड गुल्गुलीत असेलच असे नाही; तो बहुश: तीव्र भावनाप्रधानच असतो. मांसाहाराने राजस वा रणमर्द होतोच असे नाही, आणि सात्त्विक आहाराने तो शामळू बनतोच असे म्हणणेही धाडसाचेच ठरेल ! सत्याग्रहाचे शस्त्र उपसणारे महात्मा गांधी शेळीचे दूध प्यायल्याने शेळपट बनले नाहीत अथवा आंग्लाईतील बडे-बडे मटन-मार्तंड रावसाहेब-रावबहादूर रणमर्द झाले नाहीत ! सारा युरोप पादाक्रांत करणारे रोमन सैन्य शाकाहारी होते, क्रांतिकारक प्रक्षोभक विचार मांडणारा बर्नार्ड शॉ

सात्त्विक शाकाहारच घेत होता ! सारांश, शौर्य, धैर्य, गांभीर्य, सहिष्णुता, समंजसपणा इत्यादि सद्गुण आहारावरच अवलंबून असते, तर शंकराचार्यापेक्षा शंकर आचाऱ्याला अधिक महत्त्व आले असते ! हृदयपरिवर्तनाचा मार्ग इतका कष्टाचा नि जिकिरीचा राहिला तो पंचपक्वान्नाच्या ताटातून पोटात नि पोटातून हृदयापर्यंत पोहोचला असता !

खवा-मावा, तूप-रवा, दूध-लोणी, बदाम-पिस्ते ह्यांचे " पौष्टिकबलवीर्यजनक " पदार्थ सेवन करणारेच काय ते रंगेल निपजतात असे नाही, तर —

विश्वामित्र-पराशर प्रभृतय:
वातांबु-पर्णाशिना: ।
तेऽपि स्त्री-मुख पंकज
सुललितं दृष्ट्वैव मोहं गता: ।

नुसते वारा खाऊन नि पाणी पिऊन तपस्या करणाऱ्या विश्वामित्राने, मेनकेखातर तपस्येवरच पाणी सोडले आणि कंदमुळे खाणारा पराशर मत्स्यगंधेच्या नेत्रशराने घायाळ झाला. त्याने तिच्या तारुण्याचा मकरंद नौकेतच चाखला. जे कामविकाराचे तेच इतर विकारांचे ! हे विकार आहाराच्या प्रकारावर अवलंबून असतील, याविषयी आम्हास जबरदस्त शंका आहे. सर्वच ऋषिमुनींचा आहार जर सात्त्विक होता, (कंद-मूळ-फळफळावळ-दूध इत्यादींचा होता) तर वसिष्ठ ऋषी मात्र त्याची कामधेनु बळजोरीने हिरावून नेण्याचा बाका प्रसंग ओढवला असतानाही —

" माझ्या बुद्धिरूपी गुहेत कोप-मतंगज कधीच शिरत नाही. कारण तिथे विवेकरूपी सिंह जागृत आहे !" असे म्हणून बर्फासारखे थंड का राहतात नि जमदग्नि-दुर्वासादि ऋषी मात्र लहानशी 'मिस्टेक' ही का 'टॉलरेट' करत नाहीत ? 'पांडुनृपति जनक जया' असे पाच पांडव भिन्न भिन्न स्वभावाचे का ? धर्म-अर्जुन-भीम एकाच कुंतीचे, त्यांचा आहारही साधारणत: एकाच प्रकारचा, मग धर्मराज एवढा शांत का ? नि भीम एवढा तापट का ? उदारमतवादी जवाहरलाल नेहरूंची असहिष्णू कुलदीपिका इंदिरा, नेहरूंहून स्वभावाने भिन्न का ? त्यांच्या आहाराच्या भिन्नत्वामुळेच का ?

आमच्या आहारविषयक रूढ कल्पनाच तपासून घेतल्या पाहिजेत. एक कल्पना अशी की 'जसे अन्न खावे तशीच प्रजा निर्माण होते !' एक संस्कृत सुभाषितकार म्हणतो —

दीपो भक्षयते ध्वान्तं
कज्जलंच प्रसूयते ।
यदन्नं भक्षयेत् नित्यं
जायते तादृशी प्रजा ।

(ज्या प्रकारचे भोजन आपण नेहमी घेतो त्या प्रकारचीच संतती होते. पहा ना,

दिवा काळाकुट्ट अंधार खातो म्हणूनच त्यातून काळेकुट्ट काजळ पैदा होते !)

— परंतु, असे जर आहे तर सात्त्विक आहार घेणाऱ्या मिताहारी मोरारजींच्या पोटी कांतिसारखा पुत्र का जन्माला यावा ?

(सोनाली : दीपावली : १९७८)

१९. जुगाराचा जागतिक एल्गार !

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

कभी हार है, कभी जीत है,
यह जिंदगी शतरंज है !

(जुगाराचा अंगार इंग्लंडसारख्या प्रगत देशातही इतका भडकला आहे की, गतवर्षी २८० कोटी पौंडांची आहुती त्याने घेतली ! या घटनेने बेचैन झालेले ब्रिटनचे अर्थखाते जुगारी उत्पन्नावर जबर कर आकारण्याचा विचार करीत आहे.

भारतातही असाच 'कर'-पाश जुगाराच्या जादुगिरीभोवती आवळावा लागेल काय ? आणि त्याने जुगाराला यशस्वी पायबंद बसेल काय ?... छे, केवळ 'कर'-पाशांची योजना फाशांच्या मोहपाशावर मात करील्से वाटत नाही. कारण थेट वेदकालापासून चालत आलेले जुनाट वेड आहे हे ! त्याचे रंगढंग कथन करणारा हा माहितीपूर्ण लेख —)

" जा सहदेवा, थोडा अग्नि आण. म्हणजे ह्या धर्माचे हे जुगारी हातच जाळून टाकतो, " हे भीमाचे भीषण बोल काय धर्माच्या कानी गेले नसतील ? ' धिक्कार, धिक्कार ! पांचालीचा पण लावणाऱ्या युधिष्ठिराचा धिक्कार असो,' हे वृद्ध सभाजनांचे क्रुद्ध उद्‌गार काय त्याला ऐकूच आले नसतील ? केवळ वयानेच नव्हे तर ज्ञानानेही पहिला असलेला तो पांडव ! काय त्याला श्रुतिस्मृतींची जुगाराबाबतची निषेध-वचने आठवलीच नसतील ?

छे, हे अशक्य आहे... पण शृंगाराप्रमाणेच जुगाराची जिद्द टाळणेही तेवढेच अशक्य आहे ! शृंगाराप्रमाणेच जुगाराचा अंगार एकदा हृदयात धडधडला की, सर्वस्वाची आहुती घेतल्याविना तो थंडगार होणे अशक्य आहे. मोठमोठे ऋषिमुनीही ह्याच्या मोहजालातून सुटू शकले नाहीत. म्हणूनच " जुगारामुळे जे पाप माझ्या हातून घडले त्याबद्दल क्षमा कर, " अशी प्रार्थना वसिष्ठांना एका वैदिक सूक्तात करावी लागली.

जेथे मोठमोठे महात्मे फाशांच्या मोहपाशांत अडकले, तेथे इतरेजनांची काय कथा ? मृच्छकटिक नाटकाच्या दुसऱ्या अंकाच्या आरंभी जुगार हरलेला संवाहक नि त्याचा पाठलाग करणारा जुगारी अड्डचाचा मालक, ह्यांचा जेवढा मनोरंजक तेवढाच उद्‌बोधक प्रवेश आहे त्यात तो अपेशी संवाहक म्हणतो, " मी जुगाराचे दुष्परिणाम जाणतो. आता यापुढे

मी जुगार खेळणार नाही. कारण मेरु पर्वताच्या शिखरावरून कडेलोट होण्यासारखेच हे व्यसन भयानक आहे ! पण... पण... हे सारे माहीत असूनही कवड्यांचा मधुर खुळखुळाट, कोकिळेच्या मधुर बोलाप्रमाणे, माझे मन हरण करतो ! " जुगाराचे जू मानेवर बसले की ते झुगारणे फारच मुष्किल ! मग ' द्यूत म्हणजे यमदूत ' अस कंठशोष सुभाषितकार खुशाल करोत; मनुसारखे स्मृतिकार जुगार खेळणाऱ्यालाच नव्हे तर जुगार शिकविणाऱ्यालादेखील प्राणदंडाची शिक्षा ठोठावोत !

भारतासारख्या देवभीरू देशातदेखील अगदी वेदकाळापासून तो आजतागायत जुगार आपल्या विविध रंगाढंगांसह ठाण मांडून बसलाच आहे. ऋग्वेदकाळात जुगारी अड्ड्यां ' व्रात ' म्हणत, तर पुराणकाळात (बहुधा व्रातांतील व्रात्यपणा वाढल्याने) जुगारी अड्ड्यांना ' कितवशाला ' - म्हणजे फसवाफसवीचे अड्डे - अशी यथार्थ पदवी प्राप्त झाली ! रावांपासून रंकापर्यंत आणि दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वत्र जुगार-गृहे ' जितं मया, जितं मया ' आरोळ्यांनी दुमदुमू लागली ! इतकेच नव्हे तर भारताचा ' चतुरंगपट ' शतरंज (Chess) म्हणून अन्य देशांत रूढ झाला आणि " कभी हार है, कभी जीत है, ये जिंदगी शतरंज है ! " अशी जुगारी शायरी इराणच्या अंगुरीबागांत निनादू लागली ! कुरूक्षेत्रातील चतुरंग सेनेच्या संहाराचे आदिकारण म्हणजेच हा जुगारी शतरंज ! श्रुति, स्मृति, पुराणे, प्रवचने ह्यांच्या चौफेर माऱ्याला न जुमानता रावाचा रंक नि रंकाचा राव करण्यात याचा खेळ चालूच आहे !

जुगाराची घोडदौड

भारतादि पौर्वात्य देशांतच नव्हे, तर इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रगत पाश्चिमात्य देशांतही, गेली कैक शतके जुगाराची आगेकूच, ' कुछ फिकर नही ' या दिमाखात चालूच आहे. फूटबॉल सामन्यावरील ' कूपन-बेटिंग ' ; डर्बी, न्यू मार्केट, एस्कॉट इत्यादि ठिकाणच्या घोड्यांच्या शर्यती; कुत्र्यांच्या शर्यती इत्यादि नानाविध प्रकारांनी जुगाराच्या दर्याला ह्या दर्यावर्दी राष्ट्रात उधाण आले आहे. उदाहरणार्थ, नुसत्या अश्व-स्पर्धेकडे नजर टाकली तरी पुरे. १६६७ साली दुसऱ्या चार्ल्स् राजाने घोड्याच्या शर्यतींचा पाया घातला. त्या पायावर आता अश्व-स्पर्धांच्या जुगाराची टोलेजंग इमारत उभी आहे. दरवर्षी जून महिन्यात ' एस्कॉट ' येथे ज्या " रॉयल एस्कॉट-रेसेस " होतात, त्यांना खुद्द राजा-राणी, अमीरउमराव नि नवकोटनारायण उपस्थित राहतात. रॉयल एस्कॉट शर्यत म्हणजे श्रीमंत नरनारींची एक मोठी जांबोरीच म्हणाना. (जुगाराबरोबरच सुंदर नारींचा अद्वयावत् साजशृंगारही येथे पहावयास आढळतो.) पण इतर कितीही शर्यती सुरू झाल्या तरी सन १७८० पासून सुरू झालेल्या ' डर्बी 'च्या शर्यतींची महती अबाधितच आहे. इंग्लंडातील ह्या घोड्यांच्या शर्यतींनी, रविवारचे दिवस सोडल्यास सारे वर्ष व्यापलेले असते. नुसत्या मार्च ते नोव्हेंबर या सिझनमध्ये सुमारे ५००० शर्यती होतात नि १५००० घोड्यांना ट्रेनिंग मिळते ! अश्वस्पर्धांचे दोन

मुख्य प्रकार आहेत (१) सपाट मैदानावरील शर्यती (Flat-racing) (२) अडथळ्यांच्या मैदानावरील शर्यती (Steeple-chasing) ह्या शर्यतींवर पैसा लावून जुगार खेळणे, हा इंग्लंडचा जणू राष्ट्रीय खेळ झाला आहे. बरे, हा जुगार खेळण्यासाठी पूर्वी रेसच्या मैदानावर जावे लागत असे. पण आता तेवढी यातायात करण्याची जरूरी नाही. कारण, इंग्लंड देशात सुमारे १३००० 'बेटिंग शॉप्स्' (पैसे लावण्याची अधिकृत केंद्रे) उघडली आहेत. त्यामुळे बायाबापड्यादेखील या जुगारात सहज सहभागी होऊ शकतात. "आमच्या गिऱ्हाईकांत निम्मी संख्या स्त्रियांची असते," असा निर्वाळा अनेक 'बेटिंग शॉप्स्'नी दिला आहे. ही झाली केवळ अश्वस्पर्धांच्या प्रगतीची घोडदौड ! याखेरीज इतर जुगारी खेळांतही अशाच जोरदार वाढ झाली आहे.

जुगार-निषेधाचा अंगार

एका बाजूने जुगाराची वाढ होत असतानाच दुसऱ्या बाजूने त्याचे निर्मूलन करण्याचे (अर्थात् अयशस्वी) प्रयत्न तेवढ्याच जिद्दीने पाश्चात्य देशांतही झाले. सुप्रसिद्ध विचारवंत डीन इंग ह्याने आपल्या प्रवचनांतून व लेखांतून 'Disease of barbarians superficially civilized' - 'वरवर पाहता सुसंस्कृत दिसणाऱ्या जंगली लोकांचा रोग' - अशा कडक शब्दात जुगाराची हजेरी घेतली, तर "जुगार म्हणजे राष्ट्राचे नैतिक अध:पतन करणारे अजस्र एंजिन" अशा जळजळीत शब्दांत लॉर्ड बीकन्सफील्ड ह्यांनी जुगारावर झोड उडविली. इतकेच नव्हे, तर प्रथमत: १६६५ साली इंग्लंडात जुगारीविरुद्ध कायदा करण्यात आला. त्यानंतर अनेक कायदेशीर निर्बंध घालून, "उभय पक्षांच्या संमतीने चालणाऱ्या ह्या राजरोस दरोडेखोरी"ला पायबंद घालण्याचे प्रयत्न झाले. पण व्यर्थ ! जुगारी अड्डे, जुगारापायी होणारे गुन्हे, मारामाऱ्या, आत्महत्या नि दिवाळखोरी यांना यशस्वी लगाम लागलाच नाही. एका क्षणात एकाला संपत्तीच्या स्वर्गीय सुखात नेणारे, तर दुसऱ्याला दारिद्र्याच्या दारुण गर्तेत लोटून स्वर्गाची वाट दाखविणारे हे व्यसन अखंड चालूच राहिले !

- आणि मग भारताप्रमाणेच पाश्चात्य जगातही कैक विचारवंतांना कळून चुकले की उपदेशांचे डोस पाजून दबणारा रोग नव्हे हा ! कारण, ह्याचा जन्म मानवाच्या मूलभूत प्रवृत्तींतून झाला आहे. मग उपाय कोणता ? जुगारबंदी ? नव्हे, नव्हे, जुगार- बंदिस्ती ! जुगाराला नीट वळण लावणे, जुगाराचे जास्तीत जास्त शुद्धीकरण करणे, त्याला पद्धतशीरपणाने प्रतिष्ठा प्राप्त करून देणे !....

— आणि विधायक वळण

या विधायक दिशेने विचारांचे वारे वाहू लागल्यानेच भारतात धर्माचारांतही जुगाराला मानाचे स्थान देण्यात आले. आश्विनी पौर्णिमा नि कार्तिकशुद्ध एकादशी ह्या दिवशी रात्री

जागरण करून जुगार खेळण्याची किमान सोंगट्या खेळण्याची, रूढी पडली. अशी समजूत रूढ झाली, की त्या रात्री लक्ष्मी घरोघर संचार करून अक्ष-क्रीडेत दक्ष असणाऱ्यांना लक्ष लक्ष सुवर्ण-मुद्रेचे दान देते ! म्हटलेच आहे —

निशीथे वरदा लक्ष्मी
'को वा जाग्रति ? ' भाषिणी ।
'तस्मै वित्तं प्रयच्छमि
अक्षैः क्रीडा करोतियः ' ॥

वात्स्यायनाने आपल्या कामसूत्रात ६४ कलांची जी यादी दिली आहे, त्यात द्यूताचा अंतर्भाव केला आहे. प्रत्येक पुरुषाला द्यूत-क्रीडा आलीच पाहिजे असे त्याचे सांगणे आहे. आणि आर्य चाणक्याने तर आपल्या अर्थशास्त्रात " सरकारनेच ' जुगारगृहे ' काढावीत, " असे आजही अत्यंत पुरोगामी ठरणारे मत मांडले आहे. चाणक्याचे विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे. त्याचा आशय असा —

" सरकारने ' जुगारगृह ' खोल्ले की तेथे समाजातील गुन्हेगार प्रवृत्तीचे बदमाष लोकही आपोआप येतील. मग त्यांची माहिती काढणे व त्यांच्यावर नजर ठेवणे सोपे होईल. ह्या ' जुगारगृहा 'वर एक निरीक्षक अधिकारी नेमावा. त्याने फसवाफसवीचे प्रकार करणाऱ्यांना ' साहस दंड ' ठोकावा; खेळणाऱ्यांना अस्सल फासे पुरवावेत; व्यवस्थेबाबत विशिष्ट शुल्क आकारावा आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विजेत्याच्या जुगार-द्रव्यावर ५ टक्के कर वसूल करावा. "

अशी आहे कौटिल्य, वात्सायन इत्यादि भारतीय विचारवंतांची जुगाराकडे पाहण्याची विधायक दृष्टी. कामविकाराचा कडक बंधनांनी कोंडमारा केल्यास जसे बहकलेले ब्रह्मचारी मात्र निर्माण होतात, त्याप्रमाणेच जुगाराची स्वाभाविक प्रवृत्ती जबरदस्तीने दडपून टाकण्याचा खटाटोप केल्यास बहकलेले जुगारी निर्माण होतील; जुगार भूमिगत होऊन समाजशरीराला अधिकच अपाय देईल, हे त्यांनी जाणले. आणि जुगाराला पद्धतशीरपणे वाट मोकळी करून दिली. जुगाराला नव्हे तर, जुगाराच्या अतिरेकाला पायबंद घालणे, एवढेच उद्दिष्ट त्यांनी डोळ्यापुढे ठेवले. त्यामुळेच की काय, जुगाराला प्रतिष्ठा आली. आणि युधिष्ठिर, नळ, विराट, अकबर इत्यादि राजेरजवाडे नव्हे, तर खुद्द भगवान् शंकरही अक्ष-क्रीडा करू लागले.

योगेश्वर श्रीशंकरदेखील कैलासशिखरावर आपल्या त्रिभुवनसुंदर पत्नीबरोबर अक्षक्रीडा करू लागावेत, याहून जुगाराचा नि शृंगाराचा मधुर मेळ तो कोणता ? म्हणूनच पार्वती-परमेश्वरांच्या ह्या जुगाराच्या शृंगारावर, (शृंगाराच्या जुगाराप्रमाणेच !) अनेक रम्य काव्ये भारतीय कवींनी रचिली. गौरीच्या चतुर कटाक्षांनी आधीच पराजित झालेला गौरीहर, तिच्या चतुर अक्षांनीदेखील कसा हरला, ही जुगारकथा आमच्या हरदासांनी रंगून सांगितली !

मौज ही की या द्यूतात विजय नेहेमी गिरीकन्येचा ! सवर्तीना गुलाम करण्याची ही एकच युक्ति त्या गिरिजेपाशी होती. म्हणूनच भोळा शंकर डावामागून डाव हरत चालला की, मस्तकीची गंगा अन् भालपटावरील चंद्रलेखा भयभीत नजरनेच सारीपटाकडे पाहत !...

'बिंगो' बडा शैतान ?

असो. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, जुगाराला अजिबात बंदी घालण्याऐवजी त्याला प्रतिष्ठित नि पद्धतशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न प्राचीन भारतीय समाजधुरिर्णीनी केला. तसाच प्रयत्न इंग्लंडातही वेळोवेळी झाला. दुसऱ्या चार्ल्सने स्वत:च घोड्यांच्या शर्यती सुरू केल्याचे मघाशी सांगितलेच आहे. घोड्यांच्या शर्यतींप्रमाणेच अन्य काही जुगारदेखील कायदेशीर (Legalised) करावेत या उद्देशाने १९६० साली इंग्लंडमध्ये 'गेमिंग ॲन्ड् बेटिंग ॲक्ट' नामक कायदा करण्यात आला... तथापि आश्चर्यम् ! ब्रिटिश विचारवंतांचा अंदाज चुकला. बेकायदा जुगार बराच कमी झाला हे खरे पण कायदेशीर जुगार बेसुमार वाढला. इतका की, गतवर्षी इंग्लंडमध्ये २८० कोटी पौंड एवढे प्रचंड द्रव्य जुगारावर खर्च झाले. जुगार हा जणू मोठाच उद्योगधंदा होऊन बसला ! असे का झाले या प्रश्नाची उत्तरे अनेकजण अनेक प्रकारे देत आहेत. कित्येकांना असे वाटते की, अमेरिकेतून 'बिंगो' (Bingo) नामक जो खेळ अलीकडे इंग्लंडात आला त्यानेच हा जुगारी हलकल्लोळ माजविला आहे. 'बिंगो' हा खेळ तसा अगदी साधा. त्याचे मूळ नाव 'लाट्टो' (Lotto). 'लाट्टो' हा इटालियन शब्द असून त्याचा अर्थ 'लॉटस्' असा आहे. ह्या खेळात २५ उभ्या आडव्या आकड्यांचे एकेक कार्ड प्रत्येक स्पर्धकाला देण्यात येते आणि मग खेळाचा सूत्रधार एका वेळी एक नंबर मशीनमधून काढीत जातो. ज्याच्या कार्डवर सरळ रेषेत ५ नंबर्स प्रथमत: जुळतील तो जिंकला.

असा हा साधा 'लॉट'चा खेळ आहे. पण तो खेळणारे शेकडो आकर्षक आलिशान क्लब्स् इंग्लंडात निर्माण झाले असून, त्यांच्या धुंदफुंद वातावरणात हजारो नरनारी हौसेने हा जुगार खेळतात. पहिल्याच वर्षी ह्या खेळात ७,६०,००,००० पौंडांची उलाढाल झाली !

'बिंगो'चे आकर्षण सध्या इतके काही वाढले आहे की, चित्रपटांची उत्पन्ने घटू लागली. अन् त्यात आश्चर्य ते कसले ? चित्रपटगृहे 'एअर-कंडिशन्ड' तर 'बिंगो क्लब'ही एअर कन्डिशन्ड ! चित्रपटांत हिरो-हिरॉइन यांचे धाडस पहावे लागते तर येथे बिंगो खेळात विजय संपादून प्रत्यक्ष हिरो वा हिरॉइन बनता येते ! चित्रपटांत रोमांचकारिकता (Thrill) अप्रत्यक्ष, तर इथे प्रत्यक्ष ! तल्म रेशमी पोषाखांतील सुंदर ललना चित्रपटांत प्रेक्षक म्हणून येतात नि नजरेचे पारणे फेडतात; तर येथे बिंगो मंडळांत त्या दृष्टिसौख्य देऊन शिवाय प्रतिस्पर्धी खेळाडू म्हणून, रसिकांच्या दिलाला गुदगुली करतात ! अमुक अमुक सुंदरीला नाही इष्कात तर बिंगो खेळात चीत केल्याचे समाधान रसिक चित्ताला येथे लाभते. सिनेमाचे तिकीट नुसते पैसे घेणारे, तर बिंगोकार्ड जसे पैसे घेणारे तसेच

देणारेदेखील ! मग बोलपटापेक्षा, ' बिंगो ' बेहतरीन वाटल्यास त्यात नवल ते कसले ?

अचूक निदान

पण केवळ ' बिंगो 'च्या अवताराने इंग्लंडच्या जुगाराला एवढे उधाण आले, हे सर्वांना पटणारे नाही. एक विचारवंत याबाबत म्हणतो —

" There seems to be in Britain a wide-spread unrest, which manifests itself in various unconstructive ways, and a dissatisfaction with prevailing materialism and orderly safety of a welfare state, which leaves little room for the unexpected, the irrational and the great adventures of the past."

खरेच, अतिशय सुस्थिर नि सुरक्षित राजवटीत जीवन साचेबंद होत जाते; आणि नवकवि विंदा करंदीकर यांनी वर्णिलेले " तेच ते आणि तेच ते " असे ठराविकपणाचे चक्र नशिबी येते. मग या निर्जीव सुरक्षितपणाचा अन् रसहीन शांततेचा कंटाळा येऊ लागतो. आणि अशा मन:स्थितीत माणूस उन्मादक नि उत्तेजक जुगाराच्या आहारी जातो.

हे रोगनिदान अचूक आहे. पण ह्यावर अचूक इलाज कोणता, ह्याचे उत्तर अद्यापि कोणाला सापडलेले नाही. पण तूर्त, जुगाराला पायबंद घालण्यासाठी व बजेटातील जमा बाजू वाढविण्यासाठी ब्रिटनचे अर्थखाते जुगारजन्य उत्पन्नावर मोठा कर लादण्याचा विचार करीत आहे. हा उपाय योग्यच आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्राने त्याचा पुरस्कार केलेला आहे हे मघाशीच सांगितले.

आधुनिक भारतातील जुगार

आपल्या भारतातही आज ना उद्या अशाच काही उपाययोजनेचा विचार करावाच लागेल. कारण, जुगाराचे नानाविध प्रकार ह्या देशातील शहरोशहरी नि खेडोपाडी धिंगाणा घालीत आहेत. इंग्लंडच्या पावलावर पाऊल ठेवून, आपल्या देशात घोड्यांच्या शर्यतींचा कायदेमान्य जुगार केव्हाच प्रतिष्ठित झाला आहे. मुंबईच्या महालक्ष्मी-शर्यत-मैदानावर चला आणि मलबार हिल्वरील नवकोटनारायणापासून तो परळच्या दरिद्री नारायणापर्यंत जमलेला तेथील जनसंमर्द पहा. आपल्याला तेथे मंदिरेहून मादक असलेली जुगारधुंदी दिसेल. ह्या धुंदीत सुप्रसिद्ध जॉकी ' पांडू खाडे ' हा कित्येकांना पंढरीचा पांडुरंग वाटत असल्याचे मजेशीर दृश्य तुम्हास दिसेल ! अर्थात् या पांडूच्या डोक्यावर लावलेला पैसा बुडालाच, तर " बदनसीब को दांडू, तो क्या करेगा पांडू ? " अशी दैववादी हळहळही येथेच ऐकावयास मिळेल !

ओपन टू क्लोज

पण महालक्ष्मीचे मैदान तरी कशाला ? आमच्या गल्लीच्या कोपऱ्यावरील दादाची

मुलाखत घ्या. दादा धर्माधिकारी यांचे सर्वोदयाच्या अर्थशास्त्रावरील प्रवचन फिके पाडील, असे जुगाराचे अर्थशास्त्र दादा तुम्हास ऐकवील ! आमच्या मोहल्ल्यातील आधुनिक धर्मराजच तो ! न्यूयॉर्क कापूस-भावाचा आकडा अचूक हेरण्यासाठी हा महात्मा, अक्षर-शत्रु असूनही, " टाइम्स ऑफ इंडिया " चाळीत असतो ! त्यातील ' पॉप 'च्या व्यंगचित्रात, आजचा ' फिट ' दडलेला असतो, असे ह्या जुगारवीराचे म्हणणे आहे ! तो ' मजबूत ' आकडा शोधून सापडतो की नाही भगवान जाने. पण ' पॉप 'च्या डोक्यावरचे केस मोजून मोजूनच, आमच्या ह्या जुगारवीराचे डोके ' पॉप् 'सारखे तुळतुळीत झालेले असावे, यात शंका नाही ! या बेकायदा जुगाराला ' ओपन टू क्लोज ' असे भारदस्त नि यथार्थ नाव आहे. कारण, कापसाच्या भावाचा अचूक आकडा ' मजबूत ' लागला तर एकदम नशिबाचा दरवाजा खुलतो, नाहीतर धाडकन् बंद होऊन दुर्दैवाच्या स्मशानात जिवंतपणी जळावे लागते ! या आकडेबाजांना स्वप्नेही आकड्यांचीच पडतात. आणि शून्याला ' मेंढी ' हे नाव ह्या दैव-गणिती मंडळींच्या कोशातच आढळते !

ह्याखेरीज भारतातले आधुनिक जुगार किती वर्णावेत ? शेअर्स भावांच्या चढ-उतारावर अवलंबून असलेला ' लिया-दिया 'चा सौदा हा एक जुगारच ! ' रमी ' आणि ' ब्रिज ' हे पत्त्यांचे खेळ वस्तुतः करमणुकीचे. परंतु ते ' पैसा पॉइंट ' अथवा ' रुपया पॉइंट ' असे पण लावून खेळताच त्याला जुगाराची जोरदार किक् चढते ! हा पत्त्यांच्या जुगाराचा बादशाह म्हणजे त्रिपर्ण महाराज ! ' फ्लश ' हे यांचे साहेबी नाव, तर ' तीन पानी ' ही ' पापिलर ' किताबत ! यात सर्व काही नशिबावर नि धोका पत्करण्याच्या धडाडीवर अवलंबून असते. फक्त तीनच पाने ! पण ती पराजित खेळाडूच्या नशिबाचे तीन तेरा वाजविण्यास पुरेशी ठरतात !

पत्त्यांवर पैसा लावणाऱ्या बहाद्दरांप्रमाणेच क्रिकेट-खेळाडूच्या फलंदाजी-गोलंदाजीवर ' बेट ' लावणारे बहाद्दर बेटे ह्या देशात आहेत. आणि रस्त्याच्या कडेला बेवड्याच्या नशेत कवड्याची फेकाफेक करणारे अडाणी लोक तर हजारोंनी मोजता येतील !

' बा 'च्या ' बा 'चा बा !

भारतातील ह्या वाढत्या जुगारी प्रकाराची दखल, आज ना उद्या आपल्या सरकारांनाही घ्यावीच लागेल. आणि तीही विचारपूर्वक ! नाहीतर दारूबंदीप्रमाणे जुगारबंदी हा एक थट्टेचा विषय होऊन बसेल.

" जुगारबंदी ही दारूबंदीपेक्षाही अशक्य आहे, " हा सिद्धांत आपल्या रांगड्या भाषेत सांगताना आमच्या आळीतील दादाला एकदा मोठा आध्यात्मिक आवेश चढला आणि तो उद्गारला, " साहेब, जुगार कधी बी बंद होनार नाय. कुनाच्या बाला ते जमनार नाय. कारण, आपल्या ' बा 'च्या बाचा बा - परमेश्वर - जुगारीच हाय ! नशिबाचे फासे हैत त्याच्याच हातामंदी ! "

— आणि ह्या दादा-वचनात चूक ते काय आहे ? तो जे म्हणाला तेच पूर्वी उमर खय्याम म्हणाला. भर्तृहरी म्हणाला, " जग हा एक जंगी जुगारखाना आहे. " म्हणूनच येथे सर्व क्षेत्रात जुगाराचा झेंडा फडफडत आहे. ४०० वर्षांपूर्वी इटालीतील मोरोस्टिका गावी सुभेदाराच्या सुंदर कन्येचे पाणिग्रहण करण्यासाठी दोन सरदार एका प्रचंड पटावर जिवंत मानवी सोंगट्या मांडून जाहीर जुगार खेळले. तो फरसबंदी शतरंज-पट आजही जुगाराची अमर परंपरा पटवीत आहे. फतेपूर शिक्रीचा तो प्रचंड दगडी पट, आजही ' लुत्फे शतरंज तुझे क्या कहूं ऐ जाहिद ' असे मुके बोल प्रवाशांना ऐकवीत आहे !

सांगण्याचा मुद्दा एवढाच की, जिंदगी हाच एक जुगार असल्याकारणाने जुगारबंदी अशक्य आहे. अशी आख्यायिका आहे की द्यूतकर्मनि पश्चात्ताप पावलेल्या धर्मराजाने एकदा परमेश्वराला जुगार नष्ट करण्याची प्रार्थना केली. तेव्हा परमेश्वर हसून म्हणाला, " एवढे एक सांगू नकोस ! कारण मी स्वत:च आद्य-जुगारी असल्याने इतरांचा जुगार बंद करण्याचा मला काय अधिकार ? माझा जुगार अहर्निश चालूच आहे —

श्रेष्ठ जुगारी मी परमेश्वर !
नक्षत्रांचे करूनी फांसे
जगदंबेसह जगत्-पटावर
नर-नारींच्या करूनि सोंगट्या
जुगार खेळे मी विश्वंभर ! "

●

(रविवार लोकसत्ता : १४-४-६३)

२०. उदार काचेची चमकदार दुनिया

कल्याण गाडीतील कारकून-कंपनीचा पत्त्यांचा डाव अचानक उधळला गेला. कारण, तात्या चाळकरांची चाळीशी वादविवादाच्या भरात नाकावरून निसटून खाली पडली. अन् तात्यांच्या कंजुष दिलाप्रमाणेच तिचेही तुकडे तुकडे झाले !

डाव अंगावर येणार ह्या कल्पनेने आधीच चिडलेले तात्या, अधिकच भडकले. चाळीशी फुटल्याने बत्तिशीची सरबत्ती जोरात सुरू झाली !...

गाडी ठाण्याला येईपर्यंत त्यांचा संताप शमला नव्हता. पण नंतर पारा हळूहळू खाली येऊ लागला, तरी ते हळहळत होतेच — " इतका स्वस्त चष्मा आता मिळणार नाही. ३०-४० रुपयांना गंडा आहे ! "

" आणखी वर्ष-दीडवर्ष थांबा तात्या. स्वस्तात मिळेल चष्मा ! ही आजची बातमी वाचली नाही का ? वाचा, वाचा, अन् शांत व्हा ! " त्यांच्यासमोर वृत्तपत्र नाचवीत एक पत्ते-मित्र म्हणाला.

" वाचा वाचा काय शिंच्या ! चाळीशी फुटल्यावर वाचणार काय कपाळ ? "

" बरं, तर मीच वाचून दाखवितो — भारतीय काच-धंद्याची प्रगती ! दुर्गापूर येथे चष्म्याच्या काचा तयार करण्याचा कारखाना झपाट्याने उभारला जात असून, वर्ष-दीडवर्षात स्वदेशी भिंगे तयार होतील. प्रतिवर्षी १ कोट ३ लक्ष भिंगे तयार झाल्याने, सालीना १ कोटी रुपयांचे परकीय चलन वाचेल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.... "

" पुरे झाले रे तज्ज्ञांचे अंदाज ! " तात्या उसळून उद्‌गारले, " पुढे काय होईल ते होवो, आज मात्र मला ४० रुपयांची चाट बसणार. तुमच्या पत्तेकुटीपायी माझा चांगला चष्मा गेला; ' लकी ' चष्मा गेला ! "

" लकी चष्मा गेला ? गुडलक ! " तात्यांचा एक वात्रट मित्र म्हणाला, " आता काही दिवस तरी तुम्ही शेजाऱ्यांचे पत्ते चोरून पाहू शकणार नाही ! वर्तमान-पत्रांच्या फुकट्या वाचकाची संख्या निदान ८-१० दिवसांसाठी, एकाने कमी होईल ! जाड भिंगातून पोरीबाळींवर पडणारी एक म्हातारी मेहेरनजर, काही दिवस खामोश झाल्यानं नारी-जगतात आनंदीआनंद होईल !.... '

अति परिचय खोटा

फुटलेल्या काचेवरून सुरू झालेल्या त्या वादविवादाने काच-कारखाने नि काचबाजार येथपर्यंत हां हां म्हणता धाव घेतली. तेव्हा विविधरंगी काचांचा नि काचवस्तूंचा लखलखता बाजार माझ्या मनश्चक्षूंपुढे उभा राहिला. काचेच्या बाटल्या, मद्यपात्रे, हंड्या-झुंबरे, कप-बशा, शो-केसेस्, नाना प्रकारांची नि आकारांची काच-पात्रे ! काय नवल, ती काच-पात्रे नाटकांतल्या पात्रांप्रमाणे बोलूही लागली. त्यातील एक धिटुकली सुंदर सुरई, कमरेवर हात ठेवून ऐटीत उभी होती. ती आपले सुख-दु:ख सांगताना मला म्हणाली —

" आज काचेची अतिपरिचयात् अवज्ञा होत आहे. दिवसातून ५० वेळा बिचारी काच तुम्हा मानवांच्या उपयोगी पडत आहे; पण तिचे आभार कोणीतरी मानतो का ? छे, नाव नको. अहो, तुम्हीच सांगा, काच नसती तर बंद खिडक्यांतून तुम्ही बाहेरची शोभा कशी पाहू शकला असता ? काच नसती तर बिजलीच्या दिव्यांचा उजेड किती नि कसा पडला असता ? काचेची भिंगे नसती, तर 'कॅमेऱ्या'चे काळे डबडे सौंदर्य कसे टिपू शकले असते ?... नित्य सहवासामुळे आमच्या ह्या बहुविध सेवेची आजच्या मानवांना पुरेशी जाणीव नाही. आज साऱ्या जगतात ४०० प्रकारच्या काचा तयार होतात, अन् काचवस्तूंच्या प्रकारांची गणती तर हजारोंनी करावी लागेल. ह्या विपुलतेमुळेच तुम्हाला काचेचे फारसे महत्त्व वाटत नसावे."

काचेचा इतिहास

पण ५००० वर्षांपूर्वी जेव्हा मिसर देशात (इजिप्त देशात) काचेचा प्रथमत: शोध लागला, तेव्हा तिच्यावर कौतुकाचा केवढा वर्षाव झाला ! त्या मंगल दिवसापूर्वी, मानवाने मैलोगणती वाळू तुडविली होती; हजारो वेळा गारगोटीवर गारगोटी आदळली होती; त्याला पांढराशुभ्र सोडा माहीत होता अन् चुनखडीही ठाऊक होती. पण हे चार पदार्थ वितळवून त्यांचा रांधा झाला की, एक नवाच पारदर्शक गुळगुळीत पदार्थ होऊ शकतो, हे त्याला ठाऊक नव्हते. ते त्याला बहुश: योगायोगाने ठाऊक झाले आणि काचेचा शोध लागला !

आरंभाला काचेपासून लहानसहान वस्तूच तयार होत होत्या. उदाहरणार्थ, काचेचे मणि. मग सुमारे २।। हजार वर्षे उलटल्यानंतर प्रथमत: इजिप्तमध्येच काचेची भांडी तयार होऊ लागली. वाळूच्या साच्यावर काच-रसाचा मऊ थर थापून; अथवा काचेचा मोठा थोरला घट्ट तुकडा कोरून; ही भांडी तयार होत असत. अर्थात् ही पद्धती फार कटकटीची नि कष्टाची होती.

आधुनिक काचयुग

पण १५०० वर्षे अशाच प्रकारे व्यतीत झाल्यानंतर काचपात्रे बनविण्याच्या सोप्या पद्धतीचा सीरियात शोध लागला. काचेचा रस नळीने फुंकला तर त्याला चटकन् भांड्याचा

आकार देता येतो, हे सीरियन् कारागिरांना कळून चुकले. ह्या शोधामुळेच आधुनिक काच-युगाचा प्रारंभ झाला.

रोमन-विजेत्यांनी सीरिया-इजिप्तमधील कुशल कारागिरांना इटलीत आणले आणि तेव्हापासून काचपात्र-निर्मितीची कला युरोपात पसरू लागली.

हे झाले काचेच्या भांड्याविषयी. पण खिडक्यांना शोभा देणारे पातळ काचांचे लांबलचक तुकडे ? ते सुलभतेने तयार करण्याची पद्धती प्रथमत: फ्रेंच कारागिरांनी शोधून काढली. काचेचा घट्ट रस सपाट टेबलावर पसरवून त्यांनी खिडक्यांच्या काचा तयार केल्या ! मग युरोपीय देशांच्या अनुकरणाने सारेच जग काचवस्तूंनी लकाकू लागले. यंत्रयुगामुळे काच-वस्तूंच्या निर्मितीत भरपूर सुधारणा झाली.

आज काचेपासून किती विविध प्रकारच्या सुंदर सुंदर वस्तू बनतात, हे सांगावयास नकोच. पण एकच उदाहरण सांगावयाचे झाल्यास काच-तंतूच्या कपड्यांचे सांगता येईल. आपणास आश्चर्य वाटेल, काचेच्या रसापासून तयार झालेल्या चमकदार तंतूचे (Glass-fibre) चे कपडे ७० वर्षांपूर्वीच युरोपात तयार झाले होते. आणि दोन-चार फॅशन-वेड्या सुंदरींनी ते वापरलेदेखील ! आता ह्या काचतंतूबाबत भरपूर संशोधन झाले आहे. म्हणून अशीही शक्यता आहे की, नायलॉनच्या नि टेरेलिनच्या कपड्यांना बाजूस सारून चमकदार, काचकपड्यांचे युग अवतीर्ण होईल !

मानवाचा जिगरदोस्त

त्या विदुषी सुरईच्या तोंडून काचेचा हा इतिहास नि काचमण्यांपासून तो काच-कपड्यांपर्यंत झालेली प्रगती ऐकल्यावर मी म्हणालो — " तुम्ही मानवाच्या उपयोगी पडता यात शंकाच नाही. सोन्या-चांदीची भांडी टिकावू असतील; पण तुमची चकचकीत पारदर्शक शान, त्यांच्या नशिबी नाही ! केशरी दूध काय अथवा गुलाबी मद्य काय, सुवर्णपात्रांहून काचेच्या पेल्यांतच ते शोभते ! थोर पुरुषांच्या प्रतिमांना सोन्याची चौकट कोणी बहाल करोत, पारदर्शक काचेविना त्यांचे रूबाबदार रूप आमच्या मनात भरतच नाही ! म्हणूनच मानवाचे तुम्हा काचवस्तूंवर प्रेम आहे. पण मला सांगा, काचेच्या ह्या दुनियेत मानवांना सर्वात प्रिय असणारी वस्तू कोणती ? सर्वश्रेष्ठ काचवस्तु कोणती ?

मला वाटले होते ह्या प्रश्नामुळे त्या काच-वस्तूच्या दुनियेत भांडण माजेल. पण नाही, त्या सर्वांनी एकमुखाने जबाब दिला - " आरसा ! आरसा हाच अखिल काचवस्तूंचा राजा नि मानवाचा जिगरदोस्त ! "

" आरसा ? आश्चर्य आहे ! आरशी नव्हे ? आरशी म्हणजे लहानशी दुर्बिणच. ती असंख्य मानवांच्या नाकावर चढून डोळ्यांवर बसली आहे ! तरी आरशाहून तिचा नंबर खालचा ? "

" अलबत् ! " सुरई उद्गारली, " कोणतीही चढेल वस्तू अहंकारी मानवांना कितपत

रुचणार ? शिवाय, आरशी नि आरसा ह्यांच्यात शाब्दिक साम्य बरेच असले तरी, गुणात्मक फरक बराच मोठा आहे. पहा ना, आरशी केवळ अधू दृष्टीच्या मानवांना-विशेषत: वृद्धांना प्रिय; तर आरसा आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना प्रिय ! माणूस आरशीतून इतर वस्तू पाहतो; तर आरशात मुख्यत: स्वत:चे रूप पाहतो. मग सांगा, मानवांना निज स्वरूपाची ओळख करून देणाऱ्या आरशाला त्यांनी 'आदर्श' मानले तर नवल कसले ?....

आदर्श म्हणजे आरसा ! सर्व थरातील, सर्व वयातील लोकांना हवाहवासा वाटणारा. दुर्बिण लाख मोलाची असेल; वैज्ञानिकांना अत्यंत उपयोगी असेल; पण नापिताच्या धोपटीपासून तो नवकोटनारायणाच्या महालापर्यंत सर्वत्र वास्तव्य करणाऱ्या आरशाचा महिमा काही न्याराच ! अहो, चंचल पाराही ह्याने आपल्या पृष्ठभागावर खिळवून टाकला; तर इतरांची काय कथा ?...

ह्याचा शोध लागण्यापूर्वी मानव आपले रूप जलाशयात पहात असे. पण हा अवतीर्ण होताच त्यांनी 'पाण्यात पाहणे' अक्षरश: सोडून दिले ! ही ह्याची महती जाणूनच प्राचीन भारतीयांनी ह्याला 'आदर्श' हे नाव दिले !

दुसरा शुकमुनीच

आणि स्थितप्रज्ञाची सारी लक्षणे ह्याच्या ठायी दिसत असताना ह्याला 'आदर्श' का म्हणू नये ? पहा ना, विविध वस्तूंची नि सज्जन-दुर्जन व्यक्तींची रूपे ह्याच्यात हजारदा बिंबित झाली, तरी हा निर्लेपच राहिला ! हजारो खुनी क्रूरकर्म्यांचे खुनशी चेहरे ह्याने पाहिले असतील, पण भय अथवा घृणा या भावनांनी त्याला ग्रासले नाही. लक्षावधी वृद्धांनी आपले दंतविहीन तोंड नि पिकलेले केस ह्यात पाहून हळहळ व्यक्त केली असेल, पण त्या हळहळीची झळ त्याला कधीही लागली नाही. 'पद्म-पत्रं इवाम्भसाम्' हाच ह्याचा बाणा !

नारींच्या मनोहारी सहवासात मोठमोठे तपोनिष्ट लटपटले. उदाहरणार्थ, 'वसंती बघुनि मेनकेला' विश्वामित्राने आपल्या तपावर पाणी सोडले, तर मत्स्यगंधेच्या एकाच कटाक्षाने पराशर मुनींच्या कलेजाचे पाणी झाले. पण नारी-सौंदर्याच्या ऐन बहरानेही ऐन्याचे दिल कधी घायाळ झाले नाही ! सुंदरीच्या खुबसूरतीचे नि रतिरंगाचे यथातथ्य बिंब आपल्या सर्वांगी धारण करूनही हा महात्मा सोवळाच राहिला. याच्यासमोर तासन् तास उभे राहून कामिनींनी आपली नखेरल वेशभूषा केली पण " तू पातळ नेसल्यापेक्षा पातळ नेसतानाच अधिक सुंदर दिसते, " असे हा कधीही म्हणाला नाही ! ह्याच्या पुढेच कैकदा कुरळ कुंतल सुटले नि बांधले गेले; पण त्या रेशमी पाशांत ह्याचे मन कधी गुंतले नाही ! ह्याच्यापुढेच कंचुकीच्या तटतटीत गाठी कैकदा सुटल्या नि बांधल्या गेल्या; पण 'मा फलेषु कदाचन' ही त्याची मनोवृत्ती कधी सुटली नाही ! असा हा संयमी महात्मा. नाजुक मैनांचे माषुक नाज-नखरे अहर्निष पाहूनही न चळलेला दुसरा शुकमुनीच जणू काही !!

दर्प नाही तो दर्पण

पण स्वत: निष्काम निर्लेप असूनही ह्या योगीराजाने केवळ सेवाव्रतासाठी इष्काच्या अमृतयोगाला बहार आणली. कुलांगनांच्या कुंकुम-पेट्यांत ह्याने स्वत:ला जितक्या सहजतेने कोंडून घेतले, तितक्याच सहजतेने ख्रिस्ताइन् किलरसारख्या कुलटांचे आरसेमहाल साजरे केले ! बाल रामचंद्राचा हट्ट पुरा करण्यासाठी कौसल्येच्या सेवेस हाच हाजीर झाला; आणि " अल्लाउद्दीनची कामांध नजर पद्मिनीवर प्रत्यक्ष पडू नये " ही राणा भीमदेवाची मनीषा ह्यानेच पूर्ण केली ! भीमदेव असो की कामदेव असो; मीराबाईचे देवघर असो की वसंतसेनेचे विलासमंदिर असो; ह्याने सर्वत्र सारखाच सेवाभाव प्रकट केला. आणि ह्या बहुविध सेवेचा गर्व नाही, दर्प नाही, म्हणूनच ह्याला 'दर्पण' (दर्प न) हे नाव गुणज्ञ रसिकांनी बहाल केले असावे !

ह्याला स्वत:ला दर्प नाही, पण कंदर्प-दर्प अथवा सौंदर्य-दर्प वाढविण्यास हा कारणीभूत होतो. म्हणूनच शृंगारिक काव्यात ह्याला 'मदन-मित्र' म्हणून ओळखतात. इष्काच्या उर्दू शायरीत तर ह्या आरशांचा इतका वापर केला आहे की, ते सर्व आरसे एकत्र केले तर हजारो ऐनेमहाल उभे राहतील !

ह्या ऐने महालांतील ही पहा एक झलक —

देखकर आईनाको अक्ससे
कहता है वह शोख ।
कुछ अगर हुस्नका दावा हो
तो बाहर आवो ।।

(ऐन्यातील स्वत:च्या प्रतिबिंबाला पाहून ती गर्विष्ठ बिंबाधरा ईर्ष्येने म्हणते — " सौंदर्यावर तुला काही हक्क सांगावयाचा असेल, तर असा बाहेर मैदानात ये. अन् होऊन जाऊ दे तुझी नि माझी लावण्य-स्पर्धा ! ")

अशा हजारो रूपगर्वितांच्या दिलखुष विभ्रमांनीदेखील ज्याचा दिल भ्रमात पडला नाही तो आरसा, अन् त्या आरशाला जन्म देणारी काच धन्य होय !

●

(रविवारची लोकसत्ता : ११/७/१९६५)

२१. रम्य हा भारतीय झूला !

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

दोन आठवड्यांपूर्वी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी अमेरिकेची गाठभेट घेऊन आल्या. ही भेट यशस्वी झाली, संस्मरणीय झाली.

या भेटीच्या यशात एका लहानशा ' भेटी 'चाही काही ना काही वाटा आहेच ! भारत आणि अमेरिका हे दोन महान लोकशाही देश, एकाच प्रगत विचाराच्या आणि सद्भावनेच्या हिंदोळ्यावर आरूढ झाले आहेत, असे सूचित करणारी वस्तु इंदिराजींनी अमेरिकेच्या अध्यक्षांना भेट दिली. भारतीय प्रेमळपणाचे प्रतीक असलेली ही वस्तु म्हणजे खास भारतीय कारागिरी प्रकट करणारा झूला !

हा सुंदर सजावटीचा शानदार झूला, झोपाळ्यांच्या शौकाविषयी प्रसिद्ध असलेल्या गुजरात प्रांती तयार झालेला होता. ताश्कंद-बैठकीच्या वेळी कोसाजिन ह्यांना कै. शास्त्री ह्यांनी जो झूला भेट म्हणून दिला होता, त्याहीपूर्वी ब्रिटनच्या महाराणीला जो झूला नजर करण्यात आला होता, त्याचाच सहोदर शोभणारा हा बडोदाशैलीचा झूला होता ! ते झूले ज्या सावित्रीदेवी पारेख ह्यांनी तयार केले होते, त्यांनीच हाही झूला तितक्याच कौशल्याने घडविला होता. जितका टिकावू तितकाच नाजुक; जितका सुबक तितकाच सोयिस्कर ! त्याच्या दोन्ही स्तंभावर शिव-शीर्ष विराजमान झाले होते. जणू सुचवित होते - सुंदरतेला शिवाचे अधिष्ठान पाहिजे !

झूला हा सुख-शांतीचे प्रतीक आणि भारताचे एक राष्ट्रीय वैशिष्ट्य. त्याची भेट देण्यात इंदिराजींनी जेवढी रसिकता तेवढेच औचित्य प्रकट केले....

पण कोणी विचारतील, झोपाळा हे भारताचे वैशिष्ट्य कसे ? झोपाळा तर सर्वच देशांत प्राचीन काळापासून आढळतो. या प्रश्नात तथ्य नाही, असे नाही.

नाना प्रकार, नाना आकार

या ना त्या प्रकारचे झोपाळे जगांत सर्वत्रच आहेत. प्राचीन काळापासून आहेत.

वायुलहरींनी डोलणाऱ्या वृक्षांच्या फांद्यावर बसून आदिमानवाने जेव्हा आंदोलनाचे सुख अनुभवले; नदीच्या मुलायम लाटांवर तरंगताना जेव्हा हेलकावे उपभोगले; तेव्हापासूनच त्याला झूल्याचा शोध लागला असावा ! रडणारे लहान मूल, तळहाताच्या पाळण्यावर

सुखात झोपी जाते, हे त्या समाजातील मातेने जेव्हा केव्हा सहज अनुभविले असेल, तेव्हाच वृक्षांच्या फांद्यांना तान्हुला झोपाळा-म्हणजेच पाळणा-बांधण्यात आला असेल !..... आणि मग नाना प्रकारचे, नाना आकाराचे झोपाळे - पाळणे-झूले मानवी संस्कृतीबरोबरच परिणत झाले असतील. झाडांना बांधलेले तृण रज्जूचे वन्य झोपाळे; फळकुटांना दोरखंड बांधून तयार झालेले बाळगोपाळांचे झोपाळे; तान्हुल्याला शांत झोप येण्यासाठी उभारलेले लाकडी लोखंडी पाळणे; सोनेरी साखळ्यांनी, सुगंधी फुलांनी, रेशमी गाद्यागिरद्यांनी शयनागारांना शोभा आणणारे राजमंदिरातले रंगतदार झूले !

झूला माहीत नाही, असा एकही देश नाही. जगाच्या पाठीवर हजारो झूले मानवांना विरंगुळा देण्यासाठी झुलत आहेत.

पण कोणी काहीही म्हणोत, झूले अत्यंत धन्यतेने झुलले या भारतातच. कारण, ते येथे नुसते झुल्लेच नाहीत तर खुल्लेदेखील ! भारतीय लोक झोपाळ्यात रमले आणि झोपाळे भारतात रमले; भारतातील गृहजीवनातील घरोब्याचे घटक बनले. त्यांनी काय पाहिले नाही ? काय ऐकले नाही ? - हजारो वर्षांपासून त्यांनी भारतीय मातांची ममता पाहिली. '' बाळा जो जो रे " हे अमृताने न्हालेले बोल ऐकले. जणू दोरीच्या हेलकाव्याने नव्हे, तर ह्या मातृ-वात्सल्याच्या सुधालहरींनीच ते हल्ले; आनंदात डोल्ले ! त्यांनी कौसल्येचा पाळणा ऐकला; जिजाबाईने बालशिवरायांसाठी म्हणलेला पाळणा श्रवण केला. तान्हुल्या शिवबाने वीरश्रीने वळवलेल्या मुठी पाहिल्या ! त्यांनी स्वामिनिष्ठ पन्नादाईचा अतुल त्याग पाहिला. तिच्या अर्भकाच्या पवित्र रक्ताने तो रंगला, अनिवार अश्रूंनी भिजला !....

भारतीय मातांची अंगाई गीते ऐकून हा जसा हेलावला, तसाच भारतीय बालिकांनी याच्यावर बसून म्हटलेली गीते ऐकूनही हा सुखावला. हसऱ्या, गोजिरवाण्या किशोरी झोपाळ्यावर बसल्या आहेत आणि त्यांच्या दोन गटांत ' झोपाळ्यावरील ओव्यांची जुगलबंदी ' झडत आहे,हे रम्य दृश्य पाहिले नसेल, असा भारतीय विरळा.

मुलींचा एक गट म्हणतो -

काळी चंद्रकळा । धुवून धुवून विटली ।।
नाही हौस फिटली । माझ्या मनीची ।।

आणि दुसरा गट जबाब देतो,

'' वारंवार धुण्याने चंद्रकळा विटणारच. तेव्हा ती गृहिणीनं जपूनच वापरली पाहिजे-

काळी चंद्रकळा । ठेवून ठेवून नेसावी ।।
आपल्या जन्माला असावी । उपाताई ।। "

चंद्रकलेसारख्या सुंदर किशोरींनी म्हटलेली अशी गाणी ऐकता ऐकता भारतीय झोपाळा उंच उंच झोके घेऊ लागतो ! आणि मग मुलीही रंगात येऊन उंच स्वरात म्हणतात—

झोक्यांना घेऊ या, बाई !
झोक्यांना घेऊ या !
झोके घेता झोपाळा हा
उंच आभाळी नेऊं या....
चमचमणारे सुंदर तारे
हसून आले जर सामोरे
खेळायाते त्या बोलावुन
हातीं हात देऊ या....

देवांना प्रिय !

असा हा भारतीय झूला केवळ सामान्य जनांनाच प्रिय नाही तर भारतीय देवदेवतांनाही अत्यंत प्रिय आहे.

जगात अनेक झोपाळे होऊन गेले असतील आणि होतील, पण चित्रकूट पर्वतावर प्रभुरामचंद्र आणि सीतादेवी ह्यांना घेऊन झुललेला झुला अथवा कैलासावर त्रिपुरी पौर्णिमेच्या चांदण्या रात्री गिरिजा-शंकरांना पाठीवर घेऊन तारामंडित गगनात भिरभिरलेला भव्य झूला पाहिला एकट्या भारतवर्षनेच ! भारतीय झूला देव-देवतांच्या दिव्य प्रेमाने पावन झाला; आणि देवांच्या मदतीसही धावून गेला ! केव्हा ? भस्मासुराचे संकट प्राप्त झाले तेव्हा ! श्रीविष्णूंनी मोहिनीरूप घेऊन एका रम्य झूल्यावरच ठाण मांडले आणि भस्मासुराचे कामातुर चित्त अक्षरश: खालीवर झुलविले ! मोहिनी सुंदर खरी; पण तिच्या सुंदरतेची खुमारी वाढविली त्या झोपाळ्यानेच. त्यानेच भस्मासुराच्या विवेकाला झोप आणली.

परंतु भारतीय झुल्याला अभूतपूर्व महत्त्व आले ते गोकुळ-वृंदावनात. कुंजवनातल्या त्या रसिल्या झूल्याचे भाग्य अत्यंत थोर होते. कालिंदीच्या तीरावरील शीतल पवन लहरींनी त्याला सुख-संगती दिली होती. आणि श्रीहरीच्या मधुर मुरलीच्या स्वर-लहरींनी त्याला संगीत दिले होते ! त्या संगीताच्या ताला-सुरावरच तो रासक्रिडांत रंगला ! श्रीरंग आणि राधिका, गोपाळ आणि गोपिका ह्यांच्या प्रणयाचा साथीदार झाला, साक्षीदार झाला ! त्याने व्रजसुंदरींचा लटका राग पाहिला, आणि खराखुरा अनुरागही बघितला. रंगपंचमीच्या रंगात तोही रंगला, नंदकिशोराच्या भक्तीभावात दंग झाला..... त्या काळचे ते गोकुळ-वृंदावनातले सौंदर्य, औदार्य, प्रणयाचे माधुर्य आज कल्पनेच्या स्वर्गातही पहावयास मिळत नाही, म्हणूनच तो कधी कधी कुरकुरत असतो !!

त्या गिरीधर गोपाळाच्या आणि गौळणींच्या प्रेमात नाहलेल्या झोपाळ्यावर कविजनांनी कवने लिहिली; स्तुतीसुमने वाहिली. आणि भारतीय संगीतकारांनी जणू त्याच्याच गौरवार्थ ' हिंडोल ' राग निर्माण केला. ' चतुरभुज झुलत श्याम हिंडोले, ' असा त्याचा गुणमहिमा मैफिली-मैफिलींतून गायिला !

भगवंताच्या रासलीलेपासून तो संगीताच्या रागलीलेपर्यंत, आणि गरिबांच्या झोपडीपासून तो पेशवाई वाड्यापर्यंत, ' हिंडोल ' सर्वत्र डोलला. पेशवाईतील शाहीर रामजोशी यांचे कल्पनाचित्र तुम्ही पाहिले आहे का ? त्या चित्रात रंगेल रामजोशी झोपाळ्यावर बसून कवित्व करीत असल्याचे दाखविले आहे. जणू झूल्याच्या सुखद आंदोलनानेच त्यांच्या प्रतिभेला चालना मिळत असावी. आणि त्यांना तो रंगेल झोपाळा ' कुंजांत, मधुप-गुंजांत, यमुनातटीं हो यमुनातटीं ' घेऊन जात असावा !

जणू सौंदर्य-सागराची लाट !

कालखंड कोणताही असो. झूला खराखुरा रमला तो शृंगारातच. झोपाळ्यावर बसून वृद्धांनी भूपाळ्या म्हटल्या नाहीत असे नाही. पण तो मुक्तपणे डोलला, हर्षोत्फुल्ल झाला, उद्यानाच्या प्रीतीत आणि प्रीतीच्या उद्यानांतच ! तरुणीचे लावण्य आणि लावणीचे तारुण्य हेच त्याच्या आवडीचे खरे विषय !

एखादी लावण्यवती दोन्ही हातांनी झोपाळ्याच्या साखळ्या धरून झोके घेऊ लागते तेव्हा वाटते, साऱ्या जगाला शृंखलाबद्ध करून दासानुदास करण्यासाठीच ती सिद्ध झाली आहे ! जणू काही उफाळलेल्या सौंदर्य-दर्याची मदमस्त लाटच साऱ्या तरुणांना जलसमाधी देण्यासाठी मागेपुढे होत आहे ! तिचा झोका उंच उंच जाऊ लागला की, मेघांच्या हिंदोळ्यांत बसलेल्या बिजलीला वाटते, आपणाशी स्पर्धा करण्यासाठी ही भूमीवरील चंचल चपला आकाशाकडे झेप घेत आहे !.... तिचे झोके पाहून पाहूनच काय वाऱ्याचा झोक जातो, आणि तो तिच्या झोकनोकावर लट्टू होतो; तिच्याभोवती पिंगा घालू लागतो, मग वाऱ्याने तिचा केशकलाप भुरभरू लागताच रसिकांचे नयनभृंग भिरभिरू लागतात. वाऱ्याने पदर ढळण्याच्या आधीच त्यांचे धैर्य संयमासह ढळते !...

अशा रूपसुंदरीच्या दोला-केलीचे वर्णन करायला महाकवीचीच प्रतिभा पाहिजे. म्हणूनच कोण्या संस्कृत कवीने म्हटले आहे-

सौंदर्य भिन्दीवर-लोचनानां
दोलासु लोलासु यदुल्लसास ।
यदि प्रसादात् लभते कवित्वं
जानाति तद्वर्णयितुं मनोभूः ।।

(चंचल हिंदोळ्यावर बसलेल्या नीलकमलाक्षीचे जे सौंदर्य उल्हसित होते, ते कोण वर्णन करू शकेल ? जर परमेश्वराच्या कृपाप्रसादाने कवित्वशक्ती लाभली, तर मदनच ते काहीसे वर्णू शकेल !)

जीवनही असेच आहे

भारतीय कवींच्या मनावर अशी विलक्षण मोहिनी घातलेला झूला भारतीय लोकगीतांत,

कथांत, कादंबऱ्यांत, इतकेच नव्हे तर चित्रपटांतही स्थानापन्न झाला आहे; अगदी 'शकुंतले'पासून तो 'टारझन'पर्यंत, रंगमहालापासून तो सर्कशीच्या शामियान्यापर्यंत सर्वत्र आनंदाची उधळण करणारा हा महात्मा अबोलपणाने तत्त्वबोधही सांगतो.

तो म्हणतो- ''मानवी जीवन माझ्यासारखेच आहे - कधी वर कधी खाली ! कधी हे टोक तर कधी ते टोक ! पूर्णापासून ढळणे आणि पुन: पूर्णत्वाकडे जाणे, अशी ही अखंड मुसाफिरी चालू आहे. 'झूला' बोलपटात कोण्या शायराने म्हटले ते खरेच आहे-

इन्सानकी जिंदगी है
दुख-सुखका एक झूला ।
अजांम उसका दुख है,
सुखमें जो दुखको भुला !

●

(रविवारची लोकसत्ता १७-४-१९६६)

२२. हरिद्रा-कुंकुम

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

काही सणसमारंभ खास पुरुषांचे असतात. काही केवळ स्त्रियांचे. काही उभयतांचे. हळदी-कुंकू हा दुसऱ्या वर्गातला समारंभ. सिर्फ औरतोंके लिये ! फक्त महिलांसाठी !

ह्या समारंभाला केवळ प्रेक्षक म्हणून तरी उपस्थित असावे; आणि भरजरी पैठणीपासून तो ' ट्विंकल् नायलॉन 'पर्यंत नानाविध वस्त्रालंकारांनी सजलेला तो ' नव-नवल-नयनोत्सव ' पहावा, अशी लालसा पुरुषांच्या मनात डोकावते. पण....पण त्या ' जनाना शो 'ला मर्दांना सक्त मज्जाव असतो ! म्हणूनच की काय, ' भाऊराव कोल्हटकर नि बालगंधर्व बेमालूम स्त्रीवेश धारण करून हळदी-कुंकू घेऊन गेले, अशा दंतकथा पुरुषवर्गाने निर्माण केल्या असाव्यात. हो, तेवढेच अप्रत्यक्ष समाधान !

सांगण्याचा मुद्दा एवढाच की, हळदी-कुंकू : मग ते मकर संक्रांतीचे असो की, चैत्रातले असो, - हा खास ' बानुओ माटे ' असा उत्सव आहे. कारण, ह्यातील मुख्य भाग जो हरिद्रा-कुंकुम-तिलक तो खास स्त्रियांचा विषय आहे-भारतीय सुवासिनींचा विषय आहे. त्याची उठाठेव विधवांप्रमाणेच धवांनादेखील करण्याचे कारण नाही !

तसे पाहिल्यास भारतीय सुवासिनी दररोज स्नानानंतर, ' हळदी-कुंकू 'समारंभ आरशासमोर साजरा करीतच असतात. त्यालाच मकर संक्रांतीला वा चैत्रमासात सामूहिक स्वरूप प्राप्त होते. ह्या वेळी गौरीची आरास करून तिजसमोर गौरीप्रमाणे सजलेल्या स्त्रिया हरभऱ्यांनी ओटी भरतात, तेव्हा त्या हरभऱ्यांनादेखील खूपच बरे वाटत असेल ! श्री गौरीच्या सान्निध्यात जसे हराला बरे वाटते त्याप्रमाणे !

ते हरभरे-बत्ताशे, ते अत्तर नि गुलाबपाणी, ते आंब्याच्या डाळीसमवेत हजर झालेले आंबट-गोड पन्हे ! ते हसणे-खिदळणे, ते नटणे-मुरडणे, त्या वेण्या, ते गजरे आणि नानापरीचे नखरे ! वा: ! हळदी-कुंकू समारंभाच्या निमित्ताने जणू ऋतुराज वसंताची सारी श्रीमंतीच घरोघर प्रकट होते !

सर्वश्रेष्ठ दिलप्यार दागिना

पण ह्या समारंभाचा मूलाधार आहे हळदी-कुंकू. भारतीय रमणींना अतिशय प्रिय असलेल्या सौभाग्य-तिलकाचे महत्त्व प्रस्थापित करणारा समारंभ आहे हा !

हरिद्रा-कुंकुम तिलक ! भारतीय नारींचा दिलप्यार अलंकार. चिंतामणराव वैद्य ह्यांच्या मते हा अलंकार, भालप्रदेशी रेखण्याची प्रथा महाभारतकाळीही रूढ होती. ते काहीही असो, आज पंजाबसारखा एखादा प्रांत वा एखादी जमात सोडल्यास भारतातील सर्व प्रांतांत नि हिंदु समाजात हा ' टिलक पंथ ' बद्धमूल झालेला दिसतो ! इतर कोणत्याही अलंकारापेक्षा नि प्रसाधनापेक्षा ह्या ' तिलका 'लाच भारतीय स्त्रियांनी अधिक मान दिला आहे. अक्षरश: शिरोधार्य मानले आहे. पार्वतीपासून लंकेच्या पार्वतीपर्यंत सर्व थरातील नारींना परवडणारा नि आवडणारा हा अलंकार अतिपरिचयानेही अवज्ञा पावला नाही. उलटपक्षी, ह्या एका सौभाग्य अलंकाराला भारतीय कविजनांनी उपमा, उत्प्रेक्षादि अलंकारांचा भरघोस नजराणा नजर केला आहे. कसा ते पुढे पाहू.

उदयाचली मित्र आला !

पण ह्या अलंकाराची कल्पना भारतीय सौंदर्यशास्त्राला वा सौंदर्यवर्तीना कशी सुचली असेल ? ह्या प्रश्नाचा विचार करताना, कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन मन प्राचीन निसर्गविडचा जमान्यात उड्डाण करते आणि वाटते, भारतीय ऋषीमुनींना रम्य अरुणोदय पाहून जसे सूर्यस्तवन स्फुरले, त्याचप्रमाणे कोण्या सौंदर्यवतीला हे सुंदर अलंकरण सुचले असावे ! सुप्रभाती अंगणात सडासंमार्जन करताना तिने उदयाचली मित्र आलेला पाहिला असेल. पूर्व दिशेच्या कांतीमान ललाटावरील तो सुवर्णसाज पाहिला असेल, आणि त्यावरील तो लाल-केशरी टिळा तिच्या मनात भरताच ती मुक्तेश्वराप्रमाणे उद्गारली असेल -

शेष वेचतां अठरा घटिका ।
पूर्व दिशेने क्षाळिले मुखा ।
कुंकुम रेखिले, त्या तिलका ।
अरुणोदय बोलिजे ।।

मग तिने केशराचा तांबूस पिवळा तिलक भालप्रदेशी रेखून, प्राचीशी स्पर्धा केली असेल ! (केशरालाच संस्कृत भाषेत ' कुंकुम ' म्हणतात.) ह्याचप्रकारे हजारो वर्षांपूर्वी कोण्या भारतीय सुंदरीला, पौर्णिमेच्या चंद्रावरील तो सौंदर्यवर्धक कलंक पाहून कस्तुरीचा टिळा ललाटी रेखण्याची कल्पना सुचली असावी.

गरिबांचे केशर !

परंतु कस्तुरी काय अथवा केशर काय, दोन्ही वस्तु केवळ श्रीमंतांनाच परवडणाऱ्या, गोरगरिबांच्या आवाक्याबाहेरच्या. म्हणूनच कस्तुरी-केशराऐवजी हरिद्रा-कुंकुम वापरण्यास प्रारंभ झाला असेल. हरिद्रा उर्फ हळद म्हणजे गरिबांचे केशरच की ! उभयतांच्या अंगी औषधी गुण आणि उभयतांचा रंग पिवळाधमक. तथापि हळद म्हणजे ' जनता क्लास ' तर केशर म्हणजे ' फर्स्ट क्लास '! म्हणून तर उच्चभ्रू शर्मिष्ठेने बिचाऱ्या देवयानीला

वाक्‌ताइन करताना म्हटले -

राजसुतेचे यश जे
तुज येईल काय गे दरिद्रे ते ?
पाहसि विकावया तू
केशर-मौल्ये कैसे हरिद्रेते ? ||

तथापि, हा उच्च-नीच भाव भारतीय नारींनी सौभाग्यतिलकाबाबत बाळगला नाही आणि थोरामोठ्यांच्या बायकाही हळदी-कुंकू वापरू लागल्या !

ज्यांना संस्कृतात ' हरिद्राखंड ' म्हणतात, त्यांनाच मराठीत ' हळकुंड ' म्हणतात. ही हळकुंडे हळदीच्या झाडापासून तयार होतात. हळदीचे झाड आल्याच्या झाडाप्रमाणेच कमरेइतके उंच असते आणि जसे आले जमिनीत उगवते, तसेच हळकुंडही जमिनीतच होते. मात्र हळदीच्या झाडाची पाने कर्दळीच्या पानांसारखी असतात.

हळकुंडे पाण्यात भिजत घालून, त्यांची सालपटे सोलून काढतात. मग त्यांना पापडखार, लिंबाचा रस इत्यादींच्या मिश्रणाची पुटे चढवितात. ह्या प्रक्रियेने पिवळ्या हळकुंडाची लाल हळकुंडे तयार होतात. ती लाल हळकुंडे कुटून, जे बारीक चूर्ण तयार होते, त्यालाच कुंकू उर्फ पिंजर म्हणतात.

पिंजर ? नव्हे पिंजरा !

आरंभाला केशर काय, हळद काय, अथवा पिंजर काय, चंदनाच्या दाट गंधात खलूनच मस्तकी लावत असतील. पण पुढे तो सौभाग्यतिलक नीट टिकावा म्हणून मेणावर पिंजर लावण्याचा प्रघात सुरू झाला असावा. आतातर काय, पिंजर तयार करण्याचा उद्योग मागे पडला असून, कुंकवाच्या बाटल्या निघाल्या आहेत. काही प्रांतांत पिंजरेऐवजी सिंदूर तिलक लावतात. इतकेच नव्हे तर तो भांगातही भरतात. त्यालाच सीमन्तरचना असे नाव आहे.

पण पिंजर ते पिंजर ! रमणींच्या लालचुटुक ओठांना लाजविणारा त्याचा रंग नि रुबाब काही न्याराच असतो. निदान मला तरी बाटलीतील कुंकवापेक्षा पिंजरच जास्त आकर्षक वाटते. अन् त्याहून आकर्षक वाटतो ' पिंजर ' हा काव्यमय शब्द ! ज्या कोणी व्यक्तीने हा शब्द प्रथमत: उपयोगात आणला असेल, तिच्या चोखंदळ रसिकतेला वंदन असो. कारण पिंजर ह्या शब्दाचा एक अर्थ आहे ' तांबडा-पिवळा रंग ' तर दुसरा अर्थ आहे - ' पिंजरा ! ' सुंदर नारीच्या ललाटी रेखलेले पिंजर म्हणजे रसिक मनाचे पाखरू बंदिस्त करणारा पिंजराच नव्हे काय ?

रंगीन ठसा !

अर्थात्, पिंजर काय, कुंकुम काय, कस्तुरिकेचा टिळा काय, सुहासिनीच्या कांतिमान

भालपटावर तो आरूढ होतो, तेव्हाच त्याला मोल प्राप्त होते. कविजनांच्या दिलावर त्याचा रंगीन ठसा उमटतो हा असा -

केयूरं न करे, पदे न कटकं
मौलो न माला पुन: ।
कस्तूरी-तिलकं तथापि तनुते
संसार-सार-श्रियम् ।।
सर्वाधिक्यमलेखि भाल-फलके
यत् सुभ्रुवो वेधसा ।
जानीम: किमु तत्र मन्मथ-
महीपालेन मुद्रा कृता ? ।।

(ज्या इंद्रधनुष्याकृती भुवयांच्या सुंदरीच्या हातात बाजुबंद नाहीत, पायात जोडवी नाहीत, केशपाशात फुलांची वेणी नाही आणि तरीही त्या अनलंकृत रमणीचे सौंदर्य आणि संसाराची सौभाग्य लक्ष्मी, कस्तुरीचा टिळा वृद्धिंगत करीत आहे ! हिच्या ललाटी विधात्याने सर्वश्रेष्ठतेचा लेख तर लिहिलाच आहे, त्यावर ह्या तिलकाच्या रूपाने, मदन राजाने आपली राजमुद्रा तर विराजित केली नाही ना ?)

मदनराजाचे हे शिक्कामोर्तब - हा ललाटीचा टिळा - जसा सुंदर वाटला, तसाच सुंदर वाटला हा भांगातील सिंदूर ! त्या लालबुंद सीमन्त-रेखेचे वर्णन करताना कोणी कवी म्हणतो -

वेणी श्यामा भुजंगीयम्
नितंबात् मस्तकं गता ।
मुखचंद्र-सुधा लेढुं
सान्द्र-सिंदूर-जिव्हया ।।

(कोणत्याही दुर्लभ वस्तूवर झडप घालायची तर ती पाठीमागूनच घातली पाहिजे ! म्हणूनच की काय, त्या रमणीच्या काळ्याभोर केशकलापाची वेणी, नव्हे, काळीभोर नागीण, नितंबप्रदेशावरून पाठीमागूनच मस्तकी चढली. कशासाठी ? लालभडक जिभेने तिच्या मुखचंद्राचे अमृत चाटण्यासाठी.)

अशा ह्या सौभाग्य-सिंदूरावर अथवा सौभाग्य-तिलकावर रसिक मन भ्रमराप्रमाणे झेप घेते. पण येथे तर त्या तिलकालाच भुंग्याची उपमा देऊन बहार उडविली आहे. पहा -

लोचन फुल्लांभोज-द्वय-लोभात्
दोलितैकमना: ।
कस्तूरी-तिलक-मिषाद

अयमलिके ! ऽलिः सम्मुत्सुसति ।।

(अग लबाडे ! तुझे नेत्र म्हणजे दोन उत्फुल्ल कमळेच ! त्यांचा लोभ मनात धरून, भ्रमराने झेप घेतली. 'पण ह्या कमळात रममाण होऊ की, त्या कमळात ?' ह्या प्रश्नाने त्याचे मन दोलायमान झाले ! आणि मग तो कस्तुरी-तिलकाच्या रूपाने, दोन्ही डोळ्यांपासून समान अंतरावर तुझ्या भालप्रदेशी स्थिरावला नि शोभायमान झाला !)

नानाविध आकार

सौभाग्यतिलक एकच. पण तो रेखण्याचे प्रकार अनेक ! प्राचीन काळापासून हे नाना आकार नि प्रकार चालू आहेत. आजही नाही का कुठे ललाटावर ढब्बू पैशाएवढे गरगरीत कुंकू तर कुठे नया पैशाहूनही बारीक बिंदु ! कुठे आडवी कुंकवाची चिरी तर कोठे चंद्रकोर साजिरी ! कुठे ज्योत-फॅशन तर कुठे कोयरी-फॅशन ! अशीच एक नखरेल कुंकुम-रेखा पाहून कोणी रसिक उद्गारला -

बाले ! ललाम-लेखेयं
भाले भल्लीव राजते ।
भ्रूलता-चापमाकृष्य
न विद्मः कं हनिष्यति ? ।।

(बाळे ! तुझ्या निटिलावरील कुंकुमरेखा एखाद्या भल्लीप्रमाणे - भालाच्या वा बाणाच्या पात्याप्रमाणे - शोभत आहे. भुवयांचे धनुष्य आकर्ण खेचून आणि त्यावर कुंकुमरेखेचा बाण सज्ज करून तू कोणाला गारद करणार, ते कळत नाही !)

— असा आहे सौभाग्य-रंगापासून मदन-रंगापर्यंत सर्वत्र प्रभाव गाजविणारा तिलक ! भारतीय नारींचा अत्यंत आवडता अलंकार ! आणि त्याच्या प्रतिष्ठेचा समारंभ म्हणजे हळदीकुंकू !

(लोकसत्ता)

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३५२९
दि. क्र. २९.६.९५
निबंध १३।१३

२३. ठसकेबाज 'चिलम'-सुंदरी !

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

सिगारेटचा बडा भाई

" आग ! आग ! आग ! ! मालकांना आग लागली ! धावा ! " अशा हाकांनी सर वॉल्टर रॅले ह्यांच्या खुळचट नोकराने सारा बंगला दणाणून सोडला.

वस्तुत: रॅलसाहेबांना आग लागली नव्हती, तर ते आपल्या आरामखुर्चीवर बसून शांतपणे धूम्रपानाचा आनंद लुटीत होते. पण ह्यापूर्वी असे दृश्य, त्यानेच नव्हे तर इंग्लंडमधील कोणत्याही इसमाने पाहिले नसल्याने ' मालकाला आग लागली ' असा गैरसमज होणे, अगदीच अशक्य नव्हते. हा प्रसंग सन १५८६ मध्ये घडला असे म्हणतात.

हा प्रसंग खरा असो वा काल्पनिक असो, एवढे निश्चित की सन १५८६ मध्येच सर वॉल्टर रॅले ह्यांनी तंबाखू आणि तंबाखूच्या धूम्रपानाचा शौक, याची अमेरिकेतून इंग्लंडात आयात केली. भारतातदेखील साधारणत: त्याच शतकात तंबाखूने पहिला उन्मादक पदन्यास केला, असे संशोधकांचे मत आहे. ' सन १५०८ मध्ये दक्षिण भारतात प्रथम तंबाखू आली, ' असा उल्लेख दारा शिकोच्या चरित्रात आढळतो.

तथापि, दक्षिण-भारतात फिरंगी व्यापाऱ्यांनी तंबाखू १५ व्या, १६ व्या शतकात आणली असली तरी, उत्तर भारतात ती (तुर्कस्थानातून ?) आधीच येऊन पोहोचली होती, असे दिसून येते. पण मला तर वाटते, या पूर्वीही कैक शतके तंबाखूचा तर्र करणारा धूर भारतीयांनी चाखला असावा. कारण, बाणभट्टाच्या कादंबरीत शूद्रक राजाचे वर्णन करताना अत: परिपीत-धूम्रवर्ति: ' असा उल्लेख आढळतो. ही शूद्रक राजाची धूम्रवर्ती (उर्फ बिडी !) तंबाखूची होती की, ओव्याची ? संशोधकांनी परिसंवाद घडवावा असा हा प्रश्न आहे.

तंबाखूची 'ओढ'

सांगण्याचा मुद्दा एवढाच की, जसा संगीताचा सूर तसाच तंबाखूचा धूर, भारतीयांना कैक शतकांपासून दिलाऱ्यार वाटत आला आहे. जितका रावांना तितकाच रंकांना - किंबहुना रंकानाच अधिक ! कारण, चिंतांची चिता ज्यांच्या हृदयाच्या स्मशानात धगधगत आहे, त्यांनाच तंबाखूचा धूर अधिक दिलाऱ्यार वाटतो ! जणू आपल्या हृदयातील व्यथांना

धूम्र-मंडलावर आरूढ करून, त्यांना ते आकाशात देवाकडे खाना करतात - फिर्याद गुदरण्यासाठी ! दाद मागण्यासाठी !

पण हाय हाय ! तंबाखूच्या जन्माइतकाच तंबाखू-निषेधाचा व धूम्रपानविरोधाचा इतिहास जुना आहे. पहिल्या जेम्स राजाने सन १६०४ मध्ये तंबाखूसेवनाविरुद्ध फर्मान काढले होते. फ्रान्सच्या १३ व्या लुईनेदेखील तंबाखूच्या धुव्व्याचा धुव्वा उडविण्याचा प्रयत्न केला होता आणि आठव्या पोपने तर ' जाहिदगिरीचा बैल ' - एक कडक फर्मान चौखूर उधळून, तंबाखू-भक्तांना नि धूम्रपान पंडितांना चर्चमधून हद्दपार करण्याची जोरदार कोशीस केली ! नवल हे की, जहांगीरसारख्या रसिक मोगल बादशाहानेदेखील तंबाखू ओढण्यास मनाई केली होती. ह्या स्वस्त पण मस्त तंबाखूने मदिरेचा नक्शा उतरेल अशी धास्ती त्या शराबी शहेनशाहाला वाटली की काय, नकळे !

पण राजेरजवाडयांनी तंबाखू ओढण्यास मनाई केली, अथवा तंबाखू ओढल्याने मृत्यु ओढवेल अशी तंबी वैद्यकशास्त्राने दिली, तरी मानवी दिलातील तंबाखूची ओढ मुळीच कमी झाली नाही !

सावळाच रंग तिचा !

ही ओढ बिनतोड स्वरूपात पहावयाची असेल तर राज-मंदिरापेक्षा झोपडयांचा शोध घेणे उत्तम. दिवसभर काबाडकष्ट करणारे कामगार आणि ' होंटल्में खाना और मसजिदमें सोना ' असे कलंदर फकीर ह्यांची दिलफ्यारी चिलीम पहा ! ती हुक्क्याप्रमाणे बादशाही नाही, चिरुटाप्रमाणे घरंदाज नाही, ' मॅच्युअर्ड ' नाही, सिगारेटसारखी नाजुक नार नाही, सावळाच रंग तिचा ! पण ठसका असा जोरदार, की ठसठशीत मराठी लावणीच जणू ! ह्या ग्रामीण श्यामलेची आणि शहरी गोऱ्यापान सिगारेटची जुगलबंदी लावली, तर खात्रीने सिगारेटच्या साहेबी ऐटीचा धुव्वा उडेल. तिच्या आक्रमक नि ' दम 'बाज व्यक्तिमत्वापुढे सिगारेट पांढरी फटफटीत पडली आणि टिनाच्या डब्यात दडून बसली, असे वाटते !

अशी आहे ही चिलम ! धोंडिबा, कोंडिबा इत्यादि मध्याटमोळ्या रसिकांना, किंबहुना भारतातील असंख्य गरीब धूम्रपान शौकिनांना, झुरक्या झुरक्यागणिक आनंद देणारी ! ही गोरगरिबांत वावरत असली, तरी आहे मूळची बादशाही वंशात जन्मलेली. म्हणजे असे की, हुक्क्याच्या अगदी वरच्या मृत्तिका-पात्राला ' चिलम 'च म्हणतात. किंबहुना चिलम हेच हुक्क्याचे मूळ रूप ! कालांतराने त्याला जलपात्राचे नि लांबलचक नळीचे लटांबर जोडून कोण्या कल्पक कारागीराने श्रीमंतांसाठी हुक्का तयार केला. सुटसुटीत चिलमेचे अगडबंब हुक्क्यात रूपांतर झाले. तंबाखूचा वा गुडाखूचा ' डायरेक्ट ' धूर ज्यांना सोसवत नाही, अशा श्रीमंतांना पाण्याचा थंडावा घेऊन आलेला गाळीव (Filtered) धूर ह्या हुक्क्यांतून मिळू लागला !

जवळीक हवी !

पण बहुजनसमाजाला हे नजाकतीचे खुषबूदार धूम्रपान लाभणे शक्य नाही आणि पसंतही नाही. त्यांना चिलमसुंदरीची जास्तीत जास्त जवळीक पाहिजे ! तिच्या अधराचा नि धुराचा जास्तीत जास्त ' डायरेक्ट कॉन्टॅक्ट ' पाहिजे ! हां, तरीही तिची अदब त्यांनी जरूर तेवढी राखलीच आहे. चिलमीला फडक्याचा तुकडा लावूनच ते तिचा आस्वाद घेतात. तिला अगदीच बे-परदा करणे त्यांना पसंत नाही ! ते फडके म्हणजे चिलम सुंदरीचा ' चिलमन् ' (पडदा) म्हणावा की घागरा ? काही का म्हणाना, ज्याला चिलम ओढण्याची सवय जडली, त्याला धूम्रपानाचे अन्य प्रकार फिकेच वाटणार ! म्हणूनच, जेव्हा जेव्हा चिलमी-बहाद्दर आळीपाळीने झुरक्यामागून झुरके मारतात, तेव्हा कोणीतरी खुष होऊन पुढील परंपरागत काव्य सुनावतो -

"चिलमी-दानं शत-गोदानं ।
एकेक झुरका गंगास्नानम् ।।"

चिलमीचा महिमा गोदान नि गंगास्नान ह्यांच्या मापांनी मोजला गेला आहे. यावरून ही मूळची फारसी सुंदरी किती भारतीय बनली आहे ह्याची कल्पना येते.

चिलम-सुंदरीचा अपराध ?

चिलम म्हणजे मातीचा पाइपच म्हणाना. तिच्यातून जेव्हा तंबाखूबरोबर गांजाही ओढतात, तेव्हा चिलमीच्या धूम्रपानाला खरी रंगत चढते, असे गांजेकसांचे म्हणणे आहे. अशा धुंदफुंद चिलमपानापुढे सुरांचे अमृतपान नि असुरांचे सुरापानदेखील त्यांना तुच्छ वाटते ! कल्पनांचे हजारो सितारे त्यांच्या डोळ्यांपुढे चमचमू लागतात ! त्यातील काही तारे पाहा -

" चिलम ही कोणी काळी सावळी तरुणी असून, यौवनाचा अंगार तिच्यात पेटला आहे आणि त्यात तंबाखूरूपी आशिकाची ती राखरांगोळी करीत आहे ! "

ह्या तिच्या घोर अपराधाबाबत एकदा परमेश्वराने तिला जाब विचारला. तेव्हा ती मातीची चिलमसुंदरी जगाच्या कुंभाराला - जगदीश्वराला - उमरखैय्यामच्या रुबाबात म्हणाली -

मलिन मिट्टीकी दे दी देह
फिर न ये कैसे करती पाप ?..।।
...अरे ये सारे तेरे पाप
कलंकित जिनसे मेरा भाल ।
क्षमा कर ये मेरे अपराध
क्षमा अपनी पा ले तत्काल !।।

' अमेरिकेत दर मिनिटाला सुमारे १७,००० वेळा चिरूट पेटविला जातो, ' असे ' सिगार इन्स्टिटचूट ऑफ अमेरिका ' या संस्थेने पुरस्कारिलेल्या एका जाहिरातीत म्हटले

आहे आणि ते अक्षरश: खरेही आहे.

पण असे असूनही सध्या चिरूटाच्या व्यापारावर चिंतेचा धूर पसरला आहे. " अमेरिकन डॉलर्स काळजीपूर्वकच खर्चिले जातात, हे खरे. पण त्यातील पुरेसे डॉलर्स पूर्णत: अमेरिकन चिरूटांवर खर्च होत नाहीत," असे अमेरिकन चिरूट-निर्मात्याचे म्हणणे आहे.

उपाध्यक्ष मार्शल ह्यांनी एकदा असे सुचविले होते की, " ह्या देशाला कशाची गरज असेल, तर ती ५ सेन्टमध्ये विकत मिळणाऱ्या उत्तम चिरूटांची-सिगारांची!" तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की, " अमेरिकेत ५ सेंट किंमतीचे चिरूट भरपूर असले तरी, ते १५ सेंटला विकले जातात."

चिरूटाची बहीण म्हणजे सिगारेट. प्राय: पांढऱ्या शुभ्र बहिरंगाची ही नाजुक नार! तिचे प्रकार नि आकार अवघ्या पाच सहा धर्तीचेच असले तरी 'चिरूटरावां'ची - सिगार-साहेबांची - बनावट मात्र हजारो प्रकारांची असते! आणि किंमतीदेखील नानाविध असतात - प्रत्येकी २ सेंट पासून तो ५ डॉलर्स पर्यंत!

तो जमाना गेला!

चिरूटांचा खप जसजसा वाढू लागला तसतसा त्याचा आलिशान घरंदाजपणा कमीकमी होऊ लागला. आता जुन्या जमान्याचा खुशबूदार बादशाही चिरूट आणि त्याचे चोखंदळ गिऱ्हाईक इतिहासजमा झाले आहेत. कारण 'मास प्रॉडक्शन' 'मास मार्केट'! आता उपाहारगृहांपासून तो औषधी दुकानांपर्यंत चिरूट कोठेही विकत मिळतो.

ह्या विशाल बाजारपेठेत - 'मास मार्केट'मध्ये - आपले चिरूट लोकप्रिय व्हावेत म्हणून, सिगार-निर्माते भरपूर पैसा जाहिरातींवर खर्च करतात. गतवर्षी सुमारे २ कोटी ७० लक्ष पौंड खर्च झाले. चिरूटांचा खप वाढावा म्हणून आधुनिक अभिरुची लक्षात घेऊन त्यांच्या बनावटीत नाना प्रकाराचे प्रयोग चालू आहेत. पूर्वीचा 'लिन्ड्रल सीझर' चिरूट केव्हाच मागे पडला. हल्ली आकाराने बारीक, वजनाने हलका आणि आस्वादाला सौम्य अशा चिरूटाला भाव आहे!

व्यापाराचे स्वरूपही झपाट्याने बदलत आहे. पूर्वी चिरूट-निर्मिती ही घरगुती उद्योगासारखी होती, आता ती 'बडा बिझिनेस' बनली आहे! कारण, चिरूट-उत्पादनाचा वेग वाढला, प्रमाण वाढले. १९१७ साली अमेरिकेत २४,००० चिरूट-निर्माते होते, तर आता २०० च्या आसपास आहेत. पण ह्या आधुनिक निर्मात्यांची उत्पादन-क्षमता प्रचंड व अद्ययावत् आहे.

नारींची तक्रार नाही!

पूर्वीपासून चिरूटांना एक प्रकारची प्रतिष्ठा समाजात लाभली आहे. विवाहप्रसंगी कोणी सिगारेटचे पाकीट भेट देईल काय? छे, अशक्य! पण चिरूटांचे तसे नाही.

सिगार-इन्स्टिटचूटच्या अध्यक्षांनी नुकतेच एक गमतीदार उदाहरण सांगितले की, "एका स्त्रीने एका वाङ्निश्चय समारंभात चिरूटांची पेटी आपल्या मैत्रिणीला सप्रेम भेट दिली! आणि त्या पेटीवर चिठ्ठी डकविली की, 'हा १७० पौंडाचा अन् २२ वर्षे वयाचा मुलगा तुला सप्रेम भेट दिला आहे.'

एके काळी नारीजनांना चिरूटांच्या धुराविषयी तिटकारा असे. आपल्या नवऱ्याने वा प्रियकराने चिरूट ओढणे त्यांना तेवढेसे पसंत नसे. पण आता स्त्रियांचा चिरूटाबाबतचा पूर्वग्रह हळूहळू नाहीसा होत आहे. 'सिगार-इन्स्टिटचूट'ने केलेल्या निरीक्षणानुसार ७० टक्के अमेरिकन स्त्रियांची चिरूट वा चिरूट-शौकिन यांच्या विरुद्ध काही तक्रार नाही.

मर्दानी शौक

सिगारेटस्चे व्यसन हे तसे उभयलिंगी आहे! म्हणजे असे की, पुरुषांप्रमाणे स्त्रियाही सिगारेटी ओढतात. अमेरिकेत सुमारे ६५,००० स्त्रिया सिगारेटस्चा आस्वाद घेतात. पण 'चिरूट' हा अद्यापि पुरुषी शौक आहे. अर्थात् कवयित्री एमी लॉवेल् ह्यांच्यासारख्या काही सुप्रसिद्ध स्त्रिया ह्या नियमाला अपवाद होत.

गेल्या वर्षी क्यूबाबाबतच्या राजनैतिक धोरणाने, प्रेसिडेंट केनेडी ह्यांच्या लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी, क्यूबाहून अमेरिकेत येणाऱ्या उत्तम तंबाखूला जबर तडाखा बसला. पण त्याचा परिणाम अमेरिकेच्या चिरूटधंद्यावर फारसा झाला नाही. कारण, डॉ. कॅस्ट्रो सत्तेवर येण्यापूर्वी क्यूबातून जो तंबाखू व चिरूट अमेरिकेत येत असे, तो महागडाच होता आणि त्याच्या आयातीचे प्रमाणही घटतच चालले होते.

क्यूबाचे नुकसान, हे इतर काही देशांच्या पथ्यावर पडले. उदाहरणार्थ, फिलिपाइन्स संघराज्य. ह्या देशातील चिरूट नि तंबाखू आता अमेरिकेत भरपूर येऊ लागला. विशेषत: प्यूअर्टो रिको (Puerto Rico) ह्या नर्जाकच्या मुलुखाचा फार फायदा झाला. युद्धपूर्व-काळातील चिरूट-तंबाखू-व्यापाराची पातळी ह्या प्रदेशाने तावडतोब गाठली.

चिरूट-कीर्ती

सिगारेटस्च्या मानाने, चिरूटाच्या धूम्रपानापासून 'लंग्ज कॅन्सर' होण्याचा धोका फारच कमी असतो, असा शोध अलीकडे लागला आहे. त्यामुळे कित्येक सिगारेटबहाद्दर चिरूटाकडे वळतील आणि चिरूटधंद्याला अधिक तेजी चढेल असा अंदाज आहे.

असो. सध्या वॉशिंग्टन हे चांगले चिरूट-नगर म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. अध्यक्ष केनेडी दिवसाला फक्त सहा चिरूट ओढतात, असेही वृत्त आहे. त्यामुळे चिरूट-पान हे मन:शांति व यशस्विता इत्यादींचे आद्यकारण होय, अशी चिरूट-कीर्ती फैलावण्याचा संभव दिसतो!

●

(लोकसत्ता)

२४. निदर्शने : ग्राम्य, सौम्य आणि रम्य

/ / / / / / / / / / / / / / / / / /

काही दिवसांपूर्वीची एका विधानसभेतील ही गोष्ट आहे. एका प्रगत राज्यातील विधानसभेत जी " रामधून " झाली तिची ही कहाणी आहे !

मंत्री-मंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव त्या ' कायदेकर्त्यां 'च्या सभेत मांडला गेला आणि त्यावर तब्बल सहा तास कडाक्याचा वादविवाद झाल्यानंतर सुमारे दीड तास त्या सभेला मासळीबाजाराचे स्वरूप प्राप्त झाले ! सर्व बाजूंनी टेबले बडविण्याचा आवाज उठला. केवळ टेबलावर आपले हस्तकौशल्य दाखवूनच आमदार लोक थांबले नाहीत, तर एकमेकांकडे सरोष नजरेने पाहून त्यांनी वानरांप्रमाणे भुभुःकार करण्यासही प्रारंभ केला. तेव्हा, हल्लीच्या रामराज्यातील वानर-गणांचीच ही सभा आहे, " बुद्धिमतां वरिष्ठं " अशा लोकनेत्यांची नव्हे, अशी खात्री पटली ! साहजिकच, सभापतींनी काही मिनिटांसाठी ती सभा विसर्जित केली. पण तेवढ्याने आमदार मंडळींचा उत्साहभंग थोडाच होणार ? सभा विसर्जित झाली तरी असभ्यपणा विसर्जित झाला नाही ! काही आमदारांनी अक्षरशः ' रामधून ' करण्यास प्रारंभ केला. आणि एकाने तर सभापतींचा राजदंडच पळविला ! या अपमानाने सभापती जागच्या जागी जळफळत असतानाच, एका आमदाराने तक्रार नोंदविली की, " महाराज ! महाराज ! माझा शर्ट ' त्या ' आमदाराने टरकाविला आहे हो !... "

ही एक स्वराज्य-युगातील सत्यकथा आहे. एक काय अशा अनेक कथा - इस्से भी जादा कथा - आपल्या काही विधानसभांत घडल्या आहेत. स्वराज्य-पूर्व काळात याच विधानसभांत मोठी चमकदार भाषणे होत, हजरजबाबी कोटिक्रमाने मंद हास्याचे कल्लोळ उठत; आणि बुद्धिमत्तेच्या किरण-शलाका वारंवार तळपल्याने विधानसभा गौरवाने उजळून जात असत ! पण हा हन्त ! डॉक्टर आंबेडकर, बॅ. जम्नादास मेहता, श्री. सत्यमूर्ति, भुलाभाई देसाई, बाबासाहेब खापर्डे, बॅ. रामराव देशमुख, केदार इत्यादि वादविवादपटूंनी आपल्या वाक्-पाटवाने गाजविलेल्या विधान-सभांचा तो जमाना केव्हाच मागे पडला. आता ' रामधून 'चा, ' पंचशीलां 'ची पोपटपंची करणाऱ्या शिळांचा, भंपक फाल्गुनमास चालू आहे ! विक्रमादित्याच्या विद्वत्सभेचे रूप प्राप्त होऊन जरी आमच्या हल्लीच्या विधानसभा रंगत नसल्या, तरी चक्रमवीरांच्या दंगलीचे वा धुळवडीचे रूप प्राप्त

होऊन त्या अधुनमधून रंगत असतात ! प्रौढ मतदानाचा हक्क बहाल केल्यानंतर जन्माला आलेल्या या विधानसभांत, राजकीय प्रौढपणाचे फारसे दर्शन झाले नाही तरी, आरंभी वर्णन केलेली ' रामधून 'ची रामलीला अनेकदा दृष्टीस पडते !

दु:शासन आमदार

इतकी सुंदर ' रामलीला ' आमदारांनी विधानसभेच्या आवारात करून दाखविली याबद्दल त्यांना भारताच्या नाटक अकादमीतर्फे एखादे पारितोषिक द्यावयास पाहिजे होते ! कारण ह्या प्रकारच्या ' राम-लीलां 'नी (किंबहुना नर-लीलांनी !) केवळ जनतेची करमणूकच साधली नाही, तर विचारवंतांच्या मनात प्रश्नांची मालिका उभी करण्याचेही मोठे कार्य आपोआप साधले आहे. जेथे वादेवादे तत्त्वबोध होण्याची आवश्यकता, तेथे वादेवादे शीर्षभेद होऊ लागला, यावरून देशात ब्राह्मवृत्ती लोपली तरी क्षात्रवृत्ती मुसमुसत आहे, असे मानावे काय ? विरोधी मताच्या आमदाराच्या कपड्यांवर धाड घालण्यात आली, हे दिगंबर पंथीय बुद्धसंप्रदाय सुरू होण्याचे प्रसादचिन्ह समजावे काय ? की या देशात लोकशाहीऐवजी, गण्यागणप्यांची झुंडशाही (मॉबॉक्रसी) निर्माण होण्याची ही लक्षणे आहेत ? विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीवर कोरडे ओढणारे हे नेते ! सौजन्यसप्ताहात लंबीचवडी प्रवचने झोडणारे हे ' जनता के प्रतिनिधी ' ! शांतता नि सुव्यवस्था राखण्यासाठी कायदे करणारे हे आमदार ! यांनीच कायदा नि रीतिरिवाज धाब्यावर बसवून, विधानसभेची विवस्त्र पांचाली करण्याचा खटाटोप करून ' दु:शासन ' व्हावे, हा कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार नाही काय ?...

'यथा आमदार तथा मतदार'

विचारवंतांनी या प्रश्नांचा खुशाल विचार करावा. वाटल्यास एक ' तज्ज्ञ समिती ' नेमून सरकारला अहवाल सादर करावा. पण आमचे आमदार तो कितपत मानतील याची शंका वाटते. ' आदत बडी बुरी चीज है ' या न्यायाने, चळवळीच्या जमान्यात आमच्या पुढाऱ्यांना जडलेली निषेध-निदर्शनांची, घोषणांची, कायदेभंगाची सवय सहजासहजी दूर होईल असे वाटत नाही. किंबहुना, आमच्या ' लीडर ' मंडळींनी निदर्शने, संप, मोर्चा, घोषणा, उपवास, निरोधन इत्यादींचे बेडर नि बेरड युगच प्रवर्तित केले आहे ! त्या युगधर्माच्या पकडीतून त्यांचीही सुटका होणे दुरापास्त आहे. तेव्हा प्रचलित युग हे निरोधन-निदर्शनाचे आहे हे गृहीत धरूनच, विचारवंतांनी विचार (अर्थात् स्वस्थ बसण्याचा !) केला पाहिजे !

या युगाच्या सुबत्तेचे चित्र एखाद्याने काढावयाचे ठरविले, तर तिच्या हातात दोन आयुधे निश्चित दाखवावी लागतील. एक निवडणूक नि दुसरे निदर्शन ! पहिले आयुध जनतादेवीला दर पाच वर्षांनी वापरावयास मिळते, तर ' निदर्शन ' - आयुधाचे धारदार

दर्शन ती केव्हाही घडवू शकते. म्हणजेच, निवडणूक हे नैमित्तिक आयुध; तर निदर्शन हे नित्य आयुध आहे. या आयुधांचा वापर 'यथा आमदार तथा मतदार' या न्यायाने हरघडी होऊ लागल्याने, त्याचे विविध प्रकार निर्माण झाले आहेत. "निदर्शने (यांत संप, मोर्चा, निरोधन इत्यादींचा अंतर्भाव होतोच) आणि त्यांचे विविध परीचे हिंसक नि अहिंसक विलास" या विषयावर एखाद्याने पी. एच्‌डी. साठी प्रबंध लिहावा, इतके हे शास्त्र भारतात प्रगत झालेले दिसते.

निदर्शनांचे नाना रंग

कम्युनिस्टांची रौद्र-स्वरूपी लाल संप-निदर्शने ! प्रजासमाजवाद्यांची सौम्य गुलाबी निदर्शने ! बाबू लोक ज्याचा बहुशः प्रयोग करतात असा बैठा उर्फ 'लेखणी-विश्राम-संप; तर कामगारांचा मोर्चेवाला चालता संप ! बे-मुदत वजनदार संप आणि एक दिवसाचा लाक्षणिक हल्काफुलका संप !

पण याहूनही कल्पकतापूर्ण संप-निदर्शने अस्तित्वात आली आहेत. काही महिन्यांपूर्वी जम्मूच्या सरकारी नोकरांनी, कमी वेतनाच्या निषेधार्थ जो 'दाढी-वर्धन-संप' (नो शेव्ह ड्राइव्ह !) केला होता, तो उदाहरणादाखल पुढे करता येईल. पगारवाढीची मागणी सरकारने नाकारली याबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी एक आठवडा दाढी न करता जम्मूचे कारकून कामावर गेले म्हणतात. आमच्या आमदारांनी विधानसभेत 'रामधून' करण्यापेक्षा या अहिंसक नि कल्पक निदर्शनाचे अनुकरण केले, तर ते अधिक श्रेयस्कर होईल. या 'दाढीवाढ निदर्शना'मुळे कामाचा खोळंबा होणार नाही; शिवाय गालावर नि हनुवटीवर निषेधाचा काळा (बहुशः काळा !) बावटा फडकविल्याचे श्रेय मिळेल ! ब्लेडस्‌चा वापर निदान सात दिवस बंद पडून, केसांची हिंसा केल्याचे पाप घडणार नाही; आणि अहिंसा-पालनाचे पुण्य थोडेबहुत पदरी पडेल. शिवाय कौटुंबिक काटकसर योजनेला हातभार लावल्यासारखे होईल, हा फायदा निराळाच ! सात दिवसांनंतर आपण 'किंचित् फेरोजशहा मेथा' अथवा 'किंचित् रवींद्रनाथ टागोर' असल्याचाही साक्षात्कार घडू शकेल. (मात्र हे 'श्मश्रुवर्धन-निदर्शन' कित्येक नापितांना नापसंत पडेल आणि 'नाजुक गृहखात्याला' ही त्याची भलतीच टोचणी लागेल—हा मानल्यास तोटा !)

मौन-निदर्शन

'दाढी-वर्धन निदर्शना'प्रमाणेच इतरही अनेक अभिनव निदर्शने या लोकशाही भारतात प्रत्यही निर्माण होत आहेत. काही महिन्यांपूर्वी निपाणीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या परिणामकारक निदर्शनाचा निर्देश या संदर्भात करता येईल. बनारस-लखनौच्या विद्यार्थ्यांची ती दगडफेकीची, जाळपोळीची उग्र नि भडक निदर्शने निपाणीच्या कल्पक विद्यार्थ्यांना 'स्टिरिओ टाइप' (ठराविक ठशाची) वाटली आणि म्हणून त्यांनी मौन-निदर्शन

अंगिकारले ! " कर्नाटक विद्यापीठाकडून ' तोंड दाबून बुक्क्यांचा मार ' या जातीचा अन्याय होत आहे, त्याचा आम्ही निषेध करितो, " हे त्यांनी तोंड बंद ठेवून प्रभावीपणे प्रकट केले ! इन्स्पेक्टर शाळा तपासणीसाठी आले असताना निपाणी-नगरपालिकेच्या विद्यार्थ्यांनी मौन पाळून त्यांचा निषेध केला. हे ' मूक निदर्शन ' फार परिणामकारक झाले म्हणतात. ' घोषणा-निदर्शन ' हा उत्तर ध्रुव तर हे मूक-निदर्शन म्हणजे दक्षिण ध्रुव. अगदी वाच्यार्थनिदेखील ! कारण, ते दाक्षिण्यपूर्ण असते ! हा अभिनव निदर्शन प्रकार शंभर टक्के अहिंसक आहे. याचेही अनुकरण विधानसभेत उगाच हातघाईवर येणाऱ्या आमदारांना करता येईल.

कमलिनीचे नाजुक निदर्शन !

छे, पण आत्ताच आम्ही या निदर्शनाला ' अभिनव ' म्हटले, ते तितकेसे बरोबर नाही. कारण मूक-निषेध व्यक्त करण्याचा प्रकार हजारो वर्षांपासून चालतच आला आहे. निपाणीच्या विद्यार्थ्यांचे वैशिष्ट्य एवढेच की, या प्रकाराचा सामुदायिक पद्धतीने त्यांनी उपयोग केला. आपल्या दैनंदिन जीवनात ज्याला आपण ' अबोला ' म्हणतो, ते एक प्रकारचे मूक-निदर्शनच असते. स्व. महात्मा गांधी आश्रमातील बेशिस्तीचा निषेध व्यक्त करण्यासाठी कधीकधी हे मौन-निदर्शन नि उपवास करीत असत, हे सर्वश्रुतच आहे.

हा निदर्शन-प्रकार सभ्य, सुसंस्कृत, शांत व अगदी अहिंसक असल्याने त्याचा वापर प्रियजनांच्या कृत्याविषयी नापसंती प्रकट करण्यासाठीच बहुश: होतो. ज्यांच्याविषयी हृदयात स्नेहाच्या ऊर्मि उचंबळत आहेत अशांच्या अयोग्य कृत्यांविषयी खेद प्रकट करावयाचा झाल्यास तो अबोला धरूनच प्रकट करणे श्रेयस्कर; त्यांच्या डोक्यावर दगड हाणून नव्हे, शिवीगाळ करून नव्हे. निदर्शनाचे स्वरूप संबंधसापेक्षच असले पाहिजे. निसर्गातही हेच तत्त्व पाळले जाते. सुप्रभाती अरुणाने पूर्व दिशेच्या आरक्त मुखाचे चुंबन घेतल्याने मनात उठलेली निषेधाची नि खेदाची भावना कमलिनी कशी व्यक्त करते ? आफताब (सूर्य) मुर्दाबादच्या घोषणा करून नव्हे; संप पुकारून नव्हे ! तर दंवबिंदुरूपि अश्रु ढाळून ! कमलिनी कोमल, अरुण-किरण कोमल, प्रेमप्रकरण कोमल - म्हणूनच निषेध निदर्शनाचा प्रकारही इतका कोमल झाला ! दंवबिंदूंचे अश्रु मूकपणे ढाळण्याचे हे निदर्शन किती परिणामकारक होते पहा. क्षणातच अरुणाचे प्रेमळ सुवर्णकर ते अश्रु पुसून टाकतात !

नच सुंदरी ! करु कोपा...

मानवी सृष्टीत, प्रियकर-प्रेयसी अथवा पति-पत्नी यांच्या संबंधात तर हा मूक-निदर्शनाचा प्रकार शेष चलतो. ' असं हो काय करता ? बोला ना गडे ! ' अशी लाडीगोडीची विनंती लाडकी स्त्री वारंवार करीत असताना, पुरुषाने मूक-निदर्शन करून तिला ' पाया पडते, पदर पसरते ' या अगतिक पायरीपर्यंत आणून अखेर आपली मागणी

पदरात पाडून घेण्याचे प्रसंग 'मदन-राज्या'त अनेकदा घडतच असतात. त्याचप्रमाणे स्त्रीने मौन-मुद्रा अंगिकरून केलेले निषेध-निदर्शन किती प्रभावी होते, हे सांगावयास का पाहिजे ? श्रीकृष्णासारखा पुरुषोत्तमदेखील —

नच सुंदरी ! करुं कोपा
मजवरि धरि अनुकंपा

अशी विनवणी करू लागतो. स्त्रीच्या सशब्द-निदर्शनाहून तिचे मुके निदर्शनच अधिक परिणामकारक होते. ते नि:शब्द निदर्शन मोडून काढण्यासाठी पुरुषाला आर्जवी शब्दांच्या फौजा गारद करून देणे भाग पडते; पाया पडावे लागते; तेव्हाच कोठे ते मूक-निदर्शन मोठ्या रुबाबात मागे घेऊन 'राणी सरकार' आपल्या धवल हास्य-लहरींनी, मंजुळ शब्दांनी आणि चतुर विलासांनी आपला विजय जाहीर करतात ! (आणि गंमत अशी की, तोच त्यांच्या पाडावाचा आरंभ-बिंदु असतो !)

'मै भी मूँह में जबान रखता हूँ...'

रुष्ट सुंदरीच्या 'अबोला निदर्शना'पुढे - तिच्या रुसूबाई रूसू-निदर्शनापुढे - जगातील सारी निदर्शने फिकी वाटतात. हे निदर्शन मानवजातीच्या आरंभापासून तो आजतागायत चालू आहे. पण तरीही त्यातील गोडवा थोडाही कमी झालेला नाही. या निदर्शनामुळे पुरुषांना कशी आर्जवे करावी लागतात, ते कसे काकुळतीला येतात, याची मराठी उदाहरणे वाचकांना परिचितच असतील. पण दिल्-प्यारीच्या मौनाने बेजार झालेल्या उर्दू आशिकांचे बोल तेवढेसे परिचयाचे नसतील. त्यांची ही झलक —

मै भी मूँह मे जबाँ रखता हूँ।
काश् पूछो के मुद्दुवा क्या है ॥

(गालिब)

(प्रिये, मलाही तोंड आहे म्हटलं ! मलाही वाचा आहे. पण माझं काय म्हणणं आहे, हे विचारशील तर ना ?... दुसरा चावट अर्थ असा : राणी सरकार ! आमच्या तोंडातही जीभ आहे म्हटलं ! पण आमची जिव्हा-चुंबनाची मनीषा तुम्हांस कशी कळावी ? तुम्ही तर एक शब्दही बोलत नाही, अंतरीचा हेतू विचारीत नाही !)

खामोश है तेरे बोलों पे यह गनीमत जान।
अगर जबाब में कह दे कि 'मैं नहीं सुनता' ॥

(शाद अजीमाबादी)

(अरे प्रियकरा, तुझे हे आर्त आक्रंदन चालू असूनही ती मूकच आहे, याचा खेद बाळगू नकोस. उलट, ते साधच समज !... समज, तिने अबोला सोडून "मला काही एक ऐकावयाचे नाही" असा उत्तर दिले तर ?...)

मुस्कराये वोह हाले दिल सुनकर ।
और गोया जवाब था ही नहीं ।।
कुछ कटी हिमाते सवाल में उम्र
कुछ उम्मीदे जवाब में गुजरी ।।

(आमच्या हृदयाची दुर्दशा ऐकून तिने फक्त स्मित केले ! आणि ते स्मितही उपहासाचेच ! जणु काही माझे दु:ख-निवेदन जबाब देण्याच्या लायकीचेच नव्हते ! मित्रहो, साऱ्या आयुष्याचा हिशेब हा असा : - काही आयुष्य तिला प्रश्न विचारण्यात व्यतीत झाले, आणि उरलेले - "प्रश्नाला उत्तर मिळेल" या वेड्या उमेदीत निघून गेले !)

असे असते कठोरहृदयी उर्दू सुंदरींचे कडक ' अबोला-निदर्शन.' त्यांचा रोष ल्वकर संपुष्टात येत नाही; त्यांचे सरोष मूक-निदर्शन प्रियकराची पुरती धुळदाण उडेपर्यंत कधीकधी चालूच असते. तथापि, उर्दू प्रियकर तिच्या त्या रुष्टतेवरही खूष असतो. सुप्रसिद्ध उर्दू कवी अमीर मीनाई म्हणतो —

उनको आता है प्यार पर गुस्सा ।
हम को गुस्से पे प्यार आता है ।

(तिचा राग आहे आमच्या प्रेमावर; पण आमचे प्रेम तर तिच्या रागावरच आहे !)

(गावकरी : दीपावली १९६०)

२९. महनीयांची महान् स्मारके

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

या दुनियेच्या धर्मशाळेतून आपण निघून गेलो तरी आपली कृती नि स्मृती तिच्यात जिवंत रहावी, असेच बहुतेकांना वाटत असते. निदान आपल्या प्रियजनांनी आपणास विसरू नये, अशी आपली इच्छा असते. आपले एखादे लहानसे तरी स्मृति-चिन्ह दुनियेच्या अफाट वाळवंटावर उमटावे अशी मानवी मनाची स्वाभाविक भूक असते ! आपली अथवा आपल्या प्रिय व्यक्तीची स्मृती जोपासली जावी, या नैसर्गिक इच्छेतूनच नानाविध स्मारक-कल्पनांचा उदय झाला आहे.

आपापल्या आवडी-निवडीनुसार कित्येकजण स्वत:च्या स्मारकाची कल्पना मृत्युपूर्वीच सांगून जातात. उदाहरणार्थ, सुप्रसिद्ध फारसी कवी नि तत्त्वज्ञानी उमर खैय्याम ! तो म्हणाला होता, " माझी कबर साधी, सफेत नि सुंदर असावी. आणि तिच्या बाजूस गुलाबाची झाडे अशा बेताने लावावीत, की उत्तर दिशेकडून वारा वाहू लागताच, तिच्यावर सुगंधी गुलाबांचा अभिषेक व्हावा ! "

उमर खय्यामसारखी मोठी माणसेच नव्हेत, तर सामान्य माणसेही कधी कधी आपल्या स्मारकासंबंधी सूचना देऊन जातात. आणि त्याही त्यांच्या वृत्तीच्या निदर्शक असतात.

उदाहरणार्थ, एक प्रेमिक म्हणतो, " मी माझ्या प्रेयसीच्या ओठांवरील स्मितावर जान कुर्बान करून टाकली आहे. म्हणूनच तिच्या उज्ज्वल नि मधुर स्मिताचे प्रतीक असलेला ' चिराग ' माझ्या कबरीवर सदैव प्रकाशित राहील अशी व्यवस्था व्हावी ! " ही झाली मधुर स्मिताच्या ' शहीदा 'ची इच्छा. पण आता एक मत्सरी प्रेमिक आपल्या स्मारकासंबंधी काय इशारा देतो ते ऐका. तो म्हणतो, " तुझ्या प्रेमापायी माझी कत्तल झाल्यावर कृपा करून मला तुझ्या गल्लीत पुरू नकोस; तेथे माझी कबर बांधू नकोस. कारण, मी तुझा प्रेमिक म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे माझ्या कबरीवर फुले वाहण्यास लोक येतील आणि मग त्यांना तुझ्या घराचा पत्ता लागेल !... तुझा पत्ता कोणालाच - विशेषत: माझ्या प्रतिस्पर्ध्यांना कळू नये, अशी माझी इच्छा आहे. "

आपल्या थडग्यापाशी गुलाबाचे झाड अथवा प्रकाशमान दिवा असावा, ही इच्छा

तशी मुल्खावेगळी नाही. पण केवळ शरीर-सौंदर्यावर लुब्ध असलेल्या ' शहीदे मुहब्बत 'ची मुल्खावेगळी ' तमन्ना 'ही अशी आहे —

हूं मै आशिक अनारे पिस्ताँका ।
हो न तुरबत पे जुज-अनार दरख्त ।।

(मी त्या जोबनवंतीच्या दोन डाळिंबांचा विशेष आशिक आहे ! म्हणून म्हणतो, माझ्या थडग्याशेजारी डाळिंबाच्या वृक्षाखेरीज दुसरे कोणतेही झाड नसावे !)

श्रद्धामयोऽयं पुरुष :

आपले स्वत:चे या ना त्या प्रकारचे स्मारक व्हावे, ह्या भावनेपेक्षाही, आपल्याला प्रिय अथवा आदरणीय असलेल्या व्यक्तीचे स्मारक उभारावे ही भावना अधिक प्रभावी आहे. या भावनेत केवळ भक्तीच नसते तर कृतज्ञताही असते. ज्यांनी ज्यांनी देशाची, धर्माची, समाजाची सेवा केली; उच्च, उदात्त ध्येयासाठी जीवन वेचले; मानवतेला सुखी करण्यासाठी विधायक कार्य केले त्यांची त्यांची स्मारके कृतज्ञ जनांनी उभारली आहेत. इजिप्तमधील नाइलच्या वाळवंटापासून तो हिमालयाच्या उंचवट्यापर्यंत आणि लंडनच्या ' तमसा ' तीरापासून तो गंगेच्या घाटापर्यंत; मानवी मनातील कृतज्ञतेची नि भावुकतेची साक्ष पटवीत हजारो स्मारके उभी आहेत. आणि अश्रद्ध जनांना एक सनातन सत्य सांगत आहेत — " श्रद्धामयोऽयं पुरुष: ! "

ह्या स्मृती गौरवाचे प्रकार नानाविध आहेत आणि ते कुठे शिल्पांत, कुठे काव्यांत, कुठे केवळ शहरांच्या-नद्यांच्या-पर्वतांच्या नावात दृग्गोचर होतात. नुसते गंगेचे ' भागीरथी ' हे नाव घ्या. त्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करून गंगेचा ओघ भारताकडे वळविण्याऱ्या महान् भगीरथाची स्मृती गुंफली आहे ! रामटेक, रामपूर, रामगढ इत्यादि शेकडो गावांच्या नावात मर्यादापुरुषोत्तम रामचंद्रांची स्मृती भाविक जनतेने जोपासली आहे. ' जवाहर चौक ', ' महात्मा गांधी-मार्ग ', ' टिळक पूल ', ' श्रद्धानंद आश्रम ', ' गोखले हॉल ', ' कमला नेहरू उद्यान ', ' शिवाजी पार्क ' इत्यादि रस्त्यांच्या, उद्यानांच्या, वसाहतींच्या, संस्थांच्या सभागृहांच्या अन् इमारतींच्या नावांतून शहरोशहरी नि गावोगावी थोर पुरुषांच्या पुण्य-स्मृतींची जपणूक सहज दिसून येणारी आहे !... पण ही तर सामान्य स्मारके झाली. आपल्या प्रिय व्यक्तींची नि थोर पुरुषांची भव्य-दिव्य स्मारके उभारून, साऱ्या जगास थक्क करण्याचे प्रयत्नही थोडे झाले नाहीत.

दांपत्य-प्रेमाची स्मारके

आपणास अगदी परिचित असलेले असे भव्य स्मारक म्हणजे यमुनेच्या तीरावर उभा असलेला ' ताजमहाल.' मुमताज नि शाहजहान ह्यांच्या प्रेमाचे ते शुभ्र संगमरवरी प्रतीक. प्रीतिदेवतेने ढाळलेला संगमरवरी अश्रु !... शाहजहानने आपल्या प्रिय पत्नीच्या

स्मृत्यर्थ कोट्यवधि रुपये खर्चून बांधलेला तो ' ताजमहाल ' केवळ मुमताज बेगमची स्मृतीच नव्हे, तर त्या काळच्या कुशल भारतीय कारागिरांची प्रतिभाही चिरंतन राखीत आहे.

' ताजमहाल ' हे वैभवसंपन्न पतीने आपल्या प्रिय पत्नीच्या स्मरणार्थ बांधलेले स्मारक आहे, तर ' आशिया मायनर ' मधील करिया (Caria), येथे उभे असलेले भव्य स्मारक, वैभवशाली पत्नीने आपल्या पतीच्या गौरवार्थ उभारले आहे. त्याला म्हणतात " मॉसोल्स् (Mausolus) राजाचे स्मारक." मॉसोल्स राजाचे त्याच्या राणीने (" आर्टेमिसिया "ने) बांधलेले हे स्मारक जगातले ५ वे आश्चर्य मानले जाते. त्याचे सौंदर्य इतके प्रभावी की, इंग्रजी भाषेतील 'Mausolum' — (म्हणजे थडगे, कबर, समाधी) - हा शब्द त्यापासूनच निर्माण झाला ! मॉसोल्स् ख्रिस्तपूर्व ३५३ मध्ये मरण पावल्यावर त्याच्या निष्ठावंत राणीने ग्रीक-कारागिरांना मुद्दाम पाचारण करून हे स्मारक उभारले. हे स्मारक दोन मजली आहे. पहिला मजला भव्य चौरसाकृती असून, दुसऱ्या मजल्यावर तुकतुकीत दगडांचे उंच स्तंभ उभे आहेत. ह्या खांबांवर पिरॅमिडच्या आकाराचे प्रचंड छप्पर बांधले असून त्याच्या शिखरावर एक सुंदर रथ स्थानापन्न केला आहे. उत्तम कोरीव काम केलेल्या त्या दगडी रथात राजाराणीच्या भव्य मूर्ति बसविण्यात आल्या आहेत — मॉसोल्स् राजाची मूर्ति आहे १० फूट उंच ! अगदी जुन्या स्वरूपात हे स्मारक आज दिसणार नाही. कारण ह्यांची कोठे कोठे डागडुजी नि पुनर्बांधणी झाली आहे.

ज्यांना स्मारकत्व प्राप्त झाले !

जगातील हे ५ वे आश्चर्य म्हणजे बुद्धिपुरस्सर बांधलेले स्मारक होय. पण कधी एखादी भव्य वास्तु केवळ हौस वा उपयुक्तता म्हणून बांधली जाते, पण कालांतराने बांधणाऱ्याचे चिरंतन स्मारक होऊन बसते. जगातील सातवे आश्चर्य म्हणून विख्यात असलेले भव्य दीपगृह, हे अशा प्रकारचे उत्तम उदाहरण होय ! ' अलेक्झांडर दी ग्रेट 'ची स्मृती जिवंत राखणाऱ्या ' अलेक्झांड्रिया ' बंदरात, एखाद्या भव्य पुराणपुरुषाप्रमाणे उभे असलेले हे संगमरवरी दीपगृह ! जणू सतेज गौरवर्णाचा वरुणराजच सागरतीरावर ध्यानमग्न झाला आहे; आणि त्याच्या कांतिमान मुकुटातून बाहेर पडणाऱ्या प्रकाशाच्या शुभ्र शलाका, नीलसागरावर तरळत आहेत ! असे हे दीपगृह ख्रिस्तपूर्व २६० मध्ये दुसऱ्या टोलेमिने (Ptolemyने) बांधले, आणि तेच त्याचे स्मारक झाले !

भारतातील कुतुबमिनार, दिल्ली शहराबाहेरील वेधशाळा, कलकत्त्याचे शांतिनिकेतन, शंकराचार्यांनी स्थापन केलेले चार मठ, शिवाजी महाराजांनी बांधलेले बळकट दुर्ग ही स्मारके ह्याच प्रकारची आहेत. कुतुबमिनार पाहिला की कुतुबशहाचे कर्तृत्व आठवते; दिल्लीबाहेरील वेधशाळा पाहिली की जयपूरच्या जयसिंग राजाच्या थोर कार्याची स्मृती होते; ' शांतिनिकेतन 'च्या दर्शनाने रवींद्रनाथ टागोरांचे तर ' साबरमती 'चा आश्रम पाहून महात्मा गांधींचे कार्य डोळ्यांपुढे उभे राहते; शंकराचार्यांनी स्थापन केलेली चार धामे

त्यांच्या महान आध्यात्मिक कार्याची आठवण करून देतात आणि शिवाजी महाराजांचे ते दुर्ग ? शिवरायांच्या स्मृतिगौरवाचे ते गगनभेदी स्तंभच जणू ! कै. वासुदेवशास्त्री खरे म्हणतात, ते खरेच आहे की —

येथे ते उंच माना करूनि गड यशस्तंभ राया शिवाचे ।
देति आम्हां मराठ्या स्मरण घडीघडी आमुच्या वैभवाचे ।।

पण थोर पुरुषांच्या कार्याचे नि जीवनाचे स्मरण करून देण्याऱ्या अशा वास्तूंची गणना स्मारक-विचारात केल्यास अतिव्याप्तीचा दोष होईल. कारण, ह्या वास्तु स्मारक म्हणून बांधण्यात आल्या नव्हत्या, त्यांना स्मारकत्व आपोआप प्राप्त झाले.

अहो आश्चर्यम् ?

बुद्धिपुरस्सर उभारलेल्या स्मारकांत कबर, समाधी, पुतळे ह्यांचाच प्रामुख्याने अंतर्भाव होतो. महात्मा गौतम बुद्धाचे स्तूपदेखील अशाच स्मारकात मोडतात.

ही मोठी उद्बोधक घटना आहे की, वैदिक धर्मातील यज्ञयाग, जपजाप्य नि मूर्तिपूजा मान्य नसलेल्या कर्मकांड विरोधी बौद्धधर्मियांनीदेखील, गौतम बुद्धांच्या रक्षापात्रांवर मोठमोठे स्तूप उभारले, पुतळे उभारले, आणि पूजे-अर्चेचे सर्व षोडषोपचार सुरू झाले ! पण त्यात नवल ते कसले ? महापुरुषाची महान् स्मारके नि मंदिरे उभारून, त्यांची स्मृती जागृत ठेवण्याची भावना मानवाच्या रोमरोमांत भरली आहे. बौद्ध-स्तूपांपैकी सर्वात भव्य स्तूप आहे भोपाळमधील सांची येथे. तो ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात उभारला असून, त्याच्या प्रवेशद्वाराच्या कमानी फार सुंदर आहेत. ह्या कमानींवर महात्मा गौतमबुद्धाच्या आयुष्यातील प्रसंग उत्कृष्टपणे कोरलेले आहेत.

हिंदूंची अथवा बौद्धांची गोष्ट सोडाच, मूर्तिपूजा अजिबात मान्य नसलेल्या मुसल्मानांनीदेखील आपल्या प्रेषिताच्या स्मृति-गौरवार्थ, अप्रत्यक्षपणे मूर्तिपूजा अंगिकारली. नुकतेच गाजून गेलेले ' हजरत-बल ' मधील बालप्रकरण ! महम्मद पैगंबराच्या केश-पूजनाचा हा हव्यास हिंदूंच्या केशव-पूजनाच्या हव्यासाहून अणूमात्र कमी नाही ! आणि हे स्वाभाविकच आहे. कारण ' धर्मसंस्थापनार्थाय ' जन्म घेणाऱ्या महापुरुषाच्या स्मारकासाठी मानवी मन सदैव आसुसलेलेच आहे.

महम्मद पैगंबराचा केस जपून ठेवणाऱ्या मुसल्मानांना, अथवा रामदासस्वामींच्या वस्तु सज्जनगडावर जपून ठेवणाऱ्या समर्थ-भक्तांना, जुनाट नि भाबडे म्हणून हसण्याचे कारण नाही. कारण बाल्शेव्हिक क्रांतीचे अपत्य असलेल्या आधुनिक रशियाने तर याहून पुढची आघाडी केव्हाच गाठली आहे ! रशियातील क्रांतीचा थोर प्रणेता नि कम्युनिस्ट राजवटीचा पहिला ' डिक्टेटर ' लेनिन १९२४ साली निधन पावल्यानंतर ' सुप्रिम सोव्हिएट ' ने त्याचे भव्य स्मारक उभारण्याचे ठरविले. त्यानुसार मॉस्कोच्या लाल चौकात, क्रेमलिनच्या तटाखाली, काळ्या दगडाचे भव्य थडगे बांधण्यात येऊन, त्यात सुगंधी द्रव्यांनी भरलेला

(Enbalmed) लेनिनचा देह ठेवण्यात आला. या देहाचे दर्शन घेण्यासाठी लेनिनच्या पुण्यतिथीला अथवा १ मेच्या क्रांतीदिनी हजारो भाविक कम्युनिस्टांची रीघ लागते !

लंडनमधील 'कीर्ती-मंदिर'

आपल्या थोर पुरुषांची स्मृती पूजण्यासाठी राष्ट्र किती तत्पर असते; ह्याचे एकच उदाहरण दाखवावयाचे झाल्यास, लंडनमधील 'वेस्ट मिनिस्टर ॲबे' नामक सुप्रसिद्ध दफनभूमीकडे बोट दाखवावे लागेल. ब्रिटिश पार्लमेंटच्या जवळच असलेले हे 'सुंदर स्मशान' इ.स. १०५० ते ६५ या कालखंडात उभारले गेले. दुतर्फा भव्य खांब असलेले रम्य मार्ग, 'टोकदार' कमानी, बारीक नक्षीकामाच्या शोभिवंत जाळ्या ह्यांनी आकर्षक झालेल्या ह्या ठिकाणी ११ प्रार्थना-मंदिरे असून, ठायी ठायी उंच मनोरे आहेत. या ठिकाणी थडगे उभारले जाणे हा बहुमान समजला जातो. कारण, ब्रिटनमधील अत्यंत कर्तृत्ववान थोर व्यक्तींनाच येथे अंतिम निद्रेसाठी प्रवेश मिळतो, अशी आजवरची परंपरा आहे. म्हणूनच ह्या 'वेस्ट मिनिस्टर ॲबे'ला 'कीर्ती-मंदिर' (Temple of Fame) असे हे नाव प्राप्त झाले आहे !

ब्रिटनचे मोठमोठे राजे नि राण्या, ग्लॅडस्टन, डिझरायलीसारखे राजकारण धुरंधर ह्यांना तर येथे अंतिम विश्रांती मिळाली आहेच; पण शारदेच्या थोर उपासकांनाही येथे मानाचे स्थान आहे. ह्या महान साहित्यिकांची स्मृती जागृत ठेवणारी स्मारके जेथे उभारली आहेत त्या विभागाला "Poets Corner" असे नाव पाडले आहे. तथापि थोर व्यक्तींच्या स्मरणार्थ इतरत्र बांधलेली मोठमोठी थडगी नि समाध्या ज्यांच्यापुढे अगदी खुज्या वाटतील, अशी अतिभव्य स्मारके म्हणजे इजिप्तमधील पिरॅमिडस् ! — जगातील प्रथम क्रमांकाचे आश्चर्य ! प्राचीन मिसर देशाच्या गतवैभवाचे उत्तुंग साक्षीदार !

नाइल नदीच्या पश्चिम तीरावर सुमारे ४॥-५ हजार वर्षांपासून ही गगनभेदी पर्वताकार स्मारके उभी आहेत. इजिप्तच्या अगदी प्रारंभीच्या फारॉह (Pharaohs) राजांच्या नि राण्यांच्या कलेवरांच्या रक्षणासाठी ही अतिभव्य स्मारके अस्तित्वात आली. ख्रिस्तपूर्व २९०० ते २७५० या कालखंडात 'मेम्फिस'च्या परिसरात उभारलेले हे भव्य पिरॅमिडस्, आणि नाइलच्या तीरावरील सुमारे ६० मैल लांबीच्या टापूतील इतर शेकडो वास्तु नि वस्तू, ग्रीक इतिहासकार हेरोडोटस्पासून विद्वानांच्या संशोधनाचा विषय झाल्यास नवल कसले ? पण फारॉह राजांचे भव्य पिरॅमिड्स् आणि शेकडो थडगी, देवालये, शिलालेख, भव्य शिल्पाकृती, यांची पुरातन शान हजारो वर्षांच्या उन्हातान्हाने बरीच छिनावून नेली होती. कित्येक वास्तु नि वस्तू नाइलच्या वाळूत अर्धवट वा पूर्णतः गाडल्या गेल्या होत्या. मिसर देशाची प्राचीन चित्रलिपी काही शिलाखंडावर दिसावयाची, पण तिचा उलगडा मात्र होत नव्हता.

पण इ. स. १७९९ मध्ये नेपोलियनला ह्या चित्रलिपीसह इतर लिप्यांत लिहिलेला

एक शिलालेख सापडला आणि मिसर देशाच्या त्या अतिप्राचीन लिपीचा उलगडा झाला. ह्या घटनेने इजिप्तच्या संशोधनाला जोराची चालना मिळाली. गेल्या १०० वर्षांत तर ह्या संशोधनाचे 'Egyptology' नावाचे स्वतंत्र शास्त्रच परिणत झाले आहे. आणि त्यामुळे 'पिरॅमिडस्' नि अन्य वास्तू भरपूर बोलक्या झाल्या आहेत. इजिप्तमध्ये पाऊस अगदी कमी पडत असल्याने आणि घसरत्या वालुकाथराच्या आवरणाने ही प्राचीन स्मारके बरीच शाबूतही राहिली. इजिप्तचे पर्जन्यमान जास्त असते; तर ह्या पुरातन स्मारकांची स्थिती फारच शोचनीय झाली असती, ह्यात शंका नाही.

सर्वात भव्य पिरॅमिड आहे गिझेह (Gizeh) येथे खुफा (Khufa) नामक मिसर राजाने बांधलेला. त्याचा पाया ७५५ चौ. फूट असून तो इतर पिरॅमिडस्प्रमाणेच चारी बाजूंनी त्रिकोणाकृति दिसतो. त्याची उंची ४८१ फूट आहे. इतर पिरॅमिडस्प्रमाणे खुफाच्या ह्या भव्य पिरॅमिडस्चे दगड नाईल-नदीच्या पैलतीरावरून आणलेले आहेत. सुमारे १ लक्ष कामगार २० वर्षे ह्या भव्य स्मारकासाठी राबत होते !

राजेशाही मालमत्ता

ह्या पिरॅमिडस्मध्ये राजा-राणीची, विशिष्ट रसायने भरून जशीच्या तशी राखलेली कलेवरे (Mummies) मध्यभागी ठेवलेली असत. ह्या मुख्य कबरीशेजारी पिरॅमिडस्च्या आवरणाखाली इतरही दालने असतात. जणू सबंध राजवाड्यासह राजा-राणींना ह्या भव्य थडग्यात चिरविश्रांती देण्यात येई ! इतर दालनात मोठमोठी भांडीकुंडी, नानाविध शस्त्रे, मंचक, गाद्यागिर्द्या, सिंहासने, दागदागिने ठेवण्यात येत असत. आणि त्यांच्या भिंतींवर राजाची दिनचर्या दाखविणारी चित्रेही काढली जात.

यातील काही वस्तु अद्यापि टिकून आहेत, पण हजारो बहुमोल वस्तु चोर-लुटारूंनी केव्हाच पळविल्या आहेत. ख्रिस्तपूर्व १३५३ मध्ये निधन पावलेल्या 'तुतान्खामेन्' (Tutan - Khamen) ह्या राजाच्या थडग्याचा १९२२ साली शोध लागला. सुदैव हे की, ह्या थडग्यातील सर्व वस्तु अगदी सुरक्षित नि सुस्थितीत राहिल्या होत्या. कोरीव लाकडी सामान, मोठ्या चाकांचा रथ, सोनेरी बिछाने, रत्नखचित सिंहासन, सर्व काही ! त्यामुळे प्राचीन मिसरच्या इतिहासावर मोठाच प्रकाश पडला.

मृतांच्या शरीराची 'ममी [illegible] ती थडग्यात ठेवावयाची नि तिच्या भोवती सारा लवाजमा ठेवायचा हे प्राचीन मिसरदेशीय स्मारकाचे वैशिष्ट्य. त्याचे मूळ आहे तत्कालीन लोकांच्या धर्मकल्पनेत. त्यांची श्रद्धा होती की, 'देहावसान झाले तरी आत्मा जिवंत राहतो. आणि मग 'ओसिरिस्' (Osiris) नामक सर्वश्रेष्ठ देवाकडून त्याच्या पापपुण्याची परीक्षा होते. तीत पुण्य अधिक भरले तर तो आत्मा पुनश्चः आपल्या देहात प्रवेश करतो. "

अशाप्रकारे आत्मा पुनः त्या कलेवरात शिरला तर त्याची खाण्यापिण्याची खोटी

होऊ नये म्हणून पिरॅमिड्स्च्या एका दालनात खाद्यपदार्थ नि पेये ठेवलेली असत ! म्हणूनच मेहन्क्वेत्रे (Mehenkwetre) येथील भव्य थडग्यात दोन दासींच्या ज्या सुंदर मूर्ति सापडल्या आहेत, त्यांच्या मस्तकावरील पेल्यात अन्न व पेय ह्यांचे कुंभ असून उजव्या हातात पक्षी आहेत ! बिचाऱ्या हजारो वर्षे त्या आपल्या माल्काच्या पुनरागमनाची वाट पहात आहेत - पण अद्यापि त्याचा पत्ता नाही !

कबर-थडगे-समाधी ह्यांच्याहून सुलभ नि लोकप्रिय स्मारक-प्रकार म्हणजे पुतळा उभारणे. थडगे वा समाधी एकच असू शकते; पण स्मारके म्हणून उभारलेले पुतळे शेकडो असू शकतात. थोर पुरुषांचे हुबेहुब पुतळे घडवून ते उभारण्याची स्मारकपद्धती जर मोंगल-रियासतीत वा मराठेशाहीत प्रचलित असती, तर भावी कालातील चित्रकारांचा फायदाच झाला असता. त्या अभावी आज तत्कालीन कित्येक थोर व्यक्तींची चित्रे कल्पनेनेच रेखाटावी लागत आहेत !

असो. प्रत्येक देशाने आपापल्या कर्तृत्वशाली व्यक्तींची स्मृती पुतळे उभारून जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, लंडनचा ट्राफल्गार-चौक नि त्यात उभारलेला सेनापती नेल्सनचा भव्य पुतळा, ट्राफल्गारच्या लढाईतील रोमहर्षक मर्दुमकीची आणि रणमर्द नेल्सनची स्फूर्तिदायक आठवण वर्षानुवर्षे करून देत आहे. 'जोन ऑफ आर्क 'चा अश्वारूढ पुतळा याचप्रकारे त्या वीरांगनेचे स्मरण करून देणारा आहे. अश्वारूढ पुतळ्यांच्या (ॲंकेस्ट्रियन् स्टॅच्यूज्) कलेतील तो एक आदर्श मानला जातो. आपल्या महाराष्ट्रांतील शिवरायांचे पुतळे (विशेषत: प्रतापगडावरचा) आणि लोकमान्यांचे पुतळे (विशेषत: मुंबईच्या चौपाटीवरचा) मूर्तिस्वरूप स्मृति-गौरवाची जवळची उदाहरणे होत.

थोर व्यक्तींच्या स्मारकांच्या ह्या विविध प्रकारच्या पार्श्वभूमीवरच, पंतप्रधान नेहरूंच्या स्मारकाचा विचार झाला पाहिजे. खुद्द पंतप्रधान नेहरूंनी " आपल्या मागे आपले पुतळे उभारले जाऊ नयेत, " अशी इच्छा प्रकट केली होती, आणि ती त्यांच्या थोरवीला शोभणारीच आहे, ह्यात शंका नाही.

पण ही त्यांची इच्छा जनतेला कितपत नि किती काळ पसंत पडू शकेल, याविषयी शंकाच वाटते. पंतप्रधान नेहरूंनी केवळ गंगेतच आपली चिमूटभर रक्षा विसर्जित करावी आणि बाकीची विमानातून देशभर विखरून टाकावी अशी इच्छा आपल्या मृत्यूपत्रात व्यक्त केली होती. पण सरकारने व जनतेने ती काटेकोरपणे अमलात आणली नाही. त्यांनी देशातील सर्व प्रमुख नद्यात रक्षा-विसर्जन समारंभपूर्वक केले आणि महाराष्ट्र सरकारने रिकामा रक्षाकलशदेखील स्मारक म्हणून जतन केला ! पण त्यात वावगे असे काय आहे ? जनतेच्या भक्तीला नि आदरभावनेला निर्गुण निराकाराची भावपूजा करणे नेहमीच अशक्य असते. जनतेने पं. नेहरूंच्या अनेक आज्ञा मनापासून पटल्या नाहीत तरी, मानल्या. पण ह्याबाबत ती नेहरूंची इच्छा मानणार नाही, हे उघड आहे !

केवळ एखाद्या नगराला, वस्तीला, इमारतीला, तलावाला, चौकाला वा राजमार्गाला नेहरूंचे नाव दिल्याने सगुणोपासक जनतेचे समाधान होणार नाही. " जुनी पाटी खोडून नेहरूंच्या नावाची नवी पाटी एखाद्या स्थळी लटकावणे " हे लटके नि लुटुपुटीचे स्मारक झाले ! ज्याने सतत ४ तपे देशकार्यार्थ तन-मन-धन वेचले आणि भारताला लोकशाही समाजवादाच्या युगात आणून दाखल केले त्या महान नेत्याची स्मारके नव्याने उभारलेली, विधायक कार्यास चालना देणारी, नि जनतेच्या सगुण भक्तीची भूक भागविणारीच असली पाहिजेत. येथे केवळ रुक्ष व्यवहारवादाचे काम नाही.

●

(रविवारची लोकसत्ता : १४.६.१९६४)

२६. ।। तुका म्हणे अवघे सोंग, तेथे कैचा पांडुरंग ।।

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

शब्दांचे अर्थ बदलतात.... एकेकाळी 'हर हर महादेव' ही महाराष्ट्राची समर-घोषणा होती. आज ती भोजनसमारंभाची नांदी झाली आहे. एकेकाळी 'गेट टुगेदर' हा मित्रमेळावा होता, आता त्याचा अर्थ 'मद्य पार्टी' असा झाला आहे !

एकेकाळी 'हुंडा' याचा अर्थ वधूपक्षाने वरपक्षास द्यावयाची रोख रक्कम असा होता, आता त्याचा अर्थ 'फॉरेन 'मधील 'उच्च शिक्षण', 'नवा फ्लॅट', 'डिस्पेन्सरी' इत्यादींसाठी सोसावयाचा भुर्दण्ड असा झाला आहे ! 'जयहर 'चा जोहार बनणे, 'शाक्त 'चा छाकटा होणे, 'तारावलम् 'चा तारांबळीत रूपांतरीत होणे अशी शब्दांच्या अर्थपालटाची आणि मूळ संकल्पनेतील बदलाची अनेक उदाहरणे आहेत. !...

'पंढरी,' 'यात्रा,' 'जत्रा' या शब्दांचे नि त्यामागील संकल्पनांचेदेखील असेच काहीसे झाले आहे !.... पूर्वीच्या काळी यात्रेला बहुसंख्य लोक पायीच जात असल्यामुळे तिला 'पदयात्रा' म्हणण्याचे काहीच कारण नव्हते. पण राजकीय संतांनी आणि पंतांनी आपल्या प्रचारकी कार्याला उठाव आणण्यासाठी पदयात्रांची शक्कल काढली !.... राजकारण्यांच्या उपाधीने 'यात्रा' या शब्दातील पावनतेची आज ना उद्या 'अंत्ययात्रा' निघण्याची आपत्ती या भ्रष्टाचार युगात निर्माण झाली आहे !

आमचा हा देश इतका यात्रा-जत्राप्रिय आहे की संपूर्ण जीवनच यात्रेच्या रूपकाने वर्णन करण्याची प्रथा रूढ झाली. मानवी जीवन ही एक यात्रा ! पण फारच थोड्या माणसांच्या जीवनाला यथार्थपणे यात्रा वा जत्रा म्हणता येईल. कारण यात्रेला कोणते ना कोणते दैवत हवे असते ! आजच्या स्वयंकेंद्रित मानवांना स्वत:च्या मतलबाखेरीज कोणते दैवत उरले आहे ?

स्वा. सावरकरांनी 'जगन्नाथाचा रथोत्सव' ही नितांतसुंदर कविता लिहून 'सारे विश्व म्हणजे त्या विश्वंभराची रथयात्राच होय.' अशी उदात्त कल्पना मांडली आहे ! 'कालपथाच्या अतूट उतरणीवरून जगन्नाथाचा रथ नक्षत्रकणांचा धुराळा उडवीत, शतशत चंद्रज्योती उजळत आहेत, अधुनमधून धूमकेतूंचे बाण उडत आहेत, अशा थाटामाटात

वेगाने पुढे चालला आहे ! ' असे उत्तम रूपक योजून सावरकरांनी ' यात्रा ' ह्या संकल्पनेची भव्यता नि पावनता वृद्धिंगतच केली आहे ! पण....

आजची साहित्य संमेलने, नाट्य संमेलने, पुस्तकांचे ग्रॅन्ड सेल्स ह्यांनी ' पंढरी, ' ' जत्रा, ' ' यात्रा, ' हे शब्द आपल्या गौरवार्थ योजून त्यांचे अवमूल्यनच केले, असेच अनेकदा म्हणावेसे वाटते. (आमच्या बॉम्बे बुक डेपोचे कुमठाशेठ ह्यांचे स्वत:चे नावच ' पांडुरंग ' असल्यामुळे त्यांच्या ' पुस्तक-पंढरी 'ची ' अर्थ 'पूर्णता कदाचित नावापुरती मान्य करावी लागेल !) जिथे उच्च ध्येयाचा पांडुरंग नाही, उदात्त भावनांची चंद्रभागा झुळझुळत नाही, जिच्या काठी भक्तीचा फुलमळा फुलल्याच नाही, तिथे कुठली पंढरी ? नि कुठली जत्रा ? आमच्या नाट्य संमेलनाला ' नाट्य पंढरी ' नि साहित्य संमेलनाच्या उरूसाला ' साहित्य पंढरी ' म्हणून गौरविले जाते. पण तेथील प्रसिद्धीलोलुप अहंकाराचे, लब्धप्रतिष्ठितांच्या डामडौलांचे, टाळ्याघेऊ व्याख्यानबाजीच्या हिकमती हिशेबीपणाचे दर्शन घडताच ह्या संमेलनांना ' जत्रा ' वा ' पंढरी ' म्हणणे अलंकारदृष्ट्याही अयोग्य वाटू लागते. आणि सहज तुकोबारायांचे उद्गार आठवतात...

तुका म्हणे अवघे सोंग
तेथे कैचा पांडुरंग !

ह्या खोट्या आणि खऱ्या जत्रा ह्यांतील साम्य-भेद पाहण्यासारखे आहेत. दोन्ही ठिकाणी समुदाय एकत्रित येतो, गर्दी होते. एकत्र रहाणे, भोजन करणे दोन्ही ठिकाणी घडते. पण देवाच्या जत्रेचे ' आमंत्रण ' नसते. ' स्पेशल इन्व्हिटेशन तर नसतेच नसते ! पांडुरंग हाच पंढरपूरच्या जत्रेचा कायमचा ' प्रेसिडेंट ' असतो, अध्यक्ष असतो ! आमच्या आधुनिक जत्रांत मात्र अध्यक्ष दर वर्षी बदलतात. (अपवाद... ह्या वर्षीच्या नाट्य संमेलनाचे पुनश्च वन्समोअर घेतलेले अध्यक्ष प्रभाकर पणशीकर) बरे, हे अध्यक्ष तरी अगदी श्रेष्ठ असतात काय ? भरोसा नाही, कारण ह्या अध्यक्षपदाच्या निवडणुकांनी तर हल्ली जिल्हा परिषद-पातळी गाठली आहे ! कोऱ्या मतपत्रिका गोळा करू शकणारे समर्थ-गणंग ज्याच्यापाशी आहेत, तो मामुली माणूसही हुकमी बहुमताच्या जोरावर प्याद्याचा फर्जी होऊ शकतो !... मतवाला हाच येथे किंमतवाला !....

पंढरपूर, गाणगापूर, जेजुरी, माहूर इत्यादि शेकडो जत्रांत खरा भक्तिभाव अद्यापि टिकून आहे, पण आमच्या साहित्यिक नि कलाक्षेत्रीय जत्रांत भाव खाण्याची भक्ती आहे !.... परिसंवादासाठी, व्याख्यानांसाठी येथे नामवंत साहित्यनवाझांना वा नाट्यनवाझांना ' फर्स्ट क्लास फेअर ' द्यावे लागते, शिवाय ' फर्स्ट क्लास लॉजिंग बोर्डिंग !.... ' हा सर्व भत्ता आगाऊ मिळाला तरी ऐन वेळी ' प्रोग्रॅम कॅन्सल करणारे ' नि पैसै खिशात घालणारे महाभागही कुठे कुठे आढळतात. याच्या उलट आमच्या पारंपारिक जत्रांत हरेक भक्ताला स्वखर्चे यावे लागते. राहाण्या-जेवणाची सोय जुळेल तेथे स्वत:ची स्वत:च

करून घ्यावी लागते. धर्मशाळा नच लाभली, तर झाडाखाली तळ ठोकावा लागतो ! साहित्य-नाट्य जत्रांचे तसे नाही. बड्या पाहुण्यांच्या नि प्रतिनिधींच्या 'सर्व सोयी' करण्यात बिचाऱ्या आमंत्रकांच्या नाकीनऊ येतात. 'कुठून झक मारली नि हे संमेलन भरविले' असे त्यांना होऊन जाते. साहजिकच आहे. कारण ह्या शिष्ट लोकांना 'रिसिव्ह' करण्यापासून तो परतताना स्टेशनवर जाऊन डब्यात बसविण्यापर्यन्त यजमानांच्या आतिथ्यशीलतेचा अंत पाहाण्यात येतो !....

पालख्यांचे येण्याचे क्रम परंपरेनुसार ठरलेले असल्यामुळे पंढरीच्या जत्रेत मानापानाचा प्रश्न नसतो. पण आमच्या ह्या आधुनिक जत्रांत प्रतिदिन कोणते ना कोणते 'मानापमान' नाटक चालू असते ! हे काय जेवण आहे ?... अरे पिण्याची राहो, खाण्याची सोय तरी ठीक कराल की नाही ? असे म्हणून जावयाच्या रुबाबात भरल्या ताटावरून उठणारे महाभाग ह्या संमेलन, जत्रांत आढळतात. पण देवांच्या जत्रेत मात्र जे साधेसुधे नि जाडभरडे जेवण मिळते त्यालाही यात्रेकरू महाप्रसाद बिनतक्रार म्हणतात ! रात्रीचा सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे नाट्यप्रयोग ... आटोपल्यानंतर चौथा धुंद अंक ! त्याखातर कॅन्टिनवाल्याला तिष्टत ठेवणारे आणि अखेर 'केवढे' हे थंड जेवण म्हणून ताट फेकून देणारे नखरेल रसिकवर्य आम्हास ठाऊक आहेत.

'तीर्थ-प्राशन' तर दोन्ही प्रकारच्या जत्रांत असते हे खरे. पण त्यात अंतर मात्र जमीन-अस्मानाचे असते. साहित्य, नाट्य जगतात हल्ली चांगलेच बोकाळलेले तीर्थ-प्राशन संमेलनाच्या आनंदोत्सवात प्रतिनिधी-निवासात घुसत नसले तरच नवल !.... तीर्थप्राशनावरून साहजिकच पत्रकारांची बरी आठवण झाली. श्री पांडुरंगाला वा खंडोबाला काही पब्लिसिटीची जरुरी नसते. पण आधुनिक जत्रांचा उद्देशच मुळी 'पब्लिसिटी' हा असतो. मग त्यात पत्रकारांची खास सोय करणे क्रमप्राप्तच नव्हे काय ?

पंढरपूरच्या जत्रेत 'जय जय विठोबा रखुमाई' असा जयघोष टाळ-मृदंगाच्या साथीत होतच असतो. पण बिचारा पांडुरंग विटेवर एकटाच उभा आहे. रुक्मिणीदेवीचे मंदिर अलग आहे ! आमच्या साहित्य, नाट्य संमेलनाचे पांडुरंग (म्हणजे अध्यक्ष महाराज) आणि गरुड-हनुमंत वगैरे (म्हणजे खास निमंत्रित शिष्ट) मात्र बहुशः आपापल्या रुक्माईसह.... आणि जमलेच तर 'राई' समवेतही जत्रेत शोभा आणण्यासाठी येतात ! अर्थात् हा निनावी खर्च संमेलनाच्या यजमानांच्या बोडक्यावर बसविण्याची त्यांची कोशिश असते.

काही वर्षांपूर्वी एका जुन्या पिढीतील संमेलनाध्यक्षाने मात्र, आपल्या कुटुंबाचा प्रवासखर्च आमंत्रकांच्या शिरावर पडू नये म्हणून पुढील सूचना मांडली... मी काही अमुक अमुक अध्यक्षांसारखा विमानखर्चासाठी अडून बसलो नाही. तुम्ही मला देऊ केलेल्या फर्स्ट क्लास रेल्वे-खर्चावर मी संतुष्ट आहे. पण समजा, मी एकट्याने प्रथम वर्गाने येण्याएवजी,

माझी पत्नी आणि तीन मुले यांच्यासह मी द्वितीय वर्ग वा एस. टी.ने आलो तर चालेल काय ?

देवांच्या जत्रेत गायन-कीर्तनच नव्हे, तर तमाशेही होतात. पण हे सारे सेवा म्हणून विनामूल्य ! त्यांचा बोजा जत्राचालकांच्या (देवस्थानांच्या) डोईवर काही बसत नाही. पण आमच्या साहित्य, नाट्य-संमेलनात होणाऱ्या नाट्य-गायनादि कार्यक्रमांची बिदागी कलाकार मंडळी चोख वसूल करीत असतात. सर्व धार्मिक जत्रांची किमान व्यवस्था पहाणे हे सरकारचे नि संबंधित मंत्र्यांचे कामच असते. ह्या जत्राही त्या मंत्र्याला तुच्छ लेखत नाहीत. पण आमच्या साहित्य-संमेलनाचा वा नाट्य-संमेलनाचा नखरा विलक्षण ! संमेलनाच्या व्यासपीठावर मंत्री नको अशी सोवळी नि बाणेदार भूमिका आमचे कित्येक गब्रू घेत असतात, पण चतुर कार्यकर्ते हे ओळखून असतात की, संमेलनाचा तीन दिवसांचा शानदार जल्लोष सामान्य रसिकांच्या वर्गण्यांवर पार पडू शकत नाही ! म्हणूनच कोणत्या ना कोणत्या प्रबल राजकारणी पुरुषांच्या (बहुशः सत्तारूढाच्या) सहाय्याची प्रकट वा गुप्त गंगा धावून येत असते. सत्तारूढांशी सलोख्याचे संबंध असलेले सेठ-साहुकार नि व्यापारी तीन ते पाच लाखांचा चंदा या आधुनिक जत्रेकऱ्यांसाठी गोळा करीत असतात !

साहित्यिक जत्रांत साहित्यिक नि नाट्य-संमेलनांत नाट्य-कलाकार ह्यांची उपस्थिती फार कमी असते. बाजारबुणगेच अधिक, हेही या जत्रांचे वैशिष्ट्य सांगता येईल. आणि म्हणूनच अधुनमधून परिसंवादाचा विषय जाहीर होतो की, ' ह्या संमेलनाची जरूरीच काय ? ती बंद का करू नयेत ? '

●

(उत्सव : १९८५)

२७. व्याख्यानांचा हंगाम आणि हंगामा !

/ / / / / / / / / / / / / / / / / / /

वसंत ऋतु सुरू झाला की महाराष्ट्रात वासंतिक व्याख्यानमालांचा हंगाम नि वक्त्यांचा (विशेषत: बिदागीबहादूर धंदेवाईक वक्त्यांचा) हंगामाही प्रतिवर्षी सुरू होतो. हे वर्षही त्याला अपवाद नाही. आणि या विषयावर लिहिण्याच्या अधिकार मला निश्चितच आहे. कारण माझे स्वातंत्र्यपूर्व काळातील बालपण नि तारुण्य स्वातंत्र्यवीर सावरकर, वीर वामनराव जोशी, बापूजी अणे, बाबासाहेब खापर्डे, दादा धर्माधिकारी, डॉ. बा. सी. मुंजे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, गोवर्धनदास पारीख, तर्कतीर्थ जोशी, वि. घ. देशपांडे, भाई डांगे, ना. ग. गोरे, अटलबिहारी वाजपेयी.... नावे तरी किती घ्यावी... इत्यादि प्रथम श्रेणीच्या वक्त्यांची व्याख्याने अभ्यासपूर्ण तल्लीनतेने ऐकण्यात व्यतीत झाले आहे. शिवाय १९४२ च्या चळवळीपासूनच मी सार्वजनिक जीवनात पडलो असल्याने अनेक 'व्याख्यानमालां'चा कार्यकर्ता म्हणूनही मी काम केले आहे.

योग्य श्रममूल्य द्यावेच

आज विस्तार खूप आणि त्यामानाने खोली कमी, हा अनुभव जसा अन्य क्षेत्रात येतो, तसाच सध्याच्या वक्तृत्वक्षेत्रातही येतो. इथे मराठीचिये नगरी, वसंत व्याख्यानमाला, शरद व्याख्यानमाला, हेमंत व्याख्यानमाला, शैक्षणिक व्याख्यानमाला, परिसंवाद ह्यांचा सुकाळ झाला आहे ! त्यामुळे आमच्यासारखे शब्दशूर वक्ते भरपूर ! पण जिवंत जीवननिष्ठेचे तेज ज्यांच्या वाणीत आहे, ... प्रतिपाद्य विषयांचा अभ्यास ज्यांच्या वाक्यावाक्यातून ओसंडतो आहे, थिल्लर विदूषकी न होता मार्मिक विनोदाचे चमकदार तुषार ज्यांच्या वक्तृत्व-मंदाकिनीवर उसळताहेत असे वक्ते थोडे ! पण घटत्या वक्तृत्वदर्जाची कसर वाढत्या पैसेकाढूपणाने भरून काढण्यात आमचे सामाजिक बांधिलकीवाले वक्तृत्व-चूडामणी मागे नाहीत ! " व्याख्यान हे समाजप्रबोधनाचे साधन. त्याचे पैसे मागणे अयोग्य. " हे स्वातंत्र्यपूर्वकालीन मूल्य, मी व्याख्यानमाला संचालक ह्या नात्याने थोर थोर विद्वान वक्त्यांकडून अनुभवले आहे. त्या ध्येयवादी केशराची आजच्या कमर्शिअल हळकुंडाशी तुलना करण्याचे कारण नाही ! तो जिहादी आवेशाचा जिद्दी जमाना संपला, सध्या महागाईने त्रस्त झालेले अर्थयुग रूढ झाले आहे. जीवनसंघर्ष तीव्र झाला आहे. प्रत्येकाला यथाप्रमाण श्रममूल्य मिळणे आवश्यक

आहे. पुराणिक, प्रवचनकारांपुढे श्रोते किमान वाटीभर तांदूळ ठेवतातच, ह्यातही हेच तत्त्व गृहीत धरले आहे.

काही प्रश्न

पण वर निर्देशिलेला 'यथाप्रमाण' हा शब्द महत्त्वाचा. "तुम्ही जादुगाराला, नकलाकाराला, काव्यगायकाला, नाटकांतील नकलांप्रमाणे कथा पाठ करून म्हणणाऱ्याला (म्हणजे कथाकथनकाराला) जर पैसे देता तर वक्त्यानेच काय पाप केले की, त्याच्या अकलेचे व कलेचे मूल्य त्याला मिळू नये ?" अशा सवालांचा परिणाम होऊन व्याख्यानांचे संयोजक वक्त्याला पैसे देऊ लागले आहेत. पण ते किती ? कसे ? नि ह्याबाबतच्या ठरवाठरवीचा तरीका काय ? हे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत.

हौशी नटरूपी सुरवंटाचे पॉप्युलर फुलपाखरात म्हणजेच नटवर्यात रूपांतर होताच त्याच्या "स्मोक मनी"ची जशी गरगरीत नाईट होऊ लागते, तसाच प्रकार ह्या क्षेत्रातही होत असतो ! "समाजप्रबोधन", "जन जागरण", "लोक शिक्षण" वगैरे बिरुदे मिरविणाऱ्या ह्या क्षेत्रात पॉप्युलर वक्ता (अथवा पॉप्युलॅरिटीच्या भ्रमात असलेला धंदेवाईक वक्ता...) आपले मानधन (?) 'क्वोट' करून नाना प्रकारच्या फर्माईशी करीत असतो ! काही प्रथितयश बड्या व्याख्यानमालांच्या संयोजकांपाशी असलेला पत्र-व्यवहार पाहिला अथवा त्यांच्याशी मनमोकळी बातचित केली की ह्याची कल्पना येऊ शकेल. हे काही नमुने पाहा —

सरकारी अनुदान या धन्वंतराचे दान न घेता, केवळ गावातील नागरिकांच्या वर्गण्या, देणग्यांवर चाललेल्या एखाद्या व्याख्यानमालेच्या अध्यक्षाला अशी फर्माइश आजच्या शैरेलेक्चरांकडून होते;

"माझी बिदागी रु. ५००/- आहे. शिवाय मला फर्स्ट क्लासचा प्रवासखर्च द्यावा लागेल." हे काहीच नाही. एखादा महाभाग अशा रीझनेबल (?) अपेक्षेला आणखी पुस्ती जोडतो. "माझ्याबरोबर आणखी एक माणूस येईल. त्याचा फर्स्ट क्लास प्रवासखर्चही आपणास द्यावा लागेल. शिवाय, आपल्या येथील जास्तीत जास्त उत्तम तारकांकित हॉटेलात आमची निवासव्यवस्था व्हावी !"

अशा फर्माईशीमधील "एक माणूस आणि त्याचा फर्स्ट क्लास प्रवासखर्च" म्हणजे रेल्वे कूपेकम्पार्टमेंटमधून वक्त्यासह कोणीतरी बाईमाणूस (सहसा पत्नी नव्हे) आपल्या गावी ज्ञानामृताचा कलश घेऊन येणार, अशी खूणगाठ व्याख्यानमालेचे गरजू कार्यकर्ते बांधतात ! अर्थात् एखाद्या मान्यवर, वयोवृद्ध वक्त्याने आपल्याबरोबर एखादा पी. ए. (अथवा आपली सेवाभावी पत्नी) घेऊन येण्याची इच्छा प्रदर्शित केली, तर ती व्याख्यानमालांच्या संयोजकांना मुळीच खटकत नाही. उलटपक्षी, अशा मान्यवर वक्त्यांना संयोजकच सहकुटुंब येण्याचे आमंत्रण देतात. इतकेच नव्हे तर एखाद्या प्रतिष्ठित घरीच

त्यांना उतरवितात !

तापदायक फर्माइशी

बिदागी, प्रवासखर्च, निवासव्यवस्था याखेरीज " तुझे आहे तुजपाशी "मधील आचार्यांसारख्या जेवण्याच्या, खाण्याच्या, पिण्याच्या बाबतीतही काही तापदायक (किंवा वैशिष्ट्यपूर्ण म्हणा !) फर्माइशी असतात. काही महाभाग आपल्या सिगारेटींचा, कपड्यांच्या इस्त्रीचा अथवा बूट पॉलिशचा खर्चही संयोजकांवर लादतात. तर काहीजण " छे बुवा, नुसते सुके स्वागत काही खरे नाही," असे म्हणून चातुर्याने ओल्या पार्टीची तमन्ना व्यक्त करतात ! व्याख्यानाच्या दिवशीही सकाळपासूनच सोमयज्ञ सुरू करणाऱ्या एका पैसेउकळू नामवंत वक्त्याचा सोलापूरचा एक किस्सा मजेदार आहे. महाशय व्याख्यानाच्या स्थळी गेले ते तर्र होऊन ! कार्यकर्ते परेशान. पण वक्ते म्हणाले, " डरू नका ! " व्याख्यान सुरू झाले. पहिल्या वीस मिनिटांतच " मला तुम्हाला सांगायचे आहे " हेच वाक्य सुमारे आठ-दहा वेळा वक्त्यांच्या मद्य-गंधित श्रीमुखातून प्रकट झाले. विषय पुढे सरकेचना. तेव्हा श्रोते वैतागून म्हणाले, " तुम्हाला काहीच सांगायचे नाही आणि आम्हास ऐकायचे नाही. " व्याख्यान बंद पडले. पण सौजन्यशील संयोजकांनी मानधनात काही कपात केली नाही ! अशा मजेदार मदिर-कथा तुम्हास गावोगावी ऐकावयास मिळतील.

काहीजण संयोजकांना सुचवितात की, आपल्या व्याख्यानाला अध्यक्षीय समारोपाची ब्याद नको, तर काही वक्तृत्व-रत्नांना स्वपसंतीचे कोंदण हवे असते. " अमुक-अमुक श्रीमंत पुढारी किंवा तमुक-तमुक कवयित्री वा प्राध्यापिका अध्यक्ष म्हणून लाभल्यास पाहावे. " असे ते सहज सुचवितात ! कोणाला आपला शब्दफुलांचा बहर टेप केला जावा असे वाटते, तर काही जण " परवानगीशिवाय टेपरेकॉर्डिंग करण्यास सक्त मनाई " करतात. जणू आपले व्याख्यान म्हणजे कोण्या किशोरी अमोणकरांचे वा भीमसेन-कुमार गंधर्वाचे सुश्राव्य गाणेच होय, अशी काहींची समजूत असते.

बांधिलकीवाल्यांचा आग्रह

परंतु, या अवांतर अभिलाषा सोडून दिल्या तरी मुख्य प्रश्न असतो तो बिदागीचा वा प्रवासखर्चाचा ! ह्याबाबत अनेक प्रकारचे वैताग उद्भवतात. समजा, व्याख्यान वसईला, कल्याणला, वा अंबरनाथला आहे, तर मुंबईचा (एरव्ही ऑफिसला फर्स्ट क्लासने वा बसने जाणारा वक्ता) स्पेशल कार मागतो !... संयोजकांना त्याची लठ्ठ बिदागी अधिक स्पेशल टॅक्सी, अधिक सरबराई हे फार गरम पडते. पण करतात काय ? नामचंद वक्ते पाहिजेत ना ? तर मग चंदा भरपूर गोळा करा, व्याख्यानमालेच्या तिकिटांचे दर वाढवा ! परंतु, महाराष्ट्रातील बहुसंख्य व्याख्यानमालांना तिकीट नसते (आणि तरीही पॉप्युलर वक्त्यांना पुरेशा श्रोत्यांसाठी छायागीत होईपर्यंत थांबावे लागते !) काही सामाजिक बांधिलकीवाले

विमान प्रवासाचाही आग्रह धरतात. कारण समर्थांनी म्हटल्याप्रमाणे :

महाराष्ट्र देश उरला थोडा ।
राजकारणे लोक रुधला ।
समय नाही जेवायला ।
उदंड कामे ।।
दे आर. व्ही. आय. पी.ज ॲण्ड व्हेरी बिझी !...

व्याख्यानांचे ठिकाण फार दूरचे नसेल तर एशियाडचे वा बसचे आरक्षित तिकीट काफी आहे. पण एका विदुषीने कोकणातील रोह्याचे वा रेवसचे किलोमीटर्स मोजून, फर्स्ट क्लास रेल्वे चार्ज डिमांड केल्याचे उदाहरण मला ठाऊक आहे !

एखाद्या वक्त्याला आपण राजीव गांधीप्रमाणे विख्यात असल्याचा भ्रम झाला तर त्याच्याशी वाद घालण्याचे कारण नाही. त्याचा भ्रम त्याच्यापाशी ! अथवा एखाद्याने एखाद्या पॉप्युलर नाटकी नटाहूनही अधिक बिदागी मागितली, फर्स्ट क्लास मागितला; तर त्याविषयीदेखील वाद घालण्याचे प्रयोजन नाही. परवडेल तर " हो " म्हणावे, नाही तर " नाही " ! पण तो वक्ता (किंवा कथाकथनकर्ता...) जेव्हा " बऽरं, तुमची संस्था गरीब आहे म्हणता ? तर सवलत म्हणून १५० रुपये सोडतो; " असे बार्गेनिंग करतो, तेव्हा ना त्याची शान राहात, ना संयोजकांची ना ह्या प्रबोधनकार्याची ! व्याख्यानमालांसारख्या सांस्कृतिक उपक्रमांना अशा शिरजोर वक्तृत्वकुंजरांनी आणि लाचार संयोजकांनी बाजाराचे रूप आणले आहे.

फुशारक्या

वक्त्यांना यथाप्रमाण बिदागी नि प्रवास-निवास सुखसोयी उपलब्ध झाल्याच पाहिजेत, यात वाद नाही. पण राजकीय पक्षांप्रमाणेच, दर्दीपेक्षा गर्दी हेच व्याख्यानमालांचे उद्दिष्ट झाल्यामुळे, हे " मालाकार " भलभलते पायंडे रूढ करू लागले आहेत. खरी गोष्ट अशी आहे की, आज टी. व्ही., वृत्तपत्रे इत्यादि प्रचार माध्यमांतून, विद्वान वक्त्यांची भाषणे आणि " सुन्दर ती ध्याने " सामान्यजनांना उपलब्ध होत असल्यामुळे आणि एकंदर व्याख्यानबाजीचाच त्यांना वीट आला असल्यामुळे, व्याख्यानमालांची पुनर्रचना करणे जरुरीचे झाले आहे. पण येनकेन प्रकाराने सालाबादप्रमाणे ज्ञानार्चा भव्य पाणपोई खोलण्याचे उत्साही संयोजकांचे धोरण त्यांना प्राप्त परिस्थितीत बिलंदरपणा शिकवीत आहे. होय. काही व्याख्यानमालावालेही वक्त्यांप्रमाणेच बिलंदर झाले आहेत. अन्यथा, पु. ल. देशपांडे यांच्यासारखा प्रथम क्रमांकाचा पट्टीचा (आमच्यासारखा पानपट्टीचा नव्हे) वक्ता काही भावनात्मक आवाहन करून वा भारी वशिला लावून आपण फुकटात कसा मिळविला ? व्याख्यानमालेच्या खर्चासाठी काही शेठ-सावकार कसे गटविले ?... ऐन वेळी बड्या वक्त्याने धंदेवाईक दांडी मारल्यावर आम्ही लोणकढी थाप मारून स्वत:ची व त्या मातबर

वक्तृत्व केसरीची अब्रू कशी सांभाळली ? अशा फुशारक्या ऐकू येत्याच ना.

वक्त्यांची पॉप्युलॅरिटी मोजावी कशी आणि त्यानुसार त्याची जबरदस्त बिदागी ठरवावी तरी कशी ? ह्या अडचणीवर एका कल्पक संयोजकाने सुचविलेले दोन मूलग्राही तोडगे मात्र अमलात आणून बघण्यासारखे आहेत. तोडगे असे :

१) सर्व वक्त्यांना किमान बिदागी (उदा. १०१ रु.) कबूल करावी. आणि सिझन-तिकिटाखेरीज जी दैनिक तिकीट विक्री होईल ती सर्व किंवा ५० टक्के त्या वक्त्याला द्यावी.

२) वक्त्यांचे व्याख्यान संपताच देवी सरस्वतीची आरती व्हावी आणि आरतीची निरांजने श्रोतृसमुदायात फिरवून जी रक्कम उपलब्ध होईल, ती तेथल्या तेथे मोजून वक्त्याला .... वाग्देवीच्या त्या उपासकाला बहाल करावी !

ह्यामुळे वक्त्याला आपल्या पॉप्युलॅरिटीचा अगदी रुपये-पैमध्ये अंदाज येऊन त्यावर अन्याय होणार नाही !

विशेषत: दुसरी सूचना अमलात आली तर संपूर्ण व्याख्यानमालेला पावित्र्याचाही एक सुवर्णस्पर्श लाभेल !

माझे असे स्पष्ट मत आहे की, व्याख्यान देणे हा अर्थप्राप्तीचा एक " पोट "धंदा (साइड-बिझिनेस) अशी भावना आमच्या प्राध्यापक-पत्रकार-साहित्यिक बंधूंत रुजली आहे. हे सत्य ध्यानात घेऊन व्याख्यानमाला संयोजकांनी त्या दृष्टीने आपापल्या कुवतीनुसार आपापले धोरण स्पष्ट आखावे आणि वक्त्याला " आपली मानधनाची नि प्रवासनिवासाची अपेक्षा काय आहे ? " असे विचारण्याऐवजी आपण ह्या बाबतीत काय करू शकतो, हे स्पष्ट कळवावे. आज शासनाहून श्रीमंत कोण आहे ? पण तेदेखील वक्त्याला वा कलाकाराला जुन्या भोजराजाच्या थाटात " बोल, तुझी अपेक्षा काय आहे ? वरं ब्रूहि ! " असे म्हणत नाहीत ! मानधन, टी. ए. वगैरे सर्व व्यक्ति-निरपेक्ष ! रेडिओवरील वा टी. व्ही. वरील भाषणांची बिदागी ठरलेली. कोणत्या कार्यक्रमात, किती मिनिटांना किती पैसे हे ठरलेले. मग ती टॉक देणारी व्यक्ती पु. ल. देशपांडे असो की. पु. य. देशपांडे असो — वा. ल. असो अथवा व. दि. असो !....

सरकार ज्याप्रमाणं आपल्या वाढत्या ऐपतीनुसार मानधनाचा दर वाढविते, त्याचप्रमाणे व्याख्यानमालेनेही " आमची आर्थिक स्थिती ह्या वर्षी सुधारली असल्यामुळे आम्ही गतवर्षाहून प्रत्येकी ५० रुपये अधिक मानधन देण्याचे ठरविले आहे. " असे मानधनवाढीचे शुभवर्तमान आपल्या वक्त्यांना कळविण्यास हरकत नाही ! व्याख्यान-संयोजकांनीच आपण होऊन आपल्या ऐपतीनुसार बिदागी-प्रवास-निवास ह्याबाबत आपली भूमिका, आपल्या कुवतीनुसार स्पष्ट करावी आणि घासाघाशीला वावच ठेवू नये.

महाराष्ट्रीय मध्यमवर्गीयांनी सुरू केलेली बहुतेक सर्वच सार्वजनिक कामे, आर्थिक

ओढगस्तीने गांजलेली असतात. व्याख्यानमाला ह्या नियमांना अपवाद नाही. अनेक कार्यकर्ते तनमनधनपूर्वक राबतात. म्हणून ठायी ठायी व्याख्यानमाला म्हणजे करमणुकीचा धंदा नव्हे ह्याची जाणीव असणारे वक्ते थोडे नाहीत. प्रातिनिधिक म्हणून आमचे मित्र रामभाऊ शेवाळकर ह्यांचेच उदाहरण घ्या ना. उत्कृष्ट वक्ते असूनही मानधनाबाबत शब्दही उच्चारणार नाहीत. जो दे उसका भला, न दे उसकाभी भला, अशा वृत्तीचा हा माणूस ! व्याख्यानाची वेळ गाठण्यासाठी वेळप्रसंगी ट्रकमधून कष्टकारक प्रवास करणारा. पण अशा संकोची स्वभावाच्या विद्वानांनी व्याख्यान संयोजकांकडून " घरकी मुर्गी " व्हावी आणि सौदेबाजांपुढे त्यांनी गुडघे टेकावेत, हे योग्य नाही. यासाठीच व्याख्यान-संयोजकांनी स्वत: व्यक्तिनिरपेक्ष न्याय्य नियम केले पाहिजेत. अन्यथा, या साऱ्या सांस्कृतिक-शैक्षणिक क्षेत्राला बाजारू रूप देणे अपरिहार्य आहे.

काही वक्ते फर्स्ट क्लासचा खर्च घेऊन द्वितीय वर्गाने प्रवास करतात. ह्या त्यांच्या " बचत योजने "बाबत काही व्याख्यान संयोजक नाक मुरडतात. पण ह्यावर उपाय एकच. प्रवासखर्चाचा अंतर्भाव करून, " व्याख्यानाची प्रवासखर्चासह बिदागी अमुक-अमुक देण्यात येईल; " असे संयोजकांनीच कळवावे आणि मग वक्ता फर्स्टने येतो की सेकंडने की बैलगाडीनं ह्याची फिकीर नि चर्चा करू नये. स्वत:च्या देहाला थोडे कष्ट देऊन बिचाऱ्याने चार पैसे संसारासाठी वाचविले तर बिघडले कोठे ? जुन्या जमान्याच ३०-३० दिवसांच्या व्याख्यानमाला होत असत. आजच्या दिवसात महागाई वाढलेली, चांगल्या वक्त्यांची टंचाई (पण त्यांच्या अपेक्षांची उंचाई) हे लक्षात घेऊन, परंपरेचा वृथा अभिमान न बाळगता, व्याख्यानमाला आटोपशीर करणेच हितावह ठरेल. सर्व रजिस्टर्ड व्याख्यानमालांचे तरी एक फेडरेशन केल्यास अनेक अडचणींचा सामूहिकरित्या परिहार होऊ शकेल. सुप्रतिष्ठित, संपन्न व्याख्यानमालांनी ह्याबाबत पुढाकार घ्यावा.

●

(महा. टाईम्स : ४-५-८६.)

२८. साहित्यातून एकात्मतेचा साक्षात्कार !

"India, beyond all double, possesses a deep underlying fundamental unity; far more profound than that produced either by geographical isolation or by political superiority. That unity transcends the innumerable diversities of blood, colour language, dress, manners and seet."

— Vincent Smith

थोर इतिहासलेखक व्हिन्सेंट स्मिथ ह्याने भारताच्या मूलभूत ऐक्यभावाला दिलेले हे प्रशस्ती-पत्र आहे. " भौगोलिक विलगतेमुळे अथवा राजकीय सत्ताबळामुळे निर्माण होणाऱ्या एकतेहून कितीतरी सखोल नि मूलगामी ऐक्य—वंश, वर्ण, भाषा, पेहराव, चालीरीती नि पंथ ह्यांच्या अगणित विविधतेवर मात करणारे ऐक्य— भारताजवळ नि:संशय आहे," अशी तारीफ केली आहे स्मिथ साहेबांनी ! पण, पण...

आधुनिक भारताने ही तारीफ खोटी ठरविण्याचा चंग तर बांधलेला नाही ना ? निदान देशाच्या लज्जास्पद फाळणीपासून तरी योग्य तो बोध घेऊन, भारताचे धुरीण राष्ट्रीय एकता दुर्भेद्य करतील असे वाटले होते. कसचे काय नि कसचे काय, ऐक्यभावाची हमी देणाऱ्या आमच्या पवित्र घटनेचा उपमर्द गेल्या तीन दशकात अनेकदा झाला आहे; राष्ट्रीय आकांक्षेचे प्रतीक असलेल्या राष्ट्रध्वजाचा अवमान अनेकदा झाला आहे; आणि ' राष्ट्रगीता 'चा अवमान तर न्यायमंदिरातच घडला आहे अनेकानेक संत-महतांनी, देशभक्तांनी नि शहीदांनी रक्त सांडून वा आटवून सिद्ध केलेली ती चैतन्यशील एकता कुठे गेली, न कळे !....

इंदिरा गांधी, जनरल अरुणकुमार वैद्य, संत लोंगोवाल, लाला जगतनारायण इत्यादि थोर नामवंतांच्या नि हजारो अनामिक सामान्यांच्या रुधिराभिषेकानेही अद्यापही शांत न झालेला पंजाब, अतिरेक्यांच्या ' खलिस्तानी ' घोषणांनी आणि हिंसाचारांनी त्रस्त झाला आहे. भारताचा खड्गहस्त नि शूर संरक्षक असा नावलौकिक संपादिलेला हा पाच पवित्र नद्यांचा प्रदेश !.... अद्याप द्वेष, संशय, भीती नि पंचमस्तंभीय कुटिल कृती ह्यांच्या मगरमिठीतून सुटलेला नाही. केशरी-मळवटाने भूषित झालेले भारतमातेचे ललाट म्हणजे काश्मीर ! त्याच्या गुलाब बागांतील फुटीरतेचे घूत्कार अद्यापि नष्ट झाले नाहीत आणि

३७० व्या कलमाचा विषारी वृक्ष छाटला गेला नाही ! हिरव्याकंच वन्यसंपदेचा कामरूप उर्फ आसाम ! तेथील परकीय घुसखोरांची समस्या निकालात निघालेली नाही: नागालँड मिझोराममधील तात्पुरती डागडुजी केव्हा निखळेल ह्याचा नेम नाही ! 'काश्मीरप्रमाणेच आम्हास स्वतंत्र दर्जा हवा' अशी तमन्ना येथील सौदेबाज राजकारण्यांच्या दिलात दबा धरून आहेच ! 'गुरखालँड'चे फुटीरतावादी तुणतुणे वाजतेच आहे ! आणि तदितर भारतातही नानाप्रकारे विघटनकारी प्रवृत्ती, कधी सीमाप्रश्नाच्या निमित्ताने, कधी जलवाटपाच्या निमित्ताने, कधी हिंदी-विरोधाच्या कारणाने तर कधी राखीव जागांच्या प्रश्नाच्या आधारे आपले अशुभ दर्शन घडवीत आहेत ' पुजास्थानांची विटंबना, यातील दंग्यांचे उद्रेक, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्राच्या होळ्या इत्यादि प्रकार 'राष्ट्रीय एकात्मता' खतऱ्यात असल्याचीच अवलक्षणे होत.

सौदेबाजांनी जोपासलेली व्याधी !

सर्वच राजकीय पक्षाच्या सौदेबाज आणि सत्तालोलुप राजकारण्यांनी व चळवळ्यांनी ही फुटीरता-व्याधी कधी कळत तर कधी नकळत जोपासली. फुटीरतावादी प्रवृत्तीपुढे गुडघे टेकले. एकगट्ठा मतांच्या हव्यासापायी जातिभेदांच्या, भाषाभेदांच्या ज्वालांना फुंकर घातली. आणि आता त्या ज्वालांचे चटके त्यांनाही बसू लागल्यावर 'राष्ट्रीय ऐक्या'च्या घोषणांचे-परिसंवादांचे नि मेळाव्यांचे-ढोल ते पिटू लागले आहेत. पण शंभर उंदीर खाऊन काशीयात्रेला निघालेल्या बोक्यांना जसा मोक्ष मिळणे अशक्य, त्याचप्रमाणे विश्वासार्हता गमावून बसलेल्या राजकीय पुढाऱ्यांना राष्ट्रीय एकतेच्या कार्यात खरेखुरे यश मिळणे अशक्य !

पु. ल. देशपांडे यांच्या 'सुंदर मी होणार'मध्ये म्हटले आहे तेच खरे - "मंत्र उच्चारायला महात्माच हवा असतो !" म्हणूनच राष्ट्रीय एकात्मतेचा महामंत्र आता चारित्र्यसंपन्न समाजसेवकांकडून, बिगरराजकीय संस्थांकडून-स्वयंसेवक संघटनांकडून एकदिलाने उच्चारला गेला पाहिजे. समाजसेवक-साहित्यिक-कलाकार ह्या महान कार्याच्या दिंडीत अग्रभागी असले पाहिजेत. त्यांचा मार्ग सुखकर करणे- किमानपक्षी त्यात काटे न पेरणे- एवढेच राजकारण्यांचे काम. सत्ताराजकारणाने ज्यांचे हात बरबटले आहेत, त्यांच्या खांद्यावर एकात्मता-कार्याची पताका कितपत शोभून दिसणार ?

खरे पुसाल तर विघटनकारक शक्तींशी मुकाबला करीत, एकात्मतेचा दुर्ग राखण्याचेच नव्हे तर मजबूतही करण्याचे काम इतिहासकाळात प्रामुख्याने लोकोद्धारक संतांनी आणि साहित्यिकांनीच केले आहे. (आणि सूज्ञ राज्यकर्त्यांनी त्याला हातभार लावला आहे.) इतिहासकाळातील ती पुण्याई आजच्या भेदपटूंच्या पातकाने झाकोळली गेली आहे; पण नष्ट झालेली नाही. म्हणूनच, भारत हा देश अद्यापि ठिकाणावर आहे. नाहीतर विच्छेद-वेताळ एकाच फाळणीवर थांबला नसता ! आजही बाबा आमटे आणि अन्य अनामिक कार्यकर्ते घुमसत्या पंजाबात जाऊन जातीय सलोख्याचे नि मानसिक जखमा बुजविण्याचे काम

करीत आहेत. 'वनवासी कल्याणाश्रमा'चे शेकडो कार्यकर्ते आसाम-नागालँड-मिझोराम-अरुणाचल प्रदेशात एकात्मता साधण्यासाठी ठाण मांडून बसले आहेत. 'विवेकानंद स्मारक समिती', 'रामकृष्ण मिशन', 'राष्ट्रीय एकजूट', 'मुस्लीम सत्यशोधक समाज' इत्यादि संस्था आपल्या क्षेत्रात राष्ट्रीय ऐक्याची जोपासना करताहेत. फुटीरतेच्या काळ्या मेघाला लगटलेली ही चंदेरी आशादायी किनार कशी वृद्धिंगत होईल, इकडे आमचे राज्यकर्ते लक्ष पुरवतील काय हाच एक मुश्किल प्रश्न आहे.

राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रामाणिक उपासकांना उत्तम प्रेरणा नि मार्गदर्शन देईल असाच आमचा इतिहास आहे. केवढा खंडप्राय देश ! त्यात किती वंश, किती राज्ये, किती भाषा, किती जाती ! पण तो एकाच उदात्त नि उदार संस्कृतीच्या सूत्रात गुंफण्याची अवघड कामगिरी आपल्या प्रतिभाशाली ऋषींनी-साधुसंतांनी-कविश्वरांनी आणि कलाकारांनी करून दाखविली. म्हणूनच अनेक पुरातन संस्कृती नष्ट झाल्या पण भारतीय एकात्मतावादी संस्कृती टिकून राहिली !

एकता पोषक प्रगल्भ अध्यात्म !

ही संस्कृती राष्ट्रीय एकतेला पोषक असण्याचे मुख्य कारण तिच्या बुडाशी असलेले प्रगल्भ अध्यात्म. ह्या संस्कृतीचा सर्वात जास्त महत्त्वाचा नि पहिला ग्रंथ जो ऋग्वेद, त्यात-

'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति ।'

(म्हणजे सृष्टीच्या मुळाशी असलेले नामरूपातीत चैतन्य एकच असून, विप्रलोक - सूज्ञ लोक -त्याला भिन्न नावांनी संबोधतात) असे स्पष्टपणे म्हटले आहे. अशा प्रकारच्या सूत्रातील एकेश्वरवादच उपनिषद्कालीन विचारवंतांनी आणखी पुढे नेला आणि अद्वैतवादाची प्रतिष्ठापना केली. "ईश्वर आणि त्याने निर्मिलेली सृष्टी ह्यात द्वैत नाही; ह्या चराचर सृष्टीच्या मुळाशी असलेले चैतन्य तिच्या कणाकणात वास्तव्य करीत आहे. ह्या चैतन्यालाच ब्रह्म म्हणतात, ईश्वर म्हणतात. परमात्मा म्हणतात." ह्याच अद्वैत वेदान्ती विचाराचा खोल ठसा भारताच्या सर्व संत-साहित्यात उमटला. म्हणूनच आपले संत ज्ञानेश्वर 'जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत' असे ठामपणे सांगून गेले ! हीच वैदिक विचारसरणी आमच्या समाजातील सर्व देव-देवता-पूजनाला, उपासनेला पायाभूत असल्यामुळे विविध समाजांना-जातींना-पंथांना आमचे थोर पूर्वज एकाच सूत्रात बांधू शकले. परमेश्वराचा साक्षात्कार हे सर्वोच्च साध्य असले, तरी त्यांची साधने भिन्न भिन्न असू शकतात, हा समंजस सहिष्णु विचार एकात्मभावाला पोषकच ठरला. ज्यांच्याशी काही काळ अपरिहार्यपणे संघर्ष आले, त्यांच्याशीच संस्कृतीसंगमही ह्या पुण्यभूमीत घडू शकला !

अहो, वेदांचे प्रामाण्य न मानणाऱ्या बुद्ध - महावीरांचादेखील (निरीश्वरवाद्यांचादेखील) येथे छळ न होता, त्यांना परमेश्वरी अवतारांची प्रतिष्ठा लाभली ! मोहेंजोदारो व हराप्पा

येथील ' सिंधु संस्कृती 'चे जनक जे दस्यु त्यांच्याशी अटीतटीचे रणसंग्राम घडले. पणी - व्रात्य आणि दक्षिणेतील द्राविड इत्यादींशीही संग्राम झडले. परंतु ह्या संग्रामाहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या आर्येतरांचे मुख्य-प्रवाहात स्नेहपूर्ण समितीकरण झाले ! आर्यांनी आर्येतरांचे देव स्वीकारले, पूजापद्धती स्वीकारल्या. शिव आणि पार्वती वस्तुत: आर्येतरांची दैवते; पण आर्यांच्या देव्हाऱ्यात महादेव नि महादेवी म्हणून ती गौरवास्पद स्थान पावली !... आपल्या उच्च नि सर्वसमावेशक उदार विचारसरणीमुळेच शक-हूण-कुशाण इत्यादि आक्रमक टोळ्याही येथील संस्कृतीशी एकरूप होऊन गेल्या. वृष्णी, अभीर, यादव ह्या अवैदिकांना वंद्य असलेला काळा देवकीनंदन वैदिक इंद्राचा पराभव करता झाला आणि त्याचा दोस्तही बनला, पूर्णावतार मानला गेला !

थेट ऋग्वेदापासून सुरू झालेला हा राष्ट्रीय एकात्मतेचा यज्ञ, पिढ्यान् पिढ्या चाललाच होता. तो अधुनमधून मंदावला, संकटग्रस्त झाला, पण थांबला कधीच नाही. सिंधू नदीच्या तीरावर सुरू झालेला आणि संघर्षामागोमाग समन्वय साधणारा हा पवित्र यज्ञ, अगस्ती - अत्री इत्यादि ऋषीवर्यांनी आणि भार्गवराम, दाशरथी, राम इत्यादि महापुरुषांनी थेट दक्षिण सिंधूपर्यंत पोचविला ! किष्किंधेच्या सिंहासनावर सुग्रीवाला नि सुवर्णमयी लंकेच्या सिंहासनावर बिभिषणाला बसवून, तो कृतकृत्य झाला !

रामायण-महाभारतादि महाकाव्यांनी आणि गीतेसारख्या समन्वयवादी अध्यात्म ग्रंथांनी, भारताला एकात्मतेच्या सूत्रात बांधण्याचे केवढे प्रचंड कार्य केले, हे आजही भारताच्या कोणत्याही प्रदेशात दिसून येते. उच्च भौतिक नि पारमार्थिक आदर्श ह्या ग्रंथराजांनी येथील जनतेसमोर ठेवले. ह्या बहुमोल संस्कृत ग्रंथांच्या आधारानेच येथील देशभाषांत साहित्यसोनियाच्या खाणी उघडल्या; विवेक-वहीची लावणी झाली; चिरंतन सांस्कृतिक मूल्यांची उद्याने बहरली !... निर्गुण-निराकाराच्या उपासनेपासून नागपंचमीच्या पूजेपर्यंत, सर्व थरावरील भक्तिपंथांचा समन्वय साधला गेला. सर्व प्रदेशातील थोर थोर आचार्यांनी वेद, उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे ह्यांच्यावर भाष्ये लिहून, भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया विस्तृत आणि मजबूत केला !

'मोल करो तलवारका !'

पण एकात्मतेचे सर्वाधिक कार्य कोणी केले असेल तर ते भारतातल्या हजारो संतांनी. त्यांच्यामुळेच भारतातील तीर्थक्षेत्रांना - त्यांच्या यात्रांना - अभूतपूर्व महत्त्व आले. त्यांच्या टाळमृदंगांच्या कल्लोळांनी, भक्तीगीतांनी आणि त्याहूनही नि:स्वार्थ, निष्कलंक जीवन-चरित्रांनी केवढी समता नि एकता निर्माण केली ! त्यांनीच जातिभेदाने बुजबुजलेल्या समाजाला खडसावून सांगितले —

जाति न पूछो संतकी
देख लियोजी ग्यान ।

मोल करो तलवारका
पडा रहा दो म्यान ।।

कडक नि कठोर चातुर्वर्ण्याची धार त्यांनीच बोथट केली; पण 'उच्च-नीच काही नेणे भगवंत' हे समाजाला शिकविले. आजही भारतातील सर्वसामान्य जनांची नैतिक विचारसरणी साधारणत: एकच दिसते, ह्याचे फार मोठे श्रेय तुलसीदास-सूरदास-कबीर-ज्ञानेश्वर-तुकाराम-रामदास-पुरंदरदास इत्यादि संतांच्या मांदियाळीस जाते !...

सत्ताराजकारणांतून पंजाबमध्ये अतिरेक्यांचा भस्मासूर निर्माण झाला, हिंदु-शिखांत वैमनस्य निर्माण झाले. पण ह्याच पंजाबांतील शिखांच्या दहाही गुरूंनी एकात्मतेचे केवढे भव्य सुवर्ण-मंदिर बांधले होते ! त्याची साक्ष आजही 'आदि ग्रंथ' देत आहे. ह्याची रचना मुख्यत: गुरू अर्जुन ह्यांनी केली. त्यांत गुरूनानक, गुरू अंगद, गुरू अमरदास व गुरू रामदास ह्या पहिल्या चार गुरूंचे विचारधन तर आहेच, शिवाय फरीद-बेनी-त्रिलोचन-रामानंद-कबीर-रामदास-सूरदास इत्यादि हिंदु-मुस्लीम संतांची भजने समाविष्ट करण्यात आली आहेत. आपल्या मराठी 'अभंगा'चा आद्य प्रणेता नामदेव तर भाविक शिखांच्या हृदयात एवढा ठसला आहे की आजचे अतिरेकीही त्याचा मूर्तिभंग करू शकत नाहीत ! जे नामदेवांचे, तेच रामदासांचे. आततायी नि अन्यायकारक मुसल्मानांचे 'बहुता दिवसांचे बंड' खंडित व्हावे म्हणून महाराष्ट्र धर्माची ज्योत प्रज्वलित करणारे समर्थ रामदास पण आपल्या मठांत ते मुसल्मान भगवद्भक्तांना मान देत आणि त्यांना 'अल्ला निरंजन दोउ नही रे' असे सांगत असत !

भारतीय साहित्याच्या उपवनात

संतांच्या उपदेशांतूनच नव्हे तर लौकिक साहित्याच्या उपवनांतूनही, राष्ट्रीय ऐक्यभावाचे पंचमालाप निनादत आहत; 'सारे जहाँसे अच्छा हिन्दोस्तां हमारा' ही भावना पाझरते आहे. भारतातील भाषा-भगिनींनी परस्परांशी केवढी देवाण-घेवाण केली हे पहाणे उद्बोधक ठरेल. जेव्हा सरकारी अनुदाने नव्हती, अकादम्या नव्हत्या, एकात्मतेचे कागदी तावूत खडे करण्यासाठी 'राष्ट्रीय एकात्मता समित्या' नव्हत्या, दूरदर्शन नव्हते, 'कल्चरल झोन' नव्हते, अशा काळी रामदासांच्या मनाच्या श्लोकांचे 'मन-समझावन' हे उर्दू रूपांतर उत्स्फूर्तपणे झाले आहे ! मिर्झा गालिबच्या सुफी रंगाच्या गझलांतून हिंदूंचा वेदान्त मधुबिंदूप्रमाणे ठिबकला आहे ! — "माझ्या फारसी कवितेला 'सोरटी सोमनाथा'चे पवित्र जानवे मी घातले आहे," असे अभिमानाने उद्गारणारा तो शायरेआझम् !... "संसार-दु:ख खूप झाले की माणूस अध्यात्माकडे जातो नि सत्चित्-आनंद भोगतो. जीवात्मारूपी बिंदु परमात्मा-रूपी सिंधूत विलीन होताच त्याच्या जन्माचे सार्थक होते," हाच वेदान्त —

इशरते कतरा है दरिया में फना हो जाना
दर्द का हदसे गुजरना है दवा हो जाना ।

ह्या शेरातून निनादतो आहे ! गालिबचा आश्रयदाता बहादुरशाह जफर —

'तक्ते लंदनतक चलेगी तेग हिंदुस्थानकी'

असा राष्ट्रीय आत्मविश्वास ललकारतो आहे !

उर्दू गझल-वाङ्मयांतही देशभक्तीवर अनेक गझल आढळतात. नामदार गोखले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी ह्यांच्यावरील प्रशंसापूर्ण गझलांनी ते शोभिवंत झाले आहे. चीनी-आक्रमणाच्या वेळी —

'राम और सीता के मुहब्बत की कसम खाके हिमाला चलो'

असे आवाहन उर्दू शायरांनी केले आहे ! कुठे बंगाल नि कुठे महाराष्ट्र ! पण स्वातंत्र्यपूर्व काळातच शरदबाबूंच्या कथा-कादंबऱ्यांची रूपांतरे मराठीत होऊन गेली आहेत; तर रवींद्रनाथ टागोरांची शिवाजी महाराजांवरील कविता बंगालमध्ये गाजली आहे ! 'सुब्रम्हण्यम् भारती' म्हणजे तर तामीळनाडूचे रवींद्रनाथ टागोरच. त्यांच्या साहित्याने राष्ट्रीय एकात्मतेचा ध्वज उंच फडकत ठेवला. विविध भाषांतील साहित्याच्या देवाणघेवाणींतून सहजच एकत्वाचे भावबंध निर्माण होतात. तीच गोष्ट संगीत नाट्यादि कलांची ! राजकीय आखाड्यात मराठी-कानडी वाद कितीही गाजो; कानडी 'यक्षगान' आधुनिक मराठी रंगभूमीच्या जन्मास कारणीभूत झाले आहे आणि मराठीतून १३७ नाटके कर्नाटक वाङ्मयात जाऊन बसली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

भारतातील बहुतेक सर्व भाषा संस्कृत भाषेच्या दुधावरच वाढल्या आहेत. म्हणूनच सर्व भाषांत हजारो साम्यस्थळे आढळतात. मेघ-चातक, मेघ-मयूर, कलम-भृंग, चकोर-चंद्रिका, ह्या जोड्या सर्वच भाषांची सेवा करताना दिसतात ! भारतीयांच्या स्त्री-विषयक कल्पना साधारणत: सर्वत्र सारख्याच. कालिदास-भवभूति-माघ-भारवी इत्यादि संस्कृत कविवर्यांचा ठसा जिच्यावर उमटला नाही, अशा एकही भाषा आढळणार नाही. उर्दूशायरीच्या रंगमहालात—

ले लो अपना बोसा वापस
काहे को तकरार की !

(सुंदरी, कशाला उगाच तक्रार करतेस ? चल, तुझे चुंबन तू परत घेऊन जा)

ह्या शेराने जी रंगत येते, तीच संस्कृतच्या रतिरंग मंदिरात शेकडो वर्षांपूर्वी —

'मह्यं समर्पय मदार्पित-चुंबनानि'

ह्या फर्माइशीने येऊन गेली आहे !

प्रियेच्या कृश कटीबद्दल संस्कृत प्रियकराने जो **'अस्ति नास्तीति संदेह:'** प्रकट केला होता, तोच

'सनम् सुनते हैं तेरे भी कमर है'

(प्रिये, तुलाही कंबर नावाचा अवयव आहे असे ऐकतो !)

ह्या खट्याळ उर्दू उक्तींतून प्रकट झाला आहे !

— सारांश, आमच्या लौकिक नि आध्यात्मिक जीवनात, आमच्या आवडी-निवडीत, आमच्या नीति-अनीतीच्या कल्पनांत, आमच्या साहित्यात-संगीतात- शिल्पांत समानतेचे जे हजारो धागे आजही उपलब्ध आहेत, त्यांनीच राष्ट्रीय एकात्मतेचे महावस्त्र विणले गेले आहे. ते आमच्या राजकारण-ग्रस्त स्वार्थांध दृष्टीला दिसत नसल्यामुळेच आम्ही नागडे-उघडे झालो आहोत. ह्या दूषित दृष्टीत राष्ट्रप्रेमाचे दिव्य अंजन घालून एकात्मतेचा साक्षात्कार घडविण्याचे व्रत प्रामुख्याने राजकारणेतर शक्तींना करावे लागेल. तसे झाले की राजकारणाचेही आपोआप अध्यात्मिकरण होऊन जाईल !

●

(उत्सव : दिवाळी १९८६)

२९. जा घेऊन संदेश जलधरा !

/ / / / / / / / / / / / / / / / / / / /

सुमारे २००० वर्षांपूर्वी महाकवी कालिदासाने आपल्या प्रतिभेने अजरामर केलेल्या महोदार मेघा ! आता तो कालिदास नाही, त्याचा रामगिरीवरील शापित यक्ष नाही, त्याची ती कैलासाच्या मांडीवर पहाराणीप्रमाणे विराजमान झालेली सुंदर अलकानगरी नाही, त्या नगरीला भूषणावह बनलेली ती 'तन्वी श्यामा, शिखरी-दशना, पक्व बिंबाधरा, अलस-गमना' अशी मीलनातुर यक्ष पत्नी नाही !

आता शेकडो वेदनांची शल्ये उरी धारण केलेला, सत्ताराजकारणाने बुजबुजलेला आणि नीतिमूल्ये घटलेला अशांत भारत विद्यमान आहे ! पण इतिहासजमा झाला आहे त्याचा कालिदास-कालीन वैभवाचा नि सुखशांतीचा जमाना ! आता नागपूरनजीकच्या रामटेकवर-रामगिरीवर-रामाच्या नि सीतेच्या आख्यायिका आहेत. पण त्या काळची ती पवित्रता आणि हिरव्यागार वृक्षांची 'स्निग्ध छाया' विशेष उरली नाही. आता रामटेकवर कालिदासाचे स्मारक उभे आहे, पण त्याचे ते नितांत सुंदर 'मेघदूत' काव्य नवीन पिढीला फारसे ठाऊक नाही ! तेथे वेळोवेळी आमदारांनी, खासदारांनी आणि नोकरशहांनी ज्याची मजा लुटली आहे असे डाकबंगले आहेत. पण हाय हाय, तो विरही यक्षाच्या अश्रूंचा साथीदार बनलेला रामगिरी-आश्रम कुठेच नाही !

असे प्रचंड स्थित्यंतर झाल्यानंतरही हे घरंदाज घना, तू तुझे कुलव्रत न सोडता, आषाढाच्या प्रथम दिवशी इंद्राच्या ऐरावताप्रमाणे आकाशाच्या अमरावतीत आला आहेस, रामगिरीच्या शिखरावर शोभला आहेस ! इतकी वर्षे उलटली तरी तू त्या विरही शापित यक्षाला आणि त्याच्या निष्ठावंत प्रियेला विसरला नाहीस. रामप्रभूंचा चरणस्पर्श लाभलेल्या रामटेकला विसरला नाहीस. धन्य तुझी निष्ठा, धन्य तुझे मित्र प्रेम !

घन:श्याम सुंदरा जलधरा, तुझे स्वागत असो. गगन-गोकुळाच्या गोविंदा, इंद्रधनुष्याचे मोरपीस मस्तकी धारण करणाऱ्या मुकुंदा, कालिदासीय कवितेची याद करून देणाऱ्या आनंदाच्या कंदा, तुझे स्वागत असो ! एका शाप-पीडित यक्षासाठी अपार कष्ट घेतलेल्या प्रणयदूता, मित्रवर्या, तुझे कुशल असो ! सह्यगिरीपासून रामगिरीपर्यंत पसरलेल्या

हा गुणपूजक महाराष्ट्र तुझे मन:पूर्वक स्वागत करीत आहे. आदराची असंख्य फुले मेघावर उधळत आहे. हा कालिदास जयंतीचा दिवस - हा आषाढाचा पहिला पुण्य दिवस - चुकू नये म्हणून बाल्याच्या वेगवान रथावर बसून, रामगिरीवर उपस्थित झालेल्या दिलदार जलधरा, तुझे स्वागत असो!

तू नेहमीच्या नेमाने या वर्षीही उत्तरेस अलकावतीकडे निघाला असशील. पण एवढी घाई कशाची? हवा रामगिरीवर थोडी विश्रांती घे. शरद मंत्रीमंडळात स्थान न मिळालेले दु:खी, कष्टी मंत्री कदाचित येथेच रामटेकवर तुला भेटतील आणि 'आमची दर्दे दिल की बात जाता जाता दिल्लीश्वरांना कळवा,' असा आर्त आक्रोश करतील! मित्रा मेघा, त्यांच्या राजकारणात तू गुंतू नकोस. पण त्या रामभाऊ मेघ्यांना अथवा श्रीकांतजी जिचकरांना तू यक्षाच्या शब्दात धीर देऊ शकशील.

कोणा लाभे सुखचि सगळे,
दु:ख तैसे सदाची?
होती खालीवरी सतत ही
भाग्यचक्रे नराची!

त्या माजी मंत्र्यांना असा दिलासा तू दे आणि मग हे गगन वृंदावनातील घन:श्यामा! कालिदासाच्या लाडक्या विदर्भावर तुझ्या रिमझिम धारांचा प्रेमळ अभिषेक करून तुझ्या प्रवासास प्रारंभ कर.

अरे आषाढ मेघा, अरे प्रगाढ मित्रा! तुला खचितच 'मेघदूता'त वर्णन केलेला प्रवास आठवत असेल. खरेच, त्या काळची ती हवाई मुसाफिरी किती मस्त मजेदार होती! तेव्हा आकाशमार्गावर इंडियन एअरलाइन्सच्या विमानांची 'उडाण टप्पू' वर्दळ नव्हती! त्या काळी मानससरोवराकडे निघालेले राजहंस आणि पांढराशुभ्र सारसपक्षी तुझी साथ करीत असत. मधुर कूजन करणारे चातक पक्षी तुझ्या सोबतीस असत. पण आता? पक्षीय राजकारणी बगळ्यांनी गजबजलेली विमाने तुझ्या मुसाफिरीत व्यत्यय आणतील. सदान्कदा दिल्लीवारी करणाऱ्या सत्तालोलुपांच्या ह्या विमानांपासून तू सात योजने दूरच राहणे बरे! अरे आल्हाददायक आषाढ मेघा, जशी ही हवाई जहाजांची ये-जा तुझ्या स्वच्छंद विहाराला तापदायक ठरेल, तशीच काही ठिकाणची वायुप्रदूषणे तुझ्या नाकीनऊ आणतील. वृक्षमित्रा, ठिकठिकाणची वृक्षांची कत्तल पाहून तू दु:खाश्रु गाळशील. वनसंपदा ज्या प्रमाणात नष्ट होते त्याच प्रमाणात जलसंपदादेखील रोडावते. म्हणूनच ठायी ठायी जलटंचाईने हैराण झालेली जनता बघून, तुला फार खेद होईल आणि मग तो २००० वर्षांपूर्वीचा घनदाट अरण्याचा, निर्मळ जलसंपत्तीचा, धूरओकत्या कारखान्यांनी दूषित न केलेल्या स्वच्छ वातावरणाचा जमाना तुला आठवेल. त्या जमान्यातील तुझा तो रामगिरी ते अलकानगरीपर्यंतचा प्रवास....

अगा विजेच्या वल्लभा, अगा सौदामिनीच्या साजणा, अगा गोऱ्यागोऱ्या बिजलीच्या

काळच्या सावळ्या प्रियकरा ! तुला प्रवासात थोडीही तकलीफ होऊ नये म्हणून गिरीशिखरांची विश्रामधामे (हिल्स्टेशनवरील सरकारी सर्किट घरे नव्हे) हिरव्यागार वृक्षांचे पंखे घेऊन जागोजागी सिद्ध होती, तुझ्यावर फिदा झालेल्या शेकडो नद्यांची शीतल जले तुझ्याखातर उचंबळत होती, रेवा नदीची - नर्मदेची शुद्ध प्रीती तिच्या शुभ्र दुधाळ लाटातून आणि आदर भावना तिच्या जयघोषातून प्रकट झाली होती. वेत्रवती (बेटवा) नदीसारख्या तुझ्या लाडक्या सरितांनी, तरंगरूपी भुवयांचे चंचल विलास दाखवून तुझ्यावरील मदहोष मुहब्बत व्यक्त केली होती ! कित्येक संगमोत्सुक सरितांनी, तू नाही तर तुझे प्रतिबिंबच आपल्या हृदय-दर्पणात घट्ट धरून ठेवले होते. 'गंभीरा' नामक नदी तर तुझी मोहनी मूरत नि सावळी सूरत पाहून इतकी सुरतोत्सुक झाली होती की, ती केवळ नाममात्रच 'गंभीरा' राहिली. त्या 'मीनाक्षी 'चे नेत्र कामवासनेने लकाकले आणि जलप्रवाहाच्या निळ्या पदराचीही शुद्ध तिला उरली नाही ! तुझे काळे-निळे रूप जेव्हा गंगेत प्रतिबिंबित झाले तेव्हा स्वर्गातील देवांना वाटले होते की, 'धरतीने आपल्या शुभ्र मुक्तावलीत इंद्रनीळ मणीच धारण केला आहे.'

अरे यक्षाच्या परममित्रा, गगनविहारी जलधरा ! तुझे त्या प्रवासातले सौख्य काय वर्णावे ? केवळ नखरेल नद्यांनीच नव्हे, तर नाजुक नारींनीही तुझे स्वागत केले होते. मावळ्यातील मुग्ध किसानकन्यांपासून तो अलकावतीच्या विलासवंतीपर्यंत सर्वांचेच नेत्र तुझ्याकडे कौतुकाने वळले होते, प्रेमाने खिळले होते. मध्यरात्रीच्या गडद अंधारात कुण्या चारूदत्ताकडे निघालेल्या वसंतसेनांचा खडतर मार्ग, तू विद्युत्दीपिकांनी उजळताच, त्यांच्या कृतज्ञ नजरांचे नजराणे, त्या चारूदत्ताच्या आधी तुलाच प्राप्त झाले होते. उरोजांवरील नखक्षतांचे दुःख, तुझ्या शीतल तुषारांनी कमी होताच उज्जयनीच्या कामिनींना तू चंदनलेप लावणाऱ्या प्रियकराप्रमाणेच सुखावह वाटला होतास आणि त्यांच्या दीर्घकटाक्षांनी तुझ्या दिलाला गोड गोड गुदगुल्या केल्या होत्या.

रसिकराज मेघा, लचकत मुरडत चालणाऱ्या सुंदर नद्यांनी नि नारींनी तर तुझे प्रेमभराने स्वागत केलेच; पण विशेष हे की, धनाढ्य नगरींनी आणि उत्तुंग पर्वतशिखरांनीही तुला अक्षरशः डोक्यावर घेतले !... तुला आठवते ना ? पिकल्या आंबरायांनी सुवर्णगौर बनलेल्या आम्रकूट पर्वतावर तू जेव्हा विश्रांतीसाठी थांबलास, तेव्हा गगनातील गंधर्व संभ्रमित होऊन ललकारले, ''अहो पाहा, पाहा. हा तर मधोमध श्यामल असलेला वसुंधरेचा सुवर्णगौर उन्नत उरोज आहे !''

अशाप्रकारे सर्वांना नेत्रसुख देत आणि नेत्रसुख घेत तू अलकावतीला पोचला होतास. तुझे वैशिष्ट्य हे की, सुंदर नद्या, सुंदर नटया, सुंदर नारी नि सुंदर नगरी ह्यांच्या सौंदर्याचा आनंद चाखीत असतानादेखील तू कधीही मोहाच्या महापुरात वाहवत गेला नाहीस. तुझे नियत कार्य नि नियत मार्ग तू सोडले नाहीस. तुझी उच्च पातळी तू विसरला नाहीस. उलटपक्षी, तू तुझ्या प्रवासात पुण्यच जोडलेस. ठिकठिकाणच्या देवमंदिरात (उदाहरणार्थ,

उज्जयिनीजवळच्या महाकाल मंदिरात) तू आरतीच्या वेळेचा दुंदुभी झालास, चौघडा बनलास! ब्रह्मावर्त, कुरूक्षेत्र, कनखल, हरद्वार इत्यादि तीर्थक्षेत्रांची यात्रा तू पदरात पाडून घेतलीस. नर्मदा-गंगा-यमुना-सरस्वती इत्यादींच्या दर्शनाने तुझा पुण्याचा ठेवा वृद्धिंगत झाला होता.

परमदयाळू पयोदा! असाच पुण्यसंचय आताही घडेल याची मात्र हमी देता येत नाही. कारण, या दंभाचारी, भ्रष्टाचारी जमान्यात तीर्थक्षेत्र नि पूजास्थानेही भ्रष्ट झाली आहेत. पुण्य-सरितांची जलसंपदा दूषित झाली आहे. अरे, गंगेच्या शुद्धीकरण प्रकल्पात लक्षावधी रुपये बुडाले. तिचे पाणी अद्यापि शुद्ध झालेले नाही! म्हणूनच म्हणतो दिलदार दोस्ता, तू तुझा प्रवास जपूनच केला पाहिजे. जमाना बदलला आहे. जिवलग मेघा, जमाना बदलला आहे. तुला पुण्याचे नि सुखाचे कण मोठ्या साक्षेपानेच उचलले पाहिजेत. त्या काळी मध्यप्रदेशातून, माळव्यातून जाताना तुला वत्सराज उदयनसारख्या साल्स राजांच्या रम्य कथा ऐकावयास मिळाल्या. मालविकांची कृतज्ञ बरखा-बहार गीते तुझ्या कानाला आनंद देऊन गेली. पण आता? आता त्याच मुलुखात विभा मिश्रा-कारंथ यांच्या विचित्र इश्काचे तराणे आणि अर्जुनसिंग, विद्याचरण इत्यादींच्या चमत्कारिक सत्तालंपट कथा ऐकण्याचा बाका प्रसंग तुझ्यावर ओढवेल! केवळ विरोधी पक्षांच्या दुहीमुळे जे कसेबसे नुकतेच निवडून आले त्या अर्जुनसिंगाच्या आख्यायिका ऐकून तुला कोणता पुण्यलाभ होणार आहे? त्यापेक्षा हृदय परिवर्तन झालेल्या चंबळखोऱ्यातील डाकूंच्या विशेषत: आता गृहिणीपद स्वीकारलेल्या फुलनदेवीच्या कथा ऐकणे बरे! मित्रा पयोधरा, भोपाळनगराजवळून जाताना तुला अद्यापि भीषण वायूगळतीच्या करुण कथा ऐकावयास मिळतील. तेथील विपद्ग्रस्तांना आपल्या स्निग्ध गर्जिताने तू यथाशक्य दिलासा दे. पण मित्रा जलधरा, तू प्रयाग क्षेत्रावर व त्या अलाहाबादेवर जराही रेंगाळू नकोस. कारण तेथे नुकत्याच झडलेल्या निवडणूक-युद्धात साधनांची शुचिता उभय पक्षांनी त्रिवेणी संगमात बुडविली! तेथील निवडणुकीत धारावाही कलावंत कसे वाहवत गेले, श्रीराम-सीता या देवतांची कशी दुर्दशा झाली, जातीय भावनांना कसे आवाहन करण्यात आले, जात्यंध लीडर कसे बेडरपणे मिरविले, उभयपक्षी पैशांचा पूर कसा वाहला इत्यादींच्या उद्वेगजनक कहाण्या तुझ्या कर्णसंपुटात शिरतील! मध्यप्रदेश काय अथवा उत्तर प्रदेश काय, हे दोन्ही प्रदेश म्हणजे धनवत्तरांच्या भ्रष्टाचारांची कुजट कोठारेच! येथील कोणत्याही उंच हवेलीत तू डोकावू नकोस. तुझा जीव तेथे वैतागेल. त्यापेक्षा कुरूक्षेत्र-हरद्वार-हृषिकेश-कौंचरंध्र इत्यादि तीर्थस्थळांची यात्रा करून तू कैलासाकडे निघावेस हेच उत्तम. मित्रा मेघा, १७६३ साली एका उदात्त राष्ट्रीय ध्येयवादास्तव परक्या आक्रमकांशी लढताना हजारो मराठावीर शौर्याची शर्थ करता करता जेथे गारद झाले त्या पानिपतच्या मैदानावर तुझ्या पुण्यजलाचा अभिषेक करण्यास तू विसरू नकोस!

पुण्यवंता जलवंता! बोफोर्स तोफांप्रमाणे गाजत असलेल्या कैक भ्रष्टाचार कथांनी तुझे कान किटण्याचा नि मन विटण्याचा संभव असला तरी आम्ही तुझे प्रेमिक सदिच्छा

व्यक्त करितो की शुभा: ते पंथान: सन्तु!.... पूर्वीप्रमाणेच आजही केतकी सुगंधाने घमघमणारी घनदाट राने, मयूरकेकांनी निनादणारी गिरी-शिखरे, ' अंगे भिजली जलधारांनी ' अशा तरुण युग्मांची कृतज्ञ अभिनंदने, इश्काच्या कैफाने धुंद झालेल्या नद्यांची अवखळ नर्तने, विहंगमांची कुंज-कूजने तुला आल्हाद देवोत!

काय म्हणतोस? राजधानी दिल्ली पाहून पुढे जाण्याचा विचार आहे? नको रे नको. तुझ्या सात्त्विक मनाला तिथे फार क्लेश होतील. मित्रा मेघा, आजही मोंगलाई थाटमाट मिरविणाऱ्या दिल्लीमधील कुतुबमिनार, राष्ट्रपती-भवन, संसद-भवन इत्यादि भव्य इमारती आणि आधुनिक नवाबजाद्यांनी गजबजलेली पंचतारांकित हॉटेले खूपच शानदार आहेत खरी - पण त्यातील संस्कृती खरी नाही! तेथील हॉटेलांतील नाना देशांच्या रंगेल नखरेल नारी तुझ्या रसिक नेत्रांना क्षणभर सुख देतील हेही खरे, पण ' काय भुल्लासी वरलिया रंगा ' हे संतवचन तुला आठविल्याविना राहणार नाही. मित्रा मेघा, घटकेत गाढवाचा गोपाळशेठ नि वाघ्याचा पाग्या बनवू शकणारी तेथील राजकीय कारस्थाने, मोगलाई मिजास मिरविणाऱ्या नोकरशाहांची भ्रष्टाचारी दर्शने, काळे झेंडे हलवीत ' झिंदाबाद मुर्दाबाद ' करणारी तीव्र निदर्शने तुला सुखावह होतील काय? कशाला महाराष्ट्राच्या मंत्र्यांप्रमाणे वा खासदारांप्रमाणे दिल्लीला उगाच वेळ वाया घालवितोस? जा जलधरा, त्या बर्फाच्छादित कैलासाकडेच तू सत्वर जा!

आता तेथे यक्षपत्नी नाही. मग तू संदेश तरी कोणता आणि कोणाला सांगणार? ही तुझी अडचण आम्ही दूर करितो. परोपकारी मेघा, कालमानाप्रमाणे परोपकाराची कार्यक्षेत्रे बदलत असतात. म्हणून त्या यक्षाऐवजी आम्हीच आमचा जिव्हाळ्याचा निरोप तुझ्याबरोबर धाडू इच्छितो. कोणाला? त्या कैलासनाथ श्रीशंकराला! जा, ' जा घेऊनी संदेश जलधरा! '

तुझ्या स्निग्ध, गंभीर गडगडाटाने भोलेनाथाला त्याच्या योगनिद्रेतून जागृत करून, आम्हा सामान्यांचे दु:ख सांग. आमचे बेळगावसारखे प्रश्न आणि शेकडो प्रकल्प वर्षानुवर्षे ताटकळत आहेत. आमच्या कैक योजना भ्रष्टाचाराच्या कर्दमात रुतून बसल्या आहेत. जागोजागी आतंकवाद्यांनी आणि फुटीर प्रवृत्तींनी उच्छाद मांडला आहे. महागाईच्या नि बेकारीच्या खाईत जनता आणि सत्तासंपादनाच्या घाईत पक्षोपक्ष खितपत पडले आहेत! हे विश्वंभरा, कैलासेश्वरा, शिवशंकरा गरिबांच्या मस्तकावर तुझा वरदहस्त ठेवून आणि उन्मत्तांच्या उरावर तुझा त्रिशूळ रोखून हा तुझा देश सुखी, समृद्ध कर!

बस्स! हाच आमचा निरोप आषाढाच्या पहिल्या जलदा, जल्दीने हा निरोप निवेदन कर. तुझे उपकार आम्ही विसरणार नाही. आमची जशी सुखवैभवापासून ताटातूट झाली आहे तशी तुझी तुझ्या प्रियेपासून - बिजलीपासून - कधीही ताटातूट न होवो.

(' माभूदेव क्षणमपिच ते विद्युत: विप्रयोग: ' हीच आमची शुभेच्छा!)

●

(लोकमत : २१-७-८८)

३०. स्वातंत्र्यवीरांचे वंदेमातरम्

काही अपवादात्मक कुलांगार कारटी वगळल्यास, ज्याला आपली जननी नि जन्मभूमी प्रिय नाही, असा माणूस जंगली जमातीतही सापडणे शक्य नाही. जगातील सर्वच देशात, - सर्वच समाजात - माता (आणि प्रत्यही शेकडो मातांना जन्म देणारी मातृभूमी) हा प्रेमादराचाच विषय आहे. परंतु ह्या सर्व देशात भारत देशच फार प्राचीन काळापासून मातृ-पूजनात आघाडीवर आहे. भारतासारखी उत्कट मातृभक्ती अन्यत्र कोठेही आढळणार नाही. मातृ-गौरव हे भारतीय संस्कृतीचे एक महनीय मूल्य आहे; 'न मातुः परदैवतम्' ही मातृपूजक भारतीयांची दृढधारणा आहे; भारताच्या वेदान्ताने-अध्यात्माने - मातेची मंगल महती सर्वोच्चपदी नेऊन ठेवली आहे.

भारतीय तत्त्वज्ञानानुसार निर्गुणनिराकार परब्रह्माला-परमेश्वराला-जगदीश्वरालादेखील जगताची निर्मिती एकट्याच्या बळावर करता येत नाही. त्याला सगुण साकार होण्यासाठी प्रकृतीचे साह्य घ्यावेच लागते. तो सर्वशक्तिमान परम पुरुषदेखील जिच्या कृपेविणा पांगळा-दुबळा ठरतो, जिच्या चतुर साहाय्याविणा त्या श्रेष्ठ सूत्रधाराचे जगन्नाटक विश्वाच्या विराट रंगमंचावर होऊच शकत नाही, त्या प्रकृतीलाच " चित्शक्ति, शिवशक्ति, आदिमाया अथवा जगन्माता " असे म्हणतात !

ह्या जगन्मातेचीच, 'सुजलां, सुफलां, मलयजशीतलाम्' इत्यादि विशेषणांनी वर्णिलेली, सर्वश्रेष्ठ प्रतिमा आम्ही भारतीय मायभूमीच्या ठायी शतकानुशतके पाहत आलो आहोत; जन्मदात्या आईच्या रूपात आम्ही त्या जगदंबेचे पुण्यदर्शन घेत आलो आहोत !

निसर्गतःच क्रमप्राप्त असा राष्ट्र-मंत्र

ह्या आमच्या तात्त्विक मनोधारणेतून नि श्रद्धेतून जे मातृपूजनाचे महामंगल मूल्य विकसित झाले ते आमच्या जीवनाच्या अणूरेणूत स्फुरण पावत आहे. इतके की जीवनात जे जे श्रेष्ठ, जे जे अत्यंत आदरणीय, जे जे आम्हाला अत्यंत दिलप्यार ते ते सारे मातृस्वरूपातच भासमान होते. आमचे नटसम्राट बालगंधर्व जेव्हा आपल्या उदार प्रेक्षकांना 'मायबाप' म्हणत, तेव्हा हेच महनीय मूल्य सहजगत्या प्रकट होत असे ! गुरूलादेखील 'माऊली' म्हणण्याचा रिवाज आमच्या समाजात पडला आहे. पंढरीच्या पांडुरंगालादेखील

'माय माझे विठाबाई माउली' अशीच हाक आमच्या संत महंतांनी मारली आहे. फार काय सांगावे, "स्त्री ही क्षणकालाची पत्नी असली तरी अनंतकाळाची माता आहे" असे सुभाषित एखाद्या आधुनिक नाटकात प्रकट होताच, ते प्रेक्षकांच्या हृदयाचा तत्काळ ठाव घेते, ह्याचे कारण त्यामागे उभी असलेली दशसहस्र वर्षांची मातृपूजनाची पवित्र परंपराच !

असे हे भारताच्या रोमरोमी भरलेले मातृ गौरव-मूल्य शंभर वर्षांपूर्वी बंगदेशात बंकीमचंद्र चट्टोपाध्याय ह्यांच्या मुखातून सहजस्फूर्तीने गीत रूपाने प्रकटले आणि अल्पावधीतच 'आनंदमठ' कादंबरीतून सर्वत्र प्रसारित झाले. कोट्यवधि भारतीयांच्या हृदयांत ठसले नि कंठांतून एखाद्या समरघोषणेप्रमाणे बाहेर पडले... तेच, तेच आपले राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' ! आपल्या राष्ट्राच्या अनन्यसाधारण परम-पवित्र सांस्कृतिक मूल्याशी सुसंवादी असणारे ते 'वंदे मातरम्' गीतच, आमचे राष्ट्रगीत होणे निसर्गत:च क्रमप्राप्त होते. कारण, त्या मातृ-पूजक गीतातच भारतीयांचा अंतरात्मा जागृत करण्याचे, हृदयवीणेच्या तारा छेडण्याचे, त्यांना असीम त्यागाला सिद्ध करण्याचे स्वयंभू सामर्थ्य होते. शेकडो हुतात्म्यांच्या रक्ताभिषेकाने त्या गीताला मंत्राचा महिमा प्राप्त झाला. 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय संग्राम-वेदातील सूक्त बनले !

मंत्रद्रष्टा भाष्यकार

सन १९०५-०६ मध्ये, बंगालच्या फाळणीचे भूत गाडण्यासाठी देशभक्तांच्या ज्या सभा भरल्या त्यात, (आणि विशेषत: १९०६ च्या एप्रिलमध्ये बारिसाल येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात) 'वंदे मातरम्' हा मंत्र कुरुक्षेत्रावरील पांचजन्याप्रमाणे दुमदुमताच साऱ्या भारतवर्षात त्याचे प्रतिध्वनि उठले; ह्या मंत्राने पुनीत झालेला स्वातंत्र्याचा रणयज्ञ अखिल भारतात विशेषत: महाराष्ट्रात प्रदीप्त झाला ! आणि मग त्याच १९०६ च्या चैत्रमासात त्याला एक समर्थ मंत्रद्रष्टाच भाष्यकार म्हणून लाभला - त्या 'शापादपि शरादपि' भाष्यकाराचे नाव स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर ! समसमा संयोग झाला; त्या मंत्ररत्नाला महाभाष्याचे सुवर्ण-कोंदण मिळाले ! त्या 'वंदे मातरम्' राष्ट्रगीताचे नुसते भाषांतर नव्हे, तर 'वंदे मातरम्' हा बीजमंत्र घेऊन निर्माण झालेले अन् त्या राष्ट्रगीताइतकेच स्फूर्तिशाली स्वतंत्र गद्यकाव्य ! 'ज्ञानेश्वरी' ही जशी भगवद्गीतेची अनुकृती नव्हे, तर गीतेच्या अनुरोधाने स्वतंत्र प्रतिभेने रचलेले एक काव्यमय भाष्य आहे, तसेच हे वीर विनायकांचे गद्यकाव्य-'वंदे मातरम्'मधील मंत्रशक्ति उलगडून दाखविणारे-प्रतिभाशाली भाष्य ! 'बिहारी' साप्ताहिकाच्या चैत्र शुद्ध २ शके १८२८ च्या अंकात ते प्रथमत: प्रकाशित झाले. (प्रज्वलंतच्या दि. ३ सप्टेंबर १९७६ च्या अंकात ते प्रसिद्ध झाले आहे.)

सावरकरांच्या ह्या गद्य-काव्याचे, 'वंदे मातरम्' भाष्याचे, भारताच्या प्रमुख

भाषात भाषांतर झाले पाहिजे; ते क्रमिक पुस्तकात समाविष्ट झाले पाहिजे. कारण हे केवळ गद्यकाव्य नव्हे तर एका क्रांतिकारक ऋषीच्या लेखणीतून प्रकटलेले पुरुष-सूक्त आहे; मातृ-उपनिषद आहे... (आणि ह्यार्चीच कविताबद्ध संक्षिप्त आवृत्ति म्हणजे, पुढे २ वर्षांनंतर [१९०८ साली] सावरकरांनी रचलेले " सकल जगामधि छान, अमुचा प्रियकर हिंदुस्थान ! ")

प्रतिभेचे गौरीशंकर-शिखर

वीर सावरकरांच्या या अवघ्या ४-५ पानी लेखात, बिंदूत सिंधूचे दर्शन व्हावे त्याप्रमाणे, अखिल भारताचे (भारताचा निसर्गरमणीय भूगोल, परमोज्ज्वल इतिहास नि अजरामर अस्मिता ह्यांचे) - पुण्यदर्शन मोठ्या मनोहारी शैलीत घडते. इतक्या सुंदर शैलीत की वाटते व्यास-वाल्मिकी नि कालिदास भवभूति ह्यांच्या काव्यरसात तेजस्वी देशभक्तीचा रंग मिसळूनच सावरकरांनी ह्या लेखासाठी विशेष शाई तयार केली आणि शिवरायांच्या भवानी तलवारीशी नाते सांगणाऱ्या पवित्र पोलादाची लेखणी करूनच त्यांनी ह्यातील रसिके अक्षरे लिहिली !

एखाद्या कुशल नाटककाराने, नाटकाच्या नांदीतच त्या नाटकाचे पायाभूत तत्त्व सांगावे-सुचवावे, त्याप्रमाणे स्वातंत्र्यवीरांनी प्रस्तुत लेखाच्या पहिल्या परिच्छेदातच सुचविले की ही भारतमाता म्हणजे त्या विश्वचालक चैतन्यशक्तीचीच ऐहिकमूर्ति ! सावरकर पहिल्या नमनातच म्हणतात — " ही वेदांत गायिल्याप्रमाणे पुराणीदेवी युवतिः पुरंध्री आहे. — अशा या प्रेममयीला आई म्हणण्याचे महद्भाग्य जिच्या प्रसादाने आम्हास लाभले त्या पारलौकिक चित्-शक्तिला व आमच्या ह्या ऐहिक परमेश्वरी आर्य भूमातेला आमचा सदैव प्रणाम असो ! "

आणि मग नांदीनंतर प्रेक्षकांच्या मनाची एकदम पकड घेणारे भव्य दृश्य, पडदा उघडताच डोळ्यांसमोर यावे तद्वत या वंदेमातरम् भाष्यात, ' हिमालय-विंध्य नि सह्य ' पर्वतांच्या गगनभेदी रांगा दृष्टीस पडतात. नगाधिराज हिमालयाच्या उत्तुंगतेचे कारण सांगताना सावरकरांची प्रतिभाही गौरीशंकर शिखर गाठून म्हणते — " सर्व जगतीतलावर पसरलेल्या हजारो भूभागांमध्ये आर्यभूसारखी रमणीय भूमी दुसरी कोणती आहे, हे पाहण्यासाठी हिमालय पर्वत उठून उभा राहू लागला. त्याने आपले डोके सर्व विश्वातील भूप्रदेश दिसतील इतके उंच केले, तरीही त्याला इतकी रमणीयता अन्यत्र कोठेच आढळेना ! "

सावरकरांचा हा देशभक्त हिमालय एवढेच करून कसा थांबेल ? भारतभूमीच्या तोडीचे सौंदर्य शोधण्यासाठीच त्याची शिखरे स्वर्गात घुसली. पण तेथेही भारतभूसारखे रमणीयत्व कोठेही आढळले नाही. उलटपक्षी, निराळाच प्रकार झाला. तो कोणता ? ' कुमार संभवा 'तील कालिदासीय हिमालय-वर्णन पचविलेली सावरकरांची लेखणी सांगते — " या हिमालयाची ती हिमधवल सौधशिखरे पाहून इंद्राच्या अमरावतीतील अप्सरांची

एकच त्रेधा उडाली ! त्या सर्वजणी हिमालयाच्या गळ्यात मिठी मारू लागल्या. अमरावतीचा त्याग करून, तेव्हापासूनच त्या हिमालयावर स्वच्छंदतेने विहार करीत असतात ! " — ह्या वर्णनावरील ' यश्चाप्सरो विभ्रम-मंडनानाम् ' इत्यादि कालिदासीय श्लोकांची छाया स्पष्ट आहे. पण सावरकरांची प्रतिभा त्या छायेपलीकडे जाऊन म्हणते — " ही बातमी पोचताच आश्चर्योत्सुक गिरिजेने गिरिजा रमणासह आपले बिऱ्हाड त्या प्रासाद सुंदर हिमनगराजावरील कैलासात नेऊन ठेवले ! " — ह्याच लेखात सावरकर असेही सांगतात की, " चीन देशाच्या बादशहाने चीनची भिंत बांधून तो देश जास्त बळकट केल्याचा वृथा गर्व करू नये म्हणून जिला उत्तरेकडे स्वत: निसर्गदेवीने हिमालयाची अत्युच्च व दुर्भेद्य भिंत उभवून दिली आहे आणि जिच्या दक्षिण-पूर्व-पश्चिम या दिशांनी समुद्राचा विस्तीर्ण खंदक संरक्षक करीत आहे त्या आमच्या भूदेवीला वंदन असो ! "

हिमालयाचे जरा विस्ताराने वर्णन करीत असतानाच स्वातंत्र्यवीर विंध्याद्रीला नि सह्याद्रीला कसे विसरतील ? सह्याद्रि, शिवशाहीच्या, मराठेशाहीच्या अतुल विक्रमाने गाजलेली सह्याद्रि ! त्याचे एकाच वाक्यात जे वर्णन सावरकरांनी केले ते वाचून ' अल्पाक्षर रमणीयत्वा 'चा तो भोक्ता — तो महाकवि कालिदास ' साधु साधु ' म्हणून गर्जला असेल ! स्वातंत्र्यवीरांची मार्मिक लेखणी लिहिते — " रायगड नि सिंहगड यांच्या रत्नांनी ज्याचा कळस शोभिवंत झालेला आहे, त्या स्वतंत्रेच्या देव्हाऱ्याने - सह्याद्रिने - हे आर्यभूमी, तू संपन्न आहेस ! "

सज्जनांच्या मनाप्रमाणे प्रसन्न !

ह्या ' वंदेमातरम् भाष्यात ' पर्वतवर्णनानंतर नद्यांचे वर्णन येणे क्रमप्राप्तच आहे. कारण त्या भारतमातेला ' सुजलां सुफलाम् ' करतात. ह्या नद्यांमध्ये गंगा सर्वश्रेष्ठ. भगवंताने गीतेच्या दहाव्या अध्यायात आपल्या विभूति सांगताना म्हटलेच आहे, ' स्रोतसाम् अस्मि जान्हवी ' गंगेचा हा महिमा ध्यानी असलेले सावरकर लीलया लिहितात — ' मनुष्यापेक्षा देव श्रेष्ठ, देवांमध्ये महादेव श्रेष्ठ परंतु त्या महादेवाच्याही मस्तकावर आरूढ झालेल्या भागीरथीने, हे आर्यभू तुला पुनीत केलेले आहे ! सिंधु, शतद्रू, ब्रह्मपुत्रा, यमुना ह्यांच्या रूपाने तू तुझ्या लेकरांसाठी स्वर्गीय पय:सुधेचे अखंडौघ सोडले आहेस. ' —

नद्यांच्या पाठोपाठ भारतभूमीची सरोवरे, तीर्थक्षेत्रे आलीच. प्रामुख्याने सज्जनांच्या मनाप्रमाणे रमणीय व प्रसन्न असलेले मानससरोवर ! ह्या सरोवरांच्या वर्णनाच्या वेळी साहजिकच रामायणातील " रमणीय प्रसन्नंच सज्जनानां मनो यथा " ही प्रसन्न उपमा सावरकरांना आठवली नसती, तरच नवल होते !

भारतमातेचे ' सुजलत्व ' सांगितल्यावर ' सुफलत्व ' नि ' संपन्नत्व ' सांगणे ओघानेच आले. ' वरी, नाचणी, भात पिकवितो कोंकणचा प्रांत । गहू-बाजरी-कापूस-शाळु देशावरि होत ॥' अशा रटाळ जंत्रीवजा पद्धतीने हे काम एखाद्या दुय्यम दर्जाच्या कवीने

केले असते. परंतु, 'वंदेमातरम्'चा हा प्रतिभासंपन्न भाष्यकार हेच कार्य, (एखाद्या कुशल चित्रकाराने कुंचलीच्या दोन चार फटकाऱ्यांतच संपूर्ण चित्र यथार्थ उभे करावे त्याप्रमाणे) मोठ्या साक्षेपाने नि सामर्थ्याने करतो. ते येणेप्रमाणे :-

" सर्व जगाचे जहाज केले असता ते गच्च भरून जाईल इतके सोने व इतकी रत्ने, हे आर्यमाते, तू शेकडो भुयारांतून आमच्यासाठी जतन करून ठेवली आहेस. त्यावाचून कोहिनुरांनी भरलेली पेटी गोवळकोंड्याकडे आहे ती वेगळीच ! "

ही झाली सुवर्ण-रत्न इत्यादींची समृद्धता आणि; आता पहा ही सस्य-शामल-धान्य समृद्धता ! " जिच्यामधील शेते ही नेहमी धान्याच्या मुठी भरलेले आपले हात उंच करून, डुलत डुलत सर्व मनुष्यजातीचा योगक्षेम चालविण्यास आपण समर्थ आहोत, असे यथार्थ स्वाभिमानाने दर्शवीत असतात,... त्या सुभगा भूदेवीला आमचे वंदन असो ! "...

वैनतेयाची तीक्ष्ण दृष्टी

भारताच्या निसर्गवैभवाचे विहंगमावलोकन करतानाही, ह्या वैनतेयाच्या तीक्ष्ण नि तरवेज नजरेतून कोणतीही प्रमुख गोष्ट सुटत नाही ! " पार्वतीच्या स्तनाप्रमाणे मधुर असलेली आम्रफले ! अप्सरांच्या अधरोष्ठांप्रमाणे सरस मृदुल असलेली द्राक्षे !... स्तनभाराने किंचित नम्र झालेल्या वनितांप्रमाणेच फलभाराने नम्र झालेल्या लता !... कनकारविंदाचे भोजन करणारे हंस ! लक्ष्मीला सदैव प्रिय असलेली प्रफुल्ल अरविंदे... शुक कोकिलादि विविध विहंगम ! जिला पाहून ब्रह्मदेवाने रंभेचे नाक कसे असावे हे ठरविले ती चंपक-कलिका ! ती जाई-जुई-मालती ! आणि दुभत्या गाईच नव्हे तर ज्यांच्या पाठी परमात्म्यांच्या हातच्या खराऱ्यांनी पुनीत झाल्या आहेत असे अश्व !... "

या साऱ्यांची काव्यमय नोंद करून 'वंदेमातरम्'चा हा महाभाष्यकार म्हणतो - " जे जे उत्तम आहे, जे जे उदात्त आहे, जे जे अभिलक्षणीय आहे व जे जे अभिप्सित आहे ते ते सर्व या भारतात परमेश्वराने भरून ठेवले आहे.. जे जे म्हणून निसर्ग देवतेला देता येणे शक्य होते ते ते सर्व संपूर्ण रीतीने लाभल्यामुळे जिला अद्वितीय चारुता नि श्रीमंती प्राप्त झालेली आहे, त्या भगवती आर्य भूजननीला आमचे सदैव वंदन असो ! "...

अधिक महत्त्वाचा उत्तरार्ध

वंदेमातरम् महाभाष्याचा उत्तरार्ध पूर्वार्धाहून अधिक महत्त्वाचा आहे. कारण; — 'कोटि कोटि भुजैः धृत-खरकरवाले ! 'बहुबल धारिणी', 'तुमि विद्या, तुमि धर्म', 'वाणी-विद्यादायिनी' इत्यादि गुणविशेषणात सूक्ष्मतेने दडून बसलेला भावार्थ स्वातंत्र्यवीरांनी ह्या उत्तरार्धात आपल्या पांडित्यपूर्ण पण ललित शैलीने अगदी स्पष्ट केला आहे. पूर्वार्धात प्रायः भारतभूमीचा निसर्गसंपन्न भूगोल आहे तर उत्तरार्धात कर्तृत्वसंपन्न इतिहास ! ह्या उत्तरार्धाची सुरुवात करताना हा प्रज्ञावंत महाकवि म्हणतो; — " स्वाभाविक सुंदरता

ही पूर्वभाग्याची द्योतक असली तरी, कर्तृत्वाची द्योतक नसते...., उत्तम देश तोच होय की ज्याच्या पुत्रांच्या अंगी काही तरी असामन्यत्व असते. ... वीर मातृत्वात जी भूमी सर्व जगात श्रेष्ठ ठरेल, तीच खरी श्रेष्ठ होय ! "

आणि मग विविध क्षेत्रातील भारतीय नरनारी रत्नाची कर्तबगारी ह्या महान इतिहास पंडिताने, वाचकांपुढे ठेवली आहे. अर्थात् येथेही स्थलाभावी ठळक ठळक घटनांचा नि व्यक्तींचाच निर्देश मोजक्या पण मनोहारी शब्दात करावा लागला आहे. एखादे विशाल भरजरी नि गभीरशामी महावस्त्र एखाद्या लहानग्या टीचभर हस्तीदंती पेटीत ठेवावे, अशी करामत सावरकरांच्या लेखनशैलीने करून दाखविली आहे. सर्व क्षेत्रातील भारतीय कर्तृत्वाचा लहानसा चलत् चित्रपट येथे काव्याच्या बहुरंगी रसायनाने रंगवून विद्वत्तेच्या पडद्यावर दाखविण्यात आला आहे !

" आमच्या भूमातेच्या वीर्यवान पुत्रांपैकी काहींचा जरी नामनिर्देश करू लागलो तरी, हे चंद्रा व हे सूर्या, तुमची तेजे फिकी पडू लागतील ! " अशी गौरवपूर्ण सुरुवात करून, ज्या वेळेस रोमचे नावही ऐकू येत नव्हते व ग्रीस देशात वस्तीही झाली नव्हती अशा अतिप्राचीन काळात ते आपणास प्रथमत: घेऊन जातात आणि मोठ्या सार्थ अभिमानाने सांगतात, — " जेथे दंतकथेचे तीव्र टोकही बोथट होत आहे अशा सहस्त्रावधी वर्षांपूर्वीच्या काळातूनही ज्या भूमिमध्ये वेदघोष ऐकू येत आहे, त्या भूमीच्या भाग्याची तुलना कोणाशी करता येणार आहे ? जगातील कित्येक भाषांत ५०० - ६०० शब्दांचा भरणा नव्हता, त्या वेळी भारतातील ऋषीवरांनी संस्कृत भाषेला संस्कृत करून, तिला सूक्ष्म विचार-प्रदर्शनात प्रवीण केले होते ! त्या काळी वीर्यवान नि ब्रह्मवेत्त्या ऋषींच्या संमिती या भूमीवर तत्त्वज्ञानाचा वादविवाद करीत असताना, आपल्या आजपर्यंतच्या गौप्याचे स्फोटन होते की काय म्हणून परमब्रह्माला काळजी वाटे ! " —

विज्ञाननिष्ठ बुद्धिप्रामाण्यवादी

ऋग्वेद, अथर्ववेद, सामवेद, यजुर्वेद, ब्राह्मणे नि उपनिषदे ज्या भूमीची आहेत, त्या भूमीच्या अंगीरस, वसिष्ठ, वामदेव, याज्ञवल्क्य, भृगु इत्यादि ब्रह्मवेत्त्यांना तर सावरकरांनी गौरविलेच. पण एवढेच करून ते थबकले नाहीत ! सावरकर स्वत: आस्तिक असले, भावनाप्रधान असले तरी ' विज्ञाननिष्ठ बुद्धिप्रामाण्यवादी ' ! म्हणूनच भारताच्या निरीश्वरवादी अथवा अवैदिक तत्त्वविदांविषयीदेखील त्यांना अपार आदर. ... असा हा महापुरुष कपिलकणादांच्या परंपरेला कसा विसरेल ? आंधळ्या परंपरेला दूर भिरकावून विचारशक्तीचा दिव्य ध्वज ज्यांनी उंच उभारला; ' सिद्धानां कपिलो मुनि: ' असा ज्याचा यथोचित गौरव भगवद्गीतेने केला, त्या सांख्यशास्त्रप्रणेत्या कपिलाचा उल्लेख करून स्वातंत्र्यवीर विचारतात — " सर्व जगाला अजून वंद्य असलेल्या कपिल महामुनीनेदेखील जिला ' आई ' म्हणून वंदन करावे अशी एखादी भूमी ह्या जगावर किंवा चंद्र-मंगळ-बुधादि ग्रहांनो,

केले असते. परंतु, 'वंदेमातरम्'चा हा प्रतिभासंपन्न भाष्यकार हेच कार्य, (एखाद्या कुशल चित्रकाराने कुंचलीच्या दोन चार फटकाऱ्यांतच संपूर्ण चित्र यथार्थ उभे करावे त्याप्रमाणे) मोठ्या साक्षेपाने नि सामर्थ्याने करतो. ते येणेप्रमाणे :-

" सर्व जगाचे जहाज केले असता ते गच्च भरून जाईल इतके सोने व इतकी रत्ने, हे आर्यमाते, तू शेकडो भुयारांतून आमच्यासाठी जतन करून ठेवली आहेस. त्यावाचून कोहिनुरांनी भरलेली पेटी गोवळकोंड्याकडे आहे ती वेगळीच ! "

ही झाली सुवर्ण-रत्न इत्यादींची समृद्धता आणि; आता पहा ही सस्य-शामल-धान्य समृद्धता ! " जिच्यामधील शेते ही नेहमी धान्याच्या मुठी भरलेले आपले हात उंच करून, डुलत डुलत सर्व मनुष्यजातीचा योगक्षेम चालविण्यास आपण समर्थ आहोत, असे यथार्थ स्वाभिमानाने दर्शवीत असतात,... त्या सुभगा भूदेवीला आमचे वंदन असो ! "...

वैनतेयाची तीक्ष्ण दृष्टी

भारताच्या निसर्गवैभवाचे विहंगमावलोकन करतानाही, ह्या वैनतेयाच्या तीक्ष्ण नि तरवेज नजरेतून कोणतीही प्रमुख गोष्ट सुटत नाही ! " पार्वतीच्या स्तनाप्रमाणे मधुर असलेली आम्रफले ! अप्सरांच्या अधरोष्ठांप्रमाणे सरस मृदुल असलेली द्राक्षे !... स्तनभाराने किंचित नम्र झालेल्या वनितांप्रमाणेच फलभाराने नम्र झालेल्या लता !... कनकारविंदाचे भोजन करणारे हंस ! लक्ष्मीला सदैव प्रिय असलेली प्रफुल्ल अरविंदे... शुक कोकिलादि विविध विहंगम ! जिला पाहून ब्रह्मदेवाने रंभेचे नाक कसे असावे हे ठरविले ती चंपक-कलिका ! ती जाई-जुई-मालती ! आणि दुभत्या गाईच नव्हे तर ज्यांच्या पाठी परमात्म्यांच्या हातच्या खराऱ्यांनी पुनीत झाल्या आहेत असे अश्व !... "

या साऱ्यांची काव्यमय नोंद करून 'वंदेमातरम्'चा हा महाभाष्यकार म्हणतो - " जे जे उत्तम आहे, जे जे उदात्त आहे, जे जे अभिलक्षणीय आहे व जे जे अभिप्सित आहे ते ते सर्व या भारतात परमेश्वराने भरून ठेवले आहे.. जे जे म्हणून निसर्ग देवतेला देता येणे शक्य होते ते ते सर्व संपूर्ण रीतीने लाभल्यामुळे जिला अद्वितीय चारुता नि श्रीमंती प्राप्त झालेली आहे, त्या भगवती आर्य भूजननीला आमचे सदैव वंदन असो ! "...

अधिक महत्त्वाचा उत्तरार्ध

वंदेमातरम् महाभाष्याचा उत्तरार्ध पूर्वार्धाहून अधिक महत्त्वाचा आहे. कारण; — 'कोटि कोटि भुजैः धृत-खरकरवाले !' 'बहुबल धारिणी', 'तुमि विद्या, तुमि धर्म', 'वाणी-विद्यादायिनी' इत्यादि गुणविशेषणात सूक्ष्मतेने दडून बसलेला भावार्थ स्वातंत्र्यवीरांनी ह्या उत्तरार्धात आपल्या पांडित्यपूर्ण पण ललित शैलीने अगदी स्पष्ट केला आहे. पूर्वार्धात प्रायः भारतभूमीचा निसर्गसंपन्न भूगोल आहे तर उत्तरार्धात कर्तृत्वसंपन्न इतिहास ! ह्या उत्तरार्धाची सुरुवात करताना हा प्रज्ञावंत महाकवि म्हणतो; — " स्वाभाविक सुंदरता

ही पूर्वभाग्याची द्योतक असली तरी, कर्तृत्वाची द्योतक नसते...., उत्तम देश तोच होय की ज्याच्या पुत्रांच्या अंगी काही तरी असामन्यत्व असते. ... वीर मातृत्वात जी भूमी सर्व जगात श्रेष्ठ ठरेल, तीच खरी श्रेष्ठ होय ! "

आणि मग विविध क्षेत्रातील भारतीय नरनारी रत्नाची कर्तबगारी ह्या महान इतिहास पंडिताने, वाचकांपुढे ठेवली आहे. अर्थात् येथेही स्थलाभावी ठळक ठळक घटनांचा नि व्यक्तींचाच निर्देश मोजक्या पण मनोहारी शब्दात करावा लागला आहे. एखादे विशाल भरजरी नि गभीरशमी महावस्त्र एखाद्या लहानग्या टीचभर हस्तीदंती पेटीत ठेवावे, अशी करामत सावरकरांच्या लेखनशैलीने करून दाखविली आहे. सर्व क्षेत्रातील भारतीय कर्तृत्वाचा लहानसा चलत् चित्रपट येथे काव्याच्या बहुरंगी रसायनाने रंगवून विद्वत्तेच्या पडद्यावर दाखविण्यात आला आहे !

" आमच्या भूमातेच्या वीर्यवान पुत्रांपैकी काहींचा जरी नामनिर्देश करू लागलो तरी, हे चंद्रा व हे सूर्या, तुमची तेजे फिकी पडू लागतील ! " अशी गौरवपूर्ण सुरुवात करून, ज्या वेळेस रोमचे नावही ऐकू येत नव्हते व ग्रीस देशात वस्तीही झाली नव्हती अशा अतिप्राचीन काळात ते आपणास प्रथमत: घेऊन जातात आणि मोठ्या सार्थ अभिमानाने सांगतात, — " जेथे दंतकथेचे तीव्र टोकही बोथट होत आहे अशा सहस्त्रावधी वर्षांपूर्वीच्या काळातूनही ज्या भूमिमध्ये वेदघोष ऐकू येत आहे, त्या भूमीच्या भाग्याची तुलना कोणाशी करता येणार आहे ? जगातील कित्येक भाषांत ५०० - ६०० शब्दांचा भरणा नव्हता, त्या वेळी भारतातील ऋषीवरांनी संस्कृत भाषेला संस्कृत करून, तिला सूक्ष्म विचार-प्रदर्शनात प्रवीण केले होते ! त्या काळी वीर्यवान नि ब्रह्मवेत्त्या ऋषींच्या समिती या भूमीवर तत्त्वज्ञानाचा वादविवाद करीत असताना, आपल्या आजपर्यंतच्या गौण्याचे स्फोटन होते की काय म्हणून परमब्रह्माला काळजी वाटे ! " —

विज्ञाननिष्ठ बुद्धिप्रामाण्यवादी

ऋग्वेद, अथर्ववेद, सामवेद, यजुर्वेद, ब्राह्मणे नि उपनिषदे ज्या भूमीची आहेत, त्या भूमीच्या अंगीरस, वसिष्ठ, वामदेव, याज्ञवल्क्य, भृगु इत्यादि ब्रह्मवेत्त्यांना तर सावरकरांनी गौरविलेच. पण एवढेच करून ते थबकले नाहीत ! सावरकर स्वत: आस्तिक असले, भावनाप्रधान असले तरी ' विज्ञाननिष्ठ बुद्धिप्रामाण्यवादी ' ! म्हणूनच भारताच्या निरीश्वरवादी अथवा अवैदिक तत्त्वविदांविषयीदेखील त्यांना अपार आदर. ... असा हा महापुरुष कपिलकणादांच्या परंपरेला कसा विसरेल ? आंधळ्या परंपरेला दूर भिरकावून विचारशक्तीचा दिव्य ध्वज ज्यांनी उंच उभारला; ' सिद्धानां कपिलो मुनि: ' असा ज्याचा यथोचित गौरव भगवद्गीतेने केला, त्या सांख्यशास्त्रप्रणेत्या कपिलाचा उल्लेख करून स्वातंत्र्यवीर विचारतात — " सर्व जगाला अजून वंद्य असलेल्या कपिल महामुनीनेदेखील जिला ' आई ' म्हणून वंदन करावे अशी एखादी भूमी ह्या जगावर किंवा चंद्र-मंगळ-बुधादि ग्रहांनो,

तुमच्याकडे तरी आहे काय ?"...

भारताच्या उभय प्रणालींच्या तत्त्ववेत्त्यांचे साभिमान गुणगान केल्यानंतर 'विज्ञाननिष्ठ' सावरकर भारताच्या शास्त्रज्ञ परंपरेकडे उत्साहाने वळल्यास नवल कसले ? " दशांशाचा शोध, गुरुत्वाकर्षणाचा शोध या भूमीचा आहे. भूमिती ह्या भूमीत जन्मास आली. त्रिकोणामिती ह्या भूमीतील यज्ञवेदीत उत्पन्न झाली. सप्तसुरांचा (संगीतशास्त्राचा) उदय ह्या भूमीच्या कोमल कंठातून झाला. मत्स्यमंत्र-होकायंत्र ह्या भूमीत जन्मास आले. जगाला व्याकरणशास्त्राची पद्धती ह्या भूमीने दिली. पहिली सशास्त्र लिपी व वर्णमाला या भूमीत निर्माण झाली. मयसभेला उत्पन्न करणारे शिल्पशास्त्र ह्या भूमीच्या मालकीचे आहे. नाट्यशास्त्र, वैद्यकशास्त्र ह्याच भूमीत निर्माण झाले, " ही सर्व ठळक ठळक शास्त्रीय प्रगती मोठ्या अभिमानाने कथन करून हा महाकवि भारताच्या प्राचीन महाकवींच्या नि आर्ष कवींच्या अतुल कर्तबगारीचे दिव्य दालन वाचकांपुढे खुले करतो. रामायण-महाभारताचा, कालिदास-भवभूतीचा महिमा कथन करताना सावरकरांच्या हृदय-समुद्राला आनंदाचे नि आदराचे उधाण आले आहे ! इतके की क्षीरसमुद्रात शेषाच्या मंचकावर पहुडलेल्या वैकुंठेश्वराच्या वैभवाहून आपल्या भारतभूमीचे वैभव मोठे असे त्यांना वाटत आहे ! का ? तर रामायण हा आमचा क्षीरसागर. महाभारत हा आमचा दुसरा क्षीरसागर. शाकुंतल हा आमचा तिसरा क्षीरसागर व उत्तर रामचरित् हा आमचा चौथा क्षीरसागर. एका क्षीरसागरात राहणाऱ्या त्या लक्ष्मीकांताहून आम्ही भारतभूचे रहिवासी चौपट भाग्यशाली आहोत.

मन आकाशाहून विस्तृत होते !

भारतभूमीची धार्मिक क्षेत्रातील अभूतपूर्व कर्तबगारी कोणत्याही इतिहास संशोधकाला विसरता येणार नाही. सावरकरांसारखा सर्वधर्माचा अभ्यासक (आणि म्हणूनच हिंदुधर्माचा डोळस अभिमानी) तर ही कर्तबगारी विसरणे शक्यच नाही. साधारणतः स्वामी विवेकानंदांप्रमाणे, स्वातंत्र्यवीर सावरकर सांगतात, 'जगताची सर्वधर्म परंपरा येथूनच उद्भूत झालेली आहे. हिंदुधर्मापासून महात्मा बुद्धाने बौद्धधर्म प्रतिपादन केला. त्या बौद्धधर्माची एक प्रत उतरून घेऊन जीझसने ख्रिस्ती धर्म तयार केला. त्यात तलवारीचे पाणी ओतून महंमदी धर्म झाला. आणि त्या महंमदी धर्माचा ओघ गुरू नानकाने पुनः मूळ आर्यधर्माशी आणून भिडवला. धर्म हा जर तुमचा प्राण असेल तर... हे जगातील सर्व समाजांनो, तुम्हाला तुमचा प्राण दिल्याबद्दल ह्या आमच्या आर्यभूमीला वंदन करा !' वेदप्रणीत हिंदुधर्मातूनच जगातील प्रमुख धर्म उद्भवले, एवढेच सांगून सावरकर थांबले नाहीत, तर ह्या धर्माला जन्म देणाऱ्या भारतभूमीची उदारमनस्कताही त्यांनी प्रतिपादन केली आहे. 'साधनानाम् अनेकता' मानणाऱ्या ह्या भूमीची धारणा आहे की अखेर सर्व नद्यांचे पाणी जसे सागरालाच मिळते तद्वत् कोणत्याही देवाला केलेला नमस्कार अखेर त्या परब्रह्मालाच मिळतो.

अशा या महोदर वैदिक धर्माच्या संरक्षणार्थ सारे आयुष्य वेचणारे शंकराचार्य - रामानुजाचार्य - मध्वाचार्य - वल्लभाचार्य ह्यांचे स्मरण करून वंदेमातरम्चे महान् भाष्यकार भारताच्या स्त्रीरत्नांकडे वाचकांचे लक्ष वेधतात. तेथेही तीच अडचण. रत्ने मोजावीत तरी किती ! सावरकरांचे संक्षेप कौशल्य येथे पुनश्च दृष्टीस पडते. त्यांनी ह्या साऱ्या भारतीय स्त्री-रत्नांच्या प्रचंड राशीतील अत्यंत विश्ववंद्य रत्न- सर्व भारतीय साध्वींचे प्रतिनिधित्व करणारे स्त्री-रत्न-पुढे करून सुधामधुर ओळी लिहिल्या- " आम्ही एकच पवित्र नाव सांगतो ते ऐका. औदार्य, धाडस, पातिव्रत्य, सदयता, निसर्ग गंभीरता आणि दिव्य सुंदरता ह्या सर्व सद्गुणांना ज्या एकाच नावाने संबोधिता येईल असे एक नाव आम्ही आता सांगतो ते ऐका ! ज्या नामोच्चारणाने आम्ही नि आमचा देश हे सदैव पावन होतील असे आता एकच नाव सांगतो ते ऐका ! - - हे नाव श्री सीतादेवींचे होय ! ज्या भूमीच्या उदरी श्री जानकी पैदा झाली, त्याच भूमीच्या उदरी आमचाही जन्म झाला आहे, ही कल्पना मनात प्रवेश करताच ते आकाशाहून विस्तृत होते ! "

— परंतु इतकी संक्षेप चातुरी प्रकट केली तरी, प्रमुख प्रमुख नर-नारी-रत्नेच लेखाच्या तबकात दाटीदाटीने मांडली तरी, कित्येक राहूनच गेली, ही रुखरुख या साक्षेपी भाष्यकाराला टोचते. आणि मग तो ' कीं टिटिभू । चोंचूवेरी माप सूये सागरी ॥ " या ज्ञानेश्वरतुल्य नम्रतेने उद्गारतो — " भारत महोदधीच्या उदराशी जाऊन त्यातील हे चोंचभर पाणी ह्या टिटवीने आणले आहे ! "

वीररसाचे भरतवाक्य


येथेच हे महामंगल भाष्य — हे भारत-गौरव-स्त्रोत्र समाप्त झाले असते तरी वाचकांनी तृप्तीचा ढेकर दिला असता. पण सावरकरांना वाटले ह्या लेखाला अत्यंत समुचित असे ' भरतवाक्य ' पाहिजेच. इतके समुचित की ते एकच वाक्य वाचकांच्या हृदयात घंटानादासारखे घणघणत राहिले तरी कार्यभाग सफल व्हावा. आणि मग स्वातंत्र्यवीरांच्या वैशिष्ट्यपूर्ण वीररसाचा शिडकाव अंतिम परिच्छेदावर झाला तो असा —

" चित्तूरचे प्रतापसिंह, बुन्देलखंडाचे छत्रसाल, बंगालचे प्रतापादित्य, रायगडचे हिंदुपद-पातशहा, पुण्याचे शनिवारवाड्याचे मालक, ग्वाल्हेरचे महादजी, पानिपतचे मैदान, सिंहगडाची दरड, रांगण्याची खिंड - - - किती सांगावे, कसे सांगावे ? - - - हे स्वातंत्र्य-तिलक-भूषिते तुला आमचे वंदन असो ! - - - श्री शिव-प्रतापादि, तुझ्या शत्रूंच्या नरडीचा घोट घेत आहेत, त्या तुला आमचे वंदन असो ! वंदे मातरम् - - - वंदे मातरम् - - - वंदे मातरम् ! - - - "

' वंदे मातरम् ' ह्या राष्ट्रमंत्राचे रहस्य उलगडून दाखविणारे असे हे शक्तिशाली, वीर्यशाली, प्रतिभाशाली भाष्य आजच्या तरुणांना कंठस्थ करावयास उद्युक्त केले पाहिजे. नुसते कंठस्थच नव्हे तर हृदयस्थदेखील ! असे केले तर त्याची फलश्रुति अगदी निश्चित

पदरी पडेल. स्वाभिमानशून्यता विरून जाईल ! न्यूनगंडाचे न्यून मुळीच उरणार नाही ! आधुनिक पिढीला ग्रस्त करणारे षंढ वैफल्याचे बंड धुळीस मिळेल, राष्ट्रीय अस्मितेचा स्फुल्लिंग पेटून उठेल !

असे समर्थ भाष्य ज्याची लेखणी क्रांतिकारी जीवनाच्या कुरुक्षेत्रावर भाऊगर्दीतही सहज लीलया लिहू शकली, त्या कृतिशूर वीर विनायकाला, त्या तत्त्वशूर महान साहित्यिकाला - त्या क्रांतिदर्शी महापंडिताला जन्म देणाऱ्या आर्य वसुंधरे, तुला वंदन असो !




REFBK-0026895

(प्रज्वलंत: दीपावली १९७६)


स्वातंत्र्याचे वंदे मातरम्
मराठी मातीचे गोरे गोरे मोरपिसी
गोवो गांव भटकणारी गतिमान शायरी
उदार काचेची चमकदार दुनिया
रम्य ही भारतीय शाला
साखरेच्या बंडाभाई
महनीयांची मधुर स्मारके
हरिद्रा कुंकुम
तुका म्हणे अवघे सोंग, तेथे कैचा पांडुरंग